दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेमार्फत प्रसिद्ध केलेलें

# संस्थानी राजकारण

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

संग्राहक

काशिनाथ नरसिंह केळकर,

ॲडव्होकेट, पुणें

हें पुस्तक आर्यभूषण छापखाना, बुधवार पठे, पुणें येथें
अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

प्रथमावृत्ति ] किंमत एक रुपया [ १९२९

[ या पुस्तकासंबंधीं पुनर्मुद्रण, भाषांतर, वगैरे सर्व प्रकारचे हक्क संग्राहकानें **दक्षिणा संस्थान हितवर्धक सभेस** तिच्या कामाचें महत्त्व लक्ष्यांत घेऊन सुपूर्त केले आहेत. ]

# प्रास्ताविक दोन शब्द

केसरीचे संपादक रा. रा. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहब केळकर यांना त्यांच्या गेल्या पसतीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमांत केसरीचे सहसंपादक, संपादक व लोकपुढारी या नात्यानें संस्थानिक, संस्थानें व संस्थानी प्रश्न यासंबंधानें आपले विचार प्रदर्शित करण्याचे अनेक प्रसंग साहजिकपणें आलेले आहेत व त्या त्या वेळीं त्यांनीं त्या प्रश्नांबद्दल आपले विचार स्पष्ट शब्दांत प्रदर्शित केलेले आहेत. या सर्व उद्गारांचें प्रसिद्धीकरण संस्थानी प्रश्नांच्या आजच्या परिस्थितीच्या दृष्टीनें विचार करतां जरी अवश्यक आहे तरी आज तें करणें शक्य नसल्यामुळें त्यांतील निवडक लेख व भाषणें प्रसिद्ध करण्याची कल्पना रा. तात्यासाहेब यांचेपुढें मांडतांच त्यांनीं सदर योजनेस आपली संमति ताबडतोब [illegible]ली व यामुळें हें पुस्तक आज प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे. रा. रा. केळकर हे संस्थानी प्रजेच्यातर्फें चालविण्यांत आलेल्या चळवळीचे पुढारी गेलीं आठ वर्षें असल्यानें, त्यांनाही संस्थानी राजकारणाचें ज्ञान लोकांत प्रसृत होण्यास संस्थानी राजकारणावर लिहिलेल्या पुस्तकांची वाण पदोपदीं भासतच होती. संस्थानी प्रश्नांवर संघटित चर्चेचें पुस्तक तयार होऊन तें प्रसिद्ध करण्याचा योग केव्हां येईल तें आज सांगतां येत नसल्यामुळें, निदान निरनिराळ्या विषयांवरील सुसंबद्ध लेख ज्यांत आहेत असें एखादें पुस्तक लोकांच्या हातीं असणें अवश्य असल्यामुळें प्रस्तुतचें पुस्तक **दक्षिणी संस्थान हितवर्धक सभे**च्यामार्फत प्रसिद्ध करण्यांत येत आ[illegible].

रा. रा. केळकर यांनीं आपले संस्थानविषयक निवडक लेख व भाषणें छापून प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली, परंतु लेखांची व भाषणांची निवड करून त्यांचें संपादन करण्याचें काम सोपें नव्हतें. रा. केळकर यांना कै. टिळक यांचें चरित्र लिहिण्याच्या वेळीं इतर मंडळींबरोबर त्यांच्या चिरंजीवांनीं मदत केली असल्याचें माहीत असल्यामुळें सदहू काम त्यांनीं केल्यास लवकर व व्यवस्थित रितीनें होईल असें वाटल्यावरून सदरचा प्रश्न रा. काशिनाथपंत यांचेपाशीं मीं काढला व त्यांनीं **तें सदरचें संपादना**चें काम करण्याचें मोठ्या उत्सुकतेनें

कबूल केलें. रा. काशिनाथपंत यांनां हें पुस्तकसंपादनाचें काम किती योग्य रितीनें केलें आहे तें या पुस्तकांचीं पानें वरवर चाळलीं असतांहि कळून येणार आहे. रा. काशिनाथपंत यांनीं हें पुस्तकसंपादनाचें जिकीरीचें काम पुरें करून, शिवाय सदरच्या पुस्तकाबद्दलचे सर्व हक्क सुद्धां **दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेस** दिले आहेत यावरून त्यांची मनोभावना संस्थानी प्रजेच्या बाबतींत किती सहानुभूतीची आहे हें तेव्हांच कळून येत आहे. रा. तात्यासाहेब केळकर व त्यांचे चिरंजीव यांनीं दाखविलेल्या या दिलदारपणाचें चीज करण्याचें काम आतां संस्थानी प्रजाजन व संस्थानी प्रश्नाबद्दल आस्था असणारे गृहस्थ यांनीं या पुस्तकाचा उपयोग करून करण्याचें आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनानें महाराष्ट्र वाचकांच्या मार्गांतील एक अडचण अंशतः तरी दूर झाली आहे. या पुस्तकाचा उपयोग कसा काय होतो हें पाहून या तऱ्हेचीं दुसरीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याची उमेद येणार आहे. सबब महाराष्ट्र वाचकवृंदानें या पुस्तकास भरपूर आश्रय द्यावा व त्याच्या द्वारें संस्थानी चळवळीस सहाय्य करावें अशी विनंति करून हे प्रास्ताविक दोन शब्द पुरे करतों.

आर्यभूषण छापखाना, पुणें शहर.<br>ता. ३० माहे मे सन १९२९ इ० }

**अ. वि. पटवर्धन.**

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ देशी राजकुमारांचें शिक्षण ... ... ... | १ |
| २ देशी संस्थानें व त्यांचीं सैन्यें ... ... ... | ७ |
| ३ संस्थानिकांनाहि कौन्सिल पाहिजे ... ... ... | २६ |
| ४ पण संस्थानच्या प्रजेची वाट काय ! ... ... ... | ३१ |
| ५ शाहू छत्रपति व इंग्रज यांचें हितगुज ... ... | ३८ |
| ६ कोल्हापूरचे दिवाण रो. लठ्ठे यांनीं लिहिलेल्या शाहू चरित्रांतील निवडक उतारे ... ... ... ... | ५९ |
| ७ देशी संस्थानिकांचा उपद्व्याप ! ... ... ... | ६३ |
| ८ करवीरचे छत्रपति यांचा मृत्यु ... ... ... | ७८ |
| ९ देशी संस्थानें व स्वराज्य ... ... ... | ८० |
| १० भोर येथील दडपशाही ... ... ... | ९२ |
| ११ भोरच्या खटल्याची हकीगत ... ... ... | ९८ |
| १२ भोरची पहिली प्रजापरिषद् ... ... ... | १०० |
| १३ भोर येथील मावळ्यांचे हृद्‌योद्गार ... ... ... | ११० |
| १४ दुसरी भोर प्रजापरिषद् ... ... ... | ११८ |
| १५ अरेराव संस्थानिकांचें संरक्षण ... ... ... | १२१ |
| १६ प्रेसबिलानें दाखविलेले देखावे ... ... ... | १२९ |
| १७ अ. भा. संस्थान परिषद् ... ... ... | १३८ |
| १८ हिंदी–संस्थान प्रजापरिषद् ... ... ... | १४३ |
| १९ अलिजाबहादूर माधवराव शिंदे यांचा मृत्यु ... ... | १५४ |
| २० इंदूरच्या राज्यावरचें संकट ... ... ... | १५७ |
| २१ इंदूर प्रकरण ... ... ... ... | १६९ |
| २२ श्री. होळकर यांचा राजसंन्यास ... ... ... | १७१ |
| २३ राजे लोकहि 'स्वराज्य,' मागतात ! ... ... | १७३ |
| २४ खुंटा हालवून बळकट केला ... ... ... | १८१ |

# दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा पुणें.

१ **सभेचें ध्येयः**–दक्षिणेंतील हिंदी संस्थानांत त्या त्या संस्थानिकांच्या आधिपत्याखालीं जबाबदार राज्यपद्धति शांततेच्या व योग्य मार्गांनीं प्राप्त करून घेणें हें या संस्थेचें ध्येय आहे.

२ **सभेच्या कार्याचें क्षेत्रः**–या सभेच्या कार्याचा विस्तार खालील संस्थानांच्या विस्ताराबरहुकूम असावा.

१ जव्हार, २जांजिरा ( जाफराबाद तालुक्यासह ), ३ सुरगणा, ४ डांग संस्थानें, ५ सावंतवाडी, ६ सावनूर, ७ कोल्हापूर, ८ कोल्हापूर जहागिरी संस्थानें, ९ औंध, १० भोर, ११ फलटण, १२ अक्कलकोट, १३ जत, १४ सांगली, १५ मिरज, १६ मिरजमळा, १७ मुधोळ, १८ जमाखिंडी, १९ रामदुर्ग, २० कुरुंदवाड ( मोठी व लहान पाती ), २१ हैद्राबाद, २२ सोंडूर.

# संस्थानी राजकारण

## देशी राजकुमारांचें शिक्षण*

गेल्या आठवड्यांत कलकत्ता येथें ना. लॉर्ड कर्झन यांनीं राजकुमारांच्या शिक्षणाचे बाबतींत विचार करण्याकरितां एक कॉन्फरन्स भरविलें होतें. देशी राजकुमारांचें शिक्षण हा विषय राज्यकारभारांतील एक महत्त्वाचा प्रश्न अशा रीतीनें इंग्रज सरकारापूर्वीं येथें असणाऱ्या राज्यकर्त्यांस कधींहि भासलेला दिसत नाहीं. याचें कारण असें वाटतें कीं, हल्लींप्रमाणें प्रजा व मुख्य राज्यकर्ते यांमध्यें हक्कांचे दृष्टीनें पाहतां स्वतंत्र, परंतु वस्तुस्थितीनें पाहतां प्रजेहूनहि अधिक परतंत्र असा राजेरजवाड्यांचा वर्ग, हा देश परकीयांच्या एकछत्राखालीं येण्यापूर्वीं कधींहि उत्पन्न झालेला नव्हता. देशी राजेरजवाड्यांच्या मुलांस पूर्वीं जें शिक्षण मिळत असे तें घरच्या घरीं व राज्यकारभाराच्या धंद्यांतच मिळत असे. एखाद्या डोंबाऱ्याचे मुलास खरें ‘ व्यवहारोपयोगी ’ शिक्षण मिळण्यास त्याला कधीं कोणत्या शाळेंत घालावा लागत नाहीं हें आपण नेहमीं पाहातों, त्याचप्रमाणें पूर्वींच्या राजेरजवाड्यांच्या मुलांस लष्करी शिक्षण खुद्द रणांगणांत व राजनीतीचें शिक्षण गादीजवळ बसून पण राजदरबारांतच मिळत असे. यामुळें अर्थातच कर्झनसाहेबांना, आमच्या कुमारांचें शिक्षण व्यवहारोपयोगी पण थोडेंसें लष्करी, परंतु एकंदरीनें निरुपद्रवी असें कसें करावें, हा जो बिकट प्रश्न येऊन पडलेला आहे, तो पूर्वीं पडण्याचें कारण नव्हतें. दुसरें असें कीं, पूर्वीं होऊन गेलेल्या मोठमोठ्या खुद्द राजांसच मिळालेलें शिक्षण जर लिहिण्यावाचण्यापलीकडे गेलेलें नव्हतें, तर राजकुमारांस तरी दुसरें शिक्षण कोठून मिळणार ? व नुसत्या लिहिण्यावाचण्याचें शिक्षण देण्यास शाळा किंवा कॉलेजें काय करावयाचीं ?

---

*केसरी, ता. ६ जून १९०४.

पूर्वीं एकवेळ हिंदुस्थानांत प्रख्यात व पराक्रमी असे होऊन गेलेले राजे, व इतिहासावरून पाहतां त्यांस जें शिक्षण मिळालें होतें तें शिक्षण, या दोन गोष्टींचा एकत्र विचार केला असतां लॉर्ड कर्झन यांस देशी राजकुमाराच्या शिक्षणाबद्दल पडलेली चिंता पाहून आम्हांस आश्चर्य वाटतें व हसूंहि येतें. जमीनअस्मानचें अंतर असणाऱ्या लहानमोठ्या गोष्टींची तुलना करणें हा एक दोषच आहे. तथापि प्रस्तुतचा मुद्दा स्पष्ट करून सांगण्याकरितां सदरहु दोषाचेंहि क्षणभर अवलंबन करण्यास आम्ही तयार आहों. राम व युधिष्ठिर यांच्या सत्कीर्तीचा दुंदुभि अजूनहि लोकांच्या कर्णरंध्रांत दुमदुमत आहे, परंतु हे राजे कुमारावस्थेंत असतांना त्यांस किती विषय शिकविले जात होते, त्यांस कोणत्या शाळेंत घेतलें होतें किंवा त्यांस वार्षिक परीक्षेंत किती मार्क मिळाले होते याचा कांहीं कोठें उल्लेख सांपडत नाहीं. अशोक व विक्रम यांपैकीं एकाचे हृदयांत झालेला धर्मोदय व दुसऱ्याच्या आंगचा पराक्रम हे जगविख्यात आहेत. परंतु यांना बाळपणीं शिकविल्या गेलेल्या क्रमिक पुस्तकांची याद कोठें मिळत नाहीं. भोजराजा हा बहुधा सर्व देशी राजांत अधिक विद्याव्यसनी व विद्वद्गुणग्राही असा मानला गेला आहे; परंतु त्याचे बालपणीं काव्यालंकारावरचीं कोणतीं संक्षिप्त पुस्तकें त्याचा शिक्षक त्यास शिकवीत होता हें कोणी सांगेल तर आमची ऐकण्याची इच्छा आहे. आधुनिक काळीं जणूं केवळ 'असतापासून सतच ' निघावें त्याप्रमाणें मुसलमानी राज्याचे योगानें विध्वंस पावलेल्या स्वराज्याचे रक्षेमधून सर्वांगपूर्ण अशी हिंदुपदपातशाही स्थापित करणाऱ्या शिवाजी महाराजांस लिहितांवाचतां मुळीं येत होतें किंवा नाहीं याविषयीं इतिहाससंशोधक अद्यापहि वादविवाद करीत आहेत. पाश्चात्य देशांकडे पाहिलें तरी हीच स्थिति दिसून येईल. आलेक्झांडरला लष्करी शिक्षण देण्यास एखादें सँडर्स्ट त्यावेळीं नव्हतें हें खास आहे. इंग्लंडचा सर्वांत लोकप्रिय व सन्मान्य राजा आल्फ्रेड याच्या चरित्रांत कोठेंहि तो घोकंपट्टी करीत असलेल्या बुकांचा किंवा त्याला समजून दिल्या जाणाऱ्या एखाद्या नीतिबोधाचा ( Moral Text Book ) उल्लेख सांपडत नाहीं. उल्लेख सांपडतो तो याच गोष्टीचा कीं, आल्फ्रेड राजानें केवळ बाल्या-

वस्थेंत असतांच स्वदेशाचे शत्रु जे डेन्स लोक त्यांचे विरुद्ध लढण्याचे कामीं आपल्या भावास मदत करण्यास एकदम धांव घेतली ! रशियाचे पीटर धी ग्रेट राजानें आपल्या अमदानींत जितक्या सुधारणा एकदम केल्या तितक्या दुसऱ्या कोणत्याहि राजानें क्वचित्च केल्या असतील. परंतु त्याचे बाळपणीं त्यास शिक्षणाचा आनंद अनुभविण्यास सांपडल्याचें दिसत नाहीं; लहानपणापासूनच राज्योपाधींचे दगदगींत त्याचा काळ गेला असें दिसतें. जर्मनीचा प्रख्यात बादशहा फ्रेडरिक धि ग्रेट याचीहि गोष्ट अशीच आहे. पुढें एवढ्या मोठ्या पराक्रमी होणाऱ्या राजाला बाळपणीं घरकोंबडेपणाचा छंद लागावा, लष्करी परेडीनें कपाळशूळ उठावा, शिकारीचें भय वाटावें व फक्त आनंद काय तो येऊन जाऊन एखाद्या गवयाच्या पोराप्रमाणें अलगुज वाजवीत बसण्यांतच वाटावा व या सर्वांकरितां बापाचे हातचे चाबूक खाण्याचे भीतीनें आईच्या पाठीशीं दडणें हाच कायतो त्याच्या बाळपणाच्या शिक्षणाचा मासला असावा ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ? बालपणचें शिक्षण व तरुणपणचें कर्तृत्व यांमध्यें, निदान राजकर्त्यांसंबंधीं तरी पाहातां, विशेष संबंध आहे असें मानणाऱ्यांस वरील प्रश्न सोडविणें थोडसें बिकट जाणार नाहीं काय ? तात्पर्य, कर्तृत्वसंपन्न राजा निपजण्यास हल्लीं ज्यास आपण सुशिक्षण असें मानतों तें मिळणें आवश्यकच आहे असें आम्हांस तरी निदान वाटत नाहीं.

यास उलट प्रत्यंतर पाहणें झाल्यास असें दिसून येईल कीं, गेल्या तीस वर्षांत हिंदुस्थानांत राजकुमार कॉलेजें स्थापित होऊन सुशिक्षणाचे ढीगच्या ढीग पडले असतांहि नव्या पिढीच्या राजेरजवाड्यांमध्यें असा कोणता सद्गुणी अगर सुसंस्कृत मनाचा पुतळा निर्माण झाला आहे कीं ज्याकडे बोट दाखवून या कॉलेजांची किंवा तीं स्थापन करणाऱ्या राज्यकर्त्यांची आपणांस धन्यता वाटेल ? येवढेंच नव्हे तर, उलट हल्लींच्या शिक्षणाचे छापांतून बाहेर पडलेल्या राजकुमारांपैकीं कित्येक असे दाखवितां येतील कीं, ज्यांच्यावर शिक्षण हें पालथ्या घागरीवर ओतलेल्या पाण्याप्रमाणें

वाहून गेलें व ते पूर्वींच्या शुद्धं व स्वयंभू मठ्ठपणामुळें किंवा दुर्गुणामुळें सरकारच्या व लोकांच्या केवळ तिरस्कारास मात्र पात्र झाले. दुसरे कित्येक असे दिसत आहेत कीं, त्यांस इंग्रजी शिक्षणानें म्हणजे साहेबांच्या सहवासानें फक्त औपचारिक व गोड गोड असें बोलतां मात्र येऊं लागलें, परंतु त्यांच्या आंगांतील रानदांडगेपणा खरोखर जसाच्यातसा राहून हें मिश्रण तिऱ्हाइताचे फसवणुकीस मात्र कारण झालें. दुसरे कित्येक स्वदेशप्रियतेचा डौल घालण्यास शिकले मात्र; परंतु नखशिखांत अंतर्बाह्य विदेशी बनले; व ब्रिटिश राज्याच्या धोरणाचें अनुकरण करण्याची चटक लागल्यानें, परंतु हातीं सत्ता किंवा अंतःकरणांत उदारता नसल्यानें त्यांचें थोतांड लोकांस व सरकारास कळून ते हास्यास्पद होत आहेत. दुसरे कित्येक अधिक साधेभोळे असल्यामुळें त्यांना छपवाछपवीचा प्रकार माहीत नाहीं खरें, परंतु आपल्या इंग्लिश गुरूनें शिकविलेल्या मंत्राच्या अहर्निश पाठामुळें स्वदेश हें नांव मुळीं त्यांस माहीत नाहींसें झालें आहे. राज्यांतील सर्व मुख्याधिकारी इंग्रजच पाहिजेत असें त्यांस वाटतें, व हिंदुस्थानची आणि विलायतेची तिजोरी यांमध्यें अभेद–प्रीति उत्पन्न झाल्यामुळें त्यांना आपल्या रयतेचे लाखों रुपये इंग्रजांचे कार्यास चुटकीसरशी देऊन टाकले तरी त्या योगें आपण स्वदेशाचें कल्याणच करीत आहों असा त्यांस भास उत्पन्न होतो! अशांव्यतिरिक्त एखादा कोणी संस्थानिक शिक्षणाचे साहाय्यानें स्वावलंबी, महत्त्वाकांक्षी, स्वपरहितविवेकी व परतेजासहिष्णु असा निपजला असलाच तर उच्छृंखल घोड्याच्या बरगड्यांत टोंचणाऱ्या लोखंडी चक्राप्रमाणें व बाहेर न दिसतां तोंडाचें रक्त काढणाऱ्या कांटेलगामाप्रमाणें दुःसह अशा पोलिटिकल एजंटाच्या कैचीमुळें हताश व दुःखी होऊन तो एखाद्या कोपऱ्यांत झुरत पडलेला असेल. ही सर्व स्थिति लक्षांत आणतां गेल्या तीस वर्षांत राजकुमारांना जें शिक्षण देण्यांत आलें त्यानें राजकुमारांचा किंवा लोकांचा विशेष फायदा झाला असें आम्हांस वाटत नाहीं; व लॉर्ड कर्झन यांनीं हें शिक्षण कितीहि अधिक "व्यवहारोपयोगी" केलें तरी त्यापासूनही कांहीं फायदा होण्याची आशा नाहीं. आमच्या म्हणण्याचा मुद्दा हाच कीं,

खरें व्यवहारोपयोगी शिक्षण जबाबदारी अंगावर पडल्याशिवाय येत नाहीं, मग तें शिक्षण राज्यकारभारासंबंधी अगर युद्धकलेसंबंधी असो. पैकीं युद्धकलेचें तर इंग्रजबहाद्दरांच्या आश्रयछत्रामुळें नांवच काढण्याचें कारण उरलें नाहीं; व खरा राज्यकारभारहि संपुष्टांत येऊन त्याचें सूत्रचालकत्व सर्व पोलिटिकल खात्याचे अधिकाऱ्यांकडे गेलें आहे !

शिक्षणाचे मुख्य दोन नमुने मांडतां येतील, व हे दोन्ही नमुने उद्देशभिन्नत्वामुळें पृथक स्वरूपाचे आहेत. पैकीं पहिल्या नमुन्याचा उद्देश आत्मविकास किंवा व्यक्तीची सुधारणा हा होय, व दुसऱ्या नमुन्याचा उद्देश समाजविकास किंवा एकंदर समाजाची अगर देशाची सुधारणा हा होय. पहिला नमुना स्वीकारला असतां त्यापासून स्वतः व्यक्ति रूपसंपन्न व चपल होऊन तिचे मनोविकार तीव्र होतील, व मनुष्याची प्रवृत्ति टापटीप, सुखसेवन वगैरे गोष्टींकडे होईल. मात्र त्याजमध्यें कर्तव्यबुद्धि पुरी विकास पावणार नाहीं. या नमुन्याप्रमाणें शिक्षण पावलेल्या मनुष्यास स्वतः ज्ञान मिळविण्याची इच्छा होईल. परंतु मिळविलेल्या ज्ञानापासून समाजास फायदा कसा देतां येईल याकडे त्याचें विशेष लक्ष लागणार नाहीं. अशा शिक्षणाचा मनुष्य तत्त्वज्ञानी होण्यास लायक असतो व ज्याला आपण दिव्यदृष्टि म्हणतों ती अशाच मनुष्यास एखादे वेळीं येते. दुसऱ्या नमुन्याचें स्वरूप व परिणाम याच्या उलट आहेत. या नमुन्याच्या शिक्षणानें मनुष्य उद्योगी, व्यवहार-चतुर, बोलका होतो. परंतु तो विद्येचा दास बनत नाहीं. स्वतःच्या हक्कांचें रक्षण करण्याविषयीं तो दक्ष असतो व समाजघटना किंवा राजनीति वगैरे विषय त्यास अधिक प्रिय होतात. यांपैकीं शिक्षणाचा पहिला नमुना पूर्वी ग्रीस देशांत दिसून आला व दुसरा रोमन लोकांनीं अंगिकारिला होता. व किंचित् विचार करून पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, आपले राजेरजवाड्यांस जें शिक्षण द्यावयाचें तें दुसऱ्या नमुन्याचेंच असलें पाहिजे. म्हणजे ते समाजनेते किंवा समाजघटक अशा दृष्टीनें त्यांस शिक्षण दिलें पाहिजे. केवळ व्यक्तिशः त्यांचाच विकास होण्या-

सारखें शिक्षण त्यांस देऊन उपयोगी नाहीं. मनुस्मृतींत असें सांगितलें आहे कीं, "बालोऽपि नावमन्तव्यो मनुष्य इति भूमिपः । महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ॥" अल्पवयी राजकुमार व भावी राजा हे दोन्ही-सारखेच मानले पाहिजेत; व श्लोकांतील दैविकस्वरूप जरी क्षणभर बाजूस ठेविलें तरी राजकुमारांचें बाळपणचें सर्व शिक्षण सर्वांशीं राज्यव्यवहारोपयोगी असेंच असलें पाहिजे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु हल्लींचें शिक्षण पाहतां तें लॉर्ड कर्झन यांनींच सांगितल्याप्रमाणें बिलकूल राज्यव्यवहारोपयोगी नाहीं. ज्यांना पुढें राज्यकारभार करावयाचा त्यांना भूमितींतील 'गर्दभ-सिद्धांत' किंवा संशयखोर साहेबांच्या चरकांतून सत्य व सत्त्व दोन्ही ज्यांतून पिळून निघालीं आहेत असा हिंदुस्थानचा इतिहास, किंवा पूर्वीच्या कथापुराणांतील उदार व महानुभाव विभूतींचें नांवहि ऐकूं येत नाहीं असा एखादा नीतिबोध, किंवा काथ्याच्या गादीवर घसरून पडणें हेंच ज्यांतील साहस, व गौरकाय तालिममास्तराचा कृपाकटाक्ष हेंच ज्यांचें बक्षीस, असे तालीमखान्यांतील लटुपटींच्या मर्दुमकीचे खेळ हे सर्व देशी राजकुमारांस शिकवून काय फायदा? जर त्यांनीं आपल्या पूर्वजांच्यासारखें नांव मिळवावें अशी सरकारची खरी इच्छा असेल तर त्यांनीं त्यांस भरपूर लष्करी शिक्षण देऊन व रणांगणावर त्यांस नेऊन इंग्लिश सरदारांच्या बरोबरीनें खांदा लावून भिडण्यास परवानगी दिली पाहिजे. ते खरे मुत्सद्दी व्हावे असा हेतु असेल तर त्यांस आपले सर्व अधिकार स्वतंत्रपणानें बजावण्याची परवानगी द्यावी. त्यांचा स्वदेशीपणा कायम रहावा असें असेल तर युरोपियन शिक्षकांचें बंड मोडून जुन्या चालीचे शास्त्रीपंडित व नव्या पद्धतीनें शिकून विद्वान् झालेले उत्तम नेटिव शिक्षक यांचे स्वाधीन त्यांस करावें. म्हणजे ते शिक्षणाचे सर्व विषय देशी पद्धतीनें शिकून स्वाभिमानी होतील. व असें झाल तरच ते समाजाचे खरे कल्याणकर्ते होतील. हें जोंपर्यंत होत नाहीं व शिक्षणाचे बाबतींतहि आपला "हातचा" गमावण्यास इंग्रज सरकार तयार नाहीं, तोंपर्यंत कुमारांच्या शिक्षणाच्या सुधारणेबद्दल कितीहि लांब लांब गप्पा मारल्या तरी त्या

व्यर्थच आहेत असें आम्ही समजतों. त्यापासून राजकुमारवर्गाचें खरें हित कांहीं एक न होतां इतर प्रजाजनांप्रमाणें त्यांचीही अवस्था दिवसेंदिवस निकृष्टच होत जाणार !

## देशी संस्थानें व त्यांचीं सैन्यें *

### ( १ )

लॉर्ड कर्झन यांच्या देशी संस्थानांसंबंधाच्या धोरणास दिवसेंदिवस परिणत स्वरूप येत चाललें आहे. या धोरणाचा उपक्रम दिल्ली येथील दरबारचे रूपानें झाला; त्याचें प्रथम फळ वऱ्हाडचे रूपानें इंग्रज सरकारचे पदरांत पडलें; व त्याचें पर्यवसान देशी संस्थानापासून लष्करी खर्चाकरितां कायमचें उत्पन्न किंवा मुलूख तोडून घेण्यानें होणार असा रंग दिसत आहे. आणि असें झालें म्हणजे मग देशी संस्थानांचा दर्जा व मान्यता कमी करूनच न थांबतां त्यांच्या आंगास तुंबडी लावून त्यांस कायमची इजा केल्याचेंही श्रेय लॉर्ड कर्झन यांस मिळणार ! चक्रवर्ती राजानें आपल्या मांडलिकांवर किती सत्ता चालवावी याचें प्रमाण कोठेंही नमूद केलेलें सांपडणार नाहीं. पण आजपर्यंत देशी संस्थानें इतकीं कमकुवत असतांही जिवंत राहूं दिलीं हाच इंग्रज सरकारचा त्यांजवर डोईजड उपकार झालेला असून त्यांजकडून वाटेल ती मागणी केल्यास त्यांना नाहीं म्हणण्याचा अधिकारच नाहीं असा लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या मनाशीं तर्कवाद केल्यासारखा दिसतो. एका दृष्टीनें पाहतां आजवर इतकीं संस्थानें शिल्लक राहिलीं हा एक चमत्कारच होय; व १८५७ सालीं भयंकर बंड झालें नसतें, राणी लक्ष्मीबाईसारख्या बंडांत सामील झाल्या नसत्या, व लॉर्ड डलहौसी यांची संस्थानें खालसा करण्याची अनिवार लालसा हीच बंड होण्यास मुख्यतः कारणीभूत झाली असा जर ब्रिटिश मुत्सद्यांचा समज झाला नसता तर, आजमितीस हयात राहिलेलीं संस्थानेंही या सुमारास ब्रिटिश राजसिंहाच्या भक्षस्थानीं पडलीं असतीं; आणि इंग्रजी मुलूख व

*केसरी ७ फेब्रुवारी १९०५

संस्थानिकांचीं राज्यें यांची भिन्नता दाखविण्याकरितां हिंदुस्थानचा नकाशा काढणाऱ्या चिताऱ्यास आज जे अनेक रंग कालवावे लागत आहेत ते न लागतां, गुणानें व स्वरूपानें अग्निसदृश अशा इंग्रजी लाल रंगाच्याच कुंचानें त्यास तो नकाशा हिमालयापासून रामेश्वरापर्यंत एकसारखाच रंगवितां आला असता. बंडाचें चरचरीत अंजन डोळयांत पडल्यामुळें इंग्रज सरकारचा संस्थानें खालसा करण्याचा क्रम त्यावेळीं थांबला खरा, पण सात्विक मनोभावाची बताबणी करतांना आपण फारच पुढें गेलों असा कांहीं कांहीं ब्रिटिश मुत्सद्यांस आतां पश्चात्ताप होत असावा असें दिसतें; व देशी संस्थानिकांशीं वागतांना ते कोणाचीही मर्यादा पाळगीत नाहींसे झाले आहेत. कोणाही संस्थानिकाचे मृत्यूनंतर त्याचे गादीवर बसण्याचा हक्क औरस व ज्येष्ठ पुत्रास येतो तो सुद्धां औरसपणामुळें येत नसून इंग्रज प्रभूच्या कृपाप्रसादानेंच येतो; त्यांच्या इच्छेस आल्यास एका घराण्याचें राज्य दुसऱ्या घराण्यास देतां येतें; एखादा संस्थानिक अप्रिय झाल्यास त्याला राजीनामा देण्यास भाग पाडण्याचा व तो राजीनामा स्वीकारण्याचा हक्क इंग्रज सरकारास आहे; संस्थानिकांस हिंदुस्थान सोडून परदेशीं प्रवासास जावयाचें झालें तरी त्यानें सरकारास सकारण अर्ज करून परवानगी मागितली पाहिजे; व प्रसंगविशेषीं संस्थानिकांचा सर्व मुलूख, त्यांचें सर्व सैन्य, व खजिन्यांतील सर्व पैसा यांजवर सरकारास कायदेशीर हक्क सांगतां येतो, इत्यादि नवीन तत्त्वांचा प्रसार बंडानंतर स्वस्थता झाल्यापासून सुरू करण्यांत आला आहे. या व अशा तत्त्वाचे बुडाशीं असणारा अन्याय व पावलोपावलीं जाणवणारी सरकारची कांचणी यामुळें कित्येक संस्थानिकांस मळमळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य बरें असें वाटूं लागलें असल्यास, व कित्येकांचे तोंडांतून "आम्हां राजेरजवाड्यांपेक्षां गरीब प्रजाजनहि खरोखर अधिक सुखी असेल" असे केव्हां केव्हां उद्गार निघाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

आज वरील प्रकारचे विचार सुचण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे देशी संस्थानिकांकडून लष्करी खर्चास मदत मिळविण्याची लॉर्ड कर्झन

यांनीं जी खटपट चालविली आहे ती होय. याबद्दल अनेक प्रकारच्या बातम्या वातावरणांत पसरल्या आहेत. कोणी म्हणतात कीं, लवकरच कलकत्त्यास देशी संस्थानिकांची एक सभा होणार असून तींत निझाम सरकारचे तोंडून कर्झन साहेब हे इतर संस्थानिकांस हितबोध करविणार आहेत; कोणी म्हणतात कीं, गायकवाड महाराजप्रमुख अशा कित्येक संस्थानिकांनीं लष्करी खर्चाकरितां उत्पन्न देण्याचें सर्वस्वीं नाकारिलें आहे; कोणी म्हणतात कीं, कोल्हापूरचे महाराज व दक्षिण महाराष्ट्रांतील सर्व संस्थानिक यांचेकडून दोन निरनिराळीं पलटणें ठेवण्याकरितां त्यांचे उत्पन्नाचा दहावा हिस्सा घेण्यांत येणार; व कोणी म्हणतात कीं, देशी संस्थानिकबांधवांस हितबोध करणाऱ्या निझामाकडूनच, अनुकरणीय उदाहरण कसें असतें हें दाखविण्याकरितांच कीं काय, त्यांचा पन्नास लक्ष उत्पन्नाचा औरंगाबादचा सुभा लष्करी खर्चाचे मदतीकरितां सरकार कायमचा तोडून घेणार !

अर्थात् या सर्व निवळ बातम्या होत. परंतु त्या बऱ्याच खऱ्या असाव्या असें मानण्यास जागा आहे व खरा प्रकारहि लवकरच म्हणजे पुढील महिन्यांत हिंदुस्थानसरकारचे अंदाजपत्रकावरील वादविवादांत बाहेर पडेल. हल्लींचे आणीबाणीचे वेळीं देशी संस्थानिकांनीं कसें वागावें हें उघडपणें सांगण्यापासून विशेष फायदा होईल असें वाटत नाहीं. कारण, शिकविलेलें शहाणपण व बांधून दिलेली शिधोरी कोणासही कधीं पुरलेली नाहीं.

हिंदुस्थान देशाचे निरनिराळे भाग निरनिराळ्या वेळीं इंग्रज सरकारच्या अमलाखालीं आले हें सर्वांस माहीत आहेच. त्याचप्रमाणें देशी संस्थानांचे इंग्रज सरकाराशीं वेगवेगळे तह झालेले आहेत व या तहनाम्यांत या उभयतांमध्यें परस्परसंबंध व देवघेव काय असावी हें नमूद केलेलें आहे. तथापि या सर्वांसंबंधानें साधारणतः असें विधान केलें असतां चालेल कीं इंग्रज सरकारचें सार्वभौमत्व प्रस्थापित केलें असतांही, देशी संस्थानिकांस त्यांच्या राज्यांतील अंतर्व्यवस्थेंत मुखत्यारी ठेवलेली आहे व संस्थानिक हे जरी मांडलिक म्हणून

तहांनीं ठरविले तरी त्यांजवर लष्करी जबाबदारी फक्त कांहीं ठरींव रक्कम देण्यापलीकडे इंग्रज सरकारांनीं मुळींच टाकली नाहीं. ज्याप्रमाणें वतना-संबंधानें चौकशी करतांना वतनाचा कांहीं भाग अबाधित बिनतक्रार चालेल असें आश्वासन देऊन वतनदारांस नोकऱ्या माफ करण्यांत आल्या, त्याचप्रमाणें संस्थानिकांचीही कारभाराची रक्कम ठरवून टाकून त्या पलीकडे त्यांजवर लष्करी खर्चाचा बोजा अगर जातीनें लष्करी नोकरी करण्याची जबाबदारी कांहीं उरली नाहीं असें ठरविण्यांत आलें. मराठी राज्यांत पेशव्यांचा व त्यांचे सरदारांचा ज्याप्रकारचा सेव्यसेवकसंबंध होता, किंवा खुद्द इंग्लंडांत ' फ्यूडल ' पद्धति मोडण्याच्या पूर्वीं राजा व त्यांचे मानकरी सरदार लोक यांजमध्यें जो संबंध होता, त्याचे विरुद्ध वरील इंग्रज सरकारच्या तहनाम्याचें धोरण होतें हें उघड आहे. व त्यास कारणेंहि तशींच प्रबळ होतीं. ' फ्यूडल ' पद्धतीमध्यें मानकरी सरदारांनीं लढाईचे वेळीं अमुक एक सैन्य घेऊन चक्रवर्ती राजाच्या मदतीस आलेंच पाहिजे असा ठराव असे, व यामुळें सरदार लोकांस नेहमीं लष्करी पेषा बाळगावा लागून त्यांचें महत्त्वहि राज्यकारभारामध्यें फार असे. परंतु अखेर अखेर हें महत्त्व फार माजल्यानें व सरदार लोकांचे हाताखालीं लढाऊ सैन्य नेहमीं तयार असल्यानें राजास वेळोवेळीं त्रास होऊन कित्येक प्रसंगीं तर गादीबद्दलच्या भांडणांत ते पडल्यानें देशांत धुमाकूळ माजून राजांचें वजन अगदीं कमी होऊन गेलें होतें. मराठी राज्यांतहि हीच फ्यूडलपद्धति कमीअधिक प्रमाणानें अमलांत होती. म्हणजे मानकरी सरदारांना ठरावाबरहुकूम सैन्य बाळगून जातीनें लष्करी नोकरी करावी लागत असे. परंतु तेच नोकर पुढें प्रबल झाल्यानें धन्याचा धनीपणा उरेनासा झाला, व पेशवाईअखेर तर या लष्करी नोकरांत दुफळी झाल्यानें, स्वराज्य एरवीं गेलें असतें त्यांचे आधींच चार दिवस नष्ट झालें. इंग्रज सरकार बोलून चालून विजातीय; व खुद्द स्वराज्यांतही ' फ्यूडल ' पद्धतीनें घडून येणारे अनर्थ त्यांचे डोळ्यापुढें असल्यानें त्यांनीं प्रथमपासूनच असें धोरण ठेविलें कीं, आपल्या मांडलिकांस फौजफांटा ठेवण्याचें कारणच पडूं नये, व तसें झालें असतां त्यांजपासून

भीति बाळगण्याचेंहि कारण उरूं नये. या धोरणामुळें प्रथमच त्यांनीं कांहीं संस्थानिकांवरील लष्करी नोकरीची जबाबदारी काढून टाकून त्याच्या मोबदल्याकरितां कारभाराची अगर लष्करी खर्चाची रकम ठरवून टाकून तेवढें उत्पन्न किंवा मुलूख तोडून घेतला. इतर कित्येक संस्थानांशीं तर केवळ बरोबरीचे दोस्त अशा नात्यानें तह झाल्यामुळें त्यांवर लष्करी नोकरी किंवा कारभार यांचा बोजा मुळींच पडला नाहीं. तात्पर्य, देशी संस्थानिकांनीं सैन्य ठेवणें तें होईल तितकें कमी ठेवावें, आणि जें थोडेंबहुत ठेवलें जाईल तेंही कवाईत न शिकविलेलें व गबाळग्रंथी असल्यास फार चांगलें अशा प्रकारचें धोरण इंग्रजी राज्याच्या सुरवातीस होतें. बंडामुळें तर या धोरणास पुष्टीकरणच मिळालें. याच कारणांनीं देशी संस्थानांत लष्कराची वाढ कोठेंही झालेली दृष्टीस पडत नाहीं. एवढेंच नव्हे, तर सरकारी परवानगीशिवाय एखादी तोफ, बंदूक किंवा काडतूसहि संस्थानांत जाऊं नये असा सक्त निर्बंध करण्यांत आलेला आहे. अशा व्यवस्थेचा परिणाम काय होईल हें उघडच आहे. आधींच शांततेचें साम्राज्य, व त्यांतूनही यत्किंचित् हालचाल झाली कीं, इंग्रज सरकारच्या संशयाग्नीचा भडका होऊन त्यांत बिचाऱ्या संस्थानिकाची आहुति पडावयाची. यामुळें पदरीं चार लष्करी लोक ठेवण्यास, त्यांना कवाईत शिकविण्यास, व सुधारलेल्या देशांत जीं नवीन हत्यारेंपात्यारें तयार होत आहेत तशीं आपल्या संग्रहीं राखण्यास कोणाही संस्थानिकास कारण किंवा हौस उरली नाहीं. आधीं मराठी लष्करास स्वभावत: कवाइतीचें वावडें, कारण खुद्द स्वराज्यांत, फ्रेंच, इंग्रज यांसारखे कवाईत शिकविणारे असूनही एका शिंद्याखेरीज इतर कोणाही सरदारानें किंवा खुद्द पेशव्यांनींहि लष्करास कवाईत शिकविण्याची आवड दाखविली नाहीं. स्वराज्य असतां, बहुधा प्रतिवर्षीं मुलुखगिरी करावी लागत असतां, इंग्रजासारख्यांच्या लष्कराचें उदाहरण डोळ्यांपुढें असतां, व अखेर अखेर तर, या लष्कराशीं पुढेंमागें खास लढावें लागणार हें ढळढळीत असतांही जर लष्कर कवाइती किंवा सुधारलेलीं शस्त्रास्त्रें ठेवण्याची आम्हांस बुद्धि झाली नाहीं, तर परराज्य स्थापित

होऊन लष्करीपेशा हें जें पूर्वी भूषण होतें तेंच दूषण म्हणून ठरल्यावर मग आपल्या लष्करास कवाईत शिकविण्याची अगर हत्यारें-पात्यारें उत्तम बाळगण्याची कोणास बुद्धि होणार ? यामुळें आज मित्तीस देशी संस्थानिकांचे लष्करामध्यें रोडके घोडे, तुटकीं खोगरें, गंजलेल्या तरवारी, काने बुजलेल्या नळ्यावजा तोफा, व तोंड्यानें उडवावयाच्या कमपल्लेदार बंदुका यांचें एक प्रदर्शनच माजून राहिल्यासारखें झालें आहे. इंग्रजी लष्करापुढें हें लष्कर म्हणजे आशेपुढें मूर्तिमंत निराशाच अशा प्रकारचें दिसणार, व दिल्लीदरबारचे वेळीं देशी संस्थानिकांच्या फौजेची 'परेड' करविण्याचा लॉर्ड कर्झन यांचा हेतुहि वरील फरक संस्थानिकांचे नजरेस चांगलाच पडावा असा होता असें मानल्यास फारशी चूक होणार नाहीं.

इंग्रज सरकारास ही स्थिति सुमारें शंभर वर्षे माहीत असतां त्यांनीं ती तशीच मुद्दाम चालूं दिली, परंतु लॉर्ड डफरिन यांचे कारकीर्दीपासून हिंदुस्थान सरकारचें सर्व लष्करी धोरणच बदललयानें त्यांचें लक्ष देशी संस्थानिकांचे सैन्याकडे गेलें. बंडाचे सालानंतर हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत इंग्रज सरकारानें फारसा मुलूख खालसा केला नाहीं, परंतु इंग्लंडांत लॉर्ड बीकन्सफिल्ड हे मुख्य प्रधान असतां इंग्लंड व रशिया यांजमध्यें आशिया खंडांत वर्चस्व मिळविण्यासंबंधाची चढाओढ व ईर्षा विशेष वाढली, व ही ईर्षा सफल करण्याचें एक साधन अशा दृष्टीनें हिंदुस्थानचा उपयोग ब्रिटिश मुत्सद्यांस विशेष वाटूं लागला. हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीच्या प्रश्नास याच विचारानें नसतें महत्त्व आलें, व रशियानें हिंदुस्थानावर स्वारी केली असतां बचाव करण्यास पुरे इतकें सैन्य हिंदुस्थानांत नाहीं अशी भीति त्यांस वाटूं लागली. देशांतील कायमचें सैन्य वाढवावें तर खर्च फार लागतो, तेव्हां सैन्य तर वाढावें व खुद्द इंग्रज सरकारचा खर्च तर वाढूं नये हें कसें व्हावें याचा विचार करतांना देशी संस्थानिकांचीं सैन्यें वाढवून तीं इंग्रजी सैन्याचे तोडीचीं करावीं, अशी कल्पना लॉर्ड डफरिन यांस सुचली. सन १८८५–१८८६ सालीं पेंजढ प्रकरण होऊन रशिया हिरातवर चालून येतो कीं काय अशी इंग्रज सरकारास भीति पडली.

ह्या प्रसंगीं आपली स्वामिभक्ति दाखविण्यास योग्य असें वाटून हैद्राबादचे निझामानें, किंवा त्याचे पदरच्या स्वार्थसाधु कारभाऱ्यांनीं असें म्हणणेंच अधिक शोभेल, सरकारास कित्येक लाख रुपये फुकट देण्यास काढले ! परंतु सुदैवानें परचक्राची भीति लवकरच नाहींशी झाली; व देशी संस्थानिकांकडून रोख पैसे घेतले तर इंग्रज सरकारनें हिंदुस्थानांत चांगलीच भिक्षुकी आरंभिली असा गवगवा होईल या भीतीनें लॉर्ड डफरिन यांनीं निझामसरकारची देणगी घेतली नाहीं. तथापि लष्करी जुलमासंबंधानें ' गव्हाची कणीक ' करून दिल्याची जी एक विनोदी गोष्ट आपल्याकडे सांगत असतात त्याप्रमाणें, निझामानें काय, किंवा इतर संस्थानिकांनीं काय रोख पैसे न देतां त्यांतूनच आपलें लष्कर इंग्रज सरकारास उपयोगी पडेल अशी व्यवस्था केल्यास देशी संस्थानिकांच्या फौजेचा वाटेल तसा उपयोग करण्यास कांहीं हरकत नाहीं असें लॉर्ड डफरिन यांनीं ठरविलें. व या नवीन युक्तीचा प्रयोग उत्तर हिंदुस्थानांतील साध्याभोळ्या संस्थानिकांवर प्रथम करण्यांत आला.

आजमित्तीस सुमारें तेवीस संस्थानिकांनीं इंग्रजसरकारास उपयोगी पडेल असें सैन्य ठेवण्याचें कबूल केलें आहे. हीं तेवीस संस्थानें म्हणजे अलवार, भावलपूर, भरतपूर, भावनगर, भोपाळ, बिकानेर, फरिदकोट, ग्वाल्हेर, हैद्राबाद, इंदूर, जयपूर, झिंद, जोधपूर, जुनागड, कपुरथळा, काश्मीर, मेलरकोटला, म्हैसूर, नाभा, नवानगर, पतियाळा, रामपूर, व सिरमूर हीं होत. यांपैकीं बहुतेक संस्थानांत संस्थानचे हक्क संभाळील असा मुत्सद्दी असल्याचें कोठें ऐकिवांत आलेलें नाहीं; व म्हैसूर जरी हल्लीं या नवीन युक्तीस बळी पडलें आहे तरी म्हैसूरचे माजी दिवाण सर शेषाद्री अय्यर हे हयात असेपर्यंत सरकारचें कांहीं चाललें नाहीं. बडोदें संस्थानानें तर खुद्द लॉर्ड डफरिन यांसच प्रत्यक्ष नकार दिला व इतर संस्थानानींही आपले हक्क लक्षांत बाळगून या नवीन युक्तीचा अंमल आपल्यावर चालूं देण्याचें टाळलें. लॉर्ड डफरिन यांनीं ही नवीन युक्ति काढली त्यास आज सुमारें १५ वर्षें होऊन गेलीं. तेवढ्या अवधींत फक्त तेवीस संस्थानिकांनींच आपली कबुली दिली व या नवीन पद्धतीनें

ठेवलेल्या सैन्याची संख्या आजवर एकोणीस हजारांवर गेलेली नाहीं हेंही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. लॉर्ड डफरिन यांचेनंतर या प्रश्नाकडे कोणाही गव्हर्नर–जनरलानें आजपर्यंत विशेष लक्ष दिलें नव्हतें, परंतु लॉर्ड कर्झन यांचें बादशाही धोरण लॉर्ड डफरिनपेक्षांही अधिक उपद्यापी असल्यामुळें या प्रश्नास हल्लीं विशेष महत्त्व आलेलें आहे.

[ २ ]*

संस्थानिकांच्या फौजा ब्रिटिश फौजांप्रमाणें तयार ठेवून त्यांचा उपयोग सरकारास करून घ्यावा व अशा रीतीनें आपणावरील लष्करी खर्चाचें ओझें थोडें बहुत संस्थानिकांवर टाकावें, ही युक्ति जरी लॉर्ड डफरिन यांनीं व त्यांचे लष्करी सल्लागार सर जॉर्ज चेलसने यांनीं मूळ काढली तरी तिचा अंमल प्रथम फार थोड्या संस्थानिकांवर झाला. उत्तर हिंदुस्थानचे कांहीं थोडे साधेभोळे संस्थानिक मुत्सद्दीगिरीच्या कपटजालांत सांपडले; परंतु लॉर्ड डफरिन यांनीं कोणा संस्थानिकांवर या बाबतींत जुलूम असा केला नाहीं असें म्हणणें भाग आहे. बडोदें संस्थानासंबंधानें तर असें सांगतात कीं, गायकवाड सरकारची समजूत घालण्याकरितां डफरिनसाहेब या बाजूस अवचित व मुद्दाम आले; तथापि श्री. सयाजीराव यांशीं झालेल्या युक्तिवादांत यश न आल्यामुळें नुसता नकार घेऊनच त्यांस परत जावें लागलें! त्यांचेनंतर आलेल्या दोन तीन गव्हर्नर–जनरलांनींही या बाबतींत फारसें लक्ष घातलेलें दिसत नाहीं, व ता. २३ आक्टोबर १८९० रोजीं गव्हर्नर–जनरल लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं पतियाळा येथें केलेल्या भाषणांत तर सर्व गोष्टींचा चांगलाच खुलासा केला. "कोणाही संस्थानिकावर जुलूम किंवा आग्रह म्हणून बिलकूल करावयाचा नाहीं; एखाद्या संस्थानिकांस प्रामाणिकपणानें व अंतःकरणापासून अशी इच्छा असेल कीं आपल्या पदरचें सैन्य इंग्रज सरकारच्या सैन्याच्या तोडीचें बनावें व त्याचा उपयोग सरकारास व्हावा तरच त्या संस्थानिकास त्याची इच्छा सफल करण्यास म्हणून

*केसरी १४ फेब्रुवारी १९०५

मदत करावयाची, एरव्हीं त्याजपाशीं या बाबतींत गोष्टही काढावयाची नाहीं. अशी इच्छा असूनही जर सदर संस्थानिकाचे राज्यांतील लोकांस लष्करी पेशाची फारशी आवड नसेल अगर असलेली आवड पुरविण्यास लागणाऱ्या खर्चाचे योगानें संस्थानावर न झेंपण्यासारखें ओझें पडत असेल, तर संस्थानिकाची इच्छा असूनही त्यानें त्या भानगडींत पडूं नये असेंच सांगण्यांत येईल; हिंदुस्थानांतील बादशहीच्या संरक्षणाकरितां संस्थानिकांवर अप्रत्यक्ष रीतीनें कर बसविणें हा या नवीन पद्धतीचा हेतु नसून, फक्त ज्या संस्थानांतील लोकांस अगर खुद्द संस्थानिकास लष्करी पेशाची खरी हौस व बहुमानाची खरी आवड असेल अशांस स्वदेशसंरक्षणाचे कामीं थोडा बहुत हातभार लावण्याची संधि मिळवून देणें हाच काय तो सरकारचा मुख्य हेतु होय; तो साधण्याकरितां कोणा संस्थानिकांनीं आपण होऊन पैसे दिले तरी ते कधींही घेण्यांत येणार नाहींत; व एखाद्या संस्थानिकास आपलें लष्कर वाढविण्यास अगर सुधारण्यास वरील हेतूस अनुसरून परवानगी देण्यांत आलीच तर कोणतीही व्यवस्था करणें ती लोकांस अभिमानास्पद व संस्थानास भूषणावह होईल अशीच करविण्याची खबरदारी घेतली जाईल." इत्यादि गोष्टी लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं आपल्या भाषणांत अगदीं स्पष्ट शब्दांनीं बोलून दाखविल्या आहेत. दप्तरी दाखल्याचे आपण दासानुदास आहों असें भासविणाऱ्या प्रस्तुतच्या बोलघेवड्या व्हाइसरॉयसाहेबांनीं लॉर्ड लॅन्सडाऊन यांचें सदरील भाषण कधीं वाचलेलें आहे काय ? व तसें असेल तर संस्थानिकांची खुषी नसतां पोलिटिकल एजंटांचा भुंगा त्यांचेमागें लावून, आपापल्या लष्करावर हल्लींहून अधिक खर्च करण्यास, प्रत्येक संस्थानिकास आपापली लष्करी व्यवस्था स्वतंत्रपणें करतां येण्यासारखी नाहीं म्हणून अमुक एक संस्थानिकांनीं मिळून अमुक एक फौज ठेवावी व तिचे देखरेखीस म्हणून अमुक एक युरोपियन अधिकारी ठेवावे व किंबहुना हा सर्व खटाटोप आपणास कशाला हवा असें म्हणून संस्थानच्या उत्पन्नाचा कांहीं भाग अगर तेवढ्यापुरता मुलुख त्यांनीं इंग्रज सरकारकडे कायमचा तोडून द्यावा, अशा ज्या सूचना सरकार आपण होऊन संस्थानिकांस करीत आहे त्यांस काय आधार ते सांगूं शकतील ?

वस्तुस्थिति अशी आहे कीं, इंग्रजसरकारनें सर्व देशाचा कारभार आटोपल्यामुळें व नेटिव्ह संस्थानें आणि त्यांच्या प्रजा हीं सर्व एका दावणीस बांधलेल्या गोठ्यांतील गुरांप्रमाणें निरुपद्रवी झालीं असल्यामुळें, ज्याप्रमाणें खुद्द इंग्रजसरकारास कोणाही नेटिव्ह संस्थानिकापासून भीति बाळगण्याचें कारण उरलें नाहीं त्याचप्रमाणें, कोणाहि संस्थानिकास आपली प्रजा कधीं काळीं बंडाळी करील व ती मोडण्याकरितां आपणास हत्यारबंद लष्कराचा उपयोग करावा लागेल अशी भीति उरलेली नाहीं. मिठागरांत आणून लहान लहान वाफ्यांत बंदिस्त करून सोडलेल्या समुद्राच्या एक वेळ उच्छृंखळ असलेल्या पाण्याप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रजेचीं मनें हल्लीं केवळ निश्चल व शांतिब्रह्मस्वरूप होऊन गेलेलीं आहेत. कितीही अन्याय अगर जुलूम सोसावा लागला तरी त्यांचे मनावर अस्वस्थतेची यत्किंचितही ऊर्मी उठत नाहींशी झालेली आहे. शिवाय संस्थानिक व त्यांची प्रजा हे दोघे आखाड्यांतील हौद्यांत सोडलेल्या मल्लाप्रमाणें स्वतंत्र असते, तर अलीकडे कित्येक संस्थानांतून जे कित्येक जुलमी प्रकार झाले आहेत त्यांच्या निवारणार्थ खचितच बंडें वगैरे झालीं असतीं. परंतु संस्थानिकांच्या प्रजेनें संस्थानिकांच्या विरुद्ध उठलें असतां क्रमानें इंग्रज सरकाराविरुद्ध उठल्याचें रूप त्यांच्या कृत्यास येत असल्यामुळें, व संस्थानांतल्या संस्थानांत होणाऱ्या दंग्याधोप्यामध्यें आपणास वाटेल तेव्हां हात घालण्याचा अधिकार आहे असें इंग्रज सरकार म्हणत असल्यामुळें आपल्या आंगीं असेल तो वीर्यप्रभाव दाखवून जुलमी संस्थानिकांस न्याय देण्यास भाग पाडूं अशी कोणाही संस्थानच्या प्रजेस आशा उरली नाहीं ! अशी स्थिति असल्यामुळें संस्थानच्या प्रजेंतील पूर्वींचा जोम निघून गेला. मग लष्करी पेशाची हौस कशी राहणार ? अर्थात् खुद्द संस्थानिकांसही चालचलाऊ पोलिसापलीकडे फौज म्हणून बाळगण्याचें प्रयोजन उरलेलें नाहीं. येऊन जाऊन शिपाईगिरीचें जें थोडेंबहुत कारण उरलें आहे तें परचक्राचा योग येईल त्यासंबंधानेंच काय तें. परंतु दूरदर्शी सरकारानें सत्तरऐंशीं हजार गोरें सैन्य व दीड दोन लाख काळें सैन्य कायमचें पोसून त्यांस कवाईत शिक-

चून व उत्तम उत्तम हत्यारेंपात्यारें देऊन ठेवलेलीं आहेत. या सर्व सैन्याचा बराच मोठा भाग सरहद्दीकडील प्रांतांत लॉर्ड किचनेर यांनीं नेऊन ठेवलेला असून, विलायतेंतून प्रथमतः आणखी तीस हजार गोरें सैन्य सरकार आणविणार आहे. व हिंदुस्थानांत लढाई झालीच तर दीड दोन लाख गोऱ्या सैन्याचा पाठपुरवठा करण्याची इंग्लंडची तयारी आहे.

असें आहे तर मग यःकश्चित् नेटिव्ह संस्थानें तीं सैन्य कितीसें ठेऊं शकणार व त्याचा उपयोग तो सरकारास काय होणार? दक्षिण महाराष्ट्रांतील एखाद्या संस्थानाचेंच जर आपण उदाहरण घेतलें तर कोल्हापूरच्या अगर मिरजेच्या शिपायांनीं पेशावरास जाऊन मोहीम मारावयाची अशी कल्पनाहि आज मनांत आणली असतां कोणासहि हसूं लोटल्याखेरीज राहणार नाहीं. एक वेळ मिरज कोल्हापूर प्रांतांतच फिरणाऱ्या घोड्यांनीं अटकेपर्यंत भरारी मारली होती हें खरें, परंतु तो काळ व ती परिस्थिति वेगळी होती, एवढें म्हटलें असतां पुरे होईल. लष्करी पेशाचा अभिमान नवीन उत्पन्न करणें ही गोष्ट म्हणावयास सोपी आहे. परंतु हल्लींच्या स्थितींत म्हणजे रिसालदारापासून लष्करच्या सर्व जागा गोऱ्या लोकांनीं भरलेल्या आहेत. तोफखान्यासारख्या महत्त्वाच्या लष्करीखात्यांत नेमण्याइतक्या विश्वासाचा एकहि नेटिव्ह अधिकारी सरकारास सांपडत नाहीं; लष्करचें कोणतेंहि खातें कां घ्याना? त्यामध्यें, अवघा जन्म लष्करी नोकरी करण्यांत घालवून, दहापांच लढायांत तरवारहि गाजवून पदकें व पदव्या मिळविलेल्या वयोवृद्ध व पराक्रमी नेटिव्ह अधिकाऱ्यांस, आपले नातू शोभतील अशा मिसरूही न फुटलेल्या व हिंदुस्थानांत येऊन एक दोन पावसाळेहि न घालविलेल्या अशा गोऱ्या पोरांचे आज्ञेखालीं शीर नमवावें लागतें! अशा स्थितींत स्वदेशाचा काय, त्यावर असलेल्या राज्याचा काय, किंवा आपल्यामध्यें उरलेल्या वीर्यांशाचा काय, कशाचाहि अभिमान वाटणें व त्याकरतां सरकारास परचक्राच्या प्रसंगीं मदत करण्याची इच्छा होणें हें कसें शक्य आहे हें आम्हांस तरी कळत नाहीं. यदाकदाचित् संस्थानिकांनीं अगदीं कसून आपल्या लष्करावर मेहनत घेतली व कवाईत शिकवून थोडे बहुत

लोक तयार केले, तरी त्यांस खरी लढाई अशी थोडीच पहावयास मिळणार ? मग लढाई मारल्याच्या यशाचा लवलेश मिळण्याची तर गोष्टच नको. एखाद्या श्रीमंताच्या घरीं मोठ्या कडाक्यानें व थाटानें लग्नाचा समारंभ गाजत असतां स्वयंपाक घराचे एखाद्या अंधाऱ्या कोपऱ्यांत पाटा वरवंटा घेऊन चटण्या कोशिंबिरी तयार करण्यांत गुंतलेल्या एखाद्या खटपट्यास या समारंभास आपण हातभार लावला असा अभिमान वाटणें जर शक्य असेल, तर मात्र सरहद्दीवर रशियाशीं लढाई जुंपली असतां संस्थानिकांच्या सैन्यासहि आपण सरकारास मदत करून देशसेवा केल्याचा अभिमान वाटेल !

कोणत्याही राज्यांत झालें तरी फौजेंतील प्रत्येक शिपायास मोठी किंवा जबाबदारीची कामागिरी करावयास संधि सांपडतेच असें नाहीं. हल्लीं चाललेल्या रूसो-जपानी युद्धाचेंच उदाहरण घेतलें तरी, यालू नदीवर पहिला गोळीबार झाडण्याची, किंवा लाओयांग येथें शत्रूचा मोड करण्याची, किंवा पोर्ट आर्थरच्या तटबंदीवर उभें राहून शरण आलेल्या रशियन शिपायांस आपल्या हत्यारांचे भारे बांधावयास लावण्याची संधि कित्येक शिपायांस सुदैवानें मिळाली. पण इतर कित्येकांस जेथें मर्दुमकी दाखविण्यास वाव नाहीं, फार काय पण जेथें आपण पहारा उघड्या डोळ्यांनीं करतों हें पाहण्यासही कोणी नाहीं, अशा आडमार्गांतील लष्करी ठाण्यावर नोकरी बजवावी लागत असेल ! तथापि या दोघांसही स्वदेशाबद्दल लढल्याचें समाधान सारखेंच वाटेल. कारण या दोन्ही प्रकारच्या शिपायांस जपानी सरकारानें सारखेंच मानलेलें असून रणांगणांतील ऐन गर्दींत जाण्याची संधि मिळणें दोघांसही सारखेंच शक्य असून ती एकास मिळाली, व दुसऱ्याची गेली हें केवळ यदृच्छेचेंच फळ होय हें जपानी शिपाई जाणत असतील. परंतु मान्यता पगार दर्जा फार काय, पण प्रत्यक्ष हत्यारेंपात्यारें या गोष्टींतही सवतीमत्सरानें वागविलेल्या नेटिव्ह सैन्यास, व विशेषतः ज्यांच्याकडे परचक्रप्रसंगीं कामागिरी आलीच तर निरोप पोंचविण्याची, पहारा करण्याची, किंवा सामानसुमान वाहून नेणाऱ्या खेचरांचें रक्षण करण्याची

येणार, त्यांना कशाचा अभिमान व कशाचें काय ? खुद्द संस्थानिकांकडे पाहिलें तरीहि, इकडे जे कोणी राजे व कोणी महाराजे असतील, ज्या कोणास ५० लक्षांची अगर तीन चार कोटींची जहागीर असेल, ज्यांशीं इंग्रज सरकारांनीं बरोबरीच्या नात्यानें दोस्तीचे तह केलेले असतील, त्यांना फार झालें तर, दहा पंधराशें रुपये महिना मिळविणाऱ्या मेजर किंवा कर्नलची सन्मानार्थक पदवी मिळणार. व त्यांजकडे कामगिरी येणार तीहि अर्थातच सन्मानार्थक अशीच नांवाचीच कांहीं तरी असणार. तात्पर्य, अशा वस्तुस्थितीमुळें कोणाहि संस्थानिकास आपली फौज तयार ठेवण्याची अगर त्या कामावर पैसा खर्च करण्याची हौस वाटण्याचा संभवच नाहीं.

जेव्हां एखाद्या संस्थानिकानें आपखुषीनें नवीन पद्धतीनें सैन्य ठेवण्यास परवानगी मागितली असें आपण ऐकतों, तेव्हां ती आपखुषी म्हणजे निवळ नाखुषी किंवा बळजबरी, व ती परवानगी म्हणजे सक्तीचा हुकूम असें आम्ही तरी निःसंशय समजतों. लॉर्ड लिटन यांचे कारकीर्दींत म्हणजे सन १८७७ सालीं राणी व्हिक्टोरिया हिंदुस्थानची बादशाहीण झाली, त्याप्रसंगीं देशी संस्थानिकांचें एक मंत्रिमंडळ नेमावयाचें असा जो एक ठराव झाला होता. त्याप्रमाणें मंत्रिमंडळ नेमलें गेलें असतें, हल्लीं साम्राज्याच्या कारभारांत देशी संस्थानिकांचा जो बिलकूल हात नाहीं तो कांहीं तरी असता, निदान पहिल्या वर्गाच्या संस्थानिकांस तरी सरकारानें तहाप्रमाणें बरोबरीच्या नात्यानें वागविलें असतें, मुसलमानी बादशाही असतांनाहि ज्याप्रमाणें मुख्य अगर दुय्यम सेनापतींचीं कामें हिंदु राजेरजवाड्यांवर विश्वासानें टाकण्यांत येत होतीं त्याप्रमाणें हल्लीं एखाद्या बड्या संस्थानिकास सैन्याचा एखादा मोठा भाग हाताखालीं वागवून स्वतंत्र अधिकारानें बडी कामगिरी बजवावयाची संधि असती, तर मात्र लष्करी खर्च करण्यास किंवा सैन्य तयार ठेवण्यास संस्थानिकांस हुरूप वाटली असती. पण हें जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंतचा सर्व केवळ जुलमाचा रामराम होय, व त्यांस फौजफाट्यावर खर्च करण्यास भाग पाडणें म्हणजे

साम्राज्याचे संरक्षणाकरतां पैशाखातर कर बसविणें असेंच स्वरूप प्राप्त होतें. अशा प्रकारचा कर आपणावर लादून घेण्यास देशी संस्थानिक आपखुषीनें तयार होतील असें मानण्यास आमचें मनच घेत नाहीं. चंद्रकिरण अंगावर पडल्याबरोबर स्फटिक ज्याप्रमाणें द्रवूं लागतो असें म्हणतात त्याप्रमाणें, पोलिटिकल एजंटाचें गौरवदन पाहिल्याबरोबर ज्यांचें तनमनधन पाझरूं लागून प्रभुचरणाकडे लोट घेऊन धांवतें, व इंग्रज प्रभूच्या कृपोच्छ्वासाचा लेश प्राप्त होत असेल तर हिंदुस्थानच्या प्रजेचा अर्थाअर्थी कांहीं हिताहित संबंध नसतां दहावीस लक्ष रुपये खर्चून एखाद्या जहाजावर दवाखाना मांडून तें सरकारचे स्वाधीन करण्यास ज्यास कांहीं एक दिक्कत वाटत नाहीं, अशा स्वाभिमानशून्य संस्थानिकांबद्दल मात्र आम्हांस कांहीं एक म्हणावयाचें नाहीं. आधींच परदास्य, त्यांतून बालाभ्यासीं इंग्रज शिक्षकांचे बुद्धिवाद एकसारखे कानीं पडत आलेले, व इंग्रज सरकारची कृपा व अवकृपा यांच्या सद्यःफलांतील मोठा फरक प्रत्यहीं दृष्टीस पडणारा, यामुळें कित्येक संस्थानिकांस स्वत्वाची ओळखच राहिलेली नाहीं. ब्रिटिश साम्राज्यरूपी महाप्रवाहांत ते हळू हळू निमीलन पावत चाललेले असून त्यांचे नांवाखेरीज त्यांजमध्यें देशी संस्थानिकत्वाची कांहींच खूण राहिलेली दिसत नाहीं. परंतु ज्या कांहीं थोड्या संस्थानिकांस अद्यापि इंग्रज सरकार जरी प्रबळ असलें तरी आपले हक्कहि नीतिदृष्ट्या तितकेच प्रबळ आहेत असें वाटत असेल, ज्यांना दुसऱ्याचे फायद्याकरितां फौजफाट्यावर खर्च करणें हा द्रव्याचा केवळ अपव्यय वाटत असेल, व इंग्रज सरकारची सत्ता सागराप्रमाणें अफाट असली तरीहि तिनें आपली मर्यादा उल्लंघूं नये असें वाटत असेल त्यांच्या संबंधानेंच फक्त आम्हांस बोलावयाचें आहे; व त्यांच्याकरितां आम्ही असें स्वच्छ म्हणतों कीं, हल्लीं देशी संस्थानिकांस त्यांचे इच्छेविरुद्ध साम्राज्योपयोगी ( Imperial service ) सैन्य ठेवण्याचा जो अत्याग्रह चाललेला आहे तो निवळ जुलूम होय!

[ ३ ]*

संस्थानिकांकडून नवीन फौजांबाबत जो खर्च करविण्यांत येत आहे त्यास मुख्य आधार म्हटला म्हणजे संकटसमयीं इंग्रज सरकारास आम्ही तन–मन–धन खर्चून ( With all the Resources of the State ) मदत करूं असें जें एक तहनाम्यांत सर्वव्यापक कलम आहे तेंच होय. तेव्हां हल्लीं प्रश्न असा उपस्थित होतो कीं, संस्थानिकांनीं आपलें सर्व तन–मन–धन सरकारच्या चरणीं वहावें असें संकट तरी कोणतें आलें आहे ? वरील कलमाचा अंमल शब्दशः व सक्तीनें केला जावा इतकें तें संकट खरें व मोठें आहे कीं काय ? ज्या अर्थीं तहनाम्यांतील विवक्षित शब्दांचे अर्थावरच मदार आहे त्या अर्थीं ते शब्द सरकारास कितीसे अनुकूल आहेत हें प्रथम पाहणें जरूर आहे. हे वरील शब्द इतके व्यापक आहेत कीं, त्यांच्या आधारें नवीन फौजांबद्दल खर्चचसा काय परंतु संस्थानिकांचें अर्धें अगर सगळें उत्पन्नही जर सरकार मागूं लागेल तरी तें देणें भाग आहे ! निर्वाणीचीच वेळ आली म्हणजे मग एका मित्रानें दुसऱ्या मित्रास न मागावी अगर त्यानें ती न द्यावी अशी वस्तु वास्तविक कोणतीच नाहीं. त्यातून इंग्रज सरकार हें सार्वभौम सरकार व संस्थानिक हे दोस्त असून त्यांतूनही मांडलिक, तेव्हां त्यांनीं सरकारास अदेय असें कांहींच उरत नाहीं. वास्तविक ज्यास राजा ही संज्ञा आहे त्यास कसल्याही प्रसंगीं अदेय अशा एक दोन तरी वस्तु असतात. महा प्रयासानें व पुण्याईनें पुत्ररत्न झालेल्या दानशूर दिलीप राजासहि पुत्रजन्ममहोत्सवप्रसंगीं कोणी मागितल्या असतां न देण्यासारख्या अशा फक्त तीन गोष्टी होत्या असें कालिदासानें सांगितलें आहे. तो म्हणतो:–" अदेयमासीत् त्रयमेव भूपतेः शशिप्रभं छत्रमुभे च चामरे "॥ आमच्या संस्थानिकांजवळ खरीं छत्रचामरें असतीं तर त्यांनीं इंग्रज सरकारास अदेय असें कांहींच नाहीं असें जें आम्हीं वर विधान केलें आहे, त्यास कदाचित् अपवाद येण्याचा संभव असता. परंतु हिंदुस्थानांत

*केसरी ता. ४।४।१९०५.

इंग्रज सरकारनें ‘ एकछत्री ’ राज्य स्थापिल्यामुळें संस्थानिकांचे मस्तकावरील राजछत्रें जाऊन त्यांचे हातीं फक्त छत्र्या राहिल्या आहेत; व चामरें जाऊन त्या ऐवजीं घोड्यावरील गोमाशा वारण्याच्या चवऱ्या आल्या आहेत; यामुळें त्यांना अदेय असें कांहींच राहिलेलें नाहीं, असें आतां बिनधोक म्हणतां येतें. परंतु तहनाम्यांचा संस्थानिकांविरुद्ध अशा रीतीनें शब्दार्थ व त्याचप्रमाणें अंमल जर करितां येतो तर, इंग्रज सरकारास अडचणींत पाडतां येण्यासारखे असेही कित्येक शब्दार्थ आम्हांस लावतां येतील असें वाटतें. तहनामा काय किंवा पदवी काय, निवळ शब्दार्थांवरून येणारी जबाबदारी सारखीच असली पाहिजे. व असें आहे तर उदाहरणार्थ, श्री. गायकवाडांस ‘फर्जंद-ई-खास-ई-दौलत ई-इंग्लिशिया ’ अशी पदवी आहे व तिचा शब्दार्थ इंग्रजी राज्याच्या वैभवाच्या दौलतीचा मुलगा असा होतो, तर श्री. सयाजीराव यांनीं उद्यां जर असें म्हटलें कीं, आम्ही इंग्रजी दौलतीचे मानसपुत्र तेव्हां ब्रिटिश राजपुत्राचे हक्क आम्हांस कां न द्यावे ? व हा एकंदर युक्तिवाद सप्रमाण मानला तर पुढील हिवाळ्यांत राजपुत्र ड्यूक ऑफ यार्क यांस हिंदुस्थानांत पाठविण्याचा, मिरविण्याचा व दरबार भरविण्याचा जो खटाटोप होणार आहे त्या ऐवजीं श्री. सयाजीराव यांसच विलायतेस जाण्याचें थांबवून घेऊन व त्यांना दौलतीचे राजपुत्र या नात्यानें हिंदुस्थानांत मिरवून इतर संस्थानिकांच्या राजनिष्ठारूप वधूकडून त्यांचे गळ्यांत माळ घालविण्यास कोणती हरकत होती ? कर्मधर्मसंयोगानें गेल्याच सामाजिक परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेल्या आपल्या भाषणांत श्री. सयाजीराव यांनीं संस्थानिकांच्या राजनिष्ठेस अनुरूप असा ब्रिटिश राजकुलांतील एखादा कुमार घरजांवई होण्यास हिंदुस्थानांत पाठविण्याची सूचना केली होती हें सर्वांस विदित आहेच; व त्याच सूचनेप्रमाणें ब्रिटिश दौलतीचे हे ‘फर्जंद-ई-खास ’ म्हणजे प्रिय मानसपुत्र हिंदुस्थानांत असतां निराळा राजकुमार हुडकण्याची व त्यास हजारों मैलांचा समुद्रावरील प्रवास पाडून इकडे पाठविण्याची आवश्यकता राहिली नसती. परंतु या ‘ मानसपुत्रास ’ अशा ‘ मनोराज्या ’ खेरीज दुसरें तिसरें

कांहीं कधींही मिळण्याचा संभव नाहीं. श्री. सयाजीराव हे आजहि आपल्या नांवापुढें ‘ फर्जंद-ई-खास-ई-दौलत-ई इंग्लिशिया’ ही पदवी लावीत आहेत; तथापि, त्यांच्या वांट्यास या पितृसुखाचा भाग कितपत येत आहे हें लोकांस कर्णोपकर्णी ऐकून माहीत असेलच. परंतु कोणतेही शब्दार्थ फक्त संस्थानि-कासच बाधक व्हावयाचे, त्यांचा जाच इंग्रज सरकारांस व्हावयाचा नाहीं हें बहुधा ठरून गेल्यासारखेंच आहे. कारण १८५८ सालाच्या जाहिरनाम्या-वर केवढ्या लांब लांब टीका व निरुक्तें बनत चाललेलीं आहेत व मूळ शब्दांच्या अर्थास कोतेपणा येत आहे व किंबहुना विपर्यासही होत आहे हें लॉर्ड कर्झन यांच्या कायदे कौन्सिलांतील गेल्या भाषणावरून कोणासही कळून येणार आहे.

संकटसमयीं संस्थानिकांनीं तनमनधन खर्च करून सरकारांस मदत केली पाहिजे याविषयीं केवळ शब्दार्थावरून कितपत जबाबदारी लादतां येईल हें येथवर सांगितलें. परंतु अशा प्रकारची जबाबदारी लादण्यास असें सबळ कारण तरी कोणतें उत्पन्न झालें आहे याचा विचार याहूनहि अधिक महत्त्वाचा आहे. प्रस्तुत समयीं इंग्रज सरकारावर संकट कोणतें आलें आहे याचा विचार करितां रशियाची हिंदु-स्थानावर स्वारी याहून दुसरें तिसरें कांहींच दिसत नाहीं. पण हें संकट कांहीं नवीन नाहीं. याची बातमी आज पांच पन्नास वर्षें तरी लोक ऐकत आले आहेत! आज जे लोक म्हातारे झाले आहेत ते लहान असतां त्यांनीं हेंच ऐकिलें, व आज जे लहान आहेत ते म्हातारे होईपर्यंतही हेंच ऐकत राहतील. रशियाचा ब्रिटिश राज्यास पूर्वीं कधीं बाऊ नव्हता असें झालेलें नाहीं व तो नाहीं असें पुढें कधींहि होईल किंवा नाहीं याची वानवाच आहे. मनुष्य-मात्रास ज्याप्रमाणें मृत्यु त्याप्रमाणें कोणत्याहि राष्ट्रांतील राज्यास नाश हा केव्हांना केव्हां तरी यावयाचाच असतो, या म्हणण्यांत कांहींच गैर नाहीं. तसेंच एकाच सांपळ्यांत कोंडून ठेवलेल्या दोन हिंस्र पशूंनीं केव्हांना केव्हां तरी एकमेकांचें ओरखडून रक्त काढलें तर तें जितकें स्वाभाविक आहे तित-

केंच भूपृष्ठावरील एका विवक्षित भागांत महत्त्वाकांक्षेनें सारखींच उद्दीप्त होऊन वावरत असणारीं व नखशिखांत शस्त्रास्त्रें धारण करणारीं राष्ट्रें एकमेकांवर वार करण्यास संधि पहात बसलेलीं असणें हेंहि स्वाभाविक आहे. परंतु याप्रमाणें हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या नाशाची वेळ किंवा रशियानें हिंदुस्थानावर घाला घालण्याची वेळ खरोखरच आलेली आहे किंवा काय याचा शांतमनानें व सारासार दृष्टीनें विचार करणें जरूर आहे.

रशियाची हल्लींची स्थिति लक्षांत घेतली असतां इंग्रज सरकारची भीति अगदीं हास्यास्पद दिसते. ‘ जातस्यहि ध्रुवो मृत्युः ’ या सिद्धांताप्रमाणें पाहिलें तर, मनुष्यमात्र जन्मल्यापासूनच मृत्युवश होण्यास पात्र होतो हें जरी तात्त्विकदृष्ट्या खरें आहे, तरी या सत्य वचनाचा आधार घेऊन रांगत्या खेळत्या मुलाच्या संसारयात्रेचा विचार अगर व्यवस्था न करतां त्याचे डोक्यावर मृत्युसंकट आजच येऊन ठेपलें आहे अशा बुद्धीनें मनुष्य निर्वाणीच्या गोष्टी बोलूं लागेल अगर संसारयात्रेच्या व्यवस्थेच्या ऐवजीं त्याच्या स्मशानयात्रेचीच तयारी करूं लागेल, तर तें हास्यास्पद झालेंच पाहिजे हें कोणींहि म्हणेल. विशेषतः रशियाची हल्लींची स्थिति लक्षांत घेतली असतां सरहद्दीवर तोफांचे मोर्चे बांधणें व लष्कर सज्ज करण्याकरितां कोटयावधि रुपये खर्च करणें हें जितकें असंबद्ध आहे त्याहूनहि, तहनाम्यांतील शब्द ज्यास उद्देशून लिहिलेले आहेत अशा प्रकारचें प्राणसंकट आज इंग्रजी राज्यावर आलेलें असून संस्थानिकांनीं तनमनधन खर्च करून आम्हांस मदत केली पाहिजे असें म्हणून त्यांकडून फौजेचा खर्च घेणें अधिक असंबद्ध ठरतें. रशियाकडे आज पहावें तों त्यास आंत बाहेर हजारों विंचू डसून राहिलेले असून त्याची नुसती तळमळ चाललेली आहे. आपले प्राण कसे वांचतील या विचारांत रशिया आहे. आपल्या शत्रूंस अपकार कसा करावा हा विचार त्याचे मनांत येण्यास आज जागा नाहीं. जें प्राणसंकट आज येऊन पडलें आहे तें खरें रशियावर आहे, ब्रिटिश साम्राज्यावर नाहीं.

देशांत पहावें तों सर्व प्रजा बेदील होऊन गेली आहे; मजूर लोकांनीं संप करून कामधाम सोडून निराशा–आवेशानें बंडाळी मांडली आहे; राजविध्वंसक अशा सोशिआलिस्ट व निहिलिस्ट पंथास पुण्य-पर्वणी आली आहे असें वाटून आपल्या भयंकर धर्मतत्त्वांस अनुसरून शेलक्या शेलक्या राजकीय लोकांचे खून करून बळी देण्यास त्यांनीं सुरवात केली आहे. विद्यार्थ्यांनीं विद्यार्जनाचें आपस्वार्थी व एकदेशीय काम तूर्त बाजूस ठेवून देशबांधवांस स्वातंत्र्य व स्वराज्याधिकार मिळावे या उदार हेतूनें बंड करण्याचा अखेरचा व निसर्गसिद्ध हक्क त्यांनीं कां कसा बजवावा हें शिकविण्याकरितां लाखों हस्तपत्रकें छापून व वांटून क्षणभर शिक्षकाचा पेशा अंगिकारला आहे; व सैन्यांतील लोक बिथरले असून राजवाड्यापुढें तोफांची ‘ सलामी ’ द्यावयाची असतां ‘ सरबत्ती ’ देऊन खुद्द राजवाड्यावरच गोळे टाकण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली आहे! परंतु या सर्व अनेक बाबी हल्लीं चाललेल्या रूसोजपानी युद्धापुढें त्या कांहींच नव्हत. कारण राशियानें अचाट प्रयत्न करून जें चार पांच लक्ष सैन्य हजारों मैल दूरच्या मोहिमेस पाठविलें त्याचे गळ्याभोंवतीं जपानी सेनानायकानें आपला घट्ट यम-पाश घालून त्यांपैकीं निम्याहून अधिक सैन्य नाहींसें केल्यानें बाकीच्यांस पळतां भुई थोडी झाली आहे व अखेर राशियास दातीं तृण धरून जपानाशीं तह करणें भाग पडलें आहे. अशा स्थितींत ‘राशियाची हिंदुस्थानावर स्वारी’ हें संकट आपणापुढें मूर्तिमंत उभें राहिलें आहे असें म्हणणें हें प्रामाणिकपणाचें होणार नाहीं. आतां तहनाम्यांतील शब्द अत्यंत व्यापक असतां आपण फक्त थोडासा खर्च घेऊन संस्थानिकांस त्यांच्या ऋणापासून मुक्त करितों हा आमचा उदारपणाच नव्हे काय? असें सरकारतर्फे कोणी म्हणण्याचा संभव आहे. परंतु जेथें ऋणच मुळीं खरें नाहीं, किंवा ऋण खरें असलें तरी तें वसूल करून घेण्यास कायदेशीर असा काळ आलेला नाहीं तेथें कितीहि थोडा खर्च घेतला तरीं तो अन्यायच होणार आहे. ‘ तीन चोक तेरा व तीन अठरा, त्यांत दोन सूट व बाकी राहिले सोळा’ या हिशोबा-प्रमाणें फक्त सोळा रुपये वसूल करणाऱ्या मारवाड्यास दोन रुपये सूट दि-

त्याबद्दलच्या औदार्याची फुशारकी कोणीही मारूं देणार नाहीं, उलट हिशोबाआगळे तीन रुपये अधिक वसूल केल्याच्या दोषासच तो पात्र होईल तीच गत संस्थानिकांकडून साम्राज्योपयोगी फौजांकरितां म्हणून नवीन खर्च घेणाऱ्या सरकारची आहे हें तेव्हांच दिसून येईल.

## संस्थानिकांनाहि कौन्सिल पाहिजे*

तीन आठवड्यांपूर्वी दिल्ली येथें संस्थानिक लोकांची परिषद् भरली होती त्याप्रसंगीं, औपचारिक रीत्या व उघडपणें संस्थानिकांतर्फे व सरकारतर्फे भाषणें झालीं. चर्चा झालेल्या गोष्टींत नाहीं म्हणावयास एक गोष्ट महत्त्वाची होती; व जरी ती आजच प्रथम नव्यानें चर्चेस निघालेली नसली तरी संस्थानिकांना एवढा हेलपाटा देऊन कां होईना पण तिचा पुनरुच्चार घडला ही गोष्ट आमच्या मतें चांगली झाली. ती गोष्ट म्हटली म्हणजे हिंदी संस्थानिकांचें एखादें कौन्सिल बनविण्यासंबंधाची होय. अशा प्रकारचें कौंसिल असण्याची आवश्यकता काय आहे हें थोड्याशा विचाराअंतीं वाचकांच्या लक्षांत येईल. हिंदी संस्थानिक व ब्रिटिश सरकार यांची जोडी अशी कांहीं लोकविलक्षण आहे कीं, तिला जगांतील दुसऱ्या कोणत्याहि राज्यांत हुडकूं गेलें तरी उपमान सांपडावयाचें नाहीं. एकंदर हिंदुस्थानांतील एकतृतीयांश इतका मुलूख व एकपंचमांशाहून अधिक प्रजा देशी संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. या संस्थानिकांत लहान व मोठे अशांची एकच खिचडी होऊन गेलेली आहे. एखादंदुसरें संस्थान विस्तारानें असेंहि मोठें आढळेल कीं, इंग्लंड, फ्रान्स वगैरे प्रमुख युरोपियन राष्ट्रांच्या खांद्याला खांदा भिडवून बरोबरीच्या नात्यानें लढणाऱ्या इटाली देशाएवढें जवळजवळ तें भरेल; तर कित्येक संस्थानें ज्या अल्प राष्ट्रांचें व्यक्तित्व नष्ट न होऊं देण्याकरितां युरोपांतील युद्ध माजून राहिलें आहे त्या बाल्कन राष्ट्रांएवढीं भरतील;

---

*केसरी ता. २१ नोव्हेंबर १९१६.

आणि कित्येक तर इतकीं चिमुकलीं आहेत कीं, त्यांच्या क्षेत्रफळाचे चौरस मैल शेंकड्यांनींही मोजतां येणार नाहींत! परंतु ब्रिटिश सरकारानें पुष्कळशा संस्थानिकांवर मिळविलेला विजय विजिगीषेचा नसून स्नेहभावाचा होता. यामुळें ब्रिटिश सरकाराशीं त्यांचे संबंध वरिष्ठ–कनिष्ठ अशा प्रकारचे नसून स्नेही किंवा सोबती अशा नात्याचेच होते; व तात्त्विक दृष्ट्या तरी अद्यापिहि ते तसेच आहेत. कांहीं संस्थानांचा पत्रव्यवहारसंबंध थेट हिंदुस्थान सरकारशीं घडतो. सुमारें १७५ संस्थानें खुद्द हिंदुस्थान सरकारच्या कारभारांत येतात व सुमारें ५०० संस्थानें प्रांतिक सरकारच्या कारभारांत येतात. कित्येकांच्या दरबारीं रेसिडेंट अगर ब्रिटिश सरकारचा वकील राहतो व कित्येकांचा पत्रव्यवहार दरबारीं न राहणाऱ्या पोलिटिकल एजंटामार्फत होतो. अशा प्रकारची विषम परिस्थिति असतांहि अधिकाराच्या दृष्टीनें हीं सर्व संस्थानें एका अर्थी एकाच दर्जाचीं किंवा एकाच पायरीवरचीं ठरतात. कारण त्यांतील मोठ्यांतल्या मोठ्या संस्थानिकालाहि परराष्ट्राशीं स्वतंत्र रीतीनें तहनामे किंवा व्यापारी संबंध ठरवितां येत नाहीं; व उलटपक्षीं अगदीं लहानांतल्या लहान संस्थानिकालाहि स्वतःच्या प्रजेवर बहुतेक अधिकार इतके पूर्ण आहेत कीं, त्यांच्या अंतर्व्यवस्थेंत ब्रिटिश सरकार कायद्यानें हात घालूं शकत नाहीं.

तथापि, या स्वतंत्रप्राय दिसणाऱ्या संस्थानिकांची स्थिति एका अर्थानें आज सामान्य ब्रिटिश प्रजाजनापेक्षांहि अडचणीची आहे. व ती अडचण ही कीं, संस्थानिकांस कोणत्याहि एखाद्या बाबतींत अन्याय किंवा त्रास झाल्यास त्याची दाद लागणें मुष्किलीचें होतें. खुद्द सरकार म्हणजे व्यक्तिशः गव्हर्नर अगर गव्हर्नर जनरल हेच त्यांचें वरिष्ठ न्यायकोर्ट; पण त्या न्यायकोर्टाचीं सर्व द्वारें सरकारी पोलिटिकल खात्याच्या हातीं. अर्थात् या व्यक्तीकडून मिळेल व या द्वारांतून बाहेर पडेल तितकाच न्याय त्यांच्या पदरीं पडणार. ब्रिटिश अमलांतील खात्यांची अडचण नाहीं असें नाहीं. पण संस्थानिकासंबंधानें विशेष अडचणीची गोष्ट ही कीं, ब्रिटिश मुलखांतील

प्रजेच्या कारभाराविषयीं कायदे कौन्सिलांतून जी चर्चा होऊं शकते व वर्तमानपत्रद्वारा लोकमताचा जो पाठिंबा मिळूं शकतो त्या चर्चेचा किंवा त्या पाठिंब्याचा फायदा संस्थानिकांस मिळत नाहीं. यामुळें संस्थानिकांचा कारभार हें ‘ तोंड दाबून बुक्यांचा मार ’ या म्हणीचें एक उत्कृष्ट उदाहरण होऊन राहिलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पहावयासच गेलें तर सरकारास कायद्यानें कोणाहि संस्थानिकावर कोणत्याहि प्रकारची सक्ति करितां येत नाहीं. पण प्रत्यक्ष प्रकार कांहीं वेगळाच असतो ! कारण रेसिडेंट अगर पोलिटिकल एजंट यांनीं एखादी गोष्ट म्हटली व संस्थानिकानें ती न ऐकली तर त्याला त्याबद्दल, तो अधिकारी बदलून जाईपर्यंत, गुप्त छळ सोसावा लागतो. खालसामध्यें असा छळ झाल्यास त्याचा गवगवा करितां येतो, व गवगव्यानें छळाचा सर्वस्वीं परिहार न झाला तरी जनसमूहाची सहानुभूति तरी मिळते. सहानुभूति हें दुःखांतलें एक मोठें सुख आहे. तिच्यायोगानें दुःख सोसण्यास मनुष्याला धीर येतो. पण देशी संस्थानिकांना हें सुख कधींहि लाभत नाहीं. त्यांचें दुःख त्यांना आपल्या ठिकाणींच झुरत सोसावें लागतें. खालसातींतला यःकश्चित् प्रजाजन वर्तमानपत्रद्वारा आपलें दुःख वेशीवर बांधूं शकतो; पण संस्थानिकांनीं वर्तमानपत्रांकडे धांव घेणें म्हणजे तो एक अक्षम्य गुन्हा मानला जातो. बरें, वर्तमानपत्रें राहिलीं. पण संस्थानिकांना आपल्या सुखदुःखाची चर्चा आपापसांत तरी मोकळ्या मनानें करितां यावी कीं नाहीं ? पण तेंहि नाहीं. देशी संस्थानिक हे या बाबतींत अत्यंत हतभागी आहेत. त्यांना पोलिटिकल एजंट किंवा रेसिडेंट यांच्या मध्यस्थी किंवा साक्षीशिवाय परस्परांशीं राजरोस दळणवळण किंवा पत्रव्यवहार ठेवितां येत नाहीं. दोन संस्थानिकांनीं गुप्तपणें एकत्र जमणें हें तुरुंगांतील कैद्यांनीं कामाव्यतिरिक्त एकमेकांशीं बोलण्याइतकें अप्रशस्त मानलें जातें. तात्पर्य, पोलिटिकल अधिकाऱ्यांना खूष ठेवून संस्थानिक लोक जो काय न्याय मिळवूं शकतील तेवढाच आज त्यांना मिळणार !

ही स्थिति पालटण्याकरितां एखादें कौन्सिल स्थापित होणें हाच तूर्त उत्तम उपाय आहे. ब्रिटिश सरकार व खालसातींतील प्रजाजन यांचे संबंध

कायद्यानें बांधलेले असतात, व प्रसंगविशेषीं ब्रिटिश न्यायकोर्टांत सरकारी व त्याविरुद्ध प्रजाजनास, त्या कायद्यांचा योग्य अर्थ ठरून, न्याय मिळूं शकतो. पण तहनामे हेच संस्थानिक व सरकार यांच्या दरम्यानचे कायदे होत. त्यांच्या शब्दांचा वाद उत्पन्न झाल्यास तो संस्थानिकांनीं कोणत्या न्यायकोर्टांत तोडून घ्यावा ? या दृष्टीनें पाहतां नुसत्या कौन्सिलानेंहि काम भागणार नाहीं. कारण कौंसिलनें एखादा निर्णय दिल्यास त्याला हुकूमनाम्याचें स्वरूप येणार नाहीं. खालसातींतील कायदेकौन्सिलच्या ठरावाइतकीच त्याची किंमत होईल, पण अशा प्रकारचें न्यायकोर्ट किंवा पंचायत कोर्ट स्थापित होईपर्यंत तूर्त संस्थानिक–सभेनेंहि बरेंच काम भागण्यासारखें आहे. कारण संस्थानें व सरकार यांच्या दरम्यान सरहद्दीची वांटणी, जकातीचें उत्पन्न, आगगाड्यांचे रस्ते, अबकारीखातें, न्यायइनसाफीचे अम्मलबजावणीस परस्पर मदत, एकमेकांच्या गुन्हेगारांची धरपकड, फौज व पोलीस, व ब्रिटिशसरकाराकडून संस्थानाच्या कारभारांत होणारी ढवळाढवळ वगैरे बाबतींत संस्थानिकांच्या तक्रारींची चर्चा होण्यास कौन्सिल किंवा संस्थानिकसभेनें बरीच मदत होईल. मात्र ही सभा कांहीं तरी ठरीव नियमांनीं प्रस्थापित झाली पाहिजे. तिची घटना कशी असावी ? तिच्या सभा केव्हां व्हाव्या ? तिच्या कामकाजाची शिस्त कशी असावी ? आणि तिच्या ठरावांची बजावणी कशी व्हावी ? वगैरे गोष्टींसंबंधानें नियम ठरणें जरूर आहे. नाहीं तर या सभेची स्थिति आमच्याइकडील जिल्हा-दरबाराप्रमाणें व्हावयाची !

आपल्या अंतर्व्यवस्थेंत संस्थानिक स्वतंत्र आहेत, यामुळें ब्रिटिश सरकारास त्यांच्या कारभारांत हात घालतां येत नाहीं ही गोष्ट तत्वतः खरी असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ती तितकी खरी नाहीं. मात्र हात घालणें अगर न घालणें हें सरकार केवळ आपल्या सोयीप्रमाणें करीत असतें. ब्रिटिश सरकारावर हिंदुस्थानासंबंधीं ईश्वरानें अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या लादल्या आहेत, त्यांतलीच एक अशी आहे कीं, देशी संस्थानांत झालें तरी गैरकारभार चालूं नये, अथवा प्रजेवर जुलूम होऊं नये. पण गैरकारभार किंवा

ज़ुलम यांची व्याख्या ठरलेली नसल्यानें एखादा संस्थानिक सरकारच्या मर्जीतला अगर गैरमर्जीतला आहे यावरच सर्व पारडें बहुधा फिरतें. जो संस्थानिक पोलिटिकल तंत्र नीट संभाळतो व सरकारास प्रिय अशा गोष्टी करतो, त्याच्या कारभारांत हात घालण्याचा प्रसंग आला असतां सरकार संस्थानिकांच्या स्वातंत्र्याचा हवाला देतें. पण जो संस्थानिक सरकाराशीं बांकून वागतो व मतस्वातंत्र्यता दाखवितो त्याच्याशीं वागतांना वर दर्शविलेल्या जबाबदारीस फाजील महत्त्व प्राप्त होतें ! याकरितां गैरकारभाराची व्याख्या ठरणें जरूर आहे, व संस्थानिकसभेंत असल्या प्रश्नांची मोकळेपणानें चर्चा होऊं दिल्यास सरकारानें संस्थानिकांच्या कारभारांत केव्हां हात घालावा व केव्हां घालूं नये याला कांहीं तरी व्यवस्था लागेल. पण हें सर्व होण्यास संस्थानें व सरकार यांच्यामधील संबंधास गोषाचें जें स्वरूप आज येऊन राहिलें आहे तें आधीं निघून गेलें पाहिजे; आणि जें स्वातंत्र्य खालसांतील प्रजेस अनुभवावयास मिळतें तितकें तरी संस्थानिकांस मिळालें पाहिजे. आतां कोणतेंहि स्वातंत्र्य घेणार जसा भेटेल तसें तें त्याला मिळतच असतें; व पुष्कळ अंशीं ‘ गोषांतील स्त्रियां ’ ची पदवी आपणास प्राप्त करून घेण्यास आमच्या संस्थानिकांचा भित्रेपणाच कारण झालेला आहे, नाहीं असें नाहीं. सरकारच्या इतराजीनें होणारें त्यांचें नुकसान सामान्य प्रजाजनापेक्षां फार मोठें असतें खरें; तरी पण त्यांनीं हेंहि विसरतां कामा नये कीं, संस्थानिक या नात्यानें त्यांचा स्वाभिमानहि सामान्य प्रजाजनांपेक्षां अधिक असला पाहिजे. जे सामान्य प्रजाजनापेक्षांहि भित्रे ते राजे कसले ? आपले हक्क रक्षण करण्यासंबंधानें झगडण्याच्या बाबतींत त्यांनींच इतरांना उदाहरण घालून दिलें पाहिजे. व्यक्तिमात्र प्रजाजनाची जबाबदारी स्वतः त्याच्या पुरती असते. संस्थानिकांची जबाबदारी संस्थानचे राजे व ट्रस्टी अशी दुहेरी आहे. व्यक्तिशः त्यांचा स्वभाव फाजील उदार असला तरी गादीकरितां त्यांना हिशेबी बनलें पाहिजे. आमच्या संस्थानिकांमध्यें अशा प्रकारची जाणीव मुळींच नसेल असें आमचें म्हणणें नाहीं. पण संस्थानिक-सभेसारख्या संस्थेच्या अभावीं सरकारास त्यांना एकएकटें घेऊन पायावर

ऊंसाच्या एकेरी कांड्याप्रमाणें सहज मोडतां येतें. तेंच अशी संस्था अस्तित्वांत आल्यास त्यांना सोबतीचा फायदा मिळून धीर येईल; आणि समुदायामुळें एकमेकांचा एकमेकांस अप्रत्यक्ष कां होईना जोर पोंचेल. बहुधा अशाच हेतूनें दिल्लीस जमलेल्या संस्थानिकांनीं नरेंद्र सभेची मागणी केली असावी, व स्नेही म्हटल्या जाणाऱ्या संस्थानिकांची ही साधी मागणी सरकारकडून मान्य होऊन लवकरच अशा प्रकारची सभा स्थापली जाईल अशी आम्हास आशा आहे.

## पण संस्थानच्या प्रजेची काय वाट ?*

आमच्या हिंदी संस्थानिकांनाहि एखादें कौन्सिल कां हवें हें वर सांगितलें. पण नुसते संस्थानिक म्हणजे कांहीं संस्थानें नव्हेत. संस्थानांत संस्थानिकांच्या प्रजेचाहि समावेश होतो, किंबहुना संस्थानिकांना जें महत्त्व आहे तें केवळ पांचसातशें संस्थानिक व्यक्तींच्यामुळें नसून, संस्थानी अमलाखालीं असणाऱ्या एकंदर हिंदुस्थानच्या एक पंचमांश प्रजेमुळें आहे. पण दुर्दैवानें ही प्रजा जवळजवळ असून नसल्यासारखीच गणण्यांत येते. खालसा मुलुखांतील यःकश्चित् प्रजाजनास जे हक्क, जे अधिकार व ज्या सवलती आहेत त्याहि आमच्या संस्थानिकांना नाहींत, पण याच्याहि पुढची परतंत्रपणाची एक पायरी असून ती संस्थानांतील प्रजाजनांची आहे. खालसांतील प्रजेला फार तर एकाच ब्युरॉक्रसीचा जाच असतो; संस्थानी प्रजेला दुहेरी जाच होत असतो. इंग्रजी व देशी अशा जाड दुपदरी ब्युरॉक्रसीच्या वस्त्रांतून गळून खालीं पडेल तेवढेंच स्वातंत्र्यसुख काय तें संस्थानी प्रजेस लाभणार !

केवळ एक दोन साधीं उदाहरणें दिलीं असतां वरील विधान अधिक स्पष्ट होईल. ब्रिटिश मुलुखांत कांहीं नाहीं म्हटलें तरी स्थानिक-स्वराज्यसंस्था आणि कायदे कौन्सिलें आहेत. याचा अर्थ हा कीं, कांहीं थोड्या गोष्टी तरी

* केसरी ता. २८ नोव्हेंबर १९१६

त्यांना आपल्या जबाबदारीवर करितां येतात आणि सरकारी कारभाराची त्यांना थोडीबहुत तरी चर्चा करितां येते. पण संस्थानांतून स्थानिक कारभार देखील प्राय: सरकारी खात्यामार्फतच चालतो, आणि राज्यकारभारावर तर लोकमताचा दाब यत्किंचितहि राहत नाहीं. तसेंच वर्तमानपत्रांचा कायदा जरी आज जारीनें अमलांत आहे तरी सार्वजनिक सुखदु:खांच्या बाबींसंबंधानें ब्रिटिश प्रजेला मोडकेंतोडकें कां होईना पण लोकमत व्यक्त करतां येतें, परंतु संस्थानी अमलांतील पांचसहा कोटि लोकांना तेंहि समाधान मिळत नाहीं. वास्तविक खालसा मुलूख व संस्थानी मुलूख यांजमध्यें केवळ काल्पनिक रेघेची सरहद्द असते; व अंमल कोणाचाहि असला तरी बुद्धिमत्ता, आकांक्षा व मनुष्यस्वभाव या दृष्टीनें पाहतां अशा सरहद्दीनें विभागलेले दोहोंकडचे लोक एकाच साम्राज्यदेहाचे जिवंत अवयव आहेत; असें असतां या दोहोंच्या वागणुकींत इतकी विषमता कां रहावी ? हा प्रश्न कोणासहि सहज सुचण्यासारखा आहे. या दोन वर्गांच्या अंगीं पात्रता भिन्न प्रकारची आहे असें नाहीं, तर केवळ त्यांची राजकीय परिस्थिति भिन्न आहे इतकेंच काय तें. एकतंत्री कारभाराची आवड ब्रिटिश अधिकाऱ्यांसच आहे असें नाहीं. देशी अधिकाऱ्यांनाहि ती असतेच. मात्र फरक इतकाच कीं, देशी संस्थानांतून देशी अधिकाऱ्यांच्या या लालसेस ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या लालसेची जोड मिळते. खालसातींत एकतंत्री अधिकाराची एकच कोंडी फोडावी लागते, पण संस्थानांतून एकतंत्री अधिकाराच्या दोन कोंड्या फोडल्याशिवाय कार्यभाग होत नाहीं. कित्येक संस्थानिक लोकमताला स्वत:च्या इच्छेनेंच धाब्यावर बसवितात, तर दुसऱ्या कित्येकांस ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या इच्छेची निदान सबब तरी सांगतां येते. पण मिळून दोहोंचा परिणाम अखेर एकच होतो.

प्रजा खालसातींतील असली काय किंवा संस्थानांतील असली काय, तिची स्थिति सर्व बाजूंनीं आज सारखीच असावयास पाहिजे. भौतिक सुधारणेचे फायदे जर दोनहि प्रजांस सारखेच उपभोगावयास सांपडतात, व ते उपभोगण्यास दोनहि प्रजा सारख्याच लायक आहेत असें जर मानण्यांत

येतें, तर राजकीय बाबतींत दोघांनाहि सारखाच दर्जा व सारखेंच सुख मिळण्यास काय हरकत आहे ? पण दुर्दैवानें दोनहि प्रजांचा राजकीय दर्जा सारखा राहावा अशी कळकळ किंवा दक्षता ब्रिटिश सरकार बाळगीत नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. एवढेंच नव्हे तर ज्या गोष्टी उघडपणें ब्रिटिश अमलांत होत नाहींत अशाहि गोष्टी परस्पर नेटिव्ह संस्थानिकांच्या हातून करविण्याचा कित्येक पोलिटिकल अधिकारी केव्हां केव्हां प्रयत्न करितात, व तो त्यांचा प्रयत्न चांगला सिद्धीसहि जातो. उदाहरणार्थ, खालसातींत कांहीं विवक्षित मर्यादेपर्यंत कां होईना पण भाषणें, व्याख्यानें, सभा, परिषदा वगैरे राजकीय चळवळी बिनहरकत होऊं शकतात, पण संस्थानी मुलखांत मात्र त्यांवर कडकडीत सरकारी बहिष्कार घातला जातो. आतां कित्येक संस्थानांतून हा बहिष्कार संस्थानिकांना प्रिय असतो म्हणून घातला जात नाहीं, तर तो त्यांना स्वतःला नापसंत असला तरी वरिष्ठ पोलिटिकल अधिकाऱ्यांच्या कारस्थानामुळें घातला जातो ! अशीं कित्येक वर्तमानपत्रें दाखवून देतां येतील कीं, जीं खालसातींत प्रेसॲक्ट होण्यापूर्वीं अव्याहत चालत होतीं व तो ॲक्ट झाल्यानंतरहि जामिनकी वगैरे भरून कां होईना पण आजहि चालू आहेत. हीं वर्तमानपत्रें ब्रिटिश सरकारास आवडतीं किंवा पसंत आहेत असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं, तरी पण तीं चालू आहेत एवढी गोष्ट खरी. त्यांचें अस्तित्व नाखुषीनें कां होईना पण सोसण्यास ब्रिटिश सरकार तयार आहे. पण मौज ही कीं, प्रेसॲक्टापूर्वींहि नेटिव्ह संस्थानांतून वर्तमानपत्रें फारशीं चालूं दिलीं जात नव्हतीं, व आतां तर जीं कित्येक वर्तमानपत्रें ब्रिटिश मुलखांत धडधडीत राजरोस चालतात त्यांजवर संस्थानांतून मात्र बहिष्कार घातला जात आहे ! या बाबतींत केवळ संस्थानिकांच्या इच्छेप्रमाणेंच गोष्टी घडावयाच्या असत्या तर असा बहिष्कार घातला गेला नसता अशी आमची पक्की खात्री आहे. वास्तविक वर्तमानपत्रांतून जी चर्चा होते ती ब्रिटिश मुलुखांतील कारभारासंबंधानेंच होते, देशी संस्थानांच्या कारभारासंबंधानें बिलकुल होत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. असें असतां ही चर्चा खुद्द ब्रिटिश मुलुखांत लोकांना वाचूं देण्यांत येते आणि संस्थानांतून

मात्र ती वाचण्यास मज्जाव होतो, हें आश्चर्य नव्हे काय ? लोकसभा वगैरें-चीहि तीच गोष्ट आहे, इकडे ब्रिटिश मुलुखांत सरकार लोकांस कायदे-कौन्सिलें देत आहे इतकेंच नव्हे तर त्यांचे अधिकार दिवसेंदिवस वाढतहि आहेत. पण लोकप्रतिनिधींची सभा स्थापण्याची संस्थानांत कोणी थोडी चळवळ केल्यास ती एखाद्या राजद्रोही किंवा क्रांतिकारक कटाप्रमाणें सक्तीनें निर्मूळ करण्यांत येते हें कसें ? आम्हांला तर याचें कारण इतकेंच दिसतें कीं, राजकीय बाबतींतील जें उदार धोरण आपल्या स्वतःच्या मुलुखांत चालविण्याचें धैर्य सुधारलेल्या ब्रिटिश सरकारच्या अंगीं आहे, तें सर्वस्वीं आवरतें घेऊन, प्रतिगामी धोरणाचा खेळ संस्थानांतून खेळण्याचा मोह पोलिटिकल अधिकाऱ्यांस आवरत नाहींसा होतो. संस्थानांतून पोलिटिकल अधिकारी ही जी गुप्त ढवळाढवळ करितात तिला खुद्द सरकारची चिथावणी किंवा पाठबळ असतें असें आमचें म्हणणें नाहीं. पण कायदे कौन्सिलें, वर्तमानपत्रें वगैरेंच्या जाचांतून आयती सुटका होऊन राजकीय चळवळीचा विंचू परस्पर संस्थानिकांच्या मुठीनें मारण्याची जी आयती संधि पोलिटिकल अधिकाऱ्यांना मिळते तिचा ते पूर्णपणें फायदा घेतात, आणि सरकार त्यांच्या या लीलेकडे धडधडीत कानाडोळा करतें एवढें मात्र म्हटल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

पण संस्थानिकां-संस्थानिकांमध्येंहि दोन प्रकार असतात. कित्येक संस्थानिकांचा पोलिटिकल खात्याच्या हुकमतीमुळें व दहशतीमुळें नाइलाज होत असेल हें आम्हास कळतें; पण आम्हास हेंहि पक्कें माहीत आहे कीं, दुसरे कित्येक संस्थानिक या दहशतीची सबब सांगून किंवा बाहणा करून स्वतःला प्रिय म्हणूनच लोकमताचें प्राबल्य वाढूं न देतां दडपशाहीचा कारभार करतात. ‘ रविरपि न दहति तादृग्यादृक्संदहति वालुकानिकरः । अन्यस्माल्लब्धपदो नीचः प्रायेण दुःसहो भवति ॥ ’ प्रत्यक्ष सूर्याच्या उन्हापासूनहि होत नाहीं असा दाह उन्हानें तापलेल्या वाळूपासून होतो, अशा अर्थाचें दुर्जननिंदेचें एक संस्कृत सुभाषित आहे त्याची आम्हाला या ठिकाणीं आठवण होते. कित्येक संस्थानिकांचीं कृत्यें पाहिलीं म्हणजे ब्रिटिश सरकारचा

अम्मल फार बरा, असें वाटतें. देशी संस्थानांसंबंधानें लॉर्ड डलहौसी यांच्या धोरणास बंडामुळें आळा पडला तो पडला नसता तर हिंदुस्थानचें हित अधिक झालें असतें असें म्हणण्याचा मोहहि मनाला क्षणभर अनावर होतो. ब्रिटिश राज्यविभागाचा विस्तार फार मोठा असल्यामुळें, आणि एकच अधिकारी कोठेंहि फार दिवस रहात नसल्यामुळें, दुःखाचा दिवस केव्हां तरी संपून सुखाचा दिवस येईल अशी आशा करण्यास जागा असते. पण एखादा संस्थानिक वाईट निघाल्यास प्रजेच्या सबंध पिढीच्या पिढीला आपला जन्म जुलुमांत काढावा लागतो. अर्थात् आजन्म वैर संपादून संस्थानिकांच्या जाचांत राहण्याखेरजि गत्यंतर नसतें. ब्रिटिश राज्यकारभारांत जसे विस्ताराचे दोष तसेच संस्थानच्या कारभारांत संकुचितपणाचे दोष आढळून येतात. टीचभर क्षेत्रांत राजाचे अष्टाधिकार गाजवावयास सांपडल्यामुळें संस्थानिकांच्या हातून आपण सुटून जाऊं अशी खात्री कोणासच बाळगतां येत नाहीं, व निराशेच्या दडपणाखालीं त्यांना संस्थानिकांच्या एकतंत्री अमलाचा जाच सोसावा लागतो.

संस्थानच्या कारभारासंबंधानें जरी आम्ही सहसा लिहिण्याच्या भानगडींत पडत नाहीं, तरी या कारभारांतील दोष आम्हास माहीत नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, कित्येक संस्थानिक संस्थानच्या वसुलाचा पुष्कळसा भाग आपल्या स्वतःच्या चैनीकडे खर्च करतात आणि प्रजेचें शिक्षण, आरोग्य वगैरे सामान्य गोष्टींकडेहि दुर्लक्ष करतात; मग प्रजेच्या संपन्नतेच्या वृद्धीकडे लक्ष देणें तर दूरच राहिलें. कित्येक संस्थानिकांना केवळ पैसा सांचविण्याची बेसुमार हांव असल्यामुळें त्यांच्या पदरच्या अधिकाऱ्यांना ते अत्यंत हलके पगार देतात व त्यामुळें अर्थातच लाचलुचपतीचा प्रकार फार चालतो. कित्येक संस्थानिकांना न्यायमनसुब्याच्या सामान्य तत्त्वाचीहि ओळख नसते, तरी पण न्यायमनसुब्याच्या कामीं ते प्रत्यक्ष ढवळाढवळ करितात. पण अशा रीतीनें हे दोष सांगत बसल्यास फारच विस्तार होईल. थोडक्यांत सांगावयाचें तर, संस्थानांतील प्रजेस जरी आमच्या

स्वराज्याच्या मागणींतलें सर्व स्वराज्य आधींच मिळून चुकलेलें आहे तरी, पुष्कळ संस्थानांतून सुराज्य मात्र असावें तितकें अद्यापि नाहीं. स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं. हें जरी खरें, तरी केवळ स्वराज्यानेंच काम संपतें असें मात्र कोणीहि समजत नाहीं. तसें खरोखर असतें तर हिंदुस्थाना-खेरीज बाहेरच्या सर्व देशांतून प्रजेला आज स्वराज्य लाभलेलें असतांहि सुराज्य साधण्याविषयीं ज्या खटपटी, ज्या चळवळी चाललेल्या आहेत त्या चालल्या नसत्या. आधीं स्वराज्य पाहिजे व मग त्यास सुराज्याची जोड मिळाली पाहिजे. ही जोड मिळविण्याकरितांच इतर देशांतील प्रयत्न आहेत व नेटिव्ह संस्थानांतूनहि जर कांहीं व्हावयास पाहिजे असेल तर अशाच प्रकारचा प्रयत्न झाला पाहिजे.

संस्थानांतून राजकीय चळवळीचें काम करणें हें ब्रिटिश मुलुखापेक्षांहि अवघड कां होऊन राहतें यांचें दिग्दर्शन आम्हीं वर केलेंच आहे. तथापि या अवघडपणाची सबब सांगूनच जर संस्थानिकांची प्रजा गप्प बसेल तर तिला सुराज्यसुख लाभण्याची केव्हांहि आशा बाळगतां येणार नाहीं. ब्रिटिश मुलुखांतील प्रजेसहि जें स्वराज्य लाभलेलें नाहीं तें आपणास लाभलेलें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवून त्याचा त्यांनीं योग्य अभिमान बाळगला पाहिजे. पण त्याचबरोबर संस्थानिकांचे हातून सुराज्यव्यवस्था लाभण्याबद्दलची चळवळ, जे परिश्रम व जो स्वार्थत्याग लागतो तोहि त्यांनीं केला पाहिजे. खुद्द संस्था-निकांचें सुराज्याभावामुळें कांहींच अडलेलें नाहीं. जर कोणाचें कांहीं अडलें असेल तर तें प्रजेचेंच आहे, व संस्थानची प्रजा हेंच खरें संस्थान अशी बुद्धि मनांत धरून राजकीय सुधारणेच्या व उन्नतीच्या मार्गास तिनें लागलें पाहिजे. संस्थानिकांचे ठायीं त्यांची भक्ति व निष्ठा असणें स्वाभाविक व योग्यहि आहे, किंबहुना ब्रिटिश मुलुखांत राजा हा प्रत्यक्ष रहात नसल्यानें व प्रजेला तो क्वचितच दृष्टिगोचर होत असल्यानें ब्रिटिश प्रजेच्या राज-भक्तीला या दूरान्वयामुळें तितकें उज्वल स्वरूप येऊं शकत नाहीं. पण स्वरा-ज्याची आकांक्षा बाळगणें हें जसें खालसांतील प्रजेच्या राजनिष्ठेशीं विरोधी

नाहीं तसेंच सुराज्याची आकांक्षा बाळगणें हेंहि संस्थानी प्रजेच्या राजनिष्ठेशीं विरोधी नाहीं. संस्थानांतून सुराज्यस्थापना करणें म्हणजे संस्थानिकांस गादी-वरून काढून टाकून प्रजासत्ताक राज्य स्थापणें असें नसून, इंग्लंडांतहि जशीं आज राजावर राज्यघटनेचीं बंधनें आहेत तशींच संस्थानिकांवरहि तीं असावीं अशी मागणी करण्यांत कांहींच वावगें नाहीं. कॉन्स्टिटयूशनल मॉनर्क ( घटनापाशबद्ध राजपद ) हे शब्द युरोपांत अपमानास्पद न गणले जातां उलट बहुमानास्पदच गणले जातात. म्हणून आमच्या संस्थानिकांनींहि स्वतःस नियमबद्ध करून घेणें हें भूषणावहच होईल. पण हें न समजण्याइतकी ज्याची बुद्धि कमकुवत व न उमजण्याइतकें ज्याचें मन क्षुद्र असेल त्याला सुधारण्याचें काम त्याच्या प्रजेनें आपल्या हातीं घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं असेंच समजलें पाहिजे. संस्थानाच्या प्रजेनें राजकीय चळवळीस सुरुवात कर-तांच प्रथम प्रथम पुढाऱ्यांना त्रास सोसावा लागून स्वार्थत्याग करावा लागेल ही गोष्ट आम्हीहि जाणून आहों. परंतु पहिल्या पिढीनें हा त्रास सोसल्यास व स्वार्थत्याग केल्यास पुढील पिढ्यांना तरी त्याचें गोड फळ मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. खुद्द आपल्यांमध्यें राहणारा राजा असतां कोणत्याहि प्रयत्नानें कां होईना, त्याचें मन सुराज्याकडे वळविण्यास जर आपण समर्थ झालों नाहीं, तर तो दोष आपला आहे असेंच संस्थानी प्रजेनें समजलें पाहिजे. संस्थानचें क्षेत्र लहान असल्यामुळें जसे तोटे आहेत तसे उलट कांहीं फायदे-हि आहेत हेंहि विसरतां कामा नये. आणि राजकीय सुधारणेविषयीं प्रजेची खरी कळकळ दिसून आल्यास ती मनावर न घेण्याइतके नादान असलेच तर फार थोडे संस्थानिक असतील अशीहि आमची अद्यापि समजूत आहे.

# शाहू छत्रपति व इंग्रज यांचें हितगुज*

[ कांहीं मनोरंजक उतारे ]

( १ ) महाराजांचें कर्नल फेरिस ( कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट ) यास पत्र ता. १२ मे १९०८—

गेल्या प्लेगांत मी तुमच्याकडे येऊन बाँबगोळ्याविषयीं बातमी दिली व बाँबगोळे करण्याची कृति शिकण्याकरितां परदेशीं जाणाऱ्या माणसाबद्दल बोललों. पण तेव्हां तुमचा त्यावर विश्वास बसला नाहीं. ‘ नेटिव्ह संस्थानांतील कायदे व नियम यामुळें चळवळ्या लोकांचा फायदा होतो व आम्हां संस्थानिकांना मात्र नडतें. ’ कारण त्या लोकांसारखें आम्हांस वागतां येत नाहीं. ”

( २ ) महाराजांचें हिल साहेबांना पत्र ( २६ जून १९०८—

“ तुमच्याशीं किती किती तरी मला बोलावयाचें आहे. व तुमच्याकडून सर्व प्रकारची बातमी मला समजावून घ्यावयाची आहे. ‘ टिळकांना कैद केलें आहे असें मला समजतें ’ व मला अशी आशा आहे कीं, नव्या कायद्याखालीं ‘ केसरी ’ वर्तमानपत्र जप्त होईल. ”

( ३ ) महाराजांचें मेजर वुडहाऊस ( कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट ) यांस पत्र ( १६ जुलै १९०८—

“ काल आपल्याशीं बोलणें झालेंच आहे. ‘ गोऱ्या ब्रिटिश सोजिरांची एक तुकडी येथें ( कोल्हापूर ) कांहीं दिवस पाठवाल तर मला आनंद होईल. बाँब करणाऱ्या चळवळ्या लोकांना दहशत बसविण्याला तिचा फार उपयोग होईल. ’ एखाद्या छापखान्याची झडती घेणें अगर त्याच्या मालकावर खटला करणें ह्याला ( इतर ) लोक किती भितात हे तुम्हांस मी

---

* केसरी ता. १७ मे १९२१

पूर्वीं सांगितलें आहे. तरी सोजीर पाठविण्याविषयीं सरकारास तुम्ही फार फार शिफारस कराल अशी आशा आहे. ”

( ४ ) महाराजांचें हिलसाहेबांस पत्र ( ता. १८।७।१९०८—

“ येथील ( कोल्हापूर ) चौकशी गुप्तपणें चालू आहे. पुण्याचे ब्राम्हण व दक्षिणमहाराष्ट्रांतील संस्थानिक हे कसे आहेत हें तुम्ही जाणतांच. पंधरा संस्थानिकांपैकीं कोल्हापूर व मुधोळ हीं दोनच ब्राम्हणेतर संस्थानें असल्यामुळें इकडचा प्रांत हा ब्राम्हणांच्या सत्तेचा एक अभेद्य किल्लाच होऊन बसला आहे. गोऱ्या सोजिरांच्या पलटणीची इकडे जरूरी आहे ती पाठविण्याविषयीं सरकारकडे तुम्हीं एकादा शब्द खर्चाल काय ? या सर्व चळवळींची जबाबदारी एका अर्थानें सरकारच्याच माथ्यावर आहे. ते नेहमीं अर्धेंमुर्धें काम करतात. पूर्वींच एकदां झपाटा मारला असता तर ही चळवळ मुळांतच खुडून निघाली असती. तसें घडलें नाहीं म्हणून आतां हे लोक छातीवर बसले आहेत. आणि अजून कडक उपाय न योजले तर यापुढें याहूनाहि जड जाईल. बडोदें, मिरज, जमखिंडी व इचलकरंजी वगैरेसंबंधानें तुम्हाला कांहीं सांगावयाचें आहे तें समक्षच सांगेन म्हणतों. पत्रांत लिहू शकत नाहीं. ”

( ५ ) महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क यांस पत्र ( ११ आगष्ट १९०८—

“ विजापूरकर हे येथील फारा दिवसांचे प्रोफेसर, त्यांच्यावर खटला केला तर खळबळ उडेल म्हणून मी कांहीं दिवस विचार करीत होतों, व पूर्ण विचारांतीं त्यांच्यावर खटला करण्याचें ठरविलें आहे. पण कैदी तिकडून इकडे देण्याबाबत थोडी अडचण दिसते. फर्नांगडीस ह्यांस सल्ला घेण्याकरितां लीगल रिमेम्ब्रन्सर ह्याजकडे पाठविलें आहे. ‘ विजापूरकरांचें आर्टिकल फारच द्वाडपणाचें आहे ’ असें जें तुमचें मत आहे तसेंच माझेंहि आहे. ”

( ६ ) सर जॉर्ज क्लार्क ह्यांचें महाराजांस पत्र ( १६ आगष्ट१९०८—

" विजापुरकरासंबंधीं कायदेपंडितांचा अभिप्राय पाठविला आहे तो पोंचला असेलच. कोल्हापुरच्या राजद्रोहाच्या कायद्याप्रमाणें हा खटला करण्यास अडचण असेल तर मी आग्रह धरणार नाहीं. पण ' विजापुरकर हा वाईट मनुष्य आहे, तो राजद्रोह शिकवितो व त्याचें वजन मोठें घातुक आहे. ' त्याच्या खटल्यानें खळबळ उडेल खरी, पण तुमच्या-विरुद्ध खटपट करणाऱ्या लोकांच्यावर त्याचा चांगलाच परिणाम होईल. "

( ७ ) महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क ह्यांस पत्र ( २३ ऑगष्ट १९०८—

" विजापुरकर व त्यांचे स्नेही ह्यांस पकडल्याचें कळलें असेलच. शंका असल्यास आग्रह नाहीं असें आपण लिहिलें त्याबद्दल फार आभारी आहे. पण मला शंकाच नाहीं, म्हणून खटला आरंभिला आहे. ' आपल्यासारखेंच माझें ह्मणणें नसतें तर मी तें आपणास आदबशीर रीतीनें कळविलें असतें. या खटल्यानें लोक चिडल्यामुळें शिवाजी-संप्रदायांतील लोकांनीं हत्यारें जमविण्याचें काम सुरू केलें आहे. म्हणून मी कांहीं दिवस इकडेच राहणार आहे. येथल्या सुशिक्षितब्रुव लोकांची टीका कानीं पडूं नये व मजकडे येऊन कोणी भीड घालूं नये म्हणून मी बाहेर तालुक्यांतच फिरत असतों. "

( ८ ) महाराजांचें रॉबर्टसनसाहेब ( पोलिटिकल सेक्रेटरी मुंबई ) यांस पत्र ( ता. ७ सप्टेंबर १९०८—

" माझ्या पोलिसांनीं बॉबची सामुग्री, हत्यारें, दारुगोळा वगैरे गोष्टी बागेजवळच्या तळ्यांत हुडकून काढल्या. या बागेला कोल्हापूरचा ' माणिकतोळा ' असें नांव देण्यांत आलें आहे. बॉब फेरीससाहेबांवर फेंकावयाचा होता. ' राष्ट्रमत ' व ' केसरी ' पत्रांशीं संबंध असलेल्या कांहीं लोकांचीं नांवें चौकशींत निघत आहेत. ' ही चौकशी आमची आम्हींच संपवावी व तिचें सर्व श्रेय आम्हींच घ्यावें, तें दुसऱ्यास जाऊं नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे. या वेळीं ब्रिटिश पोलिस मध्यें हात घालतील तर आमच्या पोलिसांना त्याबद्दल विषाद वाटेल. वुडहाउससाहेब चौकशीच्या कामीं फार मदत करतात म्हणून त्यांना येथेंच राहूं देण्यांत येईल असें

कळल्यानें आनंद झाला. आम्ही काम करतों हें पाहा व खरें तेंच पुढें आणतों कीं नाहीं तें पाहा अशी मी केनेडीसाहेब ( इन्स्पेक्टर–जनरल ऑफ पोलिस ) विनंति केली आहे. "

( ९ ) रॉबर्टसन्साहेबांचें महाराजांस पत्र ( सप्टेंबर १९०८--

" गव्हर्नरसाहेबांनीं तुमचें पत्र वाचलें. त्यांना फार आनंद झाला. तुमच्या पोलिसांची चौकशी संपवून तुमच्या अदमासाप्रमाणें फार मोठ्या गोष्टी उघडकीस येतील अशी त्यांना आशा असून, तुमच्या पोलिसानाच त्यांचें सर्व श्रेय मिळेल असें त्यांनीं कळवावयास सांगितलें आहे. पण कायद्याची सीमा तुम्हीं उल्लघूं नये. कारण कायद्याच्या मुद्यावर गळ्यांत आलें कीं सगळेंच बिघडलें. "

( १० ) महाराजांचें हिलसाहेबांस पत्र ( ८ सेप्टेंबर १९०८--

" मागील पत्र लिहिल्यानंतर आणखी एक घबाड मिळालें. बेळगांवच्या लोकांनीं अगदीं तयार केलेला असा एक बॉम्बगोळा आतां आम्हास सांपडण्याचा संभव आहे. तसेंच दारुगोळा व हत्यारेंहि. या बॉम्बला कर्नल फेरिसचें नांव ठेविलें आहे. माझ्या पोलिसांची शाबास खरी. त्यांना आपण धन्य आहों असें वाटतें, आणि तें योग्यच आहे. त्यांची आतां एवढी इच्छा आहे कीं, त्यांच्या चौकशींत यश आलें तर सरकारनें आमच्या पोलिसांची बहादुरी गाजवावी. आणि त्यांनाहि केवळ उगाच धन्यता वाटत नाहीं. कारण सगळ्या इलाखाभर पसरलेले भाग त्यांनीं हुडकून काढले आहेत, व उलट ब्रिटिश सरकारच्या पोलिसांनाच त्यांनीं माहीत नसलेल्या खाणाखुणा सांगितल्या आहेत."

( ११ ) हिल साहेबांचें महाराजांस पत्र ( ११ सप्टेंबर १९०८

" तुम्हांला आणखी शोध लागणार होते ते लागले का ? इकडील संस्थानांत शाळामास्तर व विद्यार्थी यांच्यावर मी हत्यार धरलें आहे व राजद्रोहाचें शिक्षण बिलकूल चालूं देणार नाहीं असें मी त्यांना जाणविलें आहे. "

( १२ ) महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क ह्यांना पत्र ( ९ सप्टेंबर १९०८—

" मी आपणाला भेटून खटल्याबद्दल सांगितलेंच. पण मनांत होतें तें सगळें बोलूं शकलों नाहीं. मॉरिसनसाहेब माझ्या जुन्या ओळखीचे आहेत, त्यांना भेटणार होतों. मॅकनिलसाहेबांची माझी जुनी ओळख, त्यांनाहि भेटणार होतों, व त्यांचशशीं मनमोकळें बोलून माझ्या मनांत अगदीं खरें खरें काय आहे तें त्यांनींच तुम्हांस सांगावें, अशी त्यांना विनंति करणार होतों. ह्या चौकशीच्या कामीं मी तुम्हाला थोडासा तरी उपयोगी पडूं शकतो एवढ्यानेंच मला धन्यता वाटते. मुंबईस गिरण्यांच्या मजुरांनीं दंगे केले त्या कामीं मला सरकारच्या उपयोगी पडतां आलें नाहीं, त्याबद्दल वाईट वाटतें. येऊन जाऊन आमची खरी इच्छा हीच कीं ब्रिटिश सरकारची कांहीं तरी सेवाचाकरी आमच्या हातून घडावी. मेजर वुडहाऊस हे मी बच्चा असल्यापासून मला ओळखतात. त्यांजपाशीं मी मन मोकळें करून बोललों आहे. राजद्रोह दडपून टाकल्यापासून परिणाम काय होतो व राजनिष्ठ पोलीस अशी कीर्ति मिळविल्यापासून काय फायदे आहेत हें माझ्या पोलिसांना समजावून देऊन त्यांना उत्तेजित करण्याला किती श्रम पडतील हें वुडहाउससाहेबांस माहीत आहे. फेरिस–बॉंबसारखे बॉंब सांपडणें ही मोठी अवघड गोष्ट, पण अशाही गोष्टी आपण आतां शोधून काढूं अशी त्यांना आशा वाटते. पुण्यांतील आरोपी त्यांच्या हातीं पडले म्हणजे मग तर काय सर्व लोकांना आश्चर्यानें थक्क करून सोडतील असे चमत्कारिक शोध त्यांना लागण्याचा संभव आहे. "

( १३ ) कर्नल फेरीस यांचें महाराजांस पत्र ( २३ सप्टेंबर १९०८—

" विजापुरकरांचा गळा फांसांत सांपडला व ' समर्थ ' ( छापखाना ) जप्त करण्यांत आला हें वाचून अत्यानंद झाला. पण खरेंच नुसत्या इंग्रजांचे खून करण्याला त्यांनीं चिथावणी दिली होती, कीं तुमचा सुद्धां ? ( खासगी ) पंडितरावाकडे ( कोल्हापुरचे न्यायाधीश ) मात्र विजापुरकरांचा खटला देऊं नका. तसें केलेंत कीं तो सुटलाच. आणि एकदां दोषमुक्त झालेल्या मनुष्यावर फिरून दोषारोप करणें फार कठीण असतें. "

(१४) महाराजांचें मेजर वुडहाऊस ह्यांना पत्र (३ आक्टोबर १९०८—

" विश्ववृत्ताच्या खटल्याची पूर्वचौकशी पुरी झाली. सुशिक्षित, विशेषतः ब्राह्मण, अशा लोकांवर खटला असल्यामुळें आह्मांला न्यायाधीश पाहिजे तो मोठा कडक पाहिजे. माझ्या नोकरींतले वरच्या वर्गांतील न्यायाधीश ब्राह्मण असून कडक नाहींत, आणि एकदां खालीं खटला बिघडला म्हणजे तो कौन्सिलांत सुधारून घेण्याला फार अडचण पडणार पुण्यांत नेटिव्ह न्यायाधिशांनीं मुकद्दमे बिघडविल्यामुळें हायकोर्ट—जज्जांच्या मार्गांत अडचणी आल्या हें आह्मांस माहीत आहे, ह्मणून मला क्लेमंटस साहेबासारखा कडक न्यायाधीश पाहिजे. कारण ते मोठे निःपक्षपाती· त्यांच्या मनांत पूर्वग्रह म्हणून मिळावयाचा नाहीं! लोक म्हणतील, सरकारनें कोल्हापूर दरबारला घोड्यावर घातलें; पण आपणाला लोकांशीं काय करावयाचें ? आपल्याला न्याय झाल्याशीं कारण. किंबहुना ' ब्रिटिश सरकार व कोल्हापूर दरबार एक विचारानें चालतात ' असें लोकांना दिसून आलें तरी हें इष्टच आहे. "

(१५) महाराजांचें रॉबर्टसन साहेबांना पत्र (११ आक्टोबर १९०८—

" आमच्याहि माणिकतोळा—खटल्याचें ठीक चाललें आहे. चौकशींत मदत करावयाची तर तुमचे पोलीस पाठवूं नका तर असिस्टंट जज्ज पाठवा. दोन शिकारी जसे एकाच सावजाची शिकार करूं पाहत नाहींत तसेंच दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या हातून एकदिलानें काम होऊं शकत नाहीं. विजापुरकरकरांचा खटला चालवावयाला तुमचा न्यायाधीश द्या म्हणजे माझ्यावर मोठा उपकार होईल. माझ्या पदरचे न्यायाधीश हा खटला चालविण्याला नाखूष आहेत. पत्रांतल्याहून अधिक हटवादीपणानें ते माझ्याशीं तोंडी बोलले. कृपा करा व माझी ही अडचण दूर करा. जर हे माझे दोनहि खटले फसले तर माझा दाब प्रजेवर मुळींच राहणार नाहीं व माझ्यावर पोलीस विश्वास ठेवणार नाहीं व पुढें काम करण्याला त्यांना उमेद येणार नाहीं. मी खटल्यांत इंग्रज बॅरिस्टर लावतों. तुह्मी इंग्रज

न्यायाधीश द्या. नाहीं तर सर्व फसगत होईल. सातारा व बेळगांव येथील प्रकरणें ब्रिटिश पोलीस चालवीत असल्यामुळें तीं सोडून देऊन मी आतां पुण्यांतील शोध चालविले आहेत !"

( १६ ) महाराजांचें हिल साहेबांना पत्र ( १९ आक्टोबर १९०८—

" बेळगांव येथें तेथील पोलीस व माझे पोलीस ह्यांच्यामध्यें तंटा झाला ह्याचें मला वाईट वाटतें. काय पाहा, सगळें श्रेय आपणा एकट्याला मिळावें म्हणून ज्याची त्याची खटपट ! पूर्वी कौन्सिल—हॉलांत बसलों असतां तुम्ही मला माझ्या पोलिसांची सुधारणा करण्यास सांगितलें. पण मी तुम्हांला तेव्हांच सांगितलें कीं माझे पोलीस फार चांगले असून फक्त त्यांना शाबासकी देणारा मागें हवा. तुम्ही मजबरोबर गाडींत बसून फिरावयास याल काय ? म्हणजे आपण लांबवर जाऊं व मी हकीकती सांगेन त्या ऐकून तुम्हांला नवल वाटेल. मी तुम्हांला निश्चयानें सांगतों कीं कांहीं आरोपींचे मोठमोठ्या लोकांशीं संबंध आहेत. फर्नांडीस हा माझा विश्वासू नोकर असून मी त्यास पुण्यास चौकशीला पाठवीत आहे. कांहीं आरोपींचा कांहीं संस्थानिकांशीं संबंध येऊं पाहात आहे. किनसाहेबांनीं येथें याबद्दल मला मुद्दाम विचारलें. पण सूड घेतल्यासारखें दिसेल म्हणून मी बोललों नाहीं. कदाचित मिरजकरांना पूर्वी जशी समज दिली तशी इतर कांहीं संस्थानिकांना द्यावी लागेल. तुम्हाला भेटावें आणि समक्ष पुष्कळ सांगावें असें वाटतें.

( १७ ) लीवार्नरसाहेबांचें महाराजांस पत्र ( ८ डिसेंबर १९०८—

" हीं माथेफिरूपणाचीं कृत्यें आतां थांबतील तर बरें होईल. माझे जुने पुणेंकर दोस्त ह्यांचीं आतां काय काय बिंगें बाहेर पडतात तें पाहूं. तुमच्या मागचा तरी त्यांचा त्रास थोडासा कमी झाला कीं नाहीं ?"

(१८) महाराजांचें सर वुइल्यम लीवार्नर यांस पत्र (३० जानेवारी १९०९—

" किंकेडसाहेबांनीं खटल्यांत निकाल केले ते तुम्हाला समजलेच असतील. रासायनिक द्रव्यें चोरलेल्या मुलांना चार वर्षांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा दिल्या. आर्टिकलच्या लेखकांना तीन वर्षें मिळाली. मी त्यांच्या मागें फार

दिवस होतों. सरकार अर्धवट काम करतें यामुळें हे लोक अधिक चढेल होतात. खरा मुळाशीं कोण आहे हें पाहून घाव घालावा. तें न होतां अशांना उलट सरकारकडून मान–सन्मान मिळतात व त्यांतले कांहीं तर कायदे–कौन्सिलांतहि जातात. त्यामुळें त्यांचें इकडे हिंदुस्थानांत वजन वाढतें व अनुयायांची संख्याहि! हें मी सरकारास स्पष्ट सांगितलें, पण माझ्या म्हणण्याला ते किंमत देत नाहींत हें नेहमींचेंच आहे. आतां म्हणे कायदे–कौन्सिलांच्या सभासदांची संख्या वाढणार आणि मग आणखीहि अनेक राजद्रोही लोक कौन्सिलांत शिरतील यांत काय आश्चर्य? आज खरी स्थिति म्हटली तर अशी आहे कीं आमच्यावर इंग्रजांचें राज्य नसून ह्या द्वाड कुचेष्टाखोरांचेंच आहे. त्यांना आम्ही पुरें ओळखलें तरी त्यांचें जूं झुगारून देणें ही गोष्ट कायद्यानें अवघड करून ठेविली आहे. मागसलेले लोक शेंकडों वर्षें मागें आहेत, पण त्यांची काळजी कोण करतो? मी असे खात्रीनें सांगतों कीं, लोक म्हणत असतील कीं ह्याला काय माहीत. पण बॉंबगोळ्याच्या कारस्थानाची माहिती त्यांना वाटते त्याहून माझ्या खिशांत अधिक आहे. आणि ही सगळी जर कां मी टाकिली तर पुष्कळसे रावबहादूर आणि सरकारकडून सन्मान उपटणारे लोक ह्यांची अब्रू चवाट्यावर येईल. मला मुंबईच्या सी. आय. डी. कडून मिळावी तशी मदत मिळत नाहीं एवढेंच वाईट वाटतें. ती मिळती तर या कोल्हापूर–खटल्यांतच कित्येकांचीं नांवें बाहेर आलीं असतीं. तुम्हाला समक्ष भेटून किती तरी गोष्टी सांगाव्याशा वाटतात. लॉर्ड मोर्लेसाहेबांची गांठ पडून त्यांच्याशीं एकवार बोलण्याची संधि मिळावी अशी फार इच्छा आहे. ती मिळाल्यास गोखले व इतर लोक जसे आपले विचार मोर्लेसाहेबांपुढें मांडतात तसे मलाहि मांडतां येतील. गोखले व त्यांसारखे इतर लोक काय काय घाणेरड्या गोष्टी व युक्त्या करतात त्या सांगून त्याविषयीं मी एकदां खात्री पटवून दिली म्हणजे मग लॉर्ड मोर्ले आश्चर्यचकित होऊन त्यांचा चेहरा कसा दिसेल हें मला पाहावयाचें आहे. या लोकांच्या खासगी भेटी घेतात तसें आम्हालाहि स्नेहभावानें इंग्लंडला कां बोलावीत नाहींत? तसें झालें तर

निदान उलट बाजू काय म्हणते हें तरी त्यांना कळून येईल. तुम्ही विचारतां ‘ सदर्न मराठा कंट्री ’ कसा काय आहे ? मी म्हणतों कीं, शेजारच्या मुलखासारखाच आहे ! तुम्ही विचारतां कीं, बॉंब कसे थांबतील. त्याचें उत्तर हें कीं, सिव्हिलियन लोकांना पोलिस अधिकारी नेमा. साधे पोलिस चोऱ्या दरोडे ह्यांच्या तपासाला ठीक आहेत. पण राजद्रोहाच्या तपासांत त्यांचें कांहीं चालत नाहीं. राजद्रोही लोक हे जसे सुधारलेले ‘ डामरट ’ तसेच त्या कामीं सिव्हिलियन लोकांसारखे सुशिक्षित ( डामरट ? ) पोलिसच हवे. ’

( १९ ) महाराजांचें म्यूर मॅकेंझीसाहेबांस पत्र ( १७ डिसेंबर १९०८ )

“ बेळगांवास काय सांपडलें हें आपण ऐकलेंच असेल. माझ्या पोलिसांच्या मतें कोल्हापूर व सातारा येथील प्रकरणें सारखींच आहेत. आरोपींनीं पोलिसांवर तोहमत आणण्याकरितां मुद्दाम नकली बॉंब तयार केले. ब्राह्मणेतर अधिकारी ठेवण्याच्या माझ्या धोरणाचा फायदा आतां दिसून येत आहे. आमच्या ब्राह्मण न्यायाधिशानें विजापूरकरांना जामिनावर तर सोडलेंच, पण जामीन घेण्याच्या हुकुमांतहि अशी गोम घालून ठेवली कीं आरोपीला पळून जातां यावें आणि जामिनाला दंड होऊं नये. सरकारी वकिलानें उलट अर्ज द्यावयाचा त्यांत उशीरच केला आणि न्यायाधीश उठून तालुक्यांत गेला. हे सगळे अधिकारी ब्राह्मण होते म्हणूनच असें झालें. शेवटीं मलाच तो हुकूम फिरवावा लागला. माझा डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट म्हणतो, बंगालच्या खटल्यांतहि इतका बळकट पुरावा नव्हता. किंकेडसाहेबांचा निकाल बाहेर पडेल तेव्हां कसा तो दिसून येईलच. जाधवराव व फर्नांडीस यांची मदत या कामीं फार झाली. ”

( २० ) महाराजांचें फ्रेजरसाहेबांना पत्र ( २२ जानेवारी १९०९—

“ विजापुरकर व जोशी यांना तीनतीन वर्षांची शिक्षा झाली. आतां बॉंब—केसेस चौकशीला निघाल्या आहेत. त्यांवरून येथील मुलें व ब्राह्मण पुढारी कशीं कारस्थानें करितात हें कळून येईल. मला या कामीं प्रत्येकाविरुद्ध नेटानें लढावें लागत आहे. तुम्हाला सांगतों कीं, ‘ पुण्याच्या पोलि-

सांविरुद्ध देखील मला लढावें लागलें.' या खटल्यांतील तपास त्यांना लागेना व आमच्या पोलिसांनीं लावला तेव्हां ते यांचा हेवा करूं लागले हें मी तुम्हाला आपलें खासगी सांगतों. तुम्हाला खरेंच सांगतों कीं, या कटांतील बॉंब व माणसें यांची मला पुष्कळच माहिती आहे. रावसाहेब, रावबहादूर आणि युरोपियन लोकांत जे राजनिष्ठ व नेमस्त म्हणून गणले जातात असेहि अशा कामीं दोषापासून अलिप्त नाहींत. सर जॉर्ज क्लार्क यांच्याजवळ मी उघड बोललों व नांवेंहि घेतलीं. पण त्यांची शंका जाईचना. अशा कामीं उच्च शिक्षण मिळालेलेच पोलिस हवे. लॉर्ड मोर्ले यांच्या सुधारणा माझ्या मतें प्रस्तुतच्या काळीं अगदीं गैर आहेत. अधिक हक्क पाहिजेत तर वागणूकहि नीट ठेविली पाहिजे हें लोकांना समजावयाला हवें. गोखल्यांप्रमाणें मलाहि मोर्लेसाहेबांशीं बोलण्याची संधि मिळेल तर फार चांगलें होईल. कारण सुधारणाविरुद्ध काय बोलण्यासारखें आहे तें मी त्यांना सांगेन व गोखल्यांना हिंदुस्थानांत खरोखर कितीसा मान आहे हेंहि त्यांना सांगेन!"

( २१ ) फ्रेझरसाहेबांचें महाराजांस पत्र ( ३१ जानेवारी १९०९—

"कोल्हापूरच्या खटल्यांत आरोपींना जबर शिक्षा झाल्याचें वाचून आनंद झाला. जुलमी इंग्रज लोकांचाच नव्हे तर तुमचाहि खून करण्याला उत्तेजन दिलें असा आरोप असल्याचें मी ऐकिलें. ब्रिटिश सरकार व तुम्ही राजेरजवाडे लोक हे एकाच नावेंत आहां. जो बॉंब आज आमच्यावर तोच उद्यां तुमच्यावर पडणार. म्हणून या खटल्याचा प्रत्येक संस्थानिकानें नीट विचार केला पाहिजे. कोल्हापूर हें उचलून पुण्यापलीकडे आणखी शेंकडों मैल नेऊन ठेवतां येईल तर किती चांगलें होईल असें तुम्हास वाटत असेल नाहीं?"

( २२ ) महाराजांचें बेटीसाहेब ( पोलिस ऑफिसर ) यांस पत्र— ३ जानेवारी १९०९—

" तुमची माझ्यावर नेहमीच कृपा आहे. युरोपिअन लोकांत माझे कांहीं स्नेही आहेत आणि तुमच्या माझ्या स्नेह्यांनीं तुमची माझी ओळख करून दिली असल्यामुळें तुम्हालाहि माझे स्नेही मानण्यांत मला आनंद वाटतो. हल्लीं चाललेले खटले पाहावयास तुम्हाला यायला होणार नाहीं काय ? ? "

( २३ ) बेटीसाहेबांचें महाराजांस पत्र ( १२ जानेवारी १९०९—

" तुमच्या बोलावण्याप्रमाणें मीं आलों असतों एवढेंच काय, पण तुमच्यावर उपकार होत असतील तर आणखीहि काय वाटेल तें करीन. पण आहे तें ठीक चाललें आहे. सरकारला मी कोल्हापुरास जाणें इष्ट वाटलें असतें. तर त्यांनीं मला तसें कळवलें असतें म्हणून मी यांत न पडावें तें बरें."

( २४ ) महाराजांचें एडगरले साहेब (इंडिया कौन्सिलचे एक मेंबर यांस पत्र ) २९ जानेवारी १९०९—

" फिरून मला राजद्रोही ब्राह्मण त्रास देऊं लागले आहेत. पण या खेपेस मी त्यांना रसातळास पोंचविण्याचा निश्चय केला आहे. विजापुरकर आतां माझ्या तुरुंगांत असून सुरक्षित आहेत. तुम्ही यावेळीं इकडे असतां तर फार चांगलें झालें असतें. कारण कोल्हापुरचें राजकारण व ब्राह्मणांची कारवाई यांची तुम्हाला पुरी ओळख आहे."

( २५ ) महाराजांचें कर्नल फेरीस यांस पत्र ( ९ फेब्रुवारी १९०९)–

" विजापुरकरांचा निकाल ऐकलाच असेल. तुम्ही येथें नाहीं वाईट वाटतें. तुमच्या मदतीनें आणखी किती तरी करतां आलें असतें. तुमची स्तुति करीत नाहीं. पण खरेंच सांगतों कीं, या देशाशीं पुरी माहिती असणारे तुमच्यासारखे साहेब लोक फार थोडे ! सरकारच्या हल्लींच्या कमकुवत धोरणानें राजनिष्ठ लोकहि राजद्रोही होतील आणि चळवळ्या लोकांची संख्या वाढेल. राजद्रोही लोकांशीं कसें वागावें ही अडचणीची गोष्ट होऊन बसली आहे. कारण ते जुने दिवस गेले. आतां सरकारच्या बाजूस जो जो असेल त्याचा द्वेष करण्याची प्रवृत्ति लोकांत दिसून येते. विलायतेंत गोख-

त्यासारख्या मनुष्यांना सर्वत्र प्रवेश मिळतो, पण सरकारच्या बाजूच्या लोकांना मात्र मिळत नाहीं. राजेरजवाड्यांचा सल्ला सरकारनें घेतल्यास उपयोग होईल. दुसरी बाजू काय आहे तें समजेल. ”

( २६ ) ली वार्नर साहेबांचें महाराजांना पत्र––२४ फेब्रुवारी १९०९

“ तुमचें पत्र इतकें मौल्यवान होतें कीं, तें मी मोर्लेसाहेबांकडे पाठविलें. ‘ सुधारणाबाबत अखेर निकाल झाला तो तुमची निराशा करील, पण तुम्हाला आम्हाला वाटतें तसा प्रकार घडून आला तर सरकार सुधारणा परत घेण्यास भिणार नाहीं. ’ तुमच्या येथील बदमाष लोकांना शिक्षा झाल्याचें वाचून फार आनंद झाला. तुमच्या जोरकस धोरणाचें बक्षीस तुम्हाला मिळेल अशी मला आशा आहे. ”

( २७ ) महाराजांचें म्यूर मॅकेंझीसाहेबांस पत्र ––४ मार्च १९०९

“ किंकेडसाहेब आम्हाला लाभले, फार चांगली गोष्ट झाली. पुण्याच्या पोलिसानें यांत काय, त्यांत काय, असें म्हणून खटला नासून मात्र टाकला असता ! आम्हीं कटाचे धागे इकडे टिळक व तिकडे बंगाल प्रांत येथपर्यंत भिडवूं शकतों. टिळकांनीं बॉंब पाहून मगच आर्टिकलें लिहिलीं ! वालिंजर साहेबास सरकार इकडे पाठविणार पण त्यांनीं माझे कांहीं पोलिस ऑफिसर कामावरून काढावे असा पूर्वी सल्ला दिला होता हें लक्षांत असूं द्या. ”

( २८ ) म्यूर मॅकेंझी साहेबांचें महाराजांस पत्र —११ मार्च १९०९

“ तुमच्या पोलिसांचें काम पाहून किंकेडसाहेब खूष झाले. दामू जोशी सुटून गेला, मोठी पंचाईत झाली. सावरकर कागदपत्रासह आमच्या पोलिसाकडून एकदांचा पकडला गेला. या कटांच्या उगमांचा शोध लावण्याचा तुमचा निश्चय झाल्याचें ऐकून फार आनंद झाला. ‘ तुम्ही व तुमचे पोलिस यांची कामगिरी सरकार गौरविल्याशिवाय राहणार नाहीं. ’ तुम्ही काय वाटेल तें मागण्याचा अवकाश तें सरकारनें तुम्हाला दिलेंच समजा. मात्र काय मागाल तें अयोग्य नसावें. ”

( २९ ) सर जार्ज क्लार्क यांचे महाराजांस पत्र --९ मार्च १९०९

" तुमचें वजन, तुमची कामगिरी मोठी असून, तुमचा जीव तुमच्या संस्थानालाच काय पण दक्षिण महाराष्ट्राला मौल्यवान् होऊन बसला आहे. म्हणून कृपा करून कोणी रखवालीस बरोबर घेतल्याशिवाय बाहेर पडत जाऊं नका. गाडीमागें नेहमीं दोन चपळ स्वार ठेवावे. "

( ३० ) महाराजांचें म्यूर मॅकेंझी साहेबांस पत्र —१० मार्च १९०९

" वालिंजरसाहेब मदतीस पाठविले पण बेटी किंवा एडवर्डस पाठविले असते तर अधिक चांगलें झालें असतें. हा कट लहान नसून फार मोठा. फर्नांडीस तुम्हांस भेटेल. असल्या क्षुद्र माणसाला भेटण्याला तुम्हाला वेळ कोठचा ? पण आम्ही तरी काय करावें ? आमच्यासारख्याचें शिंग दुसरा कोण फुंकील ? तें आमचें आम्हींच फुंकलें पाहिजे. "

( ३१ ) महाराजांचें हिलसाहेबांना पत्र—२७ एप्रिल १९०९

" माझ्या पोलिसांनीं सांगितलें व इतर रीतीनें समजलें तेंच खरें ठरतें. आतां मोठमोठ्या माणसांचा संबंध कटाशीं जोडण्याचा पुरावा पाहिजे आहे, तोहि यथाकाल येईल. "

( ३२ ) महाराजांचें मेजर वुडहाऊस यांस पत्र—१५ एप्रिल १९०९

" पन्हाळ्यास कैदी ( विजापूरकर वगैरे ) ठेविले आहेत, त्यांना तुरुंगवास ही एक चैनच होऊन बसली आहे, दोन महिन्यांतच दोन जेलर बदलून आतां दिलवर यास तेथें नेमला आहे, तरी तोहि येऊन तक्रार करतो कीं, कैद्यांची शिस्त रहात नाहीं, सर्वांकडून त्यांना मदत व होते. अधिक कडक उपाय इतक्यांतच योजावे तर सर्वच फसेल, "

( ३३ ) महाराजांचें मेजर वुडहाऊस यांस पत्र ता. ?—

" आम्ही सगळा कट लवकरच हुडकून काढूं. येथील कैदी खालसांतील तुरुंगांत नेऊन ठेवण्याची योजना मंजूर करविलीत याबद्दल मी तुमचा फार फार आभारी आहे. विजापूरकरांना येथील लोक जरूर तितक्या

कंडकंपणानें कां वागवूं शकत नाहींत, याचीं कारणें वालिंजरसाहेबांना सांगि-तलीं तशींच तीं तुम्हांलाहि सांगेन. ”

( ३४ ) महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क यांस पत्र—२१ एप्रिल १९०९

“ वालिंजरसाहेबांचें व माझें ठीक चाललें आहे. के. डी. कुळ-कर्ण्याच्या घरच्या झडतींत एक पत्र सांपडलें आहे असें पोलीस म्हणतात. त्यांत असें म्हटलें आहे कीं, इचलकरंजीकर व विशाळगडकर ह्यांच्याप्रमाणें इतर संस्थानिकहि मदत करतील तर देशकार्य लवकर घडून येईल. या दोघांना सरकारनें जाब विचारला पाहिजे. पुण्यांत बॉंब होतात ही बातमी पक्की ठरत आहे. मला व वालिंजरसाहेबांना मैदान मोकळें मिळेल तर रावसाहेब, रावबहादूर व संभावित मानले जाणारे संपादक यांच्याहि विरुद्ध पुरावा मिळूं शकेल. ”

( ३५ ) महाराजांचें कर्नल डनलॉप स्मिथ ( व्हाइसरॉयांचे प्रायव्हेट सेक्रेटरी ) यांस पत्र—२८ मे १९०९

“ एकंदर खटल्याची कच्ची हकीकत मी तयार करीत आहें, त्यांवरून सी. आय. डी. चें म्हणणें खरें न ठरतां अखेर माझेंच म्हणणें खरें ठरलेलें दिसून येईल. माझ्या मतें व्हावी तितकी कसून चौकशी झाल्यास बहुतेक सर्वच्या सर्व चळवळ्ये कटांत सामील झाल्याचें आढळेल, व सगळ्यांवर एकदम खटला भरला तर कांहीं दिवस तरी त्रास वांचेल. दिवसेंदिवस हे लोक मनानें अधिक सावध राहूं लागले आहेत. ही खरी शांतता नव्हे. या राजद्रोही चळवळींत रावसाहेब, रावबहादूर, कायदेकौन्सिलचे सभासद वगैरे सर्व सामील आहेत. मुंबईंत ही गोष्ट मीं सांगितली, पण कोणी त्यावर विश्वास ठेवीना. ”

( ३६ ) ली वार्नरसाहेबांचें महाराजांस पत्र—२१ जून १९०९—

“ जहाल लोक व त्यांचे बंधु ‘ नेमस्त ’ कॉंग्रेसवाले यांना इंग्रजांना हिंदुस्थानांतून घालवून द्यावयाचें आहे. पण तें कसें घडून येणार ? इकडे

आमच्या पार्लमेंटातले जहाल लोकहि फिके पडत चालले] आहेत. पुढच्या निवडणुकींत ते कदाचित निवडूनही येणार नाहींत. ”

( ३७ ) कर्नल फेरिस यांचें महाराजास पत्र—१५ डिसेंबर १९०९–

“चुकून एखादे वेळीं अन्याय होणें अपरिहार्य आहे, तसाच दामू जोश्याच्या खटल्यांत या वेळीं झाला. ‘ पुराव्याचा कायदा ’ ही एक नडच आहे. त्याचा फायदा हिंदुस्थानांत आरोपीला मिळतो. संस्थानांत कायदे सामान्यतः कमी म्हणून न्याय अधिक चांगला होतो. सरकारचा तुमच्यावर आतां पूर्ण विश्वास जडला आहे हें तुमच्या सलामीच्या तोफा वाढविल्या यावरून दिसून येईल. पण हा एक हप्ता, याहून आणखी कांहीं मिळेल. सरकार तोंडानें उघड न म्हणो, पण तुम्ही ब्राह्मण लोकांचा हा प्रश्न चांगला सोडविला याची सरकारास पूर्ण जाणीव मनांतून खचित असेल. एका टोंकाला म्हणजे कोल्हापुरास शीर कापून थोडें रक्त काढल्यामुळें पुण्याच्या मध्यवर्ती काळजावरील दाब जरा कमी होईल. तुम्हीं व तुमचे पोटसंस्थानिक यांचे संबंध कसे असावे याचा मी विचार करीत आहे. ”

( ३८ ) महाराजांचें म्यूर मॅकेंझीसाहेबांस पत्र—१३ आक्टोबर १९०९

“ कृपा करून एका गोष्टींत मदत करतां आली तर पाहा. नेटिव संस्थानांची, विशेषतः कोल्हापूरची, बदनामी देशी वर्तमानपत्रकार फार करतात. येथील रेसिडेन्सी कोर्टांत ‘राष्ट्रमता’ वर दिवाणी—फौजदारी फिर्याद झाल्यापासून समेटाच्या भिडा माझ्यावर येऊन पडूं लागल्या आहेत. पण ही ( रेसिडेन्सी कोर्टांत फिर्याद करण्याची ) सोय खासगी व्यक्तींना मिळते. खुद्द संस्थानिकांना मिळत नाहीं. खुद्द आमच्या संस्थानी कोर्टांत फिर्याद केली न केली सारखीच. लोक म्हणणार ह्याच्या घरचें कोर्ट. खालसा कोर्टांत फिर्याद करावी तर साक्षीपुराव्याचें लटांबर घेऊन संस्थानिकानें बाहेर किती दिवस हिंडावें ? या अडचणींचा फायदा देशी वर्तमानपत्रकार घेतात. एरवीं मी फिर्यादी झालों असतों एवढेंच नव्हे तर फिर्याद करण्याची मला मोठी हौस वाटली असती. ”

( ३९ ) डुबोलेसाहेबांचें महाराजांस पत्र—३० आक्टोबर १९०९

"तुमच्या तक्रारीबद्दल वर सरकारांत लिहिलें आहे. ती व्यवस्था होईल. पण आरोपी इकडून तिकडे देण्याची व्यवस्था कठीण. पहिल्यानें ब्रिटिश कोर्टांत फिर्याद मांडून बरीच शाबिती करावी लागेल. पण तें केलें काय व सर्व फिर्यादीचें काम पुरें केलें काय एकच."

( ४० ) महाराजांचें म्यूर मॅकेंझीसाहेबांना पत्र—४ डिसेंबर १९०९

"संस्थानिकांनीं सरकाराशीं राजनिष्ठ राहिलेंच पाहिजे. मग त्याचें बक्षीस मिळो वा न मिळो. तें केवळ कर्तव्य होय. पण ते अराजनिष्ठ होतील तर त्यांना शिक्षाच केली पाहिजे. मग ते छोटे जहागिरदार असोत अगर एकवीस तोफांच्या सलामीचे बडे राजे असोत. मिरज, जमखिंडी, इचलकरंजी या हद्दींतून अराजक लोकांचें वाङ्मय, फोटो, बिल्ले वगैरे येऊन माझ्या हद्दींत विकले जातात. विजापुरकरांच्या खटल्यावरून तुम्हांस कळलेंच असेल कीं, त्यांच्या डायरींत हीं नांवें झळकलीं असून टिळक, बिपिन चंद्र पाल वगैरे लोकांच्या सभेला ते जातात व टिळक--फंडासारख्या फंडाला ते मदत करितात. इचलकरंजीकरांचा बहाणा असा कीं, 'आपण कौन्सिलांत जातों व निवडणुकींत मतें मिळविण्याकरितां या गोष्टी आपणास कराव्या लागतात.' पण हें खरें नाहीं. कारण रानडे व नामजोशी यांच्या वेळेपासून त्यांचे टिळकांशीं काय संबंध आहेत हें मला माहीत आहे. त्यांना फक्त रागें भरण्याचा सरकारचा विचार दिसतो, पण त्यांच्या पदराला खार न लागेल, किंवा मानसन्मानाला चट्टा न बसेल तर नुसतें रागें भरून काय होणार ? के. डी. कुळकर्ण्यासारख्याला हे लोक पैसे देतात, पण राजाराम कॉलेजला कबूल केलेली वर्गणी देत नाहींत. या लोकांना असा चिमटा घेतला पाहिजे कीं, फिरून ते या फंदांत पडणार नाहींत. मी असें सुचवितों कीं, या लोकांना नवीन दिलेले अधिकार काढून घ्यावे. इतर गोष्टी मी तुमच्याशीं खासगी बोलेन. संस्थानी रयत राजद्रोही नाहीं, पण संस्थानिक आहेत !"

( ४१ ) म्यूर मॅकेंझीसाहेबांचें महाराजांस पत्र—१० डिसेंबर १९०९

" तुमच्या विश्वासू वर्तनानें गव्हर्नरसाहेब खूष होतील यांत शंका नाहीं. निदान एवढें सांगतों कीं, 'आपल्या अधिकारांत आपल्या रयतेशीं तुम्हीं काय वाटेल तें केलें तरी सरकार तुमचा खचित पाठपुरावा केल्याशिवाय राहाणार नाहीं. तुमच्यावर कोणीं दोषारोप केला तर सरकार ऐकणार नाहीं.' कारण तुम्हीं जाणूनबुजून अन्याय करणार नाहीं हें सरकारास माहीत आहे."

( ४२ ) सर जॉर्ज क्लार्क यांचें महाराजांस पत्र —१३ डिसेंबर १९०९

" तुमची सरकारास मदत फार झाली. तुमच्या देखत पोलिटिकल एजंटनें इचलकरंजीकर व विशाळगडकर यांची खरड काढावी असें सरकारनें ठरविलें आहे. शिवाय कोल्हापूरचे अधिराज या नात्यानें तुम्हांस काय करतां येईल तें तुम्हीहि करा. त्यांत आम्ही तुम्हांला मदत करूं. आणखीहि तुमची कांहीं अडचण असेल तर सांगा."

( ४३ ) महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क ह्यांस पत्र—१ जानेवारी १९१०--

" जॅकसनसाहेबांचा खून झाला, त्यासंबंधीं मीं केलेलें भाषण आपण वाचलेंच असेल. आतां तरी सूत्रें चालविणाऱ्या सगळ्या टोळीला धरून ठेचा, कायद्याच्या क्षुद्र अडचणी मनांत आणूं नका. खुनासंबंधानें मीं एक दुःखप्रदर्शन सभा बोलाविली; तिला एकहि ब्राह्मण, वकील, किंवा ऑफिसर किंवा विद्यार्थी आला नाहीं. सरकारशीं कोणत्याहि प्रकारें संबंध असलेल्या सभांना हजर राहावयाचें नाहीं असा या ब्राह्मणांनीं निश्चय केलेला दिसतो. दोन दिवसांनंतर मेजर वुडहाऊस एका शाळेच्या बक्षिससमारंभाकरितां गेले असतां त्या समारंभास सुखवस्तु ब्राम्हणांपैकीं कोणीहि आले नाहीं. ते ह्यांना पुरून उरणारे आहेत. त्यांच्या परिणामकारक भाषणामुळें ह्या लोकांना ते आवडत नाहींत. पण ब्राम्हणेतर समाजाला ते फार आवडतात व मलाहि त्यांची फार मदत होते. 'मला एकवार मेहेरबानास असें सुचवावेंसें वाटलें होतें कीं, सगळे अराजक लोक धरून विशाळगडासारख्या एखाद्या डोंगरी किल्ल्यावर कैदेंत ठेवावे.' पण ते माझ्या ताब्यां-

तच हवे. दुसऱ्यातिसऱ्या संस्थानच्या किंवा खुद्द ब्रिटिश सरकारच्याहि ताब्यांत नकोत. पण जॅक्सनसाहेबांच्या खुनापासून विचार थोडा बदलला. ते माझें काय करतील कोण जाणे! आणि माझ्या मनावर जर इतका परिणाम झाला तर भित्र्या लोकांची गोष्ट तर बोलावयास नको. जॅक्सनच्या वधाचा पुरा सूड घ्यावा व कटांत सामील असलेल्या लोकांकडून साहेबांच्या कुटुंबास पेन्शन देववावें. ‘ बडोद्याची जशी मुंबईसरकारला नड तशी इचलकरंजीची मला पावलोपावलीं नड होते. ’ म्हणून इचलकरंजीकर व विशाळगडकर ह्यांना वेळींच शिक्षा दिली पाहिजे. ”

( ४४ ) महाराजांचें म्यूर मॅकेंझीसाहेबांस पत्र—ता. ३ जानेवारी १९१०

“ जॅक्सनच्या खुनासंबंधानें मीं गव्हर्नरसाहेबांना परस्पर पत्र लिहिलें त्यांत कांहीं गोष्टी न लिहाव्या अशाहि लिहिल्या. मी पत्रें फार मोकळ्या मनानें लिहितों म्हणून तीं नेटिव लोक अगर त्यांचे स्नेही ह्यांचे हातीं जाऊं न देण्याविषयीं गव्हर्नरसाहेबांना विनंति करावी. नाहीं तर बिचाऱ्या जॅक्सनसाहेबांसारखीच माझी गत व्हावयाची. ”

( ४५ ) क्लेमंट्ससाहेबाचें महाराजांस पत्र— ता. २८ जानेवारी १९१०

“ नुसतीं वर्तमानपत्रेंच काय, पण वकील लोकांनाहि दडपून टाकण्याचा सरकारास अधिकार असावा अशी माझी इच्छा आहे. होणें–जाणें कठीणच दिसतें. पण मला असें वाटतें कीं एखादा वकील राजद्रोही चळवळींत कोठें सामील झालेला आढळला किंवा तो राजद्रोही असल्याची बोलवा असली तर त्याची सनद काढून घेण्याचा नियम असावा. पोलिस फौजेंत इतके ब्राम्हण आहेत हीहि चूकच आहे. ”

( ४६ ) डुबोलेसाहेबांचें महाराजांस पत्र—१४ फेब्रुवारी १९१०

“ केसरीचा उतारा तुम्हीं पाठविला तो पोंचला. फार उपकार झाले. केसरींतील अशा प्रकारच्या शिव्या वाचण्याची आम्हांस नेहमींच संवय आहे. हळुहळू नवा कायदा लावून आतां त्याला आळा घातला पाहिजे. ”

( ४७ ) महाराजांचें फ्रेझरसाहेबांस पत्र. ता, ७ मार्च १९१०

“ मी स्वतः आतां पोलिस खातें आपल्या हातीं घेतलें आहे. सी. आय. डी. खातें माझ्याविरुद्ध होतें. पण किंकेडसाहेब मला मिळाल्या-मुळें सरकारची खात्री करतां आली. माझ्या पदरचे अधिकारी, जहागिरदार व विद्यार्थी या सर्वांमध्यें अराजकता पसरली आहे. मीं माझ्या मुख्य न्यायाधिशाला कामावरून दूर केला. × × नें मला व व्हॉइसराय यांना ठार मारण्याच्या बेत केला आहे. माझ्या रक्षणार्थ सरकारनें पुष्कळ पोलिस नेमिले असून पुष्कळ पैसा खर्च केला आहे. या गोष्टीमुळें मी स्वतःचा बहुमान झाला, मी धन्य आहे असें मानतो. माझ्या रक्षणाकरितां सरकार जितकी काळजी घेतें तितकी दुसऱ्या कोणत्याहि राजरजवाड्यासंबंधानें घेत नाहीं हें मला मोठें भूषण वाटतें. सरकारचे हे उपकार फेडण्याकरितां सर-कार काय मला सांगेल तें मी करीन. ”

( ४८ ) महाराजांचें म्यूर मॅकेंझी यांस पत्र—२४ मार्च १९१०

“ लोकांना वाटेल कोल्हापुरांतच काय ते राजद्रोही लोक आहेत. पण सर्व जगभर तेच पसरले आहेत. आमच्यासारखा जेथें कसून प्रयत्न कर-ण्यांत आला तेथें मात्र थोडेबहुत सांपडले. आतां तरी मला ‘ हा उगाच भित्रेपणा माजवतो ’ असें म्हणणार नाहींत. राबर्टसन्, क्विन, एडगरले जाऊन महाराष्ट्राची माहिती असणारे असे आतां तुम्हींच काय ते एकटे उरलेले आहां. ‘ सगळ्या ब्राह्मणांनीं मला सोडलें, पण त्यामुळें न खचण्या-इतका मी खंबीर आहे. ’ माझे बंधु, दिवाण व फर्नांडिस वगैरे लोकांनीं फार मदत केली. त्यांना सरकारकडून कांहीं बक्षिसें मिळावीं. ते स्वतः-संबंधानें कसें लिहितील ? सगळ्या अराजक लोकांना विशाळगडावर ठेव-ण्याच्या बाबतींत दिवाणांना सरकारी रीतीनें तुमच्याकडे लिहिण्यास सांगि-तलें आहे. ”

( ४९ ) महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क यांस पत्र—ता. ४ एप्रिल १९१०

" तुम्हांला समक्ष सांगितल्याप्रमाणें सगळे अराजक उचलून विशाळगडावर ठेवावे असें माझ्या मनांत आहे. ह्या गडाचें जें उत्पन्न विशाळगडकरांना हल्लीं येतें त्याच्या दुप्पट मी देईन, शिवाय हा गड जहागिरदारांना पूर्वापार लाभत नाहीं. यामुळें त्यांच्या वंशांतील कोणी येथें जात नाहींत, अराजक लोक तुरुंगांतील सगळी शिस्त बिघडवीत आहेत यामुळें मला हें करणें आहे. "

( ५० ) कर्नल फेरीस यांचें महाराजांस पत्र—ता. ७ एप्रिल १९१०

विशाळगडकर व इचलकरंजीकर यांचे अधिकार काढून घेण्याच्या कामीं तुम्हांला यश आलें, ही मोठीच गोष्ट झाली. पण ' त्यांच्यावर यापुढें चांगला डोळा ठेवा. ' पैकीं इचलकरंजीकर तर गेलेले अधिकार परत मिळविल्याखेरीज कधींहि गप्प बसावयाचे नाहींत. ' सगळेच गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांजसारखे नसतात. पण बहुतेक पोलिटिकल सेक्रेटरी मात्र एकाच साच्यांत ओतल्यासारखे असतात. ' आह्मांला महाराज असा असा त्रास देतात असें जाहागिरदारांनीं म्हटलें म्हणजे तें या सेक्रेटरींना खरें वाटतें. यापुढें दिवाणाकडून या पोटसंस्थानिकांच्या चुकांची व अपराधांची यादी तयार ठेवीत जा आणि एक गव्हर्नर जाऊन दुसरा आला म्हणजे, हे लोक कारस्थान सुरु करतात तेव्हां ती यादी पुढें टाकावी. कँडीसाहेब या लोकांचा पक्ष उचलून धरण्याचा संभव आहे. "

( ५१ ) महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क यांस पत्र—ता. १९ एप्रिल १९१०

" ग. ब. मोडक ह्यांच्यावरील खटल्याच्या इनसाफाकरितां मला ब्रिटिश जज्ज पाहिजे आहे. ' माझ्या संस्थानांतच काय पण इंग्रजी राज्यांतहि राजकीय स्वरूपाचे खटले वाटेल त्या न्यायाधिशाकडे देऊन भागत नाहीं. न्यायमूर्ति दावर व न्यायमूर्ति चंदावरकर या दोघां नेटिवांनांच काय ती ही संधि आजवर देण्यांत आली. त्यांचा अनुभव व त्यांची कर्तबगारी प्रसिद्धच आहे. ' एखाद्या न्यायाधिशानें आरोपींच्या बाजूचा कल मनानें एकदां घेतला कीं त्याला त्याच्या तर्फेचे मुद्दे हवे तेवढे सांपडतात. हाय-

कोर्टांत देखील पोलीस लोक आपले खटले अमुक एका न्यायमूर्तीपुढेंच निघावे अशी तजवीज करतात असें मीं ऐकलें आहे. माझ्या गरीब संस्थानांत इतके न्यायाधीश कोठें आहेत? एखाद्या न्यायाधिशाला हळूच खासगी एखादी सूचना केली तर तो तिचा गवगवा करतो. तुम्हीं मला ब्रिटिश न्यायाधीश दिलात तर, माझ्या कामांत हात घातला, असें लोक म्हणतील. मग सरकारानें मला आपले न्यायाधीश द्यावे व माझे कैदी आपल्या तुरुंगांत ठेवावे हा सरकार मला बहुमान देतें असेंच मी तरी समजेन. सरकारची खरी मेहेरबानगी यांत दिसून येते व तिजबद्दल मी स्वतःला धन्य मानतों. ‘ हिंदुस्थान व इंग्लंड ह्या दोनहि देशांत जी अराजकता माजली आहे ती मोडण्याकरितां माझें लहानसें संस्थान धिटाईनें युद्ध करीत आहे. लहानशा बेल्जमनें रशियाशीं लढावें तसलें माझ्या संस्थानचें हें वीर कर्म आहे. सरकारनें मदत द्यावी व ती संस्थानिकांनीं घ्यावी यांत मला धन्यता व डोईजड उपकार वाटतात. ग्वाल्हेर व पतियाळा हीं संस्थानें माझ्याप्रमाणें सरकारची मदत घेत नाहींत ही त्यांची चूक आहे.”

( ५२ ) महाराजांचें मेजर वुडहाऊस यांस पत्र—१२ आगष्ट १९१४

“ शाळिग्राम व बोडस ह्यांच्यासंबंधानें फर्नांडीस यानें तुम्हांला कांहीं पत्रें व टिपणें दिलीं असें समजतें. फर्नांडीस ह्यानें ही चूक केली. कृपा करा आणखी हें पुण्याच्या सी. आय. डी. ला दाखवूं नका. उगाच त्यांचें आमचें आधींच घासतें आहे व तें भांडण उगाच वाढावयाचें. या बाबतींत आमच्याजवळ पुष्कळ माहिती आहे, पण आम्ही ती आतां देणार नाहीं.”

( ५३ ) महाराजांचें कॅंडेल साहेबांस पत्र—सप्टेंबर १९१८ पुणें

“ एकदोन दिवसांत मी तुम्हांला भेटावयास येणार आहे. माझी अशी सूचना आहे कीं, खालसा मुलूख व संस्थानें या सर्वांतील धान्यसंग्रह ब्रिटिश सरकारनें आपल्या हातीं घेऊन, विलायतेंत करतात त्याप्रमाणें, प्रत्येक इसमापुरतें मोजून मापून धान्य द्यावें. दुसरी गोष्ट, मुंबई इलाख्यांतील सरदार

वगैरे वरिष्ठ प्रतीच्या लोकांना टिळक असें सांगत आहेत कीं, मी तुमचा दर्जा वाढवून देणार आहे व असें सांगून त्यांच्यावर आपलें वजन बसवावयाचा टिळकांचा इरादा आहे. मी नेहमीं टिळकांच्या चळवळींच्या विरुद्ध खटपट करतों याचें कारण त्या नेहमीं खोटेपणाच्या असतात.' पंडितमहाराज, बाळामहाराज व आमच्यांपैकीं आणखी एक इतक्यांनीं मिळून एक मनुष्य हल्लीं नेमला आहे. टिळकांच्या कृत्याची जेवढी वाईट बाजू असेल तेवढी ते त्याजकडून दाखविणार आहेत. हें पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल. हें तयार झालें म्हणजे मी तुम्हांस दाखवीन. ब्राह्मणांच्या वर्चस्वाचा पाडाव आपणास केला पाहिजे. नाहीं तर आज जसें ब्राह्मण लोक बेजबाबदार रीतीनें हिंदुस्थानावर राज्य करीत आहेत तसेंच ते यापुढें करीत राहतील. टिळक व त्यांची पार्टी यांनीं कडकडीत चातुर्वर्ण्य धर्मस्थापना सुरू केली आहे. माझा मुलगा रिक्रूटिंगवर व्याख्यानें देत आहे. मलाहि अशी इच्छा आहे कीं, ब्राह्मणांच्या वर्चस्वाच्या केंद्रस्थानीं जाऊन रिक्रूटिंगला उत्तेजन देऊन हल्लींच्या वेळीं शक्य तर सरकारची कांहीं सेवा करावी."

## कोल्हापूरचे दिवाण प्रो. लठ्ठे यांनीं लिहिलेल्या शाहू चरित्रांतील निवडक उतारे

( १ ) या वेळीं देशांतील राजकीय परिस्थिति मोठी आणीबाणीची होती. १९०८ सालच्या आगष्ट महिन्यांत महाराजांनीं या परिस्थितीचें पुढील प्रमाणें संक्षिप्त वर्णन केलें आहे:—

" टिळकांचें साहाय्य असलेल्या बंगालच्या पुढाऱ्यांच्या चिथावणीनें बंगालमध्यें असंतोष पसरला आहे यांत शंका नाहीं. टिळक येथें नुकेच येऊन गेले. बंगालची फाळणी हें नुसतें निमित्त आहे. हा असंतोष या भागांत जरी विशेष पसरला नाहीं तरी टिळक कंपू वाईट मार्गांनीं ही गोष्ट साध्य

करूं पाहात आहे, हें आपणांस विदित आहेच. यांच्याच प्रयत्नामुळें उपरि-निर्दिष्ट चोऱ्या घडून आल्या. ही चळवळ फक्त याच वर्गात आहे. सामान्य जनतेला याचा संपर्क सुद्धा लागलेला नाहीं; परंतु योग्य वेळीं जर पुरेशी दक्षता घेतली नाहीं तर हा असंतोष सामान्य लोकांमध्यें सुद्धां पसरण्याचा संभव आहे. शेतकरी वर्ग ( याविषयीं ) पूर्णपणें बेफिकीर आहे. वकील, वर्तमानपत्रकार, शिक्षित व्यापारी व दुःखाची गोष्ट ही कीं, शाळेचीं मुलें याच्यामध्यें सुद्धां हें वारें शिरलें आहे. ” [ पृ. २४९ ]

( २ ) विजापूरकरांनीं बंगालच्या पद्धतीवर ‘ समर्थ–विद्यालय ’ नांवाचें एक राष्ट्रीय स्कूल काढलें होतें. त्यासंबंधीं आक्टोबरच्या ५ तारखेस महाराज लिहितातः—

“ ज्या शिवाजी चळवळीच्या नांवानें कित्येक दरोडे घालण्यांत येत आहेत व तरुण लोक अराजक व राजद्रोही बनविले जात आहेत, ती चळ-वळ येथें सुरूं झाल्यामुळें व नवीनच येथें एक राष्ट्रीय विद्यालय अस्तित्वांत आल्यामुळें मला मोठी चिंता उत्पन्न झाली आहे. ” [ पृ. २४९ ]

( ३ ) या विवाहानिमित्य मुंबइचे गव्हर्नर सर जार्ज क्लार्क यांचें कोल्हा-पुराला जें आगमन झालें तें अनेक दृष्टीनें महत्त्वाचें होतें. केवळ कोल्हापुरा-संबंधींच नव्हे, तर या देशाच्या सामान्य राजकारणाविषयींच्या अनेक प्रश्नां-संबंधीं चर्चा निघून, महाराजांची व गव्हर्नरसाहेबांची स्पष्ट दिलसफाई झाली. अराजकांना ताळ्यावर आणण्यासाठीं अगर शासन करण्यासाठीं ब्रिटिश सरकार नेहमीं ज्या उपायांचा अवलंब करीत असे, ते उपाय सरकारचा हेतु सफळ करणारे नव्हते असें महाराजांचें मत होतें. महाराज म्हणाले, तुमचे उपाय म्हणजे चिमण्यांना बुजवणाऱ्या तांबड्या चिंधोटीप्रमाणें आहेत. महाराजांचा हेतु सर जार्जसाहेबांच्या लक्षांत बरोबर न आल्यामुळें, ‘ बैलाला बुजविणारी तांबडी चिंधोटी असा आपल्या म्हणण्याचा अर्थ काय ? ’ म्हणून सर जार्जसाहेबांनीं महाराजांना पुन्हां प्रश्न केला. महाराज म्हणाले, ‘ छे ! मी चिमण्यासंबंधींच बोलतों.’ महाराज पुढें म्हणाले,

" आमचे शेतकरी एका काठीला चिंधोटी बांधून उभ्या पिकांचीं कणसें खाणाऱ्या चिमण्यांना बुजविण्यासाठीं तीं काठी उभी करतात. या तांबड्या चिंधोटीचा कांहीं काळ उपयोग होतो खरा, परंतु थोड्याशा अनुभवानें त्यांत भिण्यासारखें कांहीं नाहीं, असें समजून येऊन या तांबड्या चिंधोटीच्या काठीवर बसून तिच्याशीं त्या यथेच्छ खेळूं लागतात. अशाप्रकारें आपल्या उपायांचा परिणाम होतो. आपल्या शासनानें अराजकांचा अगर चळवळ्या लोकांचा कांहीं काल मोड होतो खरा, परंतु थोड्याशा अनुभवानें शिक्षा भोगलेल्या चळवळ्या लोकांना आपणांस जसजशी शिक्षा होत जाते तसतशी आपली लोकप्रियता वाढते असें प्रत्ययास येतें. शिक्षा भोगणारा एकाद्या पत्राचा जर संपादक असेल तर त्याच्या पत्राचा विस्तृत प्रमाणावर खप होऊं लागतो. अशा रीतीनें त्यांनीं स्वीकारलेल्या मार्गापासून त्यांना परावृत्त करण्यासाठीं उपयोगांत आणलेल्या बुजगावण्याशीं चिमण्याप्रमाणें ते खेळूं लागतात. " महाराजांच्या म्हणण्याचा गव्हर्नर साहेबांच्या मनावर अतिशय परिणाम झाला असला पाहिजे हें स्पष्ट आहे. [ पृ. २६७ ]

( ४ ) " ब्राम्हणांच्या मुलांनीं केलेल्या चोऱ्यांचा मी तपास लावीत आहें. तपासावरून त्यांनीं कांहीं शस्त्रें गोळा केलीं आहेत, असें आम्हांस समजतें; परंतु तीं पकडणें मुष्किलीचें झालें आहे. मुख्य गुन्हेगार ब्राम्हण असून त्यांचा पुणें येथील टिळक पक्षाशीं संबंध आहे. टिळक मध्यभागीं असून त्यांचे सहाय्यक दोन्ही बाजूंस बसले आहेत, असा आम्हास एक फोटो मिळाला आहे. चोरींत सामील असलेले तीन गुन्हेगार यांत आहेत. "
[ पृ. २९७ ]

( ५ ) एका वर्षानंतर, १९०८ सालाच्या मे महिन्यांत, जर्मनी, फ्रान्स व जपान देशांत जाऊन, बॉंब करण्याची माहिती मिळवून आणलेल्या लोकांच्या मदतीनें हिंदुस्थानांत बॉंब सुरू करणाऱ्यांच्या कटांची अधिक माहिती महाराजांना मिळाली. कोल्हापुराप्रमाणेंच बेळगांव, पुणें, सातारा व नाशिक येथेंहि बॉंब तयार करण्याचें ज्ञान राजद्रोही लोकांना झालें होतें अशीहि समजूत होती. बंगालमध्यें पहिला बॉंब

उडण्यापूर्वींच ही माहिती मिळाली असल्यामुळें, तिचें महत्त्व बरेंच होतें. तरी देखील अधिकाऱ्यांचा आशावादीपणा यत्किंचितहि ढळला नाहीं. कर्नल फेरीस साहेब म्हणतात:—

" त्यांची ( माहिती देणाऱ्यांची ) अटकळ थोडीशी अनाठायीं होती, असें त्या वेळीं मला वाटलें; " परंतु पुढें थोड्या दिवसांनींच ती अनाठायीं नव्हती असें त्यांनाच कबूल करावें लागलें. राजकीय गोष्टींचा तपास करण्याचें काम खुद्द आपल्या नजरेखालीं घेणें महाराजांना भाग पडलें, व कोल्हापुराबाहेर देखील पुढें घडणाऱ्या गोष्टींची अगोदरच अचूक अटकळ बांधण्याचें सर्व श्रेय त्यांनाच प्राप्त झालें. [ पृ. २९९ ]

( ६ ) महाराज बाँबसंबंधीं व राजद्रोहासंबंधीं जो तपास करीत होते, त्यावरून महाराजांच्या कांहीं जहागिरदारांची राजकीय गुन्हेगारांना उघडपणें नसली तरी अंतःस्थ रीतीनें फूस होती, असें महाराजांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. [ पृ. ३०४ ]

(७) "देशी पत्रें माझी, माझ्या राज्यकारभाराची व अधिकाऱ्यांची नालस्ती बेमुर्वतपणें करूं शकतात, हें आपणांस विदितच आहे. कित्येक कारणांस्तव कोणत्याहि इतर संस्थानांपेक्षां आमची विशेष नालस्ती करण्यांत येते, या गोष्टीचा येथें उल्लेख करावा असें मला वाटतें. ब्रिटिश हिंदुस्थानांत मुद्रणासंबंधीं जे नियम प्रचलित आहेत, त्यांचा उद्देश ब्रिटिश हद्दींतील जनतेचें संरक्षण करण्याचा आहे; परंतु अतिशय राजनिष्ठ असलेल्या संस्थानिकांचें किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांचें त्यापासून संरक्षण होऊं शकत नाहीं, ही गोष्ट वृत्तपत्रकारांना ठाऊक असल्यामुळें, ते संस्थानावर यथेच्छ तोंड सुख घेत आहेत; व हा गुन्हा अन्योन्य मदतीचा ( Extraditable ) नसल्यामुळें, संस्थानिकांना या बाबतींत कांहींच करतां येत नाहीं. ब्रिटिश कोर्टांत त्यांच्यावर काम चालविलें तर सर्व अधिकारी व साक्षीदार यांना ब्रिटिश हद्दींत पाठविणें बरेंच गैरसोईचें व मोठ्या खर्चाचें होतें. तथापि माझ्यासारख्या संस्थानिकाला ब्रिटिश हद्दींत काम चालविणें म्हणजे मोठी मौज वाटेल;

परंतु संस्थान सोडून कित्येक महिने मला राहातां येत नाहीं. × × × × मीं याचीहि पर्वा केली नसती; परंतु ( धुशवयाची ) घाण केव्हां केव्हां अंगाला चिकटते. या अडचणींतून निघण्याचा मार्ग म्हटला म्हणजे रेसिडेन्सी कोर्टामध्यें, अशा प्रकारचे कज्जे चालविण्याची सवड असावी. ”

[ पृ. ३०५ ]

( ८ ) “ असें झालें नाहीं तर; अशा बाबतींत संस्थानिकांवर व संस्थानांतील अधिकाऱ्यांसारख्या इतर हातपाय जखडलेल्या लोकांवर देशी वृत्तपत्रें आपलें हत्यार चालविल्याखेरीज राहाणार नाहींत. अब्रुनुकसान केल्याचा गुन्हा अन्योन्य मदतीचा करूनच भागणार नाहीं; असें जें मी म्हणतों याचें कारण असें आहे कीं, जर या वृत्तपत्रांना या खटल्यांत शिक्षा झाली तर संस्थानिकाचा ‘ जुलूम ’ होय म्हणून ओरड करण्यांत येईल. सिंध, काठेवाड, ईदर सारख्या लांबच्या ठिकाणीं ही योजना कदाचित् चालण्यासारखी आहे. ” [ पृ. ३०६ ]

## देशी संस्थानिकांचा उपद्व्याप !

एका सहृदय सुभाषितकारानें मनाला टोंचणाऱ्या सप्त शल्यांचें वर्णन केलेलें आहे. सूर्यप्रकाशांत पांढुरका दिसणारा चंद्र, तारुण्य ओसरलेली स्त्री, सुकलेला तलाव, अक्षरशून्य सुंदर पुरुष, द्रव्यलोभी प्रभु, दरिद्री सज्जन, आणि राजप्रसादानें लब्धप्रतिष्ठित बनलेला दुष्ट मनुष्य ! इतक्या सात गोष्टी, सुभाषितकार म्हणतो, माझ्या मनाला काट्याप्रमाणें टोंचतात. आणि वस्तुविरोध पाहतां त्या खरोखरच कांट्याप्रमाणें कां न टोंचाव्या ? कोठेंहि औचित्यलोप झाला म्हणजे मनाला असेंच वाटावयाचें. पण सुभाषितकारानें वर्णन केलेलीं हीं एवढींच काय तीं सात शल्यें जगांत आहेत,

इतर नाहींत, असें मात्र समजायचें नाहीं. त्यानें वर्णिलेलीं शल्यें हीं केवळ उपलक्षणें होत. औचित्यभंगाच्या दृष्टीनें अनुभवी सहृदय लोक मनांत आणतील तर ही मनःशल्यांची यादी आणखी किती तरी लांबवूं शकतील. आम्ही ज्या विषयावर आज लिहिण्याचें योजिलें आहे त्यावरून निदान एक मनःशल्य आम्हींच अधिक सुचवूं शकतों. व 'स्वराज्यद्रोही छत्रपति' हें तें शल्य होय. खरोखर स्वराज्यविरोधी छत्रपति ही औचित्यभंगाची परमावधीच नव्हे काय ?

सन १९१९ च्या नव्या पार्लमेंटरी कायद्यानें, अर्धवट व तुटक्या कां होईनात पण प्रगतीपर, राजकीय सुधारणा झाल्यापासून पुष्कळ लोकांचें चित्त या अर्धवट सुधारणा पुऱ्या करण्यापेक्षांहि, त्या आहेत तशा अर्धवटच कां होईनात पण खालसा मुलखाप्रमाणें, देशी संस्थानांतून अमलांत कशा येतील याकडे अधिक लागलें आहे. याचें कारण हेंच कीं, हिंदुस्थानांत प्रगति जी काय व्हावयाची ती वरील दोनही मुलखांत बरोबरच झाली पाहिजे. तसें न होईल तर हिंदी राष्ट्राचा प्रवास कष्टप्रद व संकटमय होईल. अफगाणिस्थानांत लोकांना स्वायत्त स्वराज्य आहे कीं नाहीं याची चौकशी करण्याचें आम्हांला काय कारण ! तसेंच, देशी संस्थानांचा मुलुख सर्व एका बाजूला अलग व खालसा मुलूख तेवढा सर्व दुसऱ्या बाजूला अलग, अशी व्यवस्थित वांटणी असती तरीहि गोष्ट वेगळी. पण दुर्दैवानें म्हणा वा सुदैवानें म्हणा तसें नाहीं. एका हिंदुस्थान देशांत एकाच साम्राज्यसत्तेखालीं असलेलीं लहानमोठीं सुमारें सातशें संस्थानें सर्व मुलुखभर पसरलेलीं आहेत. खालसा व संस्थानी मुलुखाच्या या सरमिसळीला अनेक लोक अनेक प्रकारच्या उपमा देऊं शकतील. संस्थानाभिमानी लोक म्हणतील कीं, परकीय राज्याच्या बाजरीच्या काळ्या भाकरीवर देशी संस्थानें हीं पांढरे तीळच होत. आंग्लप्रेमी लोक म्हणतील कीं, देशी संस्थानें हीं गौरवर्ण ब्रिटिश रियासतीच्या चंद्रावरील ढगें आहेत! कोणी त्रयस्थ म्हणेल कीं, देशी संस्थानें हीं हिंदी राष्ट्राच्या आंबोळींतील लहान

मोठीं भोकें होत! आम्ही या तिहींपैकीं ही शेवटची उपमाच पसंत करूं; कारण राष्ट्रीय प्रगति व राजकीय हक्क ह्यांच्या दृष्टीनें पाहतां, हिंदुस्थानांत प्रवास करीत असतां ब्रिटिश मुलुखांतून संस्थानांत पाऊल ठेवतांच एखाद्या भोकांत एकदम पाय गेल्यासारखा वाटतो खरा; व असें झालें म्हणजे बेकनच्या एका ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें, वर आकाशाकडे पाहून ध्रुव नक्षत्राचा शोध करीत असतां विहिरींत पडून मेलेल्या ज्योतिष्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. कारण जोंपर्यंत एकतंत्री संस्थानिकांचा जुलूम शेजारी नांदत आहे तोंपर्यंत ब्रिटिश मुलुखांतील अर्धवट सुधारणा ध्येयाच्या कळसाला नेऊन भिडविल्या तरी त्यांचा काय उपयोग?

वरील दृष्टीनें देशी संस्थानांतूनहि राजकीय सुधारणा अमलांत आणण्याची खटपट करावी असें अलीकडे कांहीं दिवस लोकांना— व त्यांतूनहि संस्थानी प्रजेला वाटूं लागलें आहे. राष्ट्रीय सभेसारख्या नियमनिगडित संस्थेमध्येंहि संस्थानी प्रजेला प्रतिनिधींच्या नात्यानें स्थान देण्यांत आलें, व संस्थानिकांना उद्देशून स्वराज्यदानाच्या उपदेशाचा ठराव करण्यांत आला हें नव्या मनूचें एक ठळक सुचिन्ह आहेच; पण जुलमांत पिचत पडलेल्या कित्येक काठेवाडी व दक्षिणी संस्थानांतील प्रजाजन, धीटपणें जाहीर सभा भरवून आपल्या दुःखांचें गाऱ्हाणें तोंडावाटे काढण्याचें धाडस करूं लागले ही देखील त्याच तोडीची गोष्ट होय. पण राजकीय प्रगतीच्या या प्रयत्नांना संस्थानिकांकडून इतक्यांतच क्रियेपेक्षां अधिक प्रबळ अशा प्रतिक्रियेनें विरोध सुरु झाला आहे. आणि दुर्दैवानें या विरोधकांतील अग्रगण्यत्वाचा मान महाराष्ट्रांतील प्रमुख संस्थानिक म्हणजे आमचे करवीरकर छत्रपति महाराज यांजकडे येत आहे. हा मान महाराज सरकारांना देतांना आम्हीं त्यांच्या समानशील बंधूंची आठवण विसरलों नाहीं. उदाहरणार्थ, शिंदे व होळकर यांच्या राज्यांत एकतंत्री अमल कोल्हापुरपेक्षां आज कमी आहे किंवा उद्यां कमी होईलच असें नाहीं. म्हैसूरचें राज्य वास्तविक अनेक बाबतींत थेट ब्रिटिशसरकारइतकें प्रगतिशील आहे; तथापि प्रजेच्या हक्काच्या दृष्टीनें त्याची गणना जवळ जवळ एकतंत्री राज्यांतच केली पाहिजे.

म्हैसुरांत कदाचित खुद्द राजापेक्षां दिवाजांचा जुलूम अधिक प्रभावी असेल, परंतु तो एकतंत्री जुलूमच होय. बडोद्यांत आजकाल सर्व संस्थानांपेक्षां प्रजास्वातंत्र्य अधिक दिसतें. तथापि तेथेंहि महाराजांच्या एकतंत्रीपणाचा समंध मधून मधून डोकावतोच ! बडोद्यास प्राय: महाराज व दिवाणसाहेब यांच्या अधिकारलालसेची झटापट इतर संस्थानांपेक्षां अधिक पहावयास सांपडते इतकेंच ! पण कांहीं काळ उभयतांचा जोर सारखा झाला तरी राजकारणपटु विशाखदत्त कवीनें वर्णन केल्याप्रमाणें--

अत्युच्छ्रिते मंत्रिणि पार्थिवे च । विष्टभ्य पादावुपतिष्ठते श्रीः ॥
सा स्त्रीस्वभावादसहा भरस्य । तयोर्द्वयोरेकतरं जहाति ॥

शेवटीं दोहोंतून एक म्हणजे अर्थात् महाराज विजयी होतात. मात्र प्रजेच्या दृष्टीनें महाराजांचा विजय म्हणजे हटकून प्रजास्वातंत्र्याची प्रगति असा अर्थ नसतो.

मोठ्या संस्थानिकांपैकीं राहतां राहिले निजाम साहेब ! निजामशाही ही बोलून चालून 'मोंगलाई.' तिला निराळें नांव ठेवण्याचें कारण काय ? मोंगलाईंत चांगल्यांतले चांगले नबाब किंवा दिवाण झाले तेव्हां देखील राज्यकारभारांत एकतंत्रीपणा पूर्ण वसत होताच; मग हुजूर किंवा दिवाण हे लहरी, दुष्ट व जुलमी मिळाले म्हणजे तर काय बोलावयासच नको ! हल्लींच्या नबाबांचे वडील गादीवर होते तेव्हां, दुःखांत सुख या न्यायानें एकतंत्री राज्यपद्धतीच्या विलासांतहि चुकून एखादे वेळीं तरी हुजूरच्या खऱ्या प्रजाप्रेमाच्या गोष्टी कानावर येण्याचा संभव होता. अशा गोष्टी कानावर आल्या असतां राज्यपद्धति कशी आहे याचा सूक्ष्म विचार मनुष्य क्षणभर विसरून जातो. माजी नबाबसाहेबांच्या राज्यांत अन्याय होत नसत असें नाहीं; पण एकंदरीनें प्रजा अधिक सुखी होती. हिंदु—मुसलमान यांच्या दरम्यान हुजूर जाणूनबुजून फारसा पक्षपात दाखवीत नसत. त्यांच्या धार्मिक प्रवृत्तीमुळें व लहरी औदार्यामुळें प्रजेकडून त्यांना 'अवलिया' ही पदवी मिळाली होती. १९०८ सालीं हैद्राबादेस जलप्रळय होऊन हजारों लोकांचें

नुकसान झालें, तेव्हां हुजूर नित्य नदीकांठच्या पेठेंत येऊन डोळ्यांतून टिपें गाळीत हें पाहिल्याबरोबर, नुकसान पावलेली प्रजाहि आपलें दुःख विसरून जाई; व एका कवीनें म्हटल्याप्रमाणें—

त्वन्नेत्रिं अश्रु जरि एकच एक आला ॥
तो दूषणें शत समर्थ पुसावयाला ॥

असा प्रत्यय येई. आणि राजभक्ति व प्रजावात्सल्य यांचा सात्विक झगडा पहावयास मिळे. पण याच अवलिया नबाबांचे हल्लींचे चिरंजीव गादीवर आल्यापासून एकतंत्री राज्यपद्धतीवर व्यक्तिदुष्टत्वाचा कळस चढलेला असून 'गंडस्योपरि पिटिका संवृत्ता' म्हणजे आवाळूवर करट उठल्यासारखें दुःख मोंगलाई प्रजेस होत आहे. असो. मोंगलाईवर टीका करण्याकरितां प्रस्तुत लेख लिहिला नसल्यामुळें तिचें हें गुणवर्णन आम्ही येथेंच पुरें करितों. पण आमचा सांगण्याचा मुद्दा इतकाच आहे कीं, स्वराज्यविरोधी छत्रपति करवीरकर महाराजांचा उल्लेख करितांना आम्ही त्यांचे भाऊबंद अगदींच विसरलों आहों असें नाहीं.

पण आमचा मुख्य कटाक्ष हाच कीं, स्वराज्यद्रोहाच्या बाबतींत करवीरकर महाराजांनीं, चारचौघां इतर संस्थानिकांप्रमाणें सामान्य विरोधानें संतुष्ट न राहतां अग्रपूजेचा मान मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरली आहे. कदाचित् त्यांचे इतर भाऊबंद खासगी रीतीनें सरकारला काय सांगत असतील हें आम्हांला माहीत नसल्यानें आम्ही करवीरकर महाराजांवर हा बहुमान लादीत असूं. महाराज खासगी रीतीनें सरकारी अधिकाऱ्यांना काय लिहितात हें आता आम्हांला माहीत आहेच. पण तें सार्वजनिक रीतीनेंहि तींच मतें प्रतिपादन करीत असल्यामुळें त्यांच्या खासगी मतांचाच आधार घेण्याची जबाबदारी आमच्यावर राहत नाहीं; व महाराजासंबंधीं आम्ही आज जें लिहीत आहों त्याचें समर्थन वर्तमानपत्रांचे सामान्य वाचकहि करूं शकतील. पण खासगी मतांचाहि आधार देण्याचें कारण इतकेंच कीं, महाराज वर्तमानपत्रांत आपल्या सहीवर क्वचित् एखादा लेख लिहीत

असले तरी स्वराज्यास विरोध करणारीं खासगी पत्रें युरोपियन अधिकाऱ्यांस लिहिण्याचा त्यांचा क्रम फार दिवसांचा अखंड असून, त्यांत त्यांचें हृद्गत जितकें खुलासेवार व्यक्त होतें तितकें जाहिर लेखांतून होत नाहीं. असो. महाराजांच्या स्वराज्य–द्रोहाचें आविष्करण करण्यापूर्वीं एकदोन गोष्टी सांगणें जरूर आहे. त्या ह्या. महाराजांचा व आमचा खाजगी द्वेष कोणत्याहि प्रकारचा नाहीं. व तो असण्याचें कारणहि नाहीं. प्रस्तुत लेखक हा ‘ राजारामियन ’ असल्यामुळें कोल्हापुरासंबंधानें त्याला एक प्रकारचें प्रेमच वाटतें. वर्तमानपत्राच्या दृष्टीनें पाहतां केसरीचा व कोल्हापूरचा पूर्वापार संबंध कशा प्रकारचा होता हें प्रसिद्धच आहे. महाराजांच्या दत्तक पित्याच्या संरक्षणाकरितां ‘ केसरी ’ झगडला, व त्याचे संपादक आगरकर व टिळक हे तुरुंगांत गेले. दुसरे पक्षीं ‘ केसरी ’ किंवा टिळक यांचा आणि महाराजसाहेबांचे जनक वडील कै. आबासाहेब घाटगे यांचा ऋणानुबंध कसा होता, व कोल्हापूर– प्रकरणाचें एक अप्रत्यक्ष फळ म्हणजेच कै. आबासाहेब व कोल्हापूरदरबार यांनीं फर्ग्युसन कॉलेजच्या उदयाला केलेली मदत ही गोष्ट महाराजसरकारांना माहीत नसेल असें नाहीं. हा स्नेहसंबंध १८९४।९५ पर्यंत अबाधित चालू होता. पुढें झालें तरी महाराजांच्या मनांत पुणेंकर मंडळीविषयीं वितुष्ट काय कारणानें आलें असेल तें असो; पण पुणेंकरांनीं संस्थान या नात्यानें कोल्हापूरचा अभिमान केव्हांही सोडला असें म्हणतां यावयाचें नाहीं. पुणेंकरांचा संस्थानिकांविषयींचा अभिमान, बडोदेकर मल्हाररावमहाराजांच्या इनसाफाच्या प्रसंगीं “ एक लाख रुपये आम्ही देतों, पण महाराजांच्या बचावाकरितां नामांकित बॅरिस्टर दिलाच पाहिजे, ” अशी जी तार पुण्याहून व्हॉइसरॉयसाहेबांकडे जाऊन थडकली तिनें सरकाराप्रमाणें संस्थानिक वर्गालाहि पटविला ! आणि याच तारेनें हेंहि दर्शविलें कीं, संस्थानिक दुर्गुणी असला तरी इंग्रज सरकार व संस्थानिक यांच्या दरम्यान लढा पडल्यास पुणेंकर संस्थानिकांचाच पक्ष उचलून धरतील ! स्वकीय व परकीय यांतील भेदाचें तारतम्य पुणें-

करांना चांगलेंच माहीत आहे. दुर्दैवानें संस्थानिक मात्र हें तारतम्य जाणत नाहींत याचेंच वाईट वाटतें !

पण तो विषय प्रस्तुत नाहीं. आम्हांला छत्रपतिमहाराजांना इतकेंच सांगावयाचें कीं, महाराजांची कारकीर्द सुराज्यव्यवस्थापूर्ण नाहीं हें जरी आम्हांस माहीत आहे, तरी तो प्रश्न मुख्यतः त्यांच्या प्रजाजनांचा असून, कांग्रेसच्या आजवरच्या धोरणाप्रमाणेंच आम्हां वर्तमानपत्रकारांचेंहि धोरण संस्थानांच्या अंतर्गत कारभारांत फारसें लक्ष द्यावयाचें नाहीं असेंच चालत आलेलें आहे. आम्हांला सुराज्य-व्यवस्थेची चाड असली तरी संस्थानिक आपल्या कारभारापुरते प्रायः स्वतंत्र आहेत किंवा असावे, असेंच आम्हांस वाटतें, त्यांच्या अंतर्गत कारभारावर टीका करणें हें न्यायाचें असलें तरी स्वकीय संस्थानिकांविरुद्ध परकीय इंग्रज सरकारकडे ती एक प्रकारें चहाडी केल्यासारखेंच होतें. असल्या सूक्ष्म भावनेनें आम्हीं आपली लेखणी पुष्कळ वेळां पुष्कळशी आवरून धरलेली आहे. पण 'सव्व खाऊन वरती घडणावळ' मागण्याच्या गोष्टींतील अप्रामाणिक सुवर्णकाराप्रमाणें, महाराज सरकार जेव्हां स्वतःच्या संस्थानांतील फराळ करून तृप्त न होतां वरती खालसांतील प्रजाजनांचें निष्कारण वैर साधून धडधडीत स्वराज्यद्रोह तोंडीं लावूं पहातात, तेव्हां त आमच्या संस्थानाभिमानाची कसोटी पाहण्याचें धाडस करितात, असें म्हणण्यास काय हरकत आहे ? इतर संस्थानिक एकतंत्री राज्यपद्धतीचे भोक्ते किंवा चाहते असले तरी त्यांच्यापैकीं कोणीहि, छत्रपति महाराजांप्रमाणें, स्वतःला लोकसत्ताक राजपद्धतीच्या शत्रूचा अवतार असें मानून त्या भावनेनें उद्योग चालविलेला नाहीं.

व्यक्तिशः महाराजांमध्यें अनेक गुण आहेत, पण त्या गुणांचा उपयोग लोकसत्तेला किंवा सुराज्यव्यवस्थेलाहि न होतां, विरुद्ध कार्याला होत आहे हें पाहून वाईट वाटतें. महाराजांना ईश्वरानें शरीरसंपत्ति लोकोत्तर दिली आहे. या दृष्टीनें ७०० हिंदी राजेरजवाड्यांपैकीं एकहि त्यांच्या बरोबरीला येणार नाहीं. जुन्या काळच्या क्षत्रियालाहि शोभेल असेंच शरीरसामर्थ्य त्यांच्यामध्यें

आहे. महाराजांची बुद्धिमत्ता तर त्यांच्या शरीरसामर्थ्याहूनहि वाखाणण्यासारखी आहे. या दृष्टीनें त्यांची बरोबरी करणाऱ्या कांहीं व्यक्ति संस्थानिक वर्गांत निघूं शकतील. तथापि त्यांच्या बुद्धीचा विलास पाहून आम्हांस खचित असें वाटतें कीं, छत्रपतीमहाराज जुन्या ऐतिहासिक काळांत असते तर ते आपल्या बऱ्या किंवा वाईट कृत्यांनीं कां होईना, पण आपलें नांव खचित करते. इतिहासांत कृत्यांच्या गुणावगुणांकडे न पाहतां केवळ लोकोत्तरतेमुळें जी प्रसिद्धि पुष्कळ स्त्रीपुरुषांना मिळते ती महाराजांना मिळून, त्यांचें नांव दंतकथांतून आबालवृद्धांच्या तोंडीं पिढ्यानुपिढ्या खास राहिलें असतें. महाराजांमध्यें एक प्रकारचें कर्तृत्व खास आहे. मात्र या कर्तृत्वाचा विकास पूर्वींच्या व्यक्तिप्रधान काळीं होण्याला जितका वाव असेल तितका वाव त्यांना आजच्या या कोंदटलेल्या किंवा गुदमरलेल्या परिस्थितींत नाहीं. पराक्रमाचा काळ निघून जाऊन आज छत्रपति झाले तरी त्यांनीं ताटाखालचें मांजर बनावें अशी स्थिति प्राप्त झाली आहे. उलट प्रजानुरंजन करून, जनताप्रेम व्यक्त करून, किंवा नमुनेदार सुराज्यव्यवस्था निर्माण करून नांव मिळविण्याला आजच्याहि काळांत थोडासा वाव आहे. पण महाराजांची कुशाग्रबुद्धि किंवा मुत्सद्दीगिरी त्या बाजूकडे वळत नाहीं, हेंच दुर्दैव होय. ‘ रंग नवा पण ढंग जुना ’ अशा कात्रींत महाराज सांपडल्यामुळें ‘ इदं च नास्ति, परं च न लभ्यते ’ अशी कुचंबणा त्यांची झाली असल्यास नवल नाहीं. पण या बिकट स्थितीचा सर्व तोटा आम्हांसच सोसावा लागत आहे. कारण महाराजांच्या सर्व मुत्सद्दीगिरीचा भर येऊन पडला स्वराज्यविरोधावर.

तीन आठवड्यांपूर्वी मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड हे शाहुछत्रपतींच्या निमंत्रणावरून कोल्हापुराकडे गेले होते. गव्हर्नरसाहेबांची ही भेट खासगी स्वरूपाची होती असें म्हणतात, आणि राजनगरीच्या आसपास सह्याद्रिपर्वताच्या जंगलांत त्यांनीं केलेल्या मनसोक्त शिकारीचें जें वर्णन इंग्रजी पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे त्यावरून गव्हर्नरसाहेबांच्या या खासगी भेटींतला पुष्कळसा वेळ खरोखरच करमणुकींत व खुशालीखुशालींत गेला असेल हें संभवनीय दिसतें. तथापि या खासगी भेटींत गव्हर्नरसाहेब,

महाराज छत्रपति व रेसिडेंट यांचे दरम्यान राजकारणाचा विषय निघाला नसेल हें मुळींच संभवत नाहीं. किंबहुना आम्हास कोणी तसें शपथ घेऊन सांगितलें तरी आम्ही तें सहसा खरें मानणार नाहीं. आमच्या-सारख्या तिऱ्हाइताचें लक्ष या भेटींत महाराजांनीं सरबराईच्या पायीं किती लक्ष रुपये खर्चिले, किंवा गव्हर्नरसाहेबांनीं किती वाघ मारिले, किंवा उभयतांच्या परिवारांतील हौशी गड्यांनीं मिळून स्वादिष्ट मदिरेचे किती पेले झोकले यांकडे न लागतां, या भेटीचा राजकीय दृष्ट्या निष्कर्ष काय निघणार याकडेच लागलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. भेट खासगी होती म्हणून तोफांची सरबत्ती झडली नसेल, किंवा दरबार भरून औपचारिक भाषणें झालीं नसतील. पण गव्हर्नरसाहेब किंवा छत्रपति हे या भेटींत राज-कारण सर्वस्वीं विसरले असतील असें आम्हांस वाटत नाहीं. उभय पक्षीं कांहीं तरी राजकीय हेतु मनांत ठेवून फक्त लोकांची नजरबंदी करण्याकरितां त्यावर शिकारीचा हा मंतरलेला सरपोस टाकला असावा. गव्हर्नरसाहेबांना वाघ मारावयाचे झाले तर ते फक्त दाजीपूरच्या जंगलांतच सांपडतात असें नाहीं, व छत्रपतींना आपल्या रयतेचा पैसा उधळावयाचा झाल्यास त्याला एरवीं तोंडें पुष्कळ आहेत, त्याकरितां गव्हर्नरसाहेबांचेच पाय कोल्हापुरास लागले पाहिजेत असें नाहीं. अनेक इंग्रजी पत्रांतून वाघांच्या शिकारीचें मनोरंजक वर्णन आलें आहे खरें. पण या खासगी भेटींतील खरी शिकार वेगळीच असावी व ती साधली किंवा फसली हें लवकरच इतर रीतीनें कळेल. आमच्या माहितीप्रमाणें या भेटींत मुत्सद्दीगिरीच्या दृष्टीनें खुद्द गव्हर्नर-साहेबांची शिकार करण्याचा महाराजांचा हेतु होता. पण कित्येक वेळां शिकाऱ्यानें सावज मारण्याऐवजीं सावजच शिकाऱ्याला मारतें ! कित्येकांच्या समजुतीप्रमाणें प्रस्तुत प्रसंगीं हीं दुसऱ्या प्रकारची, म्हणजे विपरीत शिकारच, कोल्हापूरच्या राजकारणी जंगलांत घडून आली असावी. कोल्हापूरची स्थिति लक्षांत घेतां असें व्हावें अशी कोणाचीहि अपेक्षा किंवा निदान इच्छा तरी असणार. सर जॉर्ज लॉइड यांचा स्वभाव लक्षांत घेतां हा अदमास चुकून, जर उलट प्रकार घडला असेल तर मात्र कोणासही त्याचें आश्चर्य वाटल्या-वांचून राहणार नाहीं.

गव्हर्नरसाहेब व छत्रपतिमहाराज यांचा आजचा दर्जा व संबंध पाहतां, महाराजांनीं मूळ आमंत्रण दिलें व गव्हर्नरसाहेबांनीं तें स्वीकारलें असेंच घडलें असलें पाहिजे. ' मी कोल्हापूरला येतों ' असें गव्हर्नरसाहेबांनीं आपण होऊन म्हणणें शक्य नाहीं. पण हें निश्चित झाल्यानंतर दुसरा प्रश्न उत्पन्न होतो तो हा कीं, महाराजांनीं तरी गव्हर्नरसाहेबांना शिफारीस आमंत्रण देण्याचें काय कारण ? गव्हर्नरसाहेबांची भेट म्हणजे मोठ्या खर्चाचें काम ! शरीरानेंही राबावें लागतें ! इतकेंही करून त्यांच्या मर्जीचा पापड कोठें वांकडा होईल ही धास्ती. अर्थात् या सर्व आपत्ति सोसून त्यांना आमंत्रण देणें यांत महाराजांचा कांहीं तरी स्वतःचा डाव साधावयाचा असला पाहिजे; व तो डाव हा कीं, मुंबईसरकारची मर्जी तर्त आपणावरून गेलेली दिसते ती परत मिळवावी. महाराजांच्या हातन होण्यासारखें इंग्रज सरकारचें काम आजच्या घटकेस कांहीं नडलेलें नसेल, किंवा महाराजांच्या फाजील मैत्रीमुळें सरकारला ' सेव्ह मी फ्रॉम माय फ्रेंड्स् ' ' बाबा तुझी मैत्री आहे इतकी पुरे झाली, आतां ती आंखडती घे '–असें कांहीं कारणानें सरकारास झालें असेल. कोणत्या कारणानें कां होईना, महाराजांना हातभर अंतरावर दूर ठेवून सरकार त्यांच्याशीं तुसटपणानें वागूं लागलें असावें अशी कांहीं लोकांची समजूत आहे. इतकेंच नाहीं तर, कांहीं दिवसांपूर्वी ' क्रॉनिकल ' पत्रांत महाराजांचें एक गुप्त पत्र कोणी पकडून प्रसिद्ध केलें होतें; त्यांतील उद्दाम व निराशापूर्ण उद्गारांनीं हेंच अनुमान दृढ होतें; कोणी म्हणतात, ' ब्रिटिश मुलुखांत येऊन तुम्ही आपल्या द्वेषमूलक सामाजिक चळवळी करतां कामा नये अशी सरकारनें महाराजांस ताकीद दिली आहे. कोणी म्हणतात, "सत्यशोधक समाजाची चळवळ सरकारलाहि मनांतून आवडणारी असली तरी महाराजांच्या केवळ कुसंगतीनें आपली बेअब्रू होण्याची वेळ आली असें सरकारास वाटूं लागल्यामुळें तें महाराजांस दूर लोटूं लागलें आहे. " कोणी म्हणतात " कोल्हापूरच्या राज्यकारभारांतलीं शेंकडों बिंगें रेसिडेंटच्या द्वारें मुंबई सरकारच्या नजरेस आल्यामुळें त्यांनीं महाराजांकडे थोडा वांकडा डोळा केला आहे. " कसेंहि असो. सरकारच्या कृपाकटाक्षाचा किरण या घटकेस आपल्या

तोंडावर चमकत नाहीं हें लोकमताच्या आरशांत दिसून आल्यामुळें, महाराजांनीं प्रस्तुतचा हा खासगी भेटीचा योग घडवून आणला असावा; व हें खरें असेल तर त्यांनीं या भेटींत राजकीय विषय आळेंवळें इकडून तिकडून काढला नसेल हें संभवतच नाहीं. तथापि सर जॉर्ज लॉईड यांच्या स्वाभिमानबुद्धीवर आमची थोडीशी भिस्त आहे. एकाद्याचा पाहुणचार स्वीकारल्यानें यत्किंचितहि ओशाळगत ज्याला येत नाहीं असा संभावित मनुष्य प्रायः विरळा. आपल्या करमणुकीकरितां स्वतः छत्रपति व त्यांचे बंधु कागलकर यांनीं किती खर्च केला, किती मर्जी राखली, व जिवाचें रान कसें केलें, हें पाहिल्यावर कृतज्ञतेमुळें पाहुण्याच्या मनाचा कल महाराजांकडे झुकता होणें अगदीं स्वाभाविक आहे. पण आमची अशी समजूत आहे कीं, महाराजांचें केवळ निमंत्रण स्वीकारण्यानें गव्हर्नरसाहेबांनीं महाराजांवर आधींच येवढा उपकार करून ठेवलेला असावा कीं भेटींत निघालेल्या चर्चेत महाराजांनीं एकादी याचना केली व ती अमान्य करावी लागली तरीहि गव्हर्नरसाहेबांच्या कृतज्ञताबुद्धीस फारसें वाईट वाटूं नये. तात्पर्य, उभयतांची भेट खासगी असली तरी तींत राजकारणाचे प्रश्न निघाले असले पाहिजेत अशी आमची पक्की समजूत आहे, व ते निघाले असल्यास महाराजांनीं मांडलेल्या मुद्याविरुद्ध बोलण्यासारखें जें काय असेल तें गव्हर्नरसाहेबापुढें मांडण्यास कोणी प्रतिपक्षी तेथें नव्हता हें मात्र दुर्दैव होय. असो, या भेटींत महाराज गव्हर्नरसाहेबांना काय बोलले हें प्रत्यक्ष बाहेर कळणें शक्यच नाहीं. तथापि ते काय बोलले असतील याचें अनुमान करण्यास उपयोगी पडण्यासारखें साधन थोडेसें आम्हांस उपलब्ध झालेलें आहे, व त्याचा फायदा केसरीच्या वाचकांसहि मिळावा अशा बुद्धीनें, करवीरकर महाराज व त्यांचे दोस्त म्हणजे प्रायः अधिकारी यांजमध्यें गेलीं दहा वर्षे झालेल्या पत्रव्यवहारांतील कांहीं त्रोटक उतारे आज मुद्दाम आम्हीं दिले आहेत व ते वाचकांना मनोरंजक व बोधप्रद वाटतील याविषयीं आम्हांस शंका नाहीं. हे उतारे वाचल्यानें महाराजांच्या मनोरचनेची कल्पना वाचकांस स्वतंत्र रीतीनें करितां येण्यासारखी आहेच; तथापि ते वाचल्यानें स्वतः

आमच्या मनांत जी कल्पना उभी राहते तिचें थोडेसें दिग्दर्शन केल्यास वाचकांस झाली तर मदतच होईल.

हे उतारे वाचतांच प्रथम एक गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते ती ही कीं, महाराजांनीं आज कित्येक वर्षेपर्यंत दुसऱ्याची निंदा करून आपलें काम साधण्याचा उपक्रम चालविला आहे. ‘ माझ्याशिवाय इतर सर्व व विशेषतः ब्राह्मण हे इंग्रज सरकारचे शत्रु असून जगांत सरकारचा खरा मित्र जर कोणी असेल तर तो एकटा मीच आहे’ हें पालुपद त्यांच्या एकंदर पत्रव्यवहारांत वरचेवर गाइलेलें आढळून येतें. पण एवढी प्रौढी मिरवून व इंग्रज सरकारांना कृतज्ञतेचें संकट घालून त्यांच्याकडून महाराजांना कोणतें बक्षीस मिळवावयाचें आहे ? तर आपल्या शत्रूंचा नाश व हिंदुस्थानांतील स्वराज्याचा विघात. राज्यांत एखादी अंतर्गत सुधारणा करावी, व त्या कामीं इंग्रज सरकारची मदत किंवा सहकारिता मागावी याविषयीं सदर उताऱ्यांत एकहि उल्लेख सांपडत नाहीं. मदत किंवा सहकारिता महाराजांनीं दिली व घेतली अशी मुख्यतः एकाच बाबतींत व ती बाब दडपशाही. हिंदुस्थानांत अस्वस्थता माजण्यापूर्वीं व लोकजागृति होण्यापूर्वीं महाराज हे सरकारच्या दृष्टीनें निर्माल्यवत् होते, किंबहुना शांततेच्या काळीं पोलिटिकल एजंटाची सगळी दृष्टि महाराजांच्या कृत्यांवर व राज्यकारभारावर रोखलेली असल्यामुळें, महाराजांविषयीं मुंबईसरकारच्या मनांत प्रतिकूल ग्रहच भरला असल्यास नवल नाहीं. पण पाणी गढूळ झालें म्हणजे मांच्छिमार धीवराचे आयतेंच साधतें; त्याप्रमाणें देशांत राजकीय असंतोषाची चळवळ सुरू होऊन इंग्रज सरकारचें मन गढूळ झाल्याबरोबर महाराजांनीं मुंबईसरकारावर आपला गळ टाकला. आणि दुर्दैवानें लॉर्ड सिडनहॅमसारखे दुष्ट गव्हर्नर त्यावेळीं इकडे असल्यामुळें, महाराजांचा गळ गव्हर्नरसाहेबांच्या घशांत इतका खोल रुतला कीं, मुंबईसरकारास त्याच्या गंभीर जलसंचयांतून बाहेर ओढून व आपल्या खांद्यावर टाकून महाराजांना वाटेल तसें नाचतां येऊं लागलें. मात्र या गळाच्या तोंडीं महाराजांनीं आमिषहि मोठें मातबर व लोभनीय असें लावलें होतें. हिंदुस्थानांत बांबगोळ्यांच्या

अत्याचारांस सुरुवात झाल्याबरोबर इंग्रज सरकार देहभान विसरून गेलें. त्यांना घेरी आल्यासारखें होऊन आपल्या भोंवतालचें सर्व जग गरगर फिरतें असें वाटूं लागलें. व या चक्राकार परिभ्रमणांत जो कोणी आपल्याला हात देऊन, पाऊलभर भूमीवर का होईना स्थिर व निःशंक करील तो आपला मोठा उपकारकर्ता असें त्यांना वाटूं लागलें. त्यामुळें खालसा मुलुखांत गुप्त पोलिसखात्याचा सुळसुळाट झाला. पण जेव्हां छत्रपतीसारखा मोठा देशी संस्थानिक, स्वतःच्या खर्चानें व आपल्या गुप्त पोलिसांपेक्षांहि अधिक उत्साहानें, राजद्रोहाचें मूळ खणून काढण्यास पुढें सरसावलेला त्यांना दिसला तेव्हां सरकारास हर्ष झाल्यास नवल नाहीं. महाराजांची झडप येवढी मोठी कीं, त्यांनीं ब्रिटिश मुलुखांतील पोलिसांवरहि ताण करून दाखविली. पण केवळ अत्याचारांच्या द्वेषापुरताच त्यांचा उद्योग असता तर त्यांस कोणी नांव ठेवलें नसतें. कारण अत्याचार हे केव्हांहि निषिद्धच असून त्यांना प्रतिबंध होणें जरूर होतें. पण गुन्हे तपासण्याच्या कामीं झालें तरी महाराजांनीं एका मोठ्या संस्थानचे अधिपति या नात्यानें जी गंभीर वृत्ति अनुसरावयास हवी होती ती न अनुसरतां, एखाद्या नवथर डिटेक्टिवाचा उथळपणा व्यक्त केला आहे, ही गोष्ट त्यांच्या पत्रव्यवहारावरून कोणासहि दिसून येईल. खालसांतील सामान्य पोलिस अधिकारी ते काय, त्यांना किंवा त्यांच्याविषयीं आर्जवानें महाराज लिहितात काय ? सामान्य सिव्हिलियन महाराजांना देवासारखा वाटतो; आणि उलट त्यांच्या दृष्टीला टिळक हे तर बदमाष वाटतातच, पण राजमान्य गोखले हे देखील या देशांत कवडीमोल आहेत असें भासविण्याचा त्यांचा प्रयत्न पत्रव्यवहारांत स्पष्ट आढळतो. यच्चयावत् हिंदी लोक, मग ते रावसाहेब, रावबहादूर, नामदार, राजमान्य, लोकमान्य कोणीहि असोत ते सर्व राजद्रोही, गुप्त कट करणारे, बिनइमानतीचे ! त्यांचा नायनाट व्हावा ही महाराजांची मोठी इच्छा. इंग्रज सरकार आपल्याइतकें संशयी व कडक नाहीं म्हणून उलट महाराजांचा सरकारवर राग ! न्याय अन्याय बाजूला सारून सर्व राजकीय चळवळ्यांना एकदम दडप-

शाहीच्या जात्यांत घालून भरडून काढण्याविषयीं त्यांचा उपदेश. खुद्द इंग्रज सरकारच्या हातूनहि हें काम पार पडणार नाहीं म्हणून, पंतप्रतिनिधींकडून विशाळगडचा डोंगरी किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन तेथें सर्व राजकीय पुढाऱ्यांना कैदेंत ठेवून त्यांचे हाल करण्याची व पाहण्याची त्यांची तयारी ! आपल्या राज्यांतील किंवा शेजारच्या यच्चयावत् ब्राह्मण संस्थानिकांवर घाणीचे शिंतोडे उडवून त्यांचा अपमान व पायमल्ली करण्याची हैास, व हें सर्व कशाकरितां ? तर स्वराज्याची चळवळ बंद पाडण्याकरितां ! व सरकारकडून जुलमी आणि एकतंत्री गॅरंटी किंवा सनद स्वतःला मिळवून मनसोक्त रावणराज्याचा धिंगाणा घालण्याकरितां ! मूठभर सुशिक्षित ब्राह्मण वाईट व टाकाऊ खरे, पण मागसलेले लोक किंवा बहुजनसमाज हा तरी महाराजांचा आवडता कीं नाहीं ? पण ब्राह्मणेतर समाजाला झाले तरी स्वराज्याचे अधिकार देण्याची महाराजांची तयारी कोठें आहे ? दहा वर्षांपूर्वींच्या मोर्ले–मिंटो सुधारणा याच फाजील उदारपणाच्या ठरवून, एकादें निमित्त काढून इंग्रज सरकारकडून त्या परत घेण्याविषयीं लीवार्नरसारख्या साहेबाशीं महाराज संगनमत करतात ! ब्राह्मणाविरुद्ध उठवायाला तेवढा ब्राम्हणेतर समाज महाराजांना प्यारा; पण ब्राम्हणेतरांना तरी स्वराज्याचे अधिकार द्या असा मुद्दा निघाला कीं, ते अशिक्षित, कमकुवत व नालायक ठरतात ! तात्पर्य खालसांतील नोकरशाहिच्या एकतंत्री अंमलाच्या विषारी रसायनाला फक्त एकच पूट मिळत होतें, त्यावर संस्थानिकांच्या स्वातंत्र्याच्या निमित्ताचें दुसरें पूट चढवून, हा विषार आपल्या संस्थानांत भिनविण्यास उत्कृष्ट संधि आहे असें पाहून, गेल्या दहा वर्षांत महाराजांनीं तिचा कुशलतेनें व स्वाभिमान गमावूनहि कसा फायदा घेतला हें आज प्रसिद्ध केलेल्या पत्रव्यवहारावरून कोणासहि दिसून येईल.

छत्रपतींचें छत्र हल्लीं जुनाट झालें आहे, त्यांतील सद्गुणाच्या रेशमाचें तेज व पराक्रमाच्या जरतारीची लकाकी लोपली आहे ही गोष्ट जरी खरी, तरी अखिल महाराष्ट्राचे लोक ही उणीव आपल्या सनातन प्रेमादरानें भरून

काढण्याला पूर्वी तयार होते व अजूनहि आहेत. परन्तु सदरचा पत्रव्यवहार वाचून कोणालाहि दुःखानें असें कबूल करावें लागेल कीं, स्वतः महाराजांनींच लोकांइतकाहि आपल्या छत्रपतित्वाचा मान आपण ठेवला नाहीं. किंबहुना प्रजेच्या स्वातंत्र्याच्या व भावी स्वराज्याच्या हक्काचा उन्हाळा व्हावा म्हणून, निरनिराळ्या प्रसंगीं आपल्या राजछत्राच्या चिंधोट्या काढून त्या, संस्थानांतील जुलमी कारभाराचे व्रण लोकांना दिसूं नयेत म्हणून त्यावर दाबून बांधल्या. व एखाद्या जुन्या छत्रीच्या सांगाड्याप्रमाणें आपलें छत्र इंग्रज सरकारास आपल्यापुरता व्यक्तिस्वातंत्र्याच्या मोबदला घेऊन विकावयास काढण्यासहि महाराजांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं ! छत्रपति आपल्या छत्राचे मालक म्हणून त्याचें काय वाटेल तें करण्याला मुखत्यार आहेत हें एक, शिवाय संस्थानिकांबद्दल आम्हास मनांतून खरोखरच आपलेपणा वाटतो हें दुसरें; या दोन कारणांकरितां आम्हीं कोल्हापूरदरबाराविषयीं सहसा लिहिलें नाहीं. अगदीं जरूर तेवढ्या बाबींचीच चर्चा केली. पण धुमाकूळ घालण्याची आपली हौस आपल्या संस्थानापुरती न ठेवतां खालसा मुलुखांतहि विद्याच्या फुल्या घालून नायटे पसरविण्याचा मोह महाराजांना अनिवार झाला. व आपल्या संस्थानांतील प्रजेचें सुख संपादण्याचें बाजूस राहून खालसांतील प्रजेंत दुःख कालविण्याचा त्यांनीं उपक्रम केला, तेव्हां प्रतिक्रियारूप दोन शब्द उच्चारल्याखेरीज आम्हांस गप्प बसवत नाहीं.

महाराजांविषयीं अप्रीति वाटण्यास इतर कारणें थोडीं आहेत असें नव्हे. गेलीं सुमारें वीस वर्षें महाराजांनीं टिळकांचा किती द्वेष व छळ केला ही गोष्ट पुष्कळांना माहीत आहे; तथापि महाराजांवर प्रस्तुत टीका करितांना ती गोष्ट आम्ही बिलकुल लक्षांत ठेवलेली नाहीं. व्यक्ति या नात्यानें महाराजांशीं आमचें भांडण नाहीं. तर केवळ संस्थानी मुलुखांतच नव्हे पण खालसा मुलुखांतहि, ' गुरूसे शिष्य सवाई ' या न्यायानें, इंग्रज सरकारला स्वराज्यद्रोहाचा उपदेश करणारे आचार्य--

व स्वराज्याकांक्षेचा उत्पात करण्यास निघालेला नवा अवतार– या नात्यानेंच आमचा महाराजांशीं विरोध आहे. महाराज हे ब्राम्हणांचा द्वेष करितात ही गोष्ट जितकी महशूर होती तितकी ते प्रजासत्ताक स्वराज्याचा द्वेष करितात ही गोष्ट महशूर नव्हती. महाराजांस आमची एवढीच विनंति आहे कीं, ब्रिटिश मुलखांत स्वराज्य स्थापन होऊं घातलें तें आतां परत येत नाहीं. व संस्थानांतूनहि यथाकाल स्वराज्यसंस्थेचा प्रवेश व प्रसार झाल्याशिवाय राहत नाहीं, व म्हणून यापुढें तरी छत्रपतींनीं स्वराज्यकल्पनेचा द्रोह सोडून द्यावा, व प्रजेचा संतोष हेंच आपलें सुख असें मानून स्वराज्याच्या कल्पनेला पुष्टि द्यावी. तसें केल्यानें छत्रपतींच्या छत्राला अकल्पित रीतीनें एक नवेंच तेज चढेल !

## करवीरचे छत्रपति यांचा मृत्यु*

आम्हांस कळविण्यास दुःख वाटतें कीं, करवीरचे छत्रपति श्रीशाहूमहाराज यांनां गेल्या शनिवारीं मुंबई येथें देवाज्ञा झाली. महाराजांची शरीरयष्टी अतिशय भव्य असल्यामुळें ते आजारी असले तरी तसें सहसा दिसून येण्यासारखें नव्हतें. यामुळें त्यांचा देह अनेक रोगांचें घर होऊन बसला असतांहि, त्यांची प्रकृति क्षीण झाली असेल असें कोणास वाटलें नाहीं. किंबहुना अखेरपर्यंत त्यांच्या हालचाली व सर्व प्रकारचें उद्योग नेहमींप्रमाणें चालले असून, ते अंथरुणाला खिळून असे अवघे एकदोन दिवसच पडले होते. त्यांचा मृत्यु अभावितपणें मुंबईंत झाल्यामुळें त्यांचें शव स्पेशल ट्रेननें शनिवारीं पुण्यास आणून तेथून मोटारीनें कोल्हापुरास अखेरच्या संस्काराकरितां नेण्यांत आलें. शाहूमहाराजांचा जन्म सन १८७४ सालीं कागलच्या घाटगे कुळांत झाला. यांचे वडील सर्जेराव आबासाहेब घाटगे हे, कोल्हापूरचे माजी शिवाजी-

* केसरी ता. ९ मे १९२२

महाराज मृत्यु पावल्यावेळीं कोल्हापूरचे रीजंट म्हणजे मुख्य कारभारी होते. शिवाजी महाराज निपुत्रिक वारल्यामुळें त्यांचे पश्चात् त्यांचे कुटुंबाचे मांडीवर शाहूमहाराज यांस त्यांच्या दहावें वर्षी दत्तक देण्यांत आलें. महाराजांचें मामुली शिक्षण राजकोटास झाल्यावर १८९४ सालीं त्यांना राज्याची मुखत्यारी मिळाली. तेव्हांपासून त्यांनी केलेला राज्यकारभार लोकांस विदितच आहे. महाराज हे आपल्या दौलतीचे अभिमानी असून त्यांनीं आपल्या कनिष्ठ राजवाड्यांचे हातीं आपले अधिकार सहसा जाऊं दिले नाहींत. राज्यांत इमारती, शिकारखाने वगैरे अनेक बांधले, व राज्यांतील वतनदार वगैरे लोकांना पूर्ण कह्यांत ठेवलें. महाराजांची बुद्धिमत्ता चांगली असल्यामुळें राज्यकारभारासंबंधानें विशेष परिणामकारक अशी कोणतीहि सूचना सल्लागारांनीं केल्यास ती त्यांना तेव्हांच पटून अमलांत आणली जाई. शिवाय राज्यकारभाराच्या सूक्ष्म बाबींत स्वतः त्यांनाहि पुष्कळच सुचे !

महाराजांचे शरीरगुण व बुद्धिगुण लक्षांत घेतां ते सामान्य प्रतीचे मनुष्य नव्हते हें कोणीहि कबूल करील. शरीरसामर्थ्याच्या बाबतींत ईश्वराची त्यांना कांहीं एक वेगळीच देणगी होती. सर्व हिंदुस्थानांत शरीरबलानें त्यांच्या तोडीचा एकहि संस्थानिक असेल असें वाटत नाहीं. अनेक मर्दानी खेळांत ते निष्णात होते. शिकार व पहिलवानगिरी या गोष्टी त्यांना अत्यंत प्रिय असत. शिकारीला लागलें कीं मग आपला राजेपणा सर्व विसरून निवळ रानटी शिकाऱ्याप्रमाणें ते पहाड व जंगलें वाटेल तशीं तुडवीत जात, पडतील ते कष्ट सोशीत, व शौर्यानें सर्व प्रकारच्या धाडसाचीं कृत्यें करीत. वाघ व अस्वलें यांच्याशीं त्यांनीं अनेक सामने केले म्हणतात. त्यांच्या धिप्पाड शरीराच्या मानानेंच त्यांची शक्ति अचाट असे. सरपंच या नात्यानें कुस्ती सोडविण्याचे प्रसंग आले असतां ते मोठमोठ्या जवानांना चड्डींत हात घालून उचलून ठेवीत. कोल्हापूरच्या पागेला एकदां आग लागली असतां महाराजांनीं हातानें खर धरून घोडे ठाणावरून उचलून बाहेर काढले असें सांगतात. महाराजांची बुद्धिमत्ताहि अशीच मोठी होती, व कारस्थानपटुता हा तिचा विशेष गुण असल्यामुळें, जुन्या काळीं ते असते तर त्यांना

ऐतिहासिक कीर्ति लाभण्यासारख्या गोष्टी त्यांच्या हातून घडल्या असत्या यांत शंका नाहीं. आपल्या हयातीचा काल मनुष्याला रुक्ष व नीरस वाटतो. पण अशाहि काळांत बुद्धिमत्ता, मनुष्यस्वभावाचें ज्ञान व जबर महत्वाकांक्षा या त्रयीच्या जोरावर त्यांनीं ' खास दरबारांत ' व ' आम दरबारांत ' ज्या अघटित घटना केल्या व करविल्या त्यांचें वर्णन, तज्ज्ञ माणसानें यथास्वरूप लिहिलें तर, तो एक अत्यंत मनोवेधक असाच ग्रंथ होईल यांत शंका नाहीं. धर्मशास्त्र, राजकारणशास्त्र, समाजशास्त्र या तिन्हींमध्यें वक्र बुद्धीचा नांगर खोल घालून सत्तेच्या बळावर शाहू महाराजांइतकी हल्लींच्या काळांत दुसऱ्या कोणीहि बिचारी जमीन उलथीपालथी केली नसेल. त्यांनीं केलेल्या मेहनत-मशागतीनें कोणत्या प्रकारचें पीक आलें हें लोकांना दिसतच आहे; तथापि बाजूस पडलेल्या अनेक मनुष्यवर्गांना अपूर्व पुढारी मिळून त्यांची बुद्धिजागृति झाली हें जितकें खरें, तितकेंच महाराजांची उद्योगशीलता, प्रयत्नाची चिकाटी व ध्येयाची एकनिष्ठता लोकोत्तर होती हेंहि खरें आहे. सूक्ष्म दृष्टीनें पाहाणाऱ्या तत्वज्ञान्यास मनुष्यस्वभावाच्या शास्त्रांत अनेक अपूर्व सिद्धांत सुचविण्याइतकी विपुल सामुग्री महाराजांनीं आपल्या चरित्रानें पुरविली आहे यांत शंका नाहीं. त्यांच्या दोषाप्रमाणें त्यांचे कांहीं गुणहि लोकोत्तर होते; व महाराज निवर्तल्यावर जनता त्यांचे गुणच तेवढे स्मरणांत ठेवून दोष विसरून जाण्याचें औदार्य दाखवील अशी आमची खात्री आहे.

## देशी संस्थानें व स्वराज्य*

दक्षिणेंतील संस्थानी प्रजेची परिषद आज सकाळीं पुण्यास भरणार आहे. अशा प्रकारची परिषद महाराष्ट्रांत ही पहिलीच होय. या परिषदेच्या बैठकीनें म्हणण्यासारखें फळ हातीं पडण्याची अपेक्षा जरी कोणास धरितां

*केसरी ता. २४ मे १९२१

आली नाहीं, तरी अशा परिषदेचा उपक्रम झाला हीच एका अर्थानें मोठी गोष्ट मानली पाहिजे.

आजपर्यंत अनेक प्रकारच्या कारणांनीं देशी संस्थानांतून आजवर लोकसत्तेची चळवळ झाली नाहीं. पण यापुढें मात्र ती टळणें शक्य नाहीं. कारण खुद्द ब्रिटिश सरकारनेंच हिंदुस्थानांतील आपल्या राज्यकारभाराचें ध्येय स्वराज्य हें ठरविल्यामुळें, संस्थानिकांना तें ध्येय आपलेंहि नाहीं असें म्हणण्याची सोय राहिली नाहीं. राहतां प्रश्न एवढाच राहतो कीं, हें ध्येय प्रत्यक्ष अमलांत कशा रीतीनें येणार? या रीतीचे तीन प्रकार संभवतात, एक संस्थानिकांनीं उदार होऊन स्वेच्छेनें स्वराज्याचे अधिकार आपल्या प्रजाजनांस द्यावे. दुसरा प्रकार म्हटला म्हणजे, ब्रिटिश सरकारनें संस्थानिकांवर आपल्या राज्यांत प्रातिनिधिक संस्था स्थापण्याची सक्ति करावी. तिसरा प्रकार म्हणजे उभयतांचीहि इच्छा नसतां केवळ बदललेल्या कालमानाच्या जोरावर संस्थानी प्रजेनेंच जोराची चळवळ करून, आपल्या यजमानांना प्रातिनिधिक संस्था स्थापण्यास व अधिकारदान देण्यास भाग पाडावें. आमच्या मतें पहिल्या दोन बाबी कमी महत्त्वाच्या असून तिसरीच अधिक महत्त्वाची आहे. संस्थानिक झाले तरी बोलून चालून ते मनुष्यप्राणी; त्यांना आपले राज्याधिकार सुखासुखी कसे टाकवतील? या जगांत भाग पडल्याशिवाय कोणीहि हातची सत्ता जाऊं देत नाहीं. बरें, ब्रिटिश सरकारनें ही गोष्ट करण्यास त्यांना भाग पाडावें म्हटलें तर त्याला संस्थानिकांचे हक्क, संस्थानांचें प्रेम बाळगणाऱ्या आम्हां लोकांचा स्वाभिमान, स्वतंत्रता व तहनाम्यामुळें सिद्ध होणारी संस्थानी राज्यांची, हीं सर्वच आड येणारीं आहेत. स्वतः ब्रिटिश सरकारला संस्थानिकांना हातीं धरून आपल्या बरोबरीनें चालविण्याची इच्छा असती तर यापूर्वीं अनेक राजकीय सुधारणा संस्थानांतून जन्मास येऊन वहिवाटींहि लागल्या असत्या. पण सरकार संस्थानी प्रजेविषयीं येवढी काळजी काय म्हणून करील? अर्थात् वरील दोन्ही मार्ग खुंटल्यानें आतां संस्थानी प्रजेला तिसरा, म्हणजे लोकमताच्या आधारावर चळवळ

करून आपले हक्क आपण मिळविण्याचाच तेवढा मार्ग उरतो. त्या मार्गानें जाण्यास त्यांनीं आतां प्रारंभ केला पाहिजे.

वास्तविक १९१७ च्या २० आगष्टचा जाहिरनामा, १९१९ चा पार्लमेंटचा कायदा, मॉंटेग्यू-चेल्म्सफर्ड रिपोर्टाचा देशी संस्थानांवरील स्वतंत्र अध्याय, आणि नागपूर येथील राष्ट्रीय सभेचा देशी संस्थानांसंबंधाचा ठराव इत्यादिकांमुळें संस्थानी प्रजेच्या हक्काचा भात लोकमताच्या विस्तवावर शिजवून तयार होऊन राहिलेला आहे हें दिसून येईल. आतां संस्थानी प्रजेनें फक्त तो भात आपल्या पानावर वाढून घ्यावयाचा उरलेला आहे. पण हेंहि त्यांच्या हातून न घडेल तर मग धन्य त्यांची ! हा भात पानावर वाढून घतांना क्वचित् कोणाचे हात भाजतील, नाहीं असें नाहीं. पण हात भाजण्याच्या भीतीनें जर ते स्वस्थ बसतील तर इकडे सर्व भात फुकट जाऊन त्यांना उपाशीं मरावें लागेल. कोणालाहि स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं. संस्थानी प्रजेला झालें तरी दुसऱ्यांच्या चळवळींचा लाभ किती दिवस मिळणार ? व त्यांनीं तशी अपेक्षा तरी कां करावी ? हक्क मिळणार संस्थानी प्रजेला व चळवळ करावी खालसा प्रजाजनांनीं, हें किती दिवस होणार व व्हावें तरी काय म्हणून ? कांहीं अंशानें व कांहीं कारणास्तव त्यांना खालसा प्रजेपेक्षांहि कदाचित् अधिक त्रास सोसावा लागेल हें आम्ही जाणतों, हें वर दर्शविलेंच आहे. पण याची सबब त्यांनीं सांगून चालणार नाहीं. त्यांच्या समाधानाकरितां आम्ही फार तर एवढें सांगूं शकतों कीं, गेल्या शतकांत इटली देशांतील छोटेखानी संस्थानी प्रजेचा जितका छळ स्वराज्य मिळविण्याकरितां झाला तितका तरी आज हिंदुस्थानांतील संस्थानी प्रजेचा होणार नाहीं. ग्लॅडस्टनसाहेबांनीं सिसिली संस्थानांतील जुलमाचें वर्णन कोणत्या शब्दांनीं केलें होतें हें प्रसिद्ध आहे. "The negation of God made into a system of Government" म्हणजे 'खरी सैतानी रियासत' हें तें वर्णन होय. सुदैवानें आमच्या देशी संस्थानांना इतकें कठोर वर्णन लागू पडणार नाहीं. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, इटालियन संस्थानांवर अधिराज्य करणाऱ्या ऑस्ट्रियन सरकाराइतकें

निर्दय किंवा बेवकूब आजचें ब्रिटिश सरकार नाहीं. संस्थानांत होणारी प्रगति सरकारला मनानें न आवडावी याला वास्तविक कांहीं कारण नाहीं; पण मनानें ती न आवडली तरी या बाबतींतील नाराजी तोंडानें तें बोलून तरी दाखविणार नाहीं, या गोष्टीचा संस्थानी प्रजेला फायदा घेतां येईल.

[ २ ]*

गेल्या मंगळवारीं व बुधवारीं दक्षिणेंतील संस्थानी प्रजेची परिषद् पुण्यास भरली होती; तिची हकीकत थोडक्यांत आज दुसरीकडे दिली आहे, तिजवरून पाहतां ही परिषद् यशस्वी झाली असेंच कोणासहि म्हणावें लागेल. अशा प्रकारच्या सभेच्या यशस्वीपणाचें आमच्या मतें मुख्य एकच लक्षण आहे. तें हें कीं, खुद्द संस्थानांतील प्रजाजन या चळवळींत उघडपणें कितपत भाग घेण्यास तयार होतात; व प्रस्तुत परिषद् यशस्वी झाली असें आम्ही म्हणतों तेंही याच दृष्टीनें. दक्षिणेंत संस्थानें अशीं सुमारें वीस आहेत असें मानलें, तर त्यांतील निदान पंधरा संस्थानांच्या प्रजाजनांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष हजर होते. या प्रतिनिधींची निवडणूक जाहिरसभा भरवून झाली नसेल; तथापि त्या त्या संस्थानांतील इतर प्रजेनें मनानें या कार्याकरितां त्यांना सुपारी दिली होती असें गृहीत धरण्यास बिलकूल प्रत्यवाय नाहीं; पूर्वीं खालसा मुलखांतल्याप्रमाणें हल्लीं संस्थानांतून जबाबदार राज्यपद्धति सुरू होऊं नये, असें मनापासून वाटणारा एकहि इसम मिळणार नाहीं. पण पूर्वीं खालसांतींत घडलें त्याप्रमाणें हल्लीं संस्थानांतून स्वराज्य हवें असें तोंडानें नुसतें म्हणण्यांतहि मोठें धाडस आहे असें मानणारेच लोक पुष्कळ. पण जें धाडस प्रत्यक्ष

---

केसरी ता. २४ मे. १९२१.

आपल्या हातून होत नाहीं; तें दुसऱ्यानें आपल्या करितां केलें तरीहि तें नको असें म्हणणारा मनुष्य मात्र विरळा, किंबहुना अशा अकारणबंधूविषयीं इतरांना कृतज्ञता वाटल्याशिवाय रहात नाहीं. लोकमान्य टिळकांबद्दल लोकांना जी कृतज्ञताबुद्धि वाटत होती तिचें कारण हेंच कीं, टिळकांनीं स्वराज्याच्या चळवळीमुळें होणारा नुकसानीचा सर्व भार आपल्या शिरावर घेऊन, लोकांच्या मनांत असलेली स्वराज्याची मागणी त्यांच्याच तोंडून, पण त्यांना तोशीस न लागतां, काढविली व सरकारकडून ती मान्य करविली. परवांच्या संस्थानी परिषदेस आलेल्या प्रतिनिधींमध्यें टिळकांइतका प्रसिद्ध किंवा कर्तृत्ववान् पुरुष कोणी होता असें नाहीं. तथापि जे प्रतिनिधी उघडपणें परिषदेस हजर राहिले, परिषदेचे सभासद म्हणून ज्यांनीं नांवें नोंदविलीं, व संस्थानांत परत जाऊन या कार्याचा प्रसार करण्याचें ज्यांनीं आश्वासन दिलें, त्यांच्याकडे प्रस्तुतच्या चळवळींतील अग्रेसरत्वाचा मान सहजच येणार आहे. हे लोक परिषदेस येतांना त्यांच्या इतर प्रजाबंधूंनीं " शुभास्ते पन्थानः सन्तु " असाच आशीर्वाद त्यांना दिला असेल, व ते परत गेल्यावर " तुम्हीं आमचें मोठें कार्य केलें " असाच धन्यवाद त्यांना मिळेल, याविषयीं आम्हांस शंका वाटत नाहीं.

संस्थानी परिषदेनें जे ठराव मंजूर केले ते दुसरीकडे समग्र दिलेच आहेत. त्यांतील एकाहि ठरावावर मतभेद न होतां ते सर्वानुमतें मंजूर झाले यावरून ते समर्पक असूनहि सर्व बाजूंचें तारतम्य राखणारे होते, असेंच कोणासहि कबूल करावें लागेल. परिषदेमध्यें खालसा मुलखांतील सर्व प्रकारच्या राजकीय मतांच्या लोकांचा तसेंच संस्थानांतील निरनिराळ्या पक्षांच्या लोकांचा समावेश झाला होता. सुदैवानें अध्यक्षस्थानहि संस्थानी मुलखांत मुख्य कारभाऱ्याचें काम बरेच दिवस केलेल्या केलेल्या अशा अनुभविक व त्यांतूनहि नेमस्त अशा गृहस्थानें स्वीकारलें होतें. परिषदेच्या चालकांचा किंवा तिला हजर असलेल्या सभासदांचा उद्देशहि गैरशिस्त असें कांहींच न करण्याचा असल्यामुळें

मतभेदास जागा कोठें फारशी उरली नाहीं; व जी क्वचित् दृष्टोत्पत्तीस आली तीहि थोडयाशा वादविवादानें निघून गेली. परिषदेंत मंजूर झालेल्या ठरावांत मुख्य दोन गोष्टी मूलभूत होत्या. पहिली ही कीं, संस्थानच्या गादी-वर बसणारीं विद्यमान घराणीं अगर विद्यमान व्यक्ति यांच्याविषयीं संस्थानी प्रजेनें सर्वस्वीं राजनिष्ठाच धारण केली पाहिजे; व दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे अशा प्रकारची राजनिष्ठा ठेविली तरी प्रजेतर्फे होणाऱ्या जबाबदार स्वराज्याची मागणी मात्र टळणें शक्य नाहीं. संस्थानिकांबद्दलच्या राजनिष्ठेचा ठराव औपचारिक असा कोणास वाटला तर वाटो; पण वास्तविक तो खऱ्या मनानेंच केलेला होता. आमच्या माहितीप्रमाणें कोणत्याहि संस्थानामध्यें आज अमुक एक घराणें किंवा व्यक्ति गादीनशीन असूं नये असा वाद उपस्थित झालेला नाहीं. हीं घराणीं आज शंभरांहून अधिक वर्षें, म्हणजे इंग्रजी राज्य होण्याच्या आधींपासून, संस्थानच्या गादीवर आहेत. संस्थानी प्रजेचा वाद असलाच तर तो इंग्रज सरकाराशीं व तोहि याचकरितां कीं, संस्थानिकांचा वारस ठरविण्याचा अधिकार एक धर्मशास्त्रास तरी असावा किंवा खुद्द संस्था-निकाला तरी असावा. परंतु तो तसा न राहतां दत्तक मान्य करणें अगर मान्य न करणें, फार तर काय पण औरस वंशांतीलहि वारस पसंत करणें हा अधिकार इंग्रज सरकार आपल्या हातीं ठेवूं पहातें ! या बाबतींत संस्थानी प्रजेचें मत घेतलें तर तें इंग्रज सरकारच्या धोरणाविरुद्ध जाईल; व यापुढें असले वाद उपस्थित झाल्यास प्रजेकडून संस्थानिकांनाच सहानुभूति व पाठिंबा मिळेल. तात्पर्य, संस्थानी प्रजेची वार्षिक परिषद भरल्यानें किंवा तिची बारामास कामकरी सभा स्थापल्यानें, किंवा सर्व संस्थानभर या सभेच्या शाखा, उपशाखा व सभासद फैलावल्यानें आपल्या आस्तित्वास किंवा वंशपरंप-रागत हक्कांस बाध येईल अशी भीति कोणाहि संस्थानिकानें बाळगण्याचें कारण नाहीं. स्वराज्यांतील अधिकारी स्वकीय असावे हा स्वराज्याच्या माग-णीच्या सोळा आण्यांतील आठ आण्यांचा भाग असून तो सुदैवानें आपणांस पूर्वींच मिळून चुकला आहे असें केळकर यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितलें. त्याचा अर्थ झाला तरी हाच कीं, संस्थानी प्रजा किंवा त्यांचे

खालसांतील सहानुभवी स्नेही यांच्या मनांत विद्यमान राजघराणीं किंवा व्यक्ति यांच्याबद्दल यत्किंचित्‌हि मळमळ नाहीं व असण्याचें कारणहि नाहीं.

पण सर्व राजकीय व्यवहार देवाण व घेवाण अशाच स्वरूपाचा आहे हें खुद्द संस्थानिकांनींहि उलटपक्षीं विसरूं नये. कारण संस्थानिक घराणीं व व्यक्ति यांच्या ठिकाणीं प्रजेची निष्ठा असली म्हणून त्यांचा एकतंत्री राज्यकारभारहि प्रजेला पसंत आहे असें मात्र अनुमान त्यावरून काढावयाचें नाहीं. कारण आपल्या यजमानावर जशी त्यांची प्रीति आहे तशी ती त्यांच्या स्वतःवरहि आहे. संस्थानिक झाला म्हणून एका व्यक्तींत सर्व अधिकार सांठविले जावे आणि प्रजाजन हजारों असले तरी त्यांची अकल व इभ्रत काडीमोल ठरावी हा न्याय मात्र यापुढें चालूं शकणार नाहीं; व संस्थानिक तो तसाच रेटूं म्हणतील तर त्याकरितां चळवळींचें तुंबळ रण माजल्याशिवाय राहणार नाहीं; कारण संस्थानांतून आज जुनी पद्धति सर्वत्रीं अमलांत राहिली नाहीं व नवीहि सर्वस्वी अमलांत आलेली नाहीं. मात्र या दोनहि पद्धतींचे तोटे तेवढे प्रजेच्या पदरांत पडत आहेत. जुन्या पद्धतींत व्यक्तिशः संस्थानिक एकतंत्री होते. पण वर्षांतून तीनशेंपन्नास दिवस राजा व प्रजा यांचा प्रत्यक्ष संबंध असा न येतां, प्रजा आपल्या व्यवहारापुरती अगदीं स्वतंत्रपणें वागत असे. शिवाय करवसुली हल्लींहून पुष्कळ कमी असून उपयोग नसतां उपद्रव मात्र करणाऱ्या नव्या पद्धतींतील अठरा कारखान्यांची त्यांच्यामागें भुणभूण तरी नसे. वतनदारांच्या वतनांना किंमत होती, तेज होतें व शंभर पायांच्या गोमीप्रमाणें संस्थानिक, अधिकारी, वतनदार व प्रजाजन ह्या सर्वांचें मिळून तें एक खरें संस्थान होई व आपापल्या दर्जाचा अभिमान बाळगून सर्व परस्परांशीं वागत. हल्लीं इंग्रजांचें पाहून संस्थानिकांना जुने असामदार, वतनदार, ग्रामाधिकारी वगैरे लोकांचें वावडें वाटूं लागलें आहे. पण याच नव्या पद्धतींत अधिकारदान व विभागणी हें जें तत्त्व जोरानें पुढें येऊन जबाबदारीच्या स्वराज्यांत त्याचें पर्यवसान होऊं घातलें आहे तें मात्र आमच्या संस्थानिकांना रुचत नाहीं. नव्या राज्य-

पद्धतींतिल खाद्यें व पेयें यांची चटक त्यांना लागली, पण आपली राज्यपद्धति मात्र सर्वस्वी जुन्या पद्धतीचीच ठेवण्याचा त्यांचा आग्रह किंवा हटवाद आहे. पण हें यापुढें चालणें शक्य नाहीं. सर्वस्वीं एक जुनें तरी पत्करतां किंवा एक नवें तरी पत्करतां सांगा ? असा त्यांना आतां जगाचा सवाल आहे; व त्याचा जबाब संस्थानिकांनीं आपण होऊन दिला तर सोन्याहून पिवळें झालें. पण कोणी तो न दिला तर चळवळीनें तो त्यांजपासून काढावयाचा असा या संस्थानी परिषदेचा मुख्य हेतु आहे.

या बाबतींत क्वचित् पुढें येणाऱ्या एकाच आक्षेपास उत्तर देऊन आजचा हा लेख पुरा करूं. कित्येक संस्थानिक आपली अशी समजूत करून घेतात कीं, आपलीं संस्थानें अल्पप्रमाण असल्यामुळें जबाबदारीच्या राज्यपद्धतीस अयोग्य आहेत. पण हा त्यांचा भ्रम आहे. दक्षिणेंतीलच काय पण सर्व हिंदुस्थानांतील सातशें संस्थानें, पांचचार सोडून दिलीं असतां, अल्पप्रमाणच ठरतील. मुंबई इलाख्यांतील साडेतीनशें संस्थानांपैकीं खालसांतील एका जिल्ह्याएवढें क्षेत्रफळ किंवा लोकसंख्या असणारीं अशीं दोनच स्वतंत्र संस्थानें दिसतात. तीं कच्छ व खैरपूर हीं होत. पण यांतील खैरपूरची लोकसंख्या दोन अडीच तालुक्यांइतकीच भरेल, व लोकसंख्येच्या मानानें कच्छचा नंबर इलाख्यांतील जवळ जवळ शेवटच्या जिल्ह्याइतका लागेल. पालनपूर एजन्सी, महीकांठा एजन्सी, रेवाकांठा एजन्सी यांचा विस्तार एकेका जिल्ह्याहून अधिक नाहीं. पण त्यांत अनेक लहानलहान संस्थानें येतात. नाहीं म्हणावयाला सर्व काठेवाड मिळून सुमारें तीनचार जिल्ह्यांचा ऐवज होऊं शकेल. पण त्यांत संस्थानिक व तालुकदार मिळून ऐशींच्या वर राजे आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. एक ब्रिटिश जिल्हा म्हटला म्हणजे त्यांत सातआठ अर्धस्वतंत्र म्युनिसिपालिट्या, दहाबारा लोकनियुक्त प्रातिनिध असणारें एक लोकलबोर्ड, व कनिष्ठ–वरिष्ठ मिळून कायदेकौन्सिलांत गेलेले तीन किंवा चार सभासद, इतकाच जबाबदारीच्या स्वराज्याचा ऐवज येतो. हेंच प्रमाण दाक्षिणी संस्थानांना लावून आपण पाहूं लागलों तर जास्तींत जास्त दोन किंवा तीन संस्थानांतून प्रातिनिधिक पद्धतीचा एखाददुसरा

प्रकार अंमलांत आणतां येईल; बाकीच्या तीनसाडेतीनशें संस्थानांत प्रातिनिधिक संस्थांना, व त्यांतूनहि जबाबदारीच्या स्वराज्याला, जागा नाहीं असा युक्तिवाद सकृद्दर्शनीं कोणी करूं शकेल. पण या प्रश्नाकडे पाहण्याची आमची दृष्टि थोडी वेगळी आहे व ती वाचकांना पटेल असें आम्हांस वाटतें. या दृष्टीनें पाहतां, प्रातिनिधिक संस्था किंवा जबाबदारीचें स्वराज्य हें अमुक एका लोकसंख्येस अमुक इतके प्रतिनिधि या प्रमाणावर बसूं शकतें, त्याचे खालीं बसूं शकत नाहीं, हें म्हणणें खरें नसून, प्रातिनिधिक तत्त्व एकदां अंगिकारिलें म्हणजे मग तें वाटेल तितक्या लहान अगर वाटेल तितक्या मोठ्या लोकसंख्येवर अमलांत आणतां येतें. ही गोष्ट खालीं दिलेल्या कोष्टकावरून लक्षांत येईल.

| देशाचें नांव | क्षेत्रफळ चौरस मैल | लोकसंख्या | प्रतिनिधींची संख्या | किती हजार लोकांस एक प्रतिनिधि | किती हजार मैलांस एक प्रतिनिधि |
|---|---|---|---|---|---|
| | ( हजार ) | (लक्ष) | | | |
| न्यू फाउन्डलंड | ४२ | २४ | २ | ९९ | १ |
| न्यूझीलंड | १,०३ | १० | ८० | १३ | १ |
| न्यू साउथ वेल्स | ३,१० | १४ | ९० | २० | ३ |
| व्हिक्टोरिया | ८७ | १४ | ६५ | २१ | १ |
| ऑन्टॅरिओ | ४,०७ | २५ | १०६ | २३ | ३ |
| क्वेबेक | ७,०६ | २० | ८३ | २४ | ८ |
| युनायटेड किंगडम | १,२१ | ४५८ | ६७० | ६५ | १ |
| मुंबई इलाखा | १,२३ | १८५ | ८६ | २,२० | १ |
| मुंबई शहर ( म्युनिसिपालिटी ) | वीस चौ. मैल | ११ | ५६ | १९ | ·०३५ |
| पुणें ( शहर ) म्युनिसिपालिटी | एक चौरस मैल | १ | २६ | २·८ | ·००४ |

" आमचें संस्थान एखाद्या तालुक्याएवढें भरेल आणि मुंबई-कायदे-कौन्सिलांत एका तालुक्यास एक चत्कोर सभासदहि पडत नाहीं; म्हणून आम्ही आपल्या संस्थानांत कायदे कौन्सिल बनाविणें अशक्य आहे; " हा युक्तिवाद भ्रामक होय. कारण एक तर एकदोन तालुक्यांएवढें लहान संस्थान असतांहि त्यांत पटेवाल्यापासून दिवाणापर्यंतच्या दर्जाचे अधिकारी तुम्ही नेमतां, व स्वतःकडे खुद्द बादशहाचा अधिकार असल्याप्रमाणें कमालीचा निग्रहानुग्रह चालवितां. त्याला जर संस्थान लहान म्हणून व्यत्यय येत नाहीं तर प्रातिनिधिक तत्त्व लावून लहानच कां होईना, पण कायदेमंडळ निर्माण करण्यास प्रत्यवाय कां यावा हें समजत नाहीं. संस्थान लहान या सबबीवर जर संकोच करणें योग्य तर संस्थानिक स्वतःच्या चैनींत, इभ्रतींत किंवा अधिकार गाजावण्यांत संकोच करितात काय ? माझें आपलें संस्थान लहान, मला कशाला म्हणतां महाराज, असें कोणी संस्थानिकानें म्हटलें आहे काय ? ब्रिटिश साम्राज्याच्या बादशहालाहि १०१ हून अधिक सलामीच्या तोफा नाहींत; मग यःकश्चित् एकदोन तालुक्यांएवढें लहान राज्य असणाऱ्या संस्थानिकांपैकीं कोणाला नऊ, कोणाला बारा, कोणाला एकवीस, अशा सलामीच्या तोफा कां हव्या ? सलामीचा मान यथाप्रमाण द्यावयाचा तर कित्येक संस्थानिकांच्या नशिबीं तोफा तर राहोच, पण लहानशी बंदूकहि येणार नाहीं, व कित्येकांची संभावना एखाद्या फुसक्या फटाक्यानेंच करावी लागेल ! संस्थानिकांना हा हिशेब मान्य असल्यास त्यांनीं सांगावें. जॉर्ज बादशहांच्या छत्रीच्या एका पाकळींत करवीरकर महाराजांच्या छत्रासारखीं शेंकडों छत्रें मावतील असें असतां, त्यांनीं बादशहांच्या बरोबरीचे दोस्त असें कां म्हणवून घ्यावें ? व बादशहांच्या छत्राशीं व्यर्थ स्पर्धा करणारें छत्रपति हें पद स्वतःला कां लावावें ? तें हवें तर प्रातिनिधिक कायदे-कौन्सिलहि महाराजांना कां नको ? अथवा खुद्द बादशहांचा खासगी तनखा ऊर्फ सिव्हिल लिस्ट जर मर्यादित तर महाराजांच्या खासगी तनख्याला तरी मर्यादा कां नसावी ?

अनुग्रहाच्या दृष्टीनें पाहतां वतनें व इनामें देतांना आपण बादशहांच्या बरोबरीचे असें वाटल्यामुळें आपल्या शिक्कामोर्तबाला बादशाही दर्जा आहे असें ते मनांत मानीत नाहींत काय ? उलट निग्रहाची बाब घेतली तर साध्या दंडापासून मनुष्यास फांशी देण्यापर्यंत सर्व अधिकार संस्थानिक हे बादशहाप्रमाणेंच चालवीत नाहींत काय ? " माझें संस्थान आपलें लहान, एकदोन तालुक्यांएवढें, तेव्हां दिवाणी न्याय देण्याचा माझा अधिकार तालुक्याच्या सेकंड क्लास मुन्सफाइतका मर्यादित असावा, त्यावरचे अधिकार इंग्रज सरकार चालवील, " असें संस्थानिकांनीं कधीं म्हटलें आहे काय ? एकाददुसऱ्या तालुक्याएवढ्या संस्थानाला ५११ कलमांचें पनिलकोड किंवा सबंध फौजदारी प्रोसीजरकोड कशाला हवें ? सेशनकोर्टांत न्यायाधीश होऊन हे छोटे संस्थानिक बसले म्हणजे कधीं विचार करतात काय कीं, खालसांतील सेशन जज्ज गुन्हेगाराला फांशीची शिक्षा सांगतांना त्याचा जीव ( म्हणजे पंचप्राण ) जाईपर्यंत फांशी देण्याचा हुकूम करितो, पण आपण पडलों छोटे संस्थानिक, आपण कशी एवढी मोठी शिक्षा द्यावी ? आपण आपली गुन्हेगाराच्या पांचांपैकीं एक प्राण जाण्याइतकीच फांशीची शिक्षा देऊं ! ही गोष्ट सामान्य निग्रहाची झाली. पण विशेष निग्रह ऊर्फ दडपशाही या बाबतींत पाहिलें तर मिऱ्याएवढ्या मिरमुटल्या संस्थानिकांची हत्तीसारख्या प्रचंड ब्रिटिश सरकारावरहि ताण ! बारा वर्षांपूर्वीच्या दडपशाहीच्या सत्रांत खालसांतील न्यायकोर्टांनीं ज्या शिक्षा दिल्या याहून अधिक कडक शिक्षा संस्थानांतच दिल्या गेल्या आहेत हें आम्ही विसरलों नाहीं. खालसा मुलुखांत १८३५ पासून १९१० चा प्रेसॲक्ट होईपर्यंत तरी मुद्रणस्वातंत्र्य भरपूर व अव्याहत होतें. १८५७ व १८७९ या दोन सालींच थोडासा प्रतिबंध झाला, पण तोहि लवकर दूर झाला. उलट म्हैसूरसारख्या सुधारलेलें म्हणणाऱ्या संस्थानांतूनहि छापखान्याला दारूच्या दुकानाप्रमाणें लायसेन्स लागतो. आणि छोटेखानी संस्थानांत तर बोलावयासच नको. तेथें मुद्रणस्वातंत्र्य हा शब्दहि लोकांना ऐकून माहीत नाहीं; सभा-

बंदीच्या कायद्याचीहि गोष्ट अशीच. ब्रिटिश मुलुखांत शेंकडों हजारों सभा होऊन बिचारें सरकार गांजलें म्हणून तें सभाबंदीच्या कायद्यास प्रवृत्त झालें असें तरी त्यांच्यातर्फे म्हणतां येईल. पण आमच्या संस्थानांतून चळवळीच्या जाहीर सभा तर राहोतच, पण अधिकाऱ्यांशीं बोलतांना तोंडाला पदर लावून अदबशीर रीतीनें बोलण्याच्या शिष्टाचारांतून लोकांनीं अद्यापि वर डोकें काढलें नाहीं तरीहि सभाबंदीचे कायदे सुरू झाले आहेत; व कित्येक संस्थानांतून नांवाला कायदा करण्याचीहि गरज न ठेवतां एकादा शिपुरडा पाठवून तोंडी हुकमानें संस्थानिक सभा मोडूं शकतात !

सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, मानमरातब व अधिकार चालविण्याच्या दृष्टीनें छोटेखानी संस्थानिक देखील जर खुशाल राजे बनतात, तर प्रजास्वातंत्र्याच्या दृष्टीनेंहि त्यांना तितक्याच मोठ्या प्रमाणानें राजे कां बनतां येऊं नये ? जुलूम किंवा दडपशाही करण्याला जर मोठ्या क्षेत्रफळाच्या किंवा मोठ्या लोकसंख्येच्या राज्याशिवाय अडत नाहीं तर कायदेकौन्सिलें, सल्लागार मंडळें, ग्रामपंचायती वगैरे नेमून प्रजेला अधिकारदान करणें व अधिकाऱ्यांना जबाबदारी शिकविणें, अशा बाबतींत तरी कां नड यावी ? मोठ्या किंवा लहान जेवढ्या क्षेत्रांत अनियंत्रित सत्ता वावरूं शकते तेवढ्याच क्षेत्रांत स्वातंत्र्यहि खुशाल वावरूं शकेल, तें अधिक क्षेत्र मागणार नाहीं. कारण त्याला आधिक क्षेत्र लागणार नाहीं. सत्ता व स्वातंत्र्य हे केवळ परस्परांचे अनुयोगी व प्रतियोगी असल्यामुळें एकाच जागेंत नांदूं शकतात. वस्तु व तिची छाया, अस्तित्व व अभाव हीं उभय जशीं एकाच मर्यादित जागेंत समाविष्ट होऊं शकतात, त्याचप्रमाणें सत्ता व स्वातंत्र्य हीं एकच जागा व्यापूं शकतात. आणि सत्ता जाऊन तिच्या जागीं स्वातंत्र्य यावयाचें तरीहि त्याला वेगळी जागा लागत नाहीं. कारण, एकांतून जें व जेवढें वजा होईल तें व तेवढेंच दुसऱ्यास मिळेल. कोणतीहि गोष्ट आज संस्थानिक जी केवळ आपल्या एकट्याच्या मनानें करितो, तीच उद्यां संस्थानांतील चार शहाणे लोक एकत्र जमून कांहीं त्यांच्या मनानें व कांहीं आपल्या मनानें करावयाची; यांत

संकट कोणतें, व याला राज्यविस्तार व उत्पन्न मोठें कशाला हवें? विलायतेंत ७५० सभासद पार्लमेंटमध्यें एकत्र बसून जितका स्वतंत्र कारभार करितात तितकाच स्वतंत्र कारभार मुंबई कायदेकौन्सिलांतील ८६ लोकनियुक्त सभासदांना दिला तरी ते करतील व एखाद्या संस्थानांत तोच अधिकार दहापांच लोकांचें मंडळ नेमून त्यांना देतां येईल. स्वातंत्र्यदानांत मुख्य अडचण आंकडे गणिताची नाहीं तर इच्छेची आहे; व संस्थानिकांच्या ठिकाणीं प्रजेला हक्क देण्याची इच्छा असेल तर ते कसे द्यावे, किती लोकांना द्यावे याची अडचण त्यांस मुळींच पडणार नाहीं. हें जाणूनच दक्षिणी संस्थानप्रजापरिषदेनें निःशंक मनानें संस्थानिकांनीं प्रातिनिधिक संस्था स्थापून जबाबदारीच्या स्वराज्याचें शिक्षण देण्याघेण्यास एकदम सुरुवात करण्याच्या शिफारशीचा ठराव मंजूर केला. व संस्थानिकांनींहि प्रसंग ओळखून या मंगलकार्यास आतां उदार मनानें प्रवृत्त व्हावें अशी त्यांना आमची सविनय विज्ञप्ति आहे.

## भोर संस्थानांतील दडपशाही.*

### कायदा मोडूनहि सभा केली.

गेल्या उन्हाळ्यांत भोर संस्थानांतील सुधागड येथें तालुकासभा भरली; त्यानंतर लगेच सर्व संस्थानाकरितां सभाबंदीचा कायदा हिज हायनेस पंतसचीव यांनीं जाहीर केला. या कायद्यापूर्वी सदर संस्थानांत एकहि जाहीर सभा झालेली नसेल, व हा कायदा अमलांत असेपर्यंत यापुढें एकहि जाहीर सभा होणें शक्य नसल्यामुळें सुधागडच्या तालुकासभेला ‘ एकमेवाद्वितीयम् ’ असा मान मिळण्याचा संभव होता. पण गेल्या गुरुवारीं खुद्द भोर गांवीं भरलेल्या जाहीर सभेनें सुधागड-सभेचा तो मान हिरावून घेतला असें

* केसरी १८ आक्टोबर १९२१.

म्हणण्यास हरकत नाहीं. एवढेंच नव्हे तर त्या सभेचे परिणाम बरेच गाजण्यासारखे होणार असल्यामुळें ती लोकांच्या स्मरणांत चांगलीच राहील अशीं लक्षणें दिसतात.

गेल्या बुधवारीं, गुरुवारीं शिरवळ व भोर गांवीं जाहीर सभा भरवाव्या असें, येथें नुकत्याच स्थापन झालेल्या दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे चिटणीस, न. चिं. केळकर व ज्ञानप्रकाशाचे संपादक वामनराव पटवर्धन यांनीं योजिलें; व त्याप्रमाणें सभांना परवानगी मागण्याचा अर्ज संस्थानी प्रजेपैकीं कांहीं गृहस्थांनीं भोरसरकाराकडे केलाहि. पहिल्या अर्जास भाषणांचीं टिपणें पाठवा असें उत्तर आलें. दुसऱ्या अर्जांत असें कळविण्यांत आलें कीं, मॉंटेग्यू–चेम्सफर्ड रिपोर्टांत नेटिव संस्थानांसंबंधानें जो एक भाग लिहिलेला आहे तोच विषय वक्ते आपल्या भाषणांत सांगतील. या अर्जाचें उत्तरच आलें नाहीं; तथापि शिरवळ व भोर लगत ब्रिटिश हद्दींत, किंवा जमल्यास खुद्द संस्थानी मुलखांत, सभा भरवाव्या असा विचार करून न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन, जागरूक पत्राचे संपादक वालचंद कोठारी, श्रीशिवाजी पत्राचे संपादक शिरोडकर, नारायणराव गुंजाळ वगैरे मंडळी शिरवळास गेली. सुदैवानें शिरवळास गांवची शीव व निरा नदी यांचे दरम्यान शेंदीडशें फूट रुंदीची ब्रिटिश मुलखाची चिंचोळी पट्टी असल्यामुळें म्हटलें तर संस्थानच्या हद्दींत म्हटलें तर बाहेर, अशा चिमटयाच्या जागेंत व्याख्यान करतां आलें; व अगदीं पाण्याच्या कांठावर खडकांत खुर्च्या टेबलें मांडून, व कित्येक श्रोते तर पाण्याच्या कांठीं बसून सभा पार पाडण्यांत आली. सभेस पांचसातशें लोक आले होते. तथापि सभा भरणें शक्य होऊं नये म्हणून संस्थानचे मामलेदार मुद्दाम शिरवळास आधीं येऊन त्यांनीं एखादें बाउंडरी कमिशन नेमल्याप्रमाणें, सभेची जागा कोणाच्या हद्दींत खरोखरी येते याची चौकशी फार वेळ खर्च करून केली व त्याकरितां दगड उलथेपालथे करून पाहिले, नकाशे तपासले; जुने म्हातारेकोतारे माहितगार आणवून चौकशी केली! तात्पर्य, सभा अशक्य व्हावी या हेतूनें शक्य तितकी खटपट झाली; पण

अखेर सभा थांबली नाहीं व शिरवळच्या लोकांना संस्थानी प्रजा या नात्यानें आपली अपमानास्पद स्थिति पूर्णपणें लक्षांत येऊन कायमच्या विषादाचें बीज त्यांच्या मनांत आपोआप रुजलें गेलें.

दुसरे दिवशीं ही सर्व मंडळी भोरास गेली. तेथील लोकांचा विचार असा होता कीं, सभेस परवानगी मिळाल्यास सभा गांवांत करावी, न मिळाल्यास दोन मैलांवर भाटघर येथें ब्रिटिश हद्दींत सभा करावी. पण बाहेरून गेलेल्या मंडळींनीं असें ठरविलें कीं, भोरला येऊन केवळ सभेकरितां उठून दोन मैल लांब ब्रिटिश हद्द धुंडाळीत जावें लागणें हें कोणासच भूषणास्पद नाहीं, म्हणून गांवांतच सभा करण्याची शक्य तितकी खटपट करावी. त्याप्रमाणें स्थानिक अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेऊन परवानगीची विनंति त्यांच्यापुढें सविनयपणें मांडण्यांत आली. परंतु येथें सभा भरवावयाची नाहीं अशा प्रकारचा आग्रह ते काहीं केल्या सोडीचनात. इकडे सभेची वेळ होऊन गेली, लोकांची गर्दी अतिशय जमली, तेव्हां केळकरांनीं अधिकाऱ्यांकडे पाहुण्या मंडळीतर्फे अखेरचा असा निरोप पाठविला कीं, वाटेल तर आजची ही सभा अशीच विसर्जन करून आम्ही परत जातों, पुढें एकादे वेळीं आठ सोडून पंधरा दिवसांची परवानगी मागतों, व जाहीरनाम्यांतील सर्व शर्ती पाळतों; पण पुढें तरी अशा सभेस परवानगी देऊं असें इमानदारीचें वचन द्या, म्हणजे तुमच्या सभाबंदीच्या जाहीरनाम्याचा योग्य मान आम्ही राखला व संस्थानांतहि सभा भरविण्याच्या आमच्या तत्त्वाला तुम्हीं मान दिला, अशा परस्पर बहुमानास्पद रीतीनें या प्रश्नाचा निकाल लागेल. परंतु संस्थानच्या अधिकाऱ्यांनीं तीहि विनंति जुमानली नाहीं. तेव्हां सभा भरलीच आहे म्हणून व्याख्यानें देऊन तीच पुरी करावी, मग काय होईल तें होईल असा पाहुणे मंडळींनीं निश्चय केला व ते सभेच्या जागीं गेले.

पुणेंकर मंडळींचा हा निश्चय पाहून अधिकाऱ्यांनींहि सभेला विरोध करण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें फौजदार येऊन त्यांनीं सभाबंदीचा हुकूम फिरून तोंडी दिला त्यावर सर्वांतर्फे केळकरांनीं कळविलें कीं, आमची

कोणतीच विनंति मान्य होत नाहीं आणि केव्हां पुढें तरी सभेला परवानगी देण्याचेंहि आश्वासन मिळत नाहीं, त्याअर्थी मनाईचा हुकूम अमान्य करणें आम्हांस भाग आहे. आम्ही पूर्वसंकेताप्रमाणें भाषणें करणार व त्याप्रमाणें केळकर, पटवर्धन, कोठारी, गुंजाळ, शेटे व जगताप वगैरे मंडळींचीं भाषणें झालीं. सभेचें काम स्वस्थपणें सुमारें दीड तास चाललें होतें. सभेला सुमारें एक हजार लोक हजर होते. दरम्यान फौजदार यांनीं जाऊन, मॅजिस्ट्रेटपुढें फिर्याद दाखल करून त्यांजकडून पिनल कोडाच्या १८८ कलमाप्रमाणें गुन्हा होतो म्हणून समन्सें आणलीं व तीं व्याख्याते मंडळीवर तेथेंच बजावलीं.

अशा रीतीनें भोर संस्थानांतील सभाबंदीच्या जाहिरनाम्याच्या बोभाट्यास व बेअब्रूस आतां तोंड लागलेलें असून संस्थानच्या प्रजेनें मनावर घेतल्यास त्यांना हा जाहीरनामा परत घेण्याला संस्थानी सरकारास भाग पाडतां येईल. पंतसचीवसाहेबांना सार्वजनिक चळवळीचें किती भय वाटतें हें प्रसिद्धच आहे. पण ज्या अन्यायामुळें, किंवा संस्थानच्या कारभारांतील ज्या अव्यवस्थेमुळें ही सार्वजनिक चळवळ उत्पन्न होते त्याचें मात्र भय पंतसचीवसाहेबांना कांहीं वाटत नाहीं! किंबहुना या गोष्टी ते उराशीं कवटाळूनच धरितात. प्रजेला शिक्षण देणें, त्यांच्या सुखसोयी करणें वगैरे बाबतींत त्यांचें बिलकूल लक्ष नसून कर पूर्णपणें वसूल कसा करावा व द्रव्यनिधि कसा जमवावा एवढेंच त्यांना चांगलें कळतें. गोऱ्या पोलिटिकल अधिकाऱ्यांना खूष कसें ठेवावें व त्यांचा शब्द कसा झेलून धरावा हेंहि ते चांगलें जाणतात. पण ईश्वरानें आपल्या पदरीं लाख दीड लाख प्रजा व माणसासारखीं माणसें दिलीं असतां त्यांचा संतोष कसा होईल, हें पाहण्याकडे मात्र त्यांची दृष्टि नाहीं. भोर संस्थानासंबंधानें ज्या तक्रारी कानावर येतात त्या कोणी सर्व लिहून काढल्या तर तो एक मोठाच ग्रंथ होईल. पण देशी संस्थानांसंबंधानें आम्हीं वर्तमानपत्रकर्त्यास स्वाभाविक अभिमान वाटतो, व ब्रिटिश मुलुखांत झालें तरी अन्याय होत नाहीं असें नाहीं ही गोष्ट लक्षांत घेऊन, संस्थानच्या कागाळया होतां होईतों आम्ही प्रसिद्ध करीत नाहीं. पण या गोष्टीचें तारतम्य

लक्षांत न घेतां गोड लागलें म्हणून मुळासकट खावें त्याप्रमाणें वागण्याची संस्थानिकांना संवय लागलेली आहे !

दडपशाहीच्या बाबतींत संस्थानिकांनीं इंग्रजसरकारचें अनुकरण इतकें अतिशयोक्तीला नेलें आहे कीं, तें पाहून हंसूं येतें. ब्रिटिश सरकारनें सभाबंदीचे वगैरे कायदे केले, पण तिकडे राजकीय चळवळहि तशीच जोरांत होती म्हणून ते केले इतकें तरी निमित्त दाखवितां येण्यासारखें आहे. पण संस्थानांतून अद्यापि सांचलेल्या पाण्याच्या डबक्याप्रमाणें पूर्ण शांतता नांदत असूनहि सभाबंदीसारखे कायदे करण्याची वेळ तेथें अजून खचित आलेली नाहीं. पुष्कळ संस्थानांतून अनेक वर्षांतून एकादीहि सभा होत नाहीं. खुद्द भोर संस्थानांत पांचपन्नास वर्षांत राजकीय विषयावर दोनतीन तरी व्याख्यानें झालीं असतील कीं नाहीं याची शंकाच आहे. फार काय, पण पंतसचिव साहेबांना असा अभिमान वाटतो कीं, वीस वर्षांपूर्वीं लो. टिळक भोरला गेले असतां विद्यार्थ्यांनीं त्यांना चार शब्द सांगण्यास विनंति केली, पण टिळकांकडे निरोप पाठवून व मनाईची विनंति करून ही साधी गोष्ट देखील होण्याचें त्यांनीं थांबविलें !

पण संस्थानिकांनींहि हें लक्षांत ठेवावें कीं, काळ आतां पालटला असून हे प्रकार यापुढें असेच अबाधित चालणार नाहींत. तारतम्यानें व सोयीनें लोकांना आपले हक्क बजावण्याला त्यांनीं परवानगी दिली तरच प्रजाहि योग्य मर्यादेंत राहून राजनिष्ठपणें आपल्या हक्कांचा उपयोग करील. पण आजपर्यंत चालत आलेला एकतंत्री अंमलाचा कडेलोट जर ते असाच चालू ठेवूं म्हणतील तर संस्थान झालें म्हणून तेथेंहि गोष्टी निकरावर आल्याशिवाय राहणार नाहींत. कोळी हालूं लागला कीं त्याबरोबर त्याच्या पोटांतून तंतू आपोआप निघूं लागतो. त्याप्रमाणें संस्थानांतहि कायद्याचें झालें आहे. संस्थानिक तोंडांतून शब्द काढतील तो कायदा व पायानें ठरवितील ती मर्यादा असा प्रकार आजवर चालला आहे. पण संस्थानांच्या चारहि बाजूंस प्रजास्वातंत्र्याच्या कल्पनेचा पूर लोटल्यावर संस्थानची

जागा तेवढी मध्येंच आम्ही कोरडी ठेवूं व या स्वातंत्र्याचा अंशहि प्रजेला लाभूं देणार नाहीं अशी घमेंड संस्थानिकांनीं बाळगणें व्यर्थ आहे, असें आम्हीं त्यांना नम्रपणें सुचवितों; व संस्थानी प्रजेलाहि आमचें हेंच सांगणें आहे कीं, ब्रिटिश प्रजेचें अनुकरण करून स्वार्थत्यागाला त्यांनीं तयारी दाखविली नाहीं तर त्यांना स्वातंत्र्य कधींहि लाभणार नाहीं. संस्थानिकांच्या जुलमांतच असेंच कुचंबत राहावें लागेल..

भोर शिरवळास झालेल्या या सभा हाणून पाडण्याची भोरच्या अधिकाऱ्यांनीं आपणांकडून पराकाष्ठा केली होती. शिरवळास नदीच्या अलीकडे सभा भरविण्याइतकी ब्रिटिश हद्दीची जागाच नाहीं असें ठरविण्याचाच मुळीं त्यांचा बेत होता. ब्रिटिश हद्दींत भाटघर येथें सभा व्हावयाची तरी देखील तेथील धरणाच्या अधिकाऱ्यांकडून मनाईचे जाहिरनामे त्यांनीं बोर्डावर डकविले होते असें म्हणतात. शिरवळास भिंतींवर लावलेले जाहिरनामे पोलिसांनीं फाडून टाकले. भोर येथें गेलेल्या पाहुणे मंडळींस नुसती उतरण्यासहि जागा मिळूं नये असा प्रयत्न करण्यांत आला होता. कोण हा उपद्व्याप ? व्याख्यानें देण्यास गेलेल्या मंडळींत तीन निरनिराळ्या राजकीय धोरणाचे गृहस्थ असतां, त्या सर्वांना हुकूम अमान्य करून ही सभा भरविलीच पाहिजे, त्याकरितां त्याचे जरूर ते परिणाम भोगावे असें वाटलें. यावरून भोरच्या अधिकाऱ्यांची सारासार विचारशून्यता किती कळसास पोंचली असावी याचें कोणीहि अनुमान करूं शकेल, कोठेंहि झालें तरी तीक्ष्ण अन्यायानेंच सहकारितावादी असहकारितेस प्रवृत्त होतात, व ब्रिटिश हद्दींत ज्यांना अद्यापि सहकारितेचा त्याग करावासा वाटूं लागला नाहीं त्यांनींहि पहिल्याच धडाक्याला भोर संस्थानांत कायदा मोडण्यास प्रवृत्त व्हावें यावरून या सहकारितावाद्यांचें सत्त्व हरण होण्याइतकी बेपर्वाई भोरच्या अधिकाऱ्यांनीं दाखविली असली पाहिजे हेंच उघड होतें. पुण्यास पूर्वीं केळकर व पटवर्धन यांनीं पंतसचीव साहेबांना भेटीस येऊं देण्याविषयीं विनंतिपत्रें लिहिलीं असतां नुसतें पत्र पावल्याचा जबाबहि त्यांनीं दिला नाहीं ! यावरून संस्थानिकमजकुरांमध्यें शिष्टाचाराचा

किती अभाव व अधिकाराची किती गुर्मी आहे हें दिसून आलेंच होतें, व तोच प्रकार पुढें भोर येथेंहि घडला. अर्थात केळकर, पटवर्धन, कोठारी प्रभृतींनीं स्वाभिमानाला योग्य असेंच वर्तन भोर येथें केलें असें कोणीहि म्हणेल.

## भोरच्या खटल्याची हकीगत

भोरला पहिली प्रजापरिषद भरली तिचा जन्म कायदेभंगांमधूनच झाला. कारण यापूर्वीं सुमारें सहा महिने पंत सरकारनीं सभाबंदीचा जाहीरनामा काढला होता. हा जाहीरनामा सर्वस्वीं जुलमाचा असल्याकारणानें भोर येथील नागरिकांचे बोलावण्यावरून न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन, कोठारी, गुंजाळ, शिरवळचे दत्तोपंत वाळिंबे व शेटे शिरोडकर, वगैरे मंडळी ता. १३ आगस्ट १९२१ रोजीं मुद्दाम भोर येथें गेली व त्यांनीं जाहीरनाम्याप्रमाणें आगाऊ परवानगी न घेतां दत्तमंदिरासमोर सभा भरवून भाषणें केलीं. सभा चालू असतांना भोर शहरचे फौजदार यांनीं कायद्याविरुद्ध सभा भरविणें गैर आहे असें बजाविलें, तरी केळकर-पटवर्धन-प्रभृति लोकांनीं तिकडे लक्ष न देतां सभेचें काम चालू ठेविलें. यामुळें वरील गृहस्थांवर फौजदारी कोर्टांत फिर्याद दाखल झाली. सर्व आरोपींनीं मिळून एकच लेखी जबाब दिला तो येणेप्रमाणें:—

### आरोपींचा जबाब

१ आम्हांस वरील कलमासंबंधानें ( इंडियन पि. कोड १८८ ) नोटिसा बजावलेल्या पावल्या आहेत.

२ ता. १३।९।२१ रोजीं मुक्काम भोर येथें आम्हीं सभेस परवानगी नसतांना सभा भरवून भाषणें केलीं ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. व ही गोष्ट आम्हांस येथील सभाबंदीचा जाहीरनामा माहीत असून व शहरचे

फौजदार यांनीं आम्हांस तोंडीं मनाई हुकूम दिला असतांहि केली, हेंहि खरें आहे. तथापि यासंबंधानें आमचें म्हणणें असें आहे कीं, सद्रहू तारखेस येथें भरणाऱ्या सभेबद्दल त्यापूर्वींच अर्ज करण्यांत आले होते, व सभेंत मॉटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्टांतील नेटिव्ह संस्थानांसंबंधाचा भाग हाच व्याख्यानाचा विषय होईल असें सदर अर्जांतच लिहिण्यांत आलेलें असल्यामुळें व मे. जोगळेकर यांस केळकरांनीं तोंडीं समक्ष सांगितलें असल्यामुळें परवानगी मिळण्यास हरकत होण्याचें बिलकूल कारण नाहीं अशी अपेक्षा होती. एवढेंच नव्हे तर संस्थानच्या जाहिरनाम्याचा मान रहावा, याकरतां सभा सुरू करण्याचें काम मुद्दाम अर्धा तास थांबवून खुद्द शहर फौजदार यांचे द्वारें हुजूरकडे असें कळविण्यांत आलें कीं, पुढें एखाद्या दिवशीं लौकरच सभेस परवानगी देण्यांत येईल, असें नक्की आश्वासन मिळाल्यास आज सभा रहीत करून निघून जाऊं व पुन्हां सभेस येऊं. शिवाय कोणत्या विषयावर बोलावें वगैरे संबंधाच्या कांहीं अटी तारतम्यानें सुचविण्यांत आल्यास त्याही मान्य करण्यास आम्ही तयार आहोंत. तात्पर्य, संस्थानाचा तर मान रहावा, व येथील प्रजेच्या व इतरांच्या जाहीर सभा भरविण्याचा हक्क प्रस्थापित व्हावा, या गोष्टी साधणारी कोणतीहि योजना आम्ही मान्य करण्यास तयार असतांना उलट जबाब, कोणत्याहि प्रकारचें नक्की आश्वासन देतां येत नाहीं असाच आला. याकरतां स्वाभिमानबुद्धीनें व प्रजाजनांच्या हक्कांच्या दृष्टीनें सभा न थांबवतां आम्हीं पुढें चालविण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें भाषणें केलीं. वर दर्शविलेल्या परिस्थितींत आमचें कृत्य गुन्ह्याचें आहे असें ठरल्यास कोर्ट देईल ती शिक्षा भोगण्यास आम्ही तयार आहोंत.''

यानंतर खटल्याचें काम रीतसर चालून सभा भरवून कायद्याचे विरुद्ध वर्तन केल्याचें आरोपींवर शाबीत होतें किंवा कसें काय या मुद्यावर मॅजिस्टेट मि. धायगुडे यांनीं निकाल सांगितला तो असा कीं, ''आरोपींचें कृत्य सभाबंदीचा कायदा मोडला या गुन्ह्याखालीं येत आहे तथापि त्यांचा हेतु हट्टानें कायदा मोडून गुन्हा करण्याचा होताच असें दिसत नाहीं. परवानगी

साठीं सभा भरविण्यापूर्वीं आपण अर्ज केला होता व सभेंतही मॉंटेग्यु-चेम्सफर्ड रिपोर्टांतील नेटिव्ह संस्थानांचा भाग याबद्दलच फक्त भाषणें व्हावयाचीं होतीं. परवानगी मिळविण्याचे बाबतींत केळकर व मॅजिस्ट्रेट जोगळेकर यांचे दरम्यान आगाऊ बोलणें झालें होतें व नक्की आश्वासन मिळाल्यास कांहीं अटी घातल्या तरी सुद्धां त्या कबूल करून सभा भरविण्याची आपली इच्छा आहे असें केळकर प्रभृतींनींच आपल्या जबाबांत म्हटलें आहे. तथापि या गोष्टी खऱ्या असल्या तरी सुद्धां त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें त्यांनीं उघड कायदा मोडून सभा व्यक्त केली हें उघड होत आहे. केळकर, कोठारी, पटवर्धन हे आरोपी युनिव्हर्सिटीचे पदवीधर असून संभावित गृहस्थ आहेत. कायदा जाणून बुजून मोडून सभा करावी असें त्यांच्या त्यावेळच्या व आतांच्या वर्तनावरून दिसत नाहीं. उद्यां होणाऱ्या भोर परिषदेकरितां त्यांनीं आगाऊ परवानगी काढली आहे त्यावरूनही हेंच दिसतें. म्हणून सर्व आरोपींना दोषमुक्त करण्यांत येत आहे. ”

## भोरची पहिली प्रजापरिषद

(२५ जानेवारी १९२२.)

भोरसंस्थान प्रजापरिषदेचे अध्यक्ष दे. भ. तात्यासाहेब केळकर व श्री. बाबुराव गोखले, सितारामपंत दामले, नारायणराव गुंजाळ, बाबुराव फुले, हरिभाऊ तुळपुळे, डॉ. नाईक, व सौ. इंदुमतीबाई नाईक, कोठारी, वामनराव पटवर्धन वगैरे पाहुणे मंडळी ता. २५।१।२२ रोजीं सकाळीं दहा-वाजतां भोरास दाखल झाली. अध्यक्षांचें व पाहुणे मंडळींचें स्वागत करण्याकरतां प्रजासभेचे कार्यकारी सभासद, भोरचे नागरिक व मावळे बंधू श्रीबलभीमाचे देवालयाजवळ जमले होते. बलभीमाचे देवालयाजवळ अध्यक्षांची मोटार थांबतांच सर्व मावळे बंधूंनीं “ शिवाजी महाराजकी जय” या प्रचंड गर्जनेंत त्यांचें स्वागत केलें. श्री. तात्यासाहेब केळकरादि सर्व

पाहुण्यांचें जमलेल्या मंडळींनीं प्रेमानें स्वागत केल्यानंतर अध्यक्ष व पाहुणे मंडळी यांची मोठ्या थाटानें मिरवणूक निघाली.

मिरणूक धर्मशाळेवरून स्वराज्याश्रमावरून सरकारवाड्याचे बाजूनें बाजार पेठेंतून दत्तमंदिराजवळ दाखल झाली. रस्त्यांत गुलाल उधळत होता, फुलांचा वर्षाव होत होता. बाजारपेठेंत पांचसहा ठिकाणीं अध्यक्षांस पानसुपारी झाली, अशा रीतीनें ती शोभादायक मिरवणूक दत्तमंदिरापाशीं आल्यावर पाहुणेमंडळीस पानसुपारी अत्तर गुलाब वगैरे व्यवस्था झाल्यावर श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं मंदिरापाशीं जमलेल्या नागरिकांस व मावळे बंधूंस दोन शब्द सांगितल्यावर सर्व मंडळी आपापल्या मुक्कामावर निघून गेली. व पाहुणेमंडळीही पुढील उद्योगास लागली.

परिषदेचा ' मंडप ' गांवांबाहेर ' कळवंतिणीचा बाग ' म्हणून आहे, तेथें घातला होता. सदर जागेंत मंडप घालणेबद्दल श्री. सचिवांकडे परवानगी मागण्यांत आली होती, पण ती देण्यांत आली नाहीं. कळवंतिणीचा बाग मंडपास सर्व दृष्टीनें सोईस्कर असल्यामुळें स्वागत मंडळानें तेथेंच मंडप घालण्याचें कायम केलें. मंडपाचें काम चालू असतां पोलिस सुपरिंटेंडंट यांनीं त्यास हरकत घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

स्वागताध्यक्ष डॉ. फाटक यांनीं आपलें स्वागतपर भाषण वाचून दाखविल्यावर विचित्रगड तालुक्यातर्फे वे. शा. शंकरशास्त्री वाळिंबे यांनीं अध्यक्षांची सूचना केली. तीस सुधागड तालुक्यातर्फे रा. लक्ष्मण केशव भावे, भोरतर्फे रा. ठकार, दीक्षित, राजगड तालुक्यातर्फे कृष्णाजीपंत कार्येकर, पौनमावळ तालुक्यातर्फे रा. जगताप व प्रचंडगड तालुक्यातर्फे रा. गोपिनाथपंत पोतनवीस या सर्वांनीं आपापल्या तालुक्यातर्फे अनुमोदन दिल्यानंतर जयजयकाराचे घोषणेमध्यें दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें; त्यांचें सुमारें दीड तासपर्यंत उत्कृष्ट भाषण झालें.

## अध्यक्षांचें भाषण

श्री. तात्यासाहेब केळकर म्हणाले:—

देशबंधु व देशभगिनीनों; आतां वेळ पुष्कळ झालेला आहे म्हणून मी लहानसेंच व कंटाळवाणें न होईल असें भाषण करणार आहे. या ठिकाणीं अनेक प्रकारची सुशिक्षित, अशिक्षित अशी मंडळी जमलेली आहेत. अशा सर्वांना समजण्यासारखें भाषण करावयाचें म्हणजे तें लहानसेंच असलें पाहिजे. मी जें काय थोडेसेंच सांगणार आहें तें आपण शांतपणें ऐका. उद्या आपणांपुढें अनेक विषय यावयाचे आहेत, व त्यांवर पुष्कळ चर्चाही होणार आहे. यासाठीं आजच सगळें बोलून टाकण्याची जरूरी नाहीं. म्हणून केवळ प्रास्ताविक म्हणून थोडेसेंच सांगणार आहें.

पांचही तालुक्यांतील लोकांनीं सूचना व अनुमोदन देऊन मला अध्यक्ष-पद दिलें त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहें. आजच्या या प्रसंगाचें महत्त्व माझ्या एकट्यामुळें नाहीं. ज्याप्रमाणें कार्यास एकादी उत्सवमूर्ति असावी लागते त्याप्रमाणें मी आहें. हा जो मला मान मिळाला आहे तो मी माझा एकट्याचा समजत नाहीं. या कामांत माझे दुसरे वांटेकरी आहेत. त्यांचा नामनिर्देश जर मी न करीन तर तो अन्याय होईल. थोडक्याच वेळापूर्वीं मी

## आरोपी होतों

व आतां दोन तासांनंतर अध्यक्ष झालों. मी आरोपी असतांना माझे-बरोबर दुसरेहि पुष्कळ आरोपी होते; पण अध्यक्ष मात्र मी एकटाच झालों आहें. ( हास्य ) पण तसें नव्हे. थोड्या वेळापूर्वीं जितके आरोपी होते तितके सर्व अध्यक्षच आहेत असें समजा. ( हंशा ) ज्यावेळीं आम्ही कोर्टांत आरोपी म्हणून खेंचलों त्यावेळीं आम्ही एकमेकांचे वांटेकरी मग आतां या अध्यक्ष-पदाच्या मानाच्या वेळींच आम्ही एकमेकांचे वांटेकरी कां होऊं नये ? पाठीवर कोरडा बसावयाचे वेळीं "हां हात आटोपा, या कामांत

माझे वांटेकरी आहेत" असें म्हणावयाचें मग मानाच्या वेळींही तसें कां म्हणूं नये ?. म्हणून म्हणतों कीं, या अध्यक्षपदाचे मानाचे वेळींही ते सर्व वाटेकरी आहेत. ( हंशा व टाळ्या ) सकाळीं ज्यावेळीं फुलांचे हार घालून घेण्यासाठीं मी मान पुढें करीत होतों त्यावेळीं मी मनांत म्हणत होतों कीं, हां हात आटोपा ! या कामांत माझे वांटेकरी आहेत. आजच्या या प्रसंगाची पूर्वपरंपरा जरा धुंडाळून पहा म्हणजे मी म्हणतों याचा अर्थ लक्षांत येईल. आज ही मोठी प्रचंड सभा भरली आहे; व तिचा मी एकटाच अध्यक्ष झालों आहें; परंतु याचें मूळ पहा म्हणजे यांत पुष्कळ अंशभूत लोक आहेत हें दिसून येईल. या खटल्यांत माझ्याबरोबर पटवर्धन, कोठारी, गुंजाळ, वाळिंबे व शेटे ही मंडळीही होती; आणि म्हणून या खटल्याचा गवगवा झाला असला तरी वरील नांवाचे नंबर वरीलप्रमाणें न लावतां शेटे, वाळिंबे, गुंजाळ, कोठारी या अनुक्रमानें लावले पाहिजेत. कारण वाळिंबे व शेटे बोलवीत नव्हते तर कोठारी येत नव्हते; व कोठारी बोलवीत नव्हते तर मी येत नव्हतों. माझ्यावर खटला झाला तरी मी तर परका, पुण्यास गेलों म्हणजे मोकळा झालों; परंतु शेटे वाळिंबे या मंडळीची तशी गोष्ट नव्हती. तीं संस्थानचीं माणसें. त्यांच्या डोक्यांवर जबाबदारी मोठी होती. म्हणून त्यांचा नामनिर्देश प्रथम केला पाहिजे. ( टाळ्या ) आणि म्हणूनच मी मानाचे वेळीं मनांत म्हणत होतों कीं, "हां हात आटोपा, या कामांत माझे वांटेकरी आहेत. ( टाळ्या ) डॉ. नाईक व सौ. इंदुमतीबाई नाईक व अष्टपुत्रे यांचाही नामनिर्देश करणें अवश्य आहे. त्यांनीं येथें येऊन व्याख्यानें दिलीं. यासाठीं तेही या कामांत माझे वांटेकरी आहेत. याच्याही पूर्वीं जाऊन मी आठवले व चांदवडकर यांचा नामनिर्देश करतों. माझ्यापेक्षां त्यांचा मान अधिक आहे. संस्थानांत चळवळी करणें अतिशय अवघड व जबाबदारीचें काम, परंतु प्रत्येकीं पांचपांचशें रुपयांचे जातमुचलके वगैरे ओझीं सोसून तेंहि काम त्यांनीं केलें यासाठीं त्यांचे अवश्य आभार मानले पाहिजेत. ( टाळ्या )

दोन तासांपूर्वी मी आरोपी होतों. व आतां अध्यक्ष झालों याबद्दल एका दृष्टीनें अधिकाऱ्यांचेही आभार मानले पाहिजेत. उगीच तुरुंगांत बसण्याचें कोणास बरें वाटेल ? या मानीव दुःखांतून त्यांनीं आमची सुटका केली त्याबद्दल त्या अर्थानें त्यांचे आभार मानले पाहिजेत. यांत एक मात्र गोष्ट आहे, ती ही कीं, अधिकाऱ्यांनीं आम्हांस सोडलें, एवढ्यावर त्यांची सत्‌प्रवृत्ति कळली असें मात्र नव्हे. जगताप वगैरे लोकांवर अजून खटले आहेत. त्यांचीही मुक्तता झाली पाहिजे. ते व मी सारखेच. त्यांना जर शिक्षा झाली तर

## मी फिरून येथें येईन

व परवानगीशिवाय भाषण करीन ( टाळ्यांचा कडकडाट ). जसें आम्हाला सोडलें तसें त्यांनाही सोडलें पाहिजे. व दुसऱ्या दोन गृहस्थांचे जामीन रद्द झाले पाहिजेत अशी माझी स्पष्ट मागणी आहे ( टाळ्या ). आतां तह झाला, समेट झाला, असें जर म्हणावयाचें व त्या बुद्धीनें जर काम करावयाचें तर त्यांचेहि जामीन रद्द होणें जरूर आहे. एरवीं तह खरा नव्हे !

हा सांप्रतचा प्रसंग म्हणजे कायदा करणारे व तो मोडणारे यांचें तुमुल युद्ध होय. अधिकारी लोकांना लोकांविषयीं आपलेपणा जर दाखवायचा असेल तर त्यांनीं झाल्या त्या चुका संपल्या, आतां नवीन संबंध सुरू झाले असें जगाला दाखवून दिलें पाहिजे. नाहीं तर इतकी जोराची चळवळ होईल कीं, संस्थानिकांना व त्यांच्या बद्सल्लागारांना नको नकोसें होऊन जाईल, ( टाळ्या ) ही मी धमकी म्हणून बोलत नाहीं. कार्यकारणभाव मी सांगत आहें. झाला एवढा प्रकार आतां पुरे झाला. यापुढें तरी चांगलें श्रेय अधिकाऱ्यांनीं संपादन करावें, नाहीं तर शांततेच्या मार्गानें संस्थानांतील पांचही तालुके इतकी जोराची चळवळ करतील कीं, अधिकाऱ्यांचा थरकांप होऊन जाईल ! हीं धमकी नव्हे. हें मी पुन्हां पुन्हां बजावून सांगतों ( टाळ्या ). एक गोष्ट अशी विचारण्यांत येते कीं, या गोष्टी आम्हांला सांगणारे तुम्ही कोण ? असा जर प्रश्न विचारला तर मी

प्रथम सरळ सांगेन कीं, मला बोलावलें म्हणून मी आलों व अध्यक्षस्थान स्वीकारलें. माझें या गोष्टींत हितानहित कांहींच नाहीं. हें एक उत्तर झालें. मी परका आहें ही गोष्ट कबूल आहे. पण मी असें विचारतों कीं, तुम्ही तुमच्या प्रजेचें काय ऐकलें आहे तर आमचें ऐकणार नाहीं म्हणतां? कोर्टालाहि फें आणि वकिलानांहि फें अशी येथील अधिकाऱ्यांची वृत्ति ( हंशा ), मी बाहेरचा म्हणून मला 'फें' व तुम्ही प्रजा म्हणून तुम्हांला 'फें' ( हशा ) मला काय संस्थानचा घातपात करावयाचा आहे, म्हणून मी आलों? आपले हक्क बजावण्याचा झगडा जगभर चाललेला आहे. व त्या दृष्टीनें आपणांसही बोलण्याची परवानगी असावी असें जर भोरच्या प्रजेस वाटलें तर त्यांत काय वावगें? संस्थानिकांविषयीं आमच्या मनांत द्वेष असण्याचें काय कारण आहे? कांहींच नाहीं. या संस्थानानें माझें कांहींच नुकसान केलेलें नाहीं. माझ्याबरोबर मित्रमंडळी दामले, गोखले वगैरे हीहि आलेली आहे. संस्थानाबद्दल आम्हांला द्वेष वाटतो म्हणून आम्ही आलों नाहीं, तर संस्थानाची जी बेअब्रू बाहेर होत आहे, ती कानावर घालण्यासाठीं आलों आहों. आम्ही पर इलाख्यांतले, येथें आम्हांस येण्याचें काय काम? पण मी असें विचारतों कीं, तुमचे महाराज पगारी मनुष्य अक्कल शिकवावयास आणतात तर फुकट सांगणारा मी काय परका झालों? ( टाळ्या ). तुमचे पगारी अॅडव्हाईसर आहेत तर मीहि प्रजाजनांचा फुकट अॅडव्हाईसर आहें, ( टाळ्या ) असें उत्तर मीही शेवटीं दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

## तूं कोण? तूं कोण?

असें व्यर्थ विचारण्यांत अर्थ नाहीं. प्रजेच्या तक्रारी योग्य आहेत का नाहींत व त्यांचीं साधनें योग्य आहेत का नाहींत हें नीट पहावें. उगीच हिणविण्यांत कांहींच अर्थ नाहीं. आम्ही येथें जे येतों ते प्रजेला सुख लागावें व तें कानांनीं ऐकावें या हेतूनें येतों. वर्तमानपत्रांवर तर तुमच्या अधिकाऱ्यांचा फार राग. कारण तीं लिहितात म्हणून! ( हंशा ) पण त्यांनीं

तरी कां लिहूं नये ? खुनाला ज्याप्रमाणें वाचा फुटते त्याप्रमाणें अन्यायाला कोठें ना कोठें तरी वाचा फुटते. तुमची प्रजाच आमच्या पत्राच्या द्वारानें बोलते त्याला आम्हीं काय करावें ? संस्थानें हीं मुळींच नको आहेत असें म्हणणारे लोक आहेत; पण मी संस्थानें हीं जरूर पाहिजे आहेत असें म्हणणाऱ्यांपैकीं आहे. हीं संस्थानें म्हणजे डोंगर, टेकड्या आहेत म्हणूनच तांबड्या रंगाचा समुद्र हिंदुस्थानभर पसरलेला दिसत नाहीं. या दृष्टीनें संस्थानें हीं अभिमानाला जागा आहे, पण तीहि अन्यायाची होते असाहि विरोधाभास होतोच. ख्रिस्ती पुराणांत नोहाची एक गोष्ट सांगितली आहे. त्यानें एक बोट बांधली व तीवर वाणगीदाखल एक एक प्राणी घेतला व तो वांचविला. त्याचप्रमाणें हीं संस्थानें आहेत. पुढें लोकशाही यावयाची आहे खरी; पण तिचा उगम मूळचा पाहिजे म्हणून हीं संस्थानें जरूर पाहिजेत.

राज्य अगर साम्राज्य हें कशाकरतां हवें असतें ? सत्तेकरतां. ही सत्ता ऐश्वर्यावरून ओळखावयाची नसते. ऐश्वर्य वेगळें व सत्ता वेगळी. पांच लाखांचा अगर नऊ लाखांचा संस्थानिक काय सभेच्या दृष्टीनें एकच होत. कांहीं संस्थानांना १८५७ सालचे घेतलेले अधिकार पुनः दिले असें सांगण्यांत येतें, तर ते अधिकार कसले ? तर नऊ तोफांचा मान अगर अकरा तोफांचा मान. अशा प्रकारचे अधिकार दिले त्यांत प्रजेचें कल्याण करण्याचा अधिकार एकहि नाहीं. फांशी देण्याचा अधिकार मिळाला म्हणतात. पण दुसऱ्याचा प्राण घेण्याचा अधिकार मिळाला हें ऐकून कोणाला आनंद होईल ? परंतु राज्य हें सत्तेकरितां पाहिजे आहे व दुसऱ्यास फांशी देण्याची सत्ता यांना मिळाली म्हणजे सत्तेची परमावधि झाली ! संस्थानें हीं आमचीं म्हणून आम्हांस त्यांच्याविषयीं अभिमान वाटतो. परंतु सत्तेचा दुरुपयोग होऊं लागला म्हणजे मात्र वेगळीच कल्पना मनांत येते. तिकडे ज्याप्रमाणें मुख्य प्रधान, लॉर्ड रीडिंग वगैरे असतात त्याप्रमाणें इकडे संस्थानांतही लॉईड जॉर्ज वगैरे होतां येतें. तिकडचे जसे लॉईड जॉर्ज, तसेच इकडचे सर्वाधि-

कारी राजा, राणी, लॉईड जॉर्ज, लॉर्ड रीडिंग, राजपुत्र वगैरे सर्व कांहीं या ठिकाणीं असतात, व तींही आमचीं माणसें असतात; मग संस्थानांचा अभिमान कां वाटूं नये? लोकमान्य टिळक पहिल्या प्रथम जे तुरुंगांत गेले ते एका संस्थानाकरतां—कोल्हापूर संस्थानाकरतांच गेले. हेंच उत्तर आम्हांला संस्थानचा अभिमान आहे याबद्दलचें आहे. संस्थानिक आम्हांला आपलेसे वाटतात. आम्ही ब्रिटिश सरकारावरही टीका करतों, ती टीका वाचा. मग आम्हांला बोल लावा. संस्थानसंबंधीं बाहेर होत असलेली बेअब्रू ऐकवत नाहीं म्हणून आम्ही टीका करतों. साहेबाला विचारलें तर साहेब हिणवितो कीं, स्वराज्य पाहिजे काय! जा कोल्हापुरला! जा भोरला! अशा प्रकारें त्यांनीं हिणविलें म्हणजे काळजाला घरें पडतात!

संस्थान कस असलें पाहिजे या विषयींची माझी कल्पना फार उज्वल आहे; परंतु त्या बाबतींत संस्थानिकांनीं थोडीशी मदत केली पाहिजे. त्यांनीं थोडा स्वार्थत्याग करून सत्तेस आळा घातला पाहिजे. असें झालें तर खरें स्वराज्य संस्थानांतून रंगलेलें दिसेल. भोर संस्थानांत काय नाहीं याचा पाढा मी वाचीत नाहीं, परंतु माझ्या कल्पनेप्रमाणें जर संस्थान असतें तर काय काय दिसलें असतें तें सांगतों. वयोवृद्ध संस्थानिक पण ते कसे रघुवंशांतल्या राजाप्रमाणें! त्यांच्या वयास शोभण्यासारखी धर्मबुद्धि त्यांच्या ठायीं वास करते ही समाधानाची गोष्ट आहे. त्याबद्दल वाद नाहीं; पण रघुवंशांत जसें राजाचें वर्तन दिलेलें आहे तसा राजा असला पाहिजे. वृद्धपणीं आपल्या हातानें आपल्या मुलाला गादीवर बसविण्याचें वय झालें, वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याची वेळ आली, अशा वेळीं आपण सिंहासनावरून उतरावयाचें व राजकुमाराला सिंहासनावर बसवून आपण सिंहासनाला नमन करावयाचें! केवढी ही सत्यवृत्ति? जगाला या वृत्तीनें केवढा तरी आनंद होईल! परमेश्वरानें महाराजांचे स्वाधीन १॥ लक्ष प्रजा केली आहे हें केवढें भाग्य आहे; पूर्वपुण्याईचा जोर असल्याशिवाय असें भाग्य लाभत नसतें. इतक्या प्रजेचें कल्याण करण्याची संधि परमेश्वरानें दिली असतां प्रजेस केवळ स्वराज्याचें स्वराज्य, स्वतःचा न्याय स्वतः करणें इत्यादि हक्कही देण्यांत

येऊं नयेत ही दुःखाची गोष्ट आहे. ज्या गोष्टी ब्रिटिश मुलुखांत झाल्या नाहींत त्या संस्थानांत करून त्यांनीं ब्रिटिशसरकाराला धडा घालून दिला पाहिजे. काय, सामान्य व्यवहार जाणण्याची अक्कल लोकांना नाहीं काय? धनी तुम्ही आहांतच. परंतु प्रजाजनांपैकींच चांगले शहाणे लोक नेमून त्यांच्याकडे न्याय पंचायतीची गोष्ट सोंपविली तर त्यांत काय वावगें? खूप पैसा जमविला आहे पण त्याचा काय उपयोग? परंतु तो पैसा मी कसा खर्च करूं हें लोकांना विचारलें पाहिजे. लोकांना विचारून त्या पैशाचा जर खर्च केला तर ५० वर्षांचे शिव्याशाप एका योजनेंत नाहींसे होतील. पण तशी बुद्धि असली पाहिजे! नाहीं तर काय उपयोग?

या संस्थानिकांचे घराण्यासंबंधीं तर आमची फार पूज्यबुद्धि आहे. ज्या घराण्यांतलि पुरुषांना शिवाजीमहाराजांचे हातांत हात घालावयास सांपडला त्या संस्थानाकडे पाहिलें म्हणजे स्मरणशक्ति मागें जाते व श्री शिवरायांची आठवण होते. अशा प्रकारच्या राजवंशावळींची आठवण आम्हाला होते. संस्थानिकही मनांत आणतील तर एक मुंबईचा हेलपाटा कमी करून त्या खर्चांत आपल्या घराण्याचा कुळवृत्तांत सर्वांना तयार करून दाखवितां येईल. हीं संस्थानेंच स्वराज्याचे आधारस्तंभ असल्यामुळेंच आम्हांला संस्थानांचा आभिमान वाटतो. परंतु संस्थानी लोक निंदा करतात ती ऐकवत नाहीं! परमेश्वरानें संस्थानिकांना सुबुद्धि देऊन ही निंदा नाहींशी व्हावी हींच आमची इच्छा. महाराजांनीं प्रजेला पुष्कळ प्रकारचीं दानें दिलीं असतील; परंतु फक्त एकच दान द्यावें आणि तें म्हणजे अधिकारदान. प्रजेला अधिकार देणें याखेरीज स्वर्गांत मुक्ति मिळण्याचें दुसरें साधन नाहीं.(टाळ्या)

## संस्थानी रिपोर्टांचा मासला

(यानंतर तात्यासाहेबांनीं भोर संस्थानचा ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट काय मासल्याचा असतो तें रिपोर्टांतील कांहीं वाक्यें वाचून दाखवून सांगितलें, तीं वाक्यें सांगत असतांना व ॲडमिनिस्ट्रेशन म्हणजे राज्यकारभाराविषयीं त्या रिपोर्टांतील ती चमत्कारिक माहिती ऐकून सभेंत हंशाच हंशा पिकला.)

अध्यक्ष तात्यासाहेब म्हणाले:—हा रिपोर्ट पाहून मला अत्यंत वाईट वाटतें. कसा रिपोर्ट लिहावा हें देखील संस्थानिकांच्या बद्-सल्लागारांना सांगतां येऊं नये ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे. या रिपोर्टांत काय कळविलें आहे तर मला " तोफांची सलामी आहे, अमुक आहे तमुक आहे " हें ! हें काय सरकारला माहीत नाहीं ? हा रिपोर्ट वाचीत असतांना कलेक्टरांस किती हसूं येत असेल व त्यांचें तोंड कसें होत असेल याची कल्पना करा. पण महाराजांचें हें असें हसें त्यांचे बद्सल्लागार करतात ! ( शेम शेम ) रिपोर्टांत पुढें काय म्हणतात तर मला हिज हायनेस म्हणतात, माझें सबंध नांव शंकराजी चिमणाजी पंडित सचीव चीफ ऑफ भोर असें आहे.! (हंशा) पहा तुमचें सरकार आपल्या हातांनीं आपलें नांव काय तें कळवितात. पुढें काय म्हणतात, माझें वय ६७ वर्षांचें आहे. ऐका हा रिपोर्ट ! मी देशस्थ जातीचा ब्राह्मण आहे ! मला एक मुलगा व दोन नातू आहेत, मीं विंचुरकरांशीं आप्तसंबंध जोडलेला आहे ! ( हंशाच हंशा ).

## हा रिपोर्ट कीं आरोपीची जबानी ?

हें मी रिपोर्ट लिहिणाऱ्या बद्सल्लागारांना विचारतों ( धिःकार ! धिःकार ) हा महाराजांचा अपमान आहे ! त्यांची ही चेष्टा आहे ! हा रिपोर्ट नव्हे ! मी सभ्यां मावळ्यांना हा प्रश्न विचारतों कीं तुमच्या महाराजांनीं असा अपमानास्पद रिपोर्ट कळवावा काय ? ( शेम ! शेम ! ) रिपोर्टांतील दुसरी बाब पहा ! मी मुंबईस गेलों त्यावेळीं झालेल्या पार्टीस हजर राहिलों, मोठी धन्यता वाटली. काश्मिरास गेलों होतों तेथील देखावे फारच सुंदर आहेत, असें दिसलें. पण यांत तुमचें काय लिहिलेंत ? हा ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट कां काश्मीरचें वर्णन ? परंतु हा दोष सर्व बदसल्लागारांचा आहे. हे असले अपमानकारक रिपोर्ट अतःपर करूं नयेत अशी माझी सर्वांना आग्रहाची मागणी आहे. ( टाळ्या ) प्रजेकडे पाय व ब्रिटिश सरकाराला वंदन अशा प्रकारचें येथील अधिकाऱ्यांचें वर्तन आहे. रिपोर्टांतील शेवटचें वाक्य काय आहे हें पहा ! हा रिपोर्ट आम्हाला

पोचला असें कळविल्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहें. मामुली नुसते थँक्स पाठविले तर त्याबद्दल मोठे ऋणी झाले काय? पुढें मि. पुलेसाहेबांचे आभार, एवढा पांचसहा लाखांचा धनी लोकांना फांशी देण्याचा अधिकार? "तोफांची सलामी! हिज् हायनेस ही पदवी", हे एवढे अधिकार, परतु एवढे मोठे महाराज एका साधारण डिस्ट्रिक्ट इंजीनिअरचे आभार ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टांत मानतात. अष्टप्रधानांतील प्रधान पत साहेब कोणीकडे? एका यःकिंचित् इंजीनिआरचे हे एवढे आभार? याला काय रिपोर्ट म्हणावयाचा? (धिःकार) या रिपोर्टांत तुमच्या सुखसोई काय याचा उल्लेख नाहीं. फक्त रोजनिशी, काश्मीर वर्णन, सुनेच्या बाळंपणाची हकीकत व पुले साहेबांचे आभार! पुढील सालीं तरी असला रिपोर्ट पाठवूं नका अशी मागणी मी अभिमानबुद्धीनें करीत आहे (टाळ्या). जर हा रिपोर्ट असा पुढील सालीं पाठवाल तर त्या रिपोर्टाच्या प्रति छापून त्या पायांखालीं तुडवून टाकूं असें स्पष्टपणें सांगणें भाग आहें. (टाळ्या). मी हें अपमान करण्याच्या बुद्धीनें बोलत नाहीं. केवळ अभिमानबुद्धीनें बोलत आहे. रिपोर्टाचें हें हिडिस स्वरूप बदललें पाहिजे. तुमचे महाराज आपल्याला गोठ्यांतल्या गुरांप्रमाणें मानतात हें या रिपोर्टांत सिद्ध होतें. तुम्ही दीन, तुमचे महाराज दीन! जणू काय आंधळ्याची माळच म्हणावयाची! माफ करा. मी म्हणतों त्याचा राग मानूं नका. आम्ही कांहीं संस्थानचे द्वेष्टे नाहीं. आम्ही संस्थानचे अभिमानी आहोंत हेंच मला तुम्हांला सांगावयाचें होतें. एकदां खोड लागली म्हणजे ती जात नाहीं म्हणतात; परंतु इतकी चळवळ करूनहि ती खोड गेली नाहीं तर नाइलाज आहे. सूर्य उगवला व आपण जर खिडक्यांचीं दारें लावून घेऊन बसलों तर सूर्यप्रकाशाचा उजेड कसा मिळावा? तुमच्या महाराजांना परमेश्वरानें ऐश्वर्य दिलें आहे, बुद्धि दिली आहे. त्यांच्यामध्यें टापटीप, कदर, वेळच्यावेळीं काम करणें वगैरे चांगले गुण आहेत; परंतु त्यांच्यांत उदार बुद्धि आहे कीं नाहीं याबद्दल शंका वाटते. म्हणून माझें शेवटचें सांगणें आहे कीं, मी त्यांच्यापुढें केवळ मुलाप्रमाणें शोभेन; मला

राज्यकारभार कसा करतात तें माहीत नाहीं; परंतु एवढें मात्र सांगतों कीं, अधिकारदानाची बुद्धि जर त्यांच्यांत आली नाहीं तर मग प्रजेला दुसरें दालन उघडावें लागेल; व तें आपल्या हातानें जोर करून उघडावें लागेल, हाच शेवटचा मार्ग होय! यःकिंचित् सभा भरवावयाची त्याकरतां केवढा बहुयाबोळ! सभा भरवावयाची म्हणजे काय फंद फितुरी करावयाची आहे? कीं बंड करावयाचें आहे? तशांतला कांहींच प्रकार नसतां एक साधी सभा भरवावयाला जर हुकूम, चिठ्या, तर मग स्वराज्याचे हक्क ते कसे काय देणार? या गोष्टी तुम्हां प्रजाजनांच्या हातच्या आहेत. तुम्ही कर देतां त्याचा खर्च कसा करावयाचा हें सांगण्याचा हक्क कर देणारांचा आहे. राजाला जसे अधिकार आहेत तसे ते प्रजेलाही आहेत. तुम्ही मागतां तो सभा भरविण्याचा क्षुल्लक हक्कहि जर तुम्हांला देण्यांत आला नाहीं तर कांहीं वेळ पहा व नंतर खुशाल सभा भरवा. देवाच्या घरीं त्यांत कांहीं पाप होणार नाहीं.

शेवटीं सांगावयाचें कीं, ब्रिटिश राज्याची तुम्ही उगीच निंदा करूं नका. त्यांची तिकडे भरपूर निंदा होत आहे. त्या बाबतींत तुम्हां संस्थानी लोकांची आम्हांला मदत नको आहे. तुमचें तुम्ही संभाळा म्हणजे झालें! राजवंशांतील व्यक्तीविषयीं अपशब्द बोलूं नका. व्यक्तीविषयीं अपशब्द बोलून कधींच कल्याण होत नाहीं. टीका कराल ती न्यायाची टीका करा. आपल्या सुखसोयीची, पैशाच्या हिशेबाची वगैरे मागणी मागण्यास भिऊं नका! परमेश्वर तुम्हांला यश देईल, इतकें सांगून मी आपलें भाषण संपवितों". (टाळयांचा कडकडाट).

पहिल्या दिवसाचें काम रात्रीं ८॥ वाजतां संपलें.

## परिषदेचा समारोप

दुसऱ्या दिवशीं सभेचें काम झाल्यानंतर शेवटचें जें 'समारोपाचें काम तें करण्यासाठीं परिषदेचे अध्यक्ष तात्यासाहेब केळकर उभे राहिले. त्यांच्या

गळ्यात हार घालण्यांत आल्यानंतर ते म्हणाले, "प्रथम मी आभार मानण्याचें काम करतों. ही जागा सभेला दिली त्याबद्दल सचिवांचे आभार मानले पाहिजेत. या सभेची फलश्रुति काय ? हा राजकीय चळवळीचा पाढा वाचला याची फलश्रुति काय ? याची तावडतोब जर कोणती फलश्रुति झाली असेल तर प्रजेला वाचा फुटली हीच होय ! यामुळें आज निमे काम झालें आहे, व निमें काम व्हावयाचें आहे, तें फार महत्त्वाचें आहे. पुष्कळ दिवस बिनवारशी झालेलें घर प्रथम झाडून साफ करतों त्याप्रमाणें आज भोरची स्थिति झाली आहे. परागंदा झालेल्याचें घर प्रथम कसें दिसतें ? उंदीरघुशींनीं उकरलें आहे, जमिनी खराब झाल्या आहेत, कोळिष्टिकें माजलेलीं आहेत, ढोंगळे, मुंग्या वावरत आहेत. अशा वेळीं घर उघडल्याबरोबर आपण केरसुणी हातांत घेतों व घर साफ करतों. त्याप्रमाणें आज हीं भाषणें होऊन मी असें म्हणतों कीं, हीं केरसुणी घेऊन कोळि-ष्टकें झाडलीं आहेत ! भीतीचीं, शंकेचीं, संशयाचीं वगैरे सर्व कोळिष्टकें झाडून टाकलीं आहेत. घर उघडल्यावर जर बायको सुग्रण असेल तर चुलीची व्यवस्था करते, पुरुष पाणी लांब असेल तर आणण्यास जातो. गडी लाकडांची व्यवस्था करतो त्याप्रमाणें शिष्टमंडळ तयार केलें, ठराव केले यावर निष्ठा ठेवा. या ठिकाणीं अपमानास्पद टीका कोणत्याहि व्यक्ती-विषयीं झाली नाहीं. खाजगी द्वेष कोणी कोणाचाहि केला नाहीं. ठराव मांड-तांना जर टीका केली असेल तर ती व्यक्तिद्वेष म्हणून व्यक्तीची केली नाहीं. सभेची किंमत व्यक्तीपेक्षांहीं जास्त आहे, यत्किंचित् माणसाची ठरावरूपानें निंदा करावयाची यांत काय पुरुषार्थ आहे ? एकच गोष्ट आपण निर्भिड-पणें केली ती कोणती तर राजकारणावर केलेली टीका होय ! कायदेमंड-ळाचा ठराव हें कायम शिष्टमंडळ होणार आहे. कायदेकौन्सिलें म्हणजे कांहीं मोठें घर, मोठे लोक, भपकेबाज ड्रेस हे नसून लोकांच्या प्रतिनि-धींनीं बसून कायद्याची चर्चा करण्याचें जें ठिकाण तें कायदे कौन्सिल होय. फांशीच्या शिक्षेचा अधिकार दोघांना आहे. तर मग लॉर्ड रीडिंग जें करीत

आहे तेंच भोर सरकार आपल्या खोलींत बसून करणार. प्रजेच्या प्रतिनिधींनीं कायद्याची चर्चा करावयाची यांत संस्थान लहान आहे ही सबब काय कामाची ? ज्यांनीं कर द्यावयाचे त्यांच्याच प्रतिनिधींनीं कायदे केले पाहिजेत आणि त्या कायद्यांची चर्चा केली पाहिजे. आतां वर्णन केलेल्या जुलमी बाबी फारच चमत्कारिक आहेत. जुन्या पुराण्या म्हणून कांहीं बाबी चालत आल्या आहेत. जंगलांत चरणाऱ्या म्हशीवर म्हैस-कर बसविला आहे तो तसाच चालू आहे. लग्नाचा करही चीड आणणारा आहे. हाच कर पहिल्यांदां देऊं नका म्हणण्यांत कांहीं चीड आणणारे कर आहेत तर कांहीं पूर्वपरंपरा म्हणून चालत आलेले आहेत. दोघांच्या समेटाचें अजून 'राऊंड टेबल' भरावयाचें आहे. सरकारच्या बाजूचा जबाबदार मनुष्य आणि प्रतिनिधी यांची चर्चा झाली पाहिजे. प्रजेला वाचा फुटली आहे; आतां राजाला वाचा फुटली पाहिजे. सचिवांनीं या गाऱ्हाण्यांचा निकाल लावण्यासाठीं एक मनुष्य नेमावा. प्रजा तयार झाली आहे, राजांनीं तयार झालें पाहिजे. एका बाजूनें विनंत्या अर्ज चालू आहेत. बारा बाबी बंद केल्याशिवाय आम्ही शेतसारा देणार नाहीं याबद्दल जें अभिनंदन केलें तें ठीकच झालें. सर्वांनींच असा ठराव करावयास पाहिजे होता. पण तसा तो केला नाहीं. यांत विवेकबुद्धि आहे. पण त्या विवेकबुद्धीवरून तरी येथील नोकरशाहीनें शहाणें व्हावें. सचिवांना एकच माझें सांगणें आहे. सचिवांच्या भोरांत सभा भरली.

## 'आतां भोर पेटलें'

असें म्हटलें आहे हें मात्र माझ्या मनांतून व्हावयास नको आहे. जर सचीव मागण्या देणार नाहींत तर मात्र भोर पेटेल यांत मुळींच शंका नाहीं. अपरिहार्य असें मानणारा जो मनुष्य त्याच्या तोंडून आग पेटेल असे शब्द न निघतील तर काय होईल ?

जर राजाला प्रामाणिकपणें असें वाटत असेल तर त्यांनीं लहान लहान देणग्या देण्यास आतांपासून सुरवात करावी ! एका कुटुंबांत एक

बाई कर्ती होती! त्या घरावर दरोडा आला! नवऱ्याचा खून होणार हें पाहून त्या बाईनें आपल्या गळयांतील कंठा तोडून त्यांतील मोतीं तीं दरोडेखोरांच्या अंगावर फेकूं लागली. व अशा रीतीनें त्या बाईनें नवऱ्याचा खून वांचविला. [ ही बाई सचिवांच्याच वंशांतली आहे असें म्हणतात. ] हे चळवळे लोक मी एक प्रकारें दरोडेखोर समजतों. ते जर राज्यावर आले तर त्यांनीं त्या बाईप्रमाणें थोडथोडया देणग्या त्यांच्या अंगावर टाकण्यास सुरवात करावी. चळवळीला आतां सुरवात झाली आहे. आतांच भिण्याचें कांहीं कारण नाहीं. प्रजेची मागणी हीच आहे कीं, आमचे हक्क आम्हांला मिळावेत. तेव्हां सचिवांनीं थोडथोडया देणग्या देण्यास सुरवात करावी. एकनिष्ठेनें कार्य करा! येवढेंच माझें तुम्हांस सांगणें आहे. कार्य करतांनासुद्धां निष्ठा ठेवून जें कार्य होईल तें कशानेंहि होणार नाहीं. स्वावलंबन शिका! महात्माजींनीं आत्मशुद्धी करण्यास सांगितलें आहे. त्याचें कारण तरी हेंच आहे; तेव्हां स्वावलंबी व्हा. आत्मशुद्धी करा! दारू बंद करा! गोरक्षण करा! शेवटीं एकच गोष्ट सांगतों कीं स्वावलंबनावर एकनिष्ठा ठेवा म्हणजे तो पाठीराखा परमेश्वर तुम्हाला कार्यसिद्धि करून देईल, इतकें बोलून मी आपली रजा घेतों."

## भोर येथील मावळ्यांचे हृदयोद्गार

भोर संस्थान प्रजापरिषदेच्या दुसऱ्या दिवसाच्या दुपारच्या बैठकींत आप-आपलीं गाऱ्हाणीं मांडतांना अनेक मावळ्यांनीं भाषणें केलीं. त्या गरीब व भावडया मावळ्यांच्या तोंडून त्यांची हृदयद्रावक हकीकत ऐकत असतांना ऐकणारांचीं अंतःकरणें भरून येत होतीं. मावळे आपल्या साध्या व वेडगळ भाषेंत बोलत होते; तेथें वक्तृत्व नव्हतें; काव्य नव्हतें, काव्यालंकार नव्हते, कांहीं नव्हतें; पण मूर्तिमंत सत्यदेवता जर कोठें मूर्त स्वरूपानें दिसली

असेल तर ती मावळ्यांच्या हृदयांतच होय. हृदयांत जें सांठलें होतें तेंच त्यांच्या मुखानें बाहेर पडलें; आपल्या अडचणींची दाद लावून घेण्यासाठीं ही सभा भरलेली आहे हें समजल्यामुळें प्रत्येक मावळा फारच मोकळ्या मनानें आपल्या नेहमींच्या भाषेंत बोलत होता. त्यांच्या भाषेंतील खेडवळ शब्दयोजना व साधी वाक्यरचना ऐकून पुष्कळ वेळां हंशा पिके; पण त्यांचे मागोमाग आपल्या बोबड्या भाषेंत त्यांनीं सांगितलेलीं त्यांचीं दुःखें मूर्तिमंत डोळ्यासमोर उभीं रहात. व हास्याचे ठिकाणीं दुःख, राग, कींव, चीड इत्यादि भावनांचें काहूर माजे.

एक म्हातारा मावळा नमस्कार करून म्हणाला, "तुमी आई–बाप बसलात. आम्हीं तुम्हांला भितोय. खालीं तलाव व वर जंगल अशा कात्रींत आमी घावलोय. शेतं करावींत तर जंगलांतील जनावर नास करत्यात ! दरसाल वाघ गूर मारून नेत्यात ! योक आंबा तोडला तर त्याबद्दल फिराद होते. मामलेदारानं त्याबद्दल १०० खावत व माझा आंबा असला तरी तो जावा ! आम्हीं आक्शी मातीला मिळालो बगा ! येक म्हस ध्यायची तर सरकारला १। रुपया द्यायचा ! अमलदाराला शेरभर लोणी द्यायचं ! न दिलं तर पोलिस म्हणतो अर तुझ्या– × × × तर असा तरास झालाय बगा ! येवढा तरास दूर झाला पाहिजे बगा " !

दुसरा मावळा ( नमन करून ); "आमी म्हशींच्या पटीचा आकार देतों; पन आमाला गायरान न्याहीं ! अजीबात रान नाहीं ! अक्शी म्येलों ! म्हशींची पटी सोडा व आमाला गायरान द्या" !

कंक घराण्यांतील घोंड गोविंद अंबिके नांवाच्या मावळयानें फारच उत्कृष्ट भाषण केलें; तो म्हणाला, "आमी शिवाजी म्हाराजांचे कंक मालुसरे आहोंत. छत्रपति शिवाजी महाराजांचे वेळीं आमी शौर्याचीं कामें केलीं, त्याबद्दल त्यांनीं आमाला तैनाति दिल्या, दुमाले दिलें. कंक मालुसरे लोकांनीं सचीव गादीचा भार कामगिरी बजावलेली आहे. चवथ्या नानासाहेबांच्या वेळीं व

---

लोकसग्रह २९ जानेवारी १९२२

निंबाळकराचे बंडांत सचीव गादीला आम्हीं मदत केली. महाराचे बंडाळीचे वेळीं आम्ही त्याला मारून साचिवांस भोरास परत आणलें. माय देशाच्या हद्दी आम्ही त्यांना सामिल करून दिल्या. आम्ही शेवटपर्यंत प्रामाणिकपणा सोडला नाहीं! सरकारची मदत आणून आमच्या जमिनींची प्रतबंदी व अर्धी जमीन फॉरेस्ट केलें! यांत हिरड्यांचीं झाडें आहेत. त्यांची पटी आम्हीं भरावी व त्यावर ताबा मात्र सरकारचा! फॉरेस्ट ठेवलें त्याचा कांहीं उपयोग नाहीं! वाघ वगैरे जनावरें दरसाल १००।२०० गुरूं नेतात! आम्ही मावळे लोक राजनिष्ठ आहों पण आमची अन्नान्न दशा झाली आहे! दिवसा झोप नाहीं! रात्रीं आहे नाहीं असा प्रकार झाला आहे. कोर्टांत जावें तर आठ आण्यांचा स्टाप भरण्यासही सोय नाहीं! गांवांत जमा होते तर त्याची १ आणा पटी वसूल करण्यास ८।८ दिवस लागतात! आमच्याजवळ शिवाजी महाराजांच्या वेळचीं ताडपत्रें आहेत पण पैसा नाहीं, तंटे खेळावयास ज्ञान नाहीं; आपण जमलां आहां ह्याचा विचार झाला पाहिजे."

जानराव खंडेराव नांवाचा मावळा म्हणाला, "माझं नांव जानराव खंडेराव देशमूख आणि घरीं काय तर ढेकूण व पिसा! नुसत्या नांवाला काय करायचं? आमच्या ३२ गांवांत पीक झालं नाहीं. तर सरकारनं यंदां आमच्या गांवांसाठीं गल्ला दिला पाहिजे अशी आमची मागणी आहे."

प्रचंडगड व राजगड तालुक्यांत जमीन असलेले कृष्णाजी शेषाचार्य ऐनापुरे नांवाचे इसमांनीं तिकडील शेतांमधून टंटणी नांवाच्या एका झाडाचा उपद्रव कसा होतो व त्यामुळें इतर पिकांची कशी नासाडी होते त्याबद्दल हकीकत सांगितली. या टंटणीला पीक अतिशय असतें. एकदा ती रानांत माजली म्हणजे तिच्या मोठ्या जाळ्याच्या जाळ्या तयार होतात व इतर पिकांस ही 'टंटणी' पार मारून टाकते. दुसरे या 'टंटणी'च्या जाळ्यांतून जनावरांना रहावयास जागा होत असल्यामुळें अश्विनापासून माघ अखेरपर्यंत खडापहारा करून पिकाचें रक्षण करावें लागतें! जरा कानाडोळा झाला कीं, झालेंच सगळ्या पिकाचें 'लांबोळें'!

## चमत्कारिक कर !

संस्थानांत जे चमत्कारिक कर आहेत त्यांचीं नांवें रा. शेटे यानीं सांगितलीं; ते कर असेः—म्हैस पट्टी; म्हैस पाळली तर तिच्यासाठीं दरसाल भरावी लागणारी १। रु. पट्टी; लग्न टक्का–लग्नासाठीं भरावा लागणारा कर; पाटदाम–पाट, म्होतूर लावावयाचा झाल्यास भरावा लागणारा कर. कुंडा पट्टी म्हणजे तपकिरीवरील कर ! घाणेवर पेंढविरील कर शिवाय शेंदूर गंधक व बंधरी माल सुकी मासळी यावरील, कर असून कांहीं ठिकाणीं 'बाळाचा खाऊं' नजराणा, दसऱ्याच्या वेळचा देकार वगैरे कर आहेत ! अशा प्रकारचे एकंदर बारा कर आहेत. या करांची यादी सांगत असतांना ( एक मावळा ओरडला 'या बारा बाबी सुटल्याशिवाय आम्ही जमिनीचा कर भरणार नाहीं' त्याबरोबर मावळ्यांनीं 'बरोबर आहे. बरोबर आहे' अशी घोषणा केली. ) दुसरा एक मावळा जाग्यावरच उभा राहून म्हणाला 'बायको आम्हीं करावी; व आम्हांला पोर झालीं तर सरकारनें लग्नाचा कर घ्यावा काय ?' ( शेम ! शेम ) तर या बाबीचा नीट विचार झाल्याशिवाय कर देणार नाहीं !

तिसरा एक म्हातारा मावळा ह्मणाला, "केळकर बाबा ! आपण मायबाप आहांत ! वर जंगल व खालीं धरण अशीं दोन दुःखें आम्हांला आहेत ! या दुःखाचा निर्वाह झाला पाहिजे. या मावळ्यानें शेवटीं सर्वांस उद्देशून एक मौजेची गोष्ट सांगितली. तो म्हणाला, तुफान दर्यामध्यें हिंदु व मुसलमान जहाज हाकीत होते. दर्या खवळला व जहाज चकरा मारूं लागलें ! तवा मुसलमान व्हता त्यानें 'अल्ला' 'अल्ला' म्हणून धांवा केला ! हिंदी व्हता त्यानं ये जनाई, ये जोखाई ये म्हसूबा ये रामचंद्र असा धांवा केला. मुसलमानांचा येकच 'अल्ला' धांवून आला व मुसलमान वाचला आणि समद्यांना हांका मारणारा हिंदु मेला ! तर बापहो ! अशा सर्वांचा येक 'अल्ला' झाला पाहिजे ! सर्वांनीं 'एकी' केली पाहिजे हाच या मावळ्याच्या सांगण्याचा हेतू होता हें सांगणें नकोच ! मावळ्यानें सांगितलेली ही गोष्ट अध्यक्ष

श्री. तात्यासाहेब यांनीं आपल्या समारोपाचे भाषणांत समग्र सांगितली व मावळ्याचा हेतु सर्वांस समजावून सांगितला.

यानंतर एका गडकरी नोकरानें आपलें गाऱ्हाणें सांगितलें व नांवें दाखल करण्याकरतां भराव्या लागणाऱ्या नजराण्याची हकीकत सांगितली. रा. शेटे यांनीं १५ दिवसांत सर्व बाबींचा योग्य विचार न झाल्यास जमीन बाबीचा करहि न देण्याचा मावळ्यांचा निश्चय झाला असल्याचें सांगितलें व त्यास सर्व मावळ्यांनीं 'होय ही गोष्ट खरी आहे' असें उत्तर दिलें.

## दुसरी भोर प्रजापरिषद*

—"गतवर्षाच्या अधिवेशनाचे प्रसंगीं मी अध्यक्ष होतों, व याही प्रसंगीं मीच अध्यक्ष आहें. हा अनौचित्याचा दोष घडत असला तरी तो पत्करून मी आजचें स्थान स्वीकारीत आहें. भाटघर धरणाचा प्रश्न समाधानानें निकालांत निघाला, असें रा. शेटे व पोतनीस यांनीं मला सांगितलें व तें ऐकून मला आनंद झाला. दोन आनंदित मनांचें काम समरस होणें हें आहे, व तो आनंद येथें व्यक्त करण्याकरितांच मीं हें स्थान स्वीकारिलें आहे. गतवर्षींची परिस्थिति व आजची परिस्थिति यांत फार अंतर पडलेलें आहे. गतवर्षींच्या माझ्या भाषणांत निंदेशिवाय दुसरा शब्द नव्हता. निराशामय, कठोर, तुटक व निंदात्मक असें माझें गतवर्षींचें भाषण आहे. मागील कारकीर्दच असती, व आणखी दहा वर्षें आम्ही ओरडत राहिलों असतों तरी कांहींही कार्य झालें नसतें, अशी माझी खात्री आहे; परंतु श्रीमंत बाबासाहेबांच्या स्वभावाच्या अनुभवावरून त्यांचें मन सुविचारी आहे असा माझा विश्वास आहे. थोडा अवधि व योग्य सल्ला दिला तर यांतून मार्ग काढतील

* लोकसंग्रह—९ जून १९२३.

अशी आशा वाटते. गतवर्षी विधायक सूचनांचा निर्देशही केलेला नाहीं. या प्रसंगीं विधायक सूचना श्रीमंतांपुढें मांडाव्या या दृष्टीनें मीं आज अध्यक्ष-स्थान स्वीकारिलें आहे. प्रजेला कसें वागवावयाचें याबद्दलच्या विधायक सूचना प्रत्यक्ष श्रीमंतांना व त्यांच्या सल्लागारांनाही सुचूं शकतील. परंतु समजलें तरी उमजणें कठीण असतें. मी राजा नाहीं, राजाचा सल्लागार नाहीं व राजाची प्रजाही नाहीं. अशा बिकट स्थितींत माझें अस्तित्व आहे. तुमच्या अधिपतीशीं मनानें स्नेह असतां त्यांनीं मला जवळ बोलावणें दुरापास्त आहे. व मला जवळ जाणें हेंही दुरापास्त आहे. राजांच्याही परिस्थितीचा आपण विचार करावयास पाहिजे. ब्रिटिश सरकार तहनाम्यानें संस्थानिकांना स्नेही समजतें, परंतु '**सून कोठली केली**' असें संस्थानिकांना विचारतें, हें आपण ध्यानांत घेतलें पाहिजे, व ब्रिटिश सरकारालाही याबद्दल शरम वाटावयास पाहिजे. संस्थानी प्रजेसारखी आमची स्थिति निर्भेळ नाहीं. संस्थानिकांना आपला मार्ग दिसतो. प्रजेला आपले मार्ग पहावे लागतात. स्वार्थ-बुद्धीची झापड प्रजेला व राजांना दोघांनाहि घातलेली आहे. अतिशयोक्तीचें मागणें प्रजेला साजतें, व सर्वच मागणी फेटाळून लावणें राजांना आवडतें. सर्वस्वी निराशा झाली तर बंडखोरीशिवाय मार्ग नाहीं; परंतु तुमची निराशा झाली, तरी आमची निराशा तितक्या लवकर होणार नाहीं. चार चळवळे लोक टुरटुर करतील असें संस्थानिक म्हणतील, व गांव करील तें राव करणार नाहीं, असें चळवळे लोक म्हणतील. राजाचें व प्रजेचें कल्याण चिंतावयाचें म्हणूनच या चळवळींत आम्हांला पडावयाचें आहे. ब्रिटिश हद्दींत होत नाहीं तें येथें व्हावें असें वाटतें, म्हणूनच आम्ही येथें येतों. नव्या अधिपतीच्या शिरावर राज्यकारभार पडल्यामुळें बुद्धि भांबावून जाणें संभवनीय आहे. मनांत जितकें करावयाचें असेल तितकें कदाचित् झालें नसेल. तथापि पोलीस, दवाखाना, मोफत शिक्षण, भोरास म्युनिसिपालिटी, सभाबंदीचा जाहिरनामा रद्द करणें, भाटघरचा समाधानकारक निकाल, वाईट लोकांना शासन, चांगल्यांना बक्षिसें, ३६००० रु. सारा माफी, १४०००

रु. बोनस, ५००० रु. भोर म्युनिसिपालिटीला ग्रँट वगैरे चांगल्या गोष्टी श्रीमंत बाबासाहेबांनीं केलेल्या आहेत.

राज्यारोहणसमारंभ, गव्हर्नर साहेबांची भेट, वगैरे गोष्टींमुळें राजेसाहेबांना वेळ मिळाला नसेल परंतु आतां यापुढें त्यांनीं प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष पोंचविलें पाहिजे. मागण्या अनंत असतात परंतु १५० मागण्यांत निदान ५० मागण्या तरी वादग्रस्त असतात. बेळगांवास कुलकर्णी वतनदारीचा ठराव नापास झाला ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. तुमचे सर्व ठराव बहुमतानें-एकमतानेंही कदाचित्—पास होतील. परंतु या सभा चळवळ करणाऱ्या असतात. जबाबदारीनें काम करणाऱ्या या सभा नसतात. कोणतीही मोठी गोष्ट जबाबदारीनें अंगावर पडली म्हणजे निकाल होतो. राजा किंवा प्रधान होण्याची जबाबदारी ज्या वेळीं शेटे व पोतनीस यांच्यावर पडेल, त्या वेळींच खरा निर्णय होईल. याकरितां प्रजेचे दोन प्रतिनिधी व राजाचे दोन प्रतिनिधि एकत्र बसवून संस्थानिकांनीं गाऱ्हाण्यांची छाननी करून निर्णया करावा. '**विचारांत आहोंत**' अशा चालढकलीवर मात्र लोकांचा विश्वास बसावयाचा नाहीं. चळवळ्या लोकांना जबाबदारी द्या, व त्यांना वादांत टाका, असा माझा संस्थानिकांना सल्ला आहे. कांहीं एका पद्धतीनें राज्यकारभाराचा निर्णय रयतेवर टाका, असें झालें तर कर जास्त बसवावयालाही प्रजा संमति देईल.' आम्हीच काय ते शहाणे' ही बुद्धि संस्थानिकांना असल्यामुळेंच जबाबदारीचें स्वराज्य आपणांस मिळत नाहीं. गव्हर्नरला जे अधिकार नाहींत, ते विशिष्ट अधिकार संस्थानिकांना आहेत. अशी स्थिति असतांना आम्हीं लहान तेव्हां आम्हांला कायदेमंडळें काय करावयाचीं आहेत, या म्हणण्यांत अर्थ नाहीं. संस्थानं लहान म्हणून मनुष्यस्वभाव कांहीं बदलत नाहीं हाच मुलूख खालसा असता तर याच लोकांना मताधिकार आला असता. संस्थान खालसा व्हावें अशी आमची बुद्धि नाहीं; परंतु दुःख भोगण्याची परंपरा कायम ठेवाल तर संस्थान खालसा व्हावें अशी प्रजेची तरी बुद्धि कां होऊं नये ? गाऱ्हाणीं कशींही असतील, तीं निवारण करणें लोकांच्या ताब्यांत द्या, एवढेंच आमचें म्हणणें आहे. काय वाटेल तें करा, व एकदां प्रजेच्या हातीं सत्ता देऊन तर पहा, एवढेंच मला मुख्यतः सांगावयाचें आहे. ”

## अरेराव संस्थानिकांचें संरक्षण !

राजेरजवाड्यांना आपल्या खास संरक्षणाकरितां म्हणून जो एक कायदा कायदेकौन्सिलांतून मंजूर व्हावयाला पाहिजे होता त्याचें बिल वरिष्ठ कौन्सिल-पुढें आलें असतां पहिल्या वाचनासच नामंजूर करण्यांत आलें, ही हकीकत गेल्या अंकीं वाचकांना समजली होती. परंतु चालू आठवड्यांत कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें तेंच बिल पुढें येऊन त्याचें पहिलें वाचन पास झालें आणि ही यक्षिणीची कांडी इतक्या जोरानें फिरली कीं, या बिलाचें दुसरें व तिसरें वाचन लगेच आटोपून चोवीस तासांच्या आंत खणखणीत नकाराचा घसघशीत रुकार बसला. नाराजीच्या रुक्ष तपोवनाच्या जागीं राजीखुशीचें सुंदर उपवन निर्माण झालें ! सर वुइल्यम व्हिन्सेंट यांचा थोडासा राग झाला, पण व्हाइसरॉयसाहेबांचा सगळा राग शमला. विला-यतसरकारनें आपल्या कर्तव्यदक्षतेची प्रशंसा करून आणि संस्थानिकांनींहि आपली कृतज्ञता जाणून परस्परांना बिनतारी विद्युत्संदेशहि पाठविले असतील ज्या बिलाचें पहिलें वाचन झालें त्याचें तिसरेंहि झालेंच म्हणून समजावें असा आपला अनुभव आहे. हिंदी कायदेकौन्सिलांच्या प्रकृतींत वातपित्तकफांपैकीं एक दोष झालेला दिसून येतांच त्रिदोष केव्हां होईल हें हटकून सांगतां येतें व तेंच या ठिकाणीं घडून आलें. तात्पर्य संस्थानि-कांच्या जिवाकरितां ब्रिटिश सरकारनें नव्या केलेल्या या कायद्याला कोण कसे बळी पडतात हें पाहण्याचेंच तेवढें काम आतां शिल्लक उरलें आहे !

हा सर्व प्रकार एकाएकीं कसा घडून आला याचें कित्येकांस सहजच आश्चर्य वाटेल, पण त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें फारसें कांहीं नाहीं. वरिष्ठ कायदेकौन्सिलाचे मुद्दाम बोलूनचालून दोन भाग करण्यांत आलेले आहेत. व त्याचा हेतूहि अगदीं उघड आहे. स्थानिक कायदेकौन्सिलांत गोष्ट बिघडली तर ती कदाचित् निराळ्या रीतीनें वरिष्ठ कायदेकौन्सिलांत सुधारून

घेतां येईल. पण वरिष्ठ कायदेकौन्सिलांतच गोष्ट बिघडली तर ती सरकार कोठें कशी सुधारून घेणार ? १९१९ च्या नव्या कायद्याच्या २६ व्या कलमांत गव्हर्नर-जनरलला असा अधिकार देण्यांत आलेला आहे कीं, " एकादें बिल पुढें आणावें असें सरकारला वाटत असलें, व तें वरिष्ठ कौन्सिलानें आणूं दिलें नाहीं, किंवा अमुक स्वरूपांत तें मंजूर व्हावें असें सरकारला वाटत असतां कौन्सिलानें त्या स्वरूपांत तें मंजूर केलें नाहीं तर तें त्या स्वरूपांत पास झालें पाहिजे असें सर्टिफिकेट गव्हर्नर-जनरलनें राज्याचें हित चिंतून द्यावें, म्हणजे तें बिल ब्रिटिश पार्लमेंटचा विरोध न होईल तर मंजुरीनें कायदा बनतें. परंतु एका कौन्सिलाऐवजीं याच कौन्सिलाचीं वरिष्ठ व वरिष्ठांत वरिष्ठ अशीं दोन अंगें निर्माण केलीं असतां सरकारचें काम अधिक सोपें होऊन कदाचित् या २६ व्या कलमांतील अधिकाराचा उपयोग करण्याची पाळीहि त्यांना येणार नाहीं असें सरकारास वाटलें असल्यास नवल नाहीं. रानांत बंदुक घेऊन आपण शिकारीला गेलों आणि बार काढला तो वांझ ठरला तर शेवटीं निदान बंदुकीचा दस्ता श्वापदाच्या तोंडावर मारणें प्राप्तच ठरतें, टळत नाहीं; पण बंदुक न्यावयाची ती एक–बारी असण्यापेक्षां दोन–बारी असलेली अर्थातच अधिक बरी. एक बार फुकट गेल्यास लगेच दुसरा तरी बहुधा उडेल; व बंदुकीच्या दस्त्यानें जीव वांचविण्याचें धाडस टळेल असा विचार कोणीहि शिकारी करणारच. याच विचारानें खुद्द इंग्लंडांत व स्वराज्य भोगणाऱ्या कित्येक वसाहतींतूनहि एकाऐवजीं दोन सभागृहें बनविलेलीं असतात. या धोरणाचा अवलंब करूनच हिंदुस्थानांतहि लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या डोक्यावर 'कौन्सिल ऑफ स्टेट' हें दुसरें एक सभागृह सरकारनें करून ठेवलें आहे.

दूरदृष्टीच्या या योजनेचें शहाणपण यापूर्वीं मुळींच अनुभवास आलें नव्हतें असें नाहीं. पण प्रस्तुत प्रसंगीं हा अनुभव इतका बिनतोड व रोख-ठोक आला आहे कीं, कौन्सिल ऑफ स्टेटसारख्या लब्धप्रतिष्ठित संभा-

गृहाचा उपयोग काय हें यापुढें शाळेंतील एखादा मुलगाहि सांगूं शकेल. तो उपयोग हाच कीं, खालीं चुकलें तर वर सुधारून घेण्याला, खालीं घसरलें तर वर सावरावयाला जागा असावी. सरकारची सावरावयाची ठराविक जागा म्हटली म्हणजे देशांतील प्रतिष्ठित गणले जाणारे पण सरकारच्या कृपेवरच प्रतिष्ठा अवलंबून असणारे स्वतः श्रीमंत लोक, किंवा त्यांचे हस्तक व प्रतिनिधि ! अशाच लोकांचा भरणा कौन्सिल आफ स्टेटमध्यें व्हावा म्हणून त्यांची मतदारी श्रीमंतीवर अवलंबून ठेविली आहे. शिवाय त्यांत ॲसेंब्लीप्रमाणें, लोकनियुक्त प्रतिनिधींचें बहुमत निवळ कागदावरहि निर्विवाद स्थितींत ठेवलेलें नाहीं. इतक्या युक्तीनें बनविलेली जोडनळीची बंदुक घेऊनच सरकार निघालें असल्यामुळें असेंब्लीच्या रानांत फसलेली त्याची शिकार कौन्सिल ऑफ स्टेटच्या नजरबागेंत साधली यांत नवल काय?

ॲसेंब्लींत संस्थानिकांसंबंधाचें बिल पुढें आलें त्या वेळीं जो रंग होता तो कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सर्वच्या सर्व पालटला. ॲसेंब्लींत बिल पुढें आणणारे गृहस्थ सर विल्यम व्हिन्सेंट यांनींच मुळीं बिलाची गोष्ट जवळ हंसण्यावारी नेली. या कामीं स्वतःचें मनच त्यांना खात होतें. दडपशाहीचे कायदे रद्द करण्याच्या कमिटींत मुख्य सरकारी सभासद व्हिन्सेंट साहेबच होते. या कमिटीपुढें प्रेस ॲक्ट रद्द करण्याची चर्चा सुरू असतां संस्थानिकांच्या रक्षणाचा हा प्रश्न निघाला होता. त्यावर साधकबाधक चर्चा झाली. शेवटीं कमिटीनें सर्वानुमतें असा निर्णय दिला कीं, प्रेस ॲक्ट रद्द केला जावा आणि नेटिव्ह संस्थानासंबंधाचें त्यांतलें कलम इतर कलमांबरोबरच रद्द होत असलें तरी त्यांच्याकरितां म्हणून तसला वेगळा कायदा करून देण्याचें कारण नाहीं. एकट्या व्हिन्सेंट साहेबांचेंच असें मत तेव्हां नसून व्हॉइसरॉय लॉर्ड रेडींग यांनींहि त्यानंतर लवकरच जें एक भाषण केलें, त्यांतहि असल्या कायद्याची फारशी जरूरी नाहीं असेंच दर्शविलें होतें. पण दरम्यान संस्थानिकांचा वशिला विलायतसरकारपर्यंत पोंचला. या सरकारला हळूहळू आढळूं लागलें कीं, संस्थानिकांना आपण कांहीं तरी वचन दिलेलें

आहे ! इतर वचनें पाळण्याच्या कामीं सरकारची स्मृति किंवा इमानदारी किती धड असते हें खिलाफतीच्या व इतर अनेक प्रकरणांत दिसून आलेंच आहे. तथापि संस्थानिकांसंबंधीं होऊं घातलेल्या या वचनभंगाची त्यांना इतकी तळमळ लागली कीं, त्यांच्या आत्म्याची झोंप पळून गेली; व " दिलेलें वचन पाळलेंच पाहिजे व घरच्या कायदेकानूच्या कारखान्यांत हा कायदा तुम्हीं घडविलाच पाहिजे " अशा अर्थाचा सक्तीचा खलिता हिंदुस्थानसरकारकडे विलायतेहून आला त्यामुळें बिल पुढें आलें. व्हिन्सेंट साहेब स्वतः होम मेंबर असल्यामुळें बिलाचें समर्थन त्यांना असेंब्लींत करावें लागलें. पण तें त्यांच्या मताच्या विरुद्ध असल्यामुळें तें समर्थन नीटसें करतां आलें नसल्यास नवल नाहीं; व वरिष्ठ कायदेकौन्सिलाचे अधिकार मर्यादित असले तरी स्वतंत्रपणाचें वारें खेळण्यास त्यांस थोडीशी कूस असल्यामुळें बहुमतानें बिल नामंजूर झालें.

पण हा पराभव स्वीकारून व्हाइसरॉयसाहेबांना स्वस्थ बसतां येण्यासारखें नव्हतें म्हणून त्यांनीं सुधारणांच्या कायद्यानें दिलेल्या अधिकाराचा ताबडतोब उपयोग केला. " हें बिल मंजूर होणें हिंदुस्थानांतील आपल्या राज्याच्या सुरक्षिततेस आवश्यक आहे " अशा अर्थाचें सर्टिफिकेट त्यांनीं मृतप्राय झालेल्या बिलाच्या नळ्यांत बांधून तें वर कौन्सिल ऑफ स्टेटकडे पाठविलें. या सर्टिफिकेटानें बहुतेक काम केलेंच, पण त्यांतनाहि उरलें सुरलें काम या कौन्सिलांतील सरकारी पुरोहित मि. टॉम्सन यांनीं पार पाडलें. तें असें कीं, आपल्याच लोकांवर कधींहि न रागावणारे व्हिन्सेंटसाहेब टाम्सनसाहेबांवर तोंड संभाळून न बोलल्याबद्दल रागावले इकडे व्हाइसरॉयसाहेबांनींहि असेंब्लीनें आपला अपमान केल्याचें सोंग आणून रागाची बतावणी केली कीं, असेंब्लींत बिलाला प्रतिकूल मत देणारांपैकीं कित्येक अर्धवट लोक मनांत भेदरून जाऊन " झालें खरें, पण झालें तें कांहीं चांगलेंसें झालें नाहीं " असें म्हणूं लागल्याचें सांगतात. कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें कित्येक सभासदांनीं कालहरण करण्याचा प्रयत्न केला, पण तोहि फसला; व शेवटीं एकच मत विरुद्ध

पडून बिलाच्या पहिल्या वाचनाला संमति मिळाली आणि पूर्वी एक दोष व त्रिदोष यासंबंधानें जें सांगितलें तेंच या बिलाच्या पहिल्या व तिसऱ्या वाचनासंबंधानें खरें ठरलें यांत आश्चर्य नाहीं.

या सर्व बाबींतलें मर्म हुडकून काढण्याला बराच मार्मिकपणा पाहिजे. कित्येकांनीं या कामीं, बाकी सर्व सोडून देऊन बिलाला सर्टीफिकेट देऊन याच बैठकींत तें कौन्सिलपुढें आणण्याबद्दल व्हाइसरॉयसाहेबांवरच झोड उठविली आहे. व्हाइसरॉयसाहेबांची यांत चूक किंवा घाई तर खरीच, कारण बिल पुढच्या बैठकीपर्यंत ढकललें गेलें असतें तर जग कांहीं बुडत नव्हतें, पण देशी संस्थानांचेंहि गांठोडें बुडत होतें अशांतला भाग नाहीं. पण असेंब्लीवरील रागाच्या तिडकीमुळें हें सर्व घडून आलें; व ही तिडीक लक्षांत घेऊनच कौन्सिल ऑफ स्टेटनेंहि आपल्या आंगांत कांहीं पाणी असतें तर तें या प्रसंगीं दाखवावयास पाहिजे होतें. चालू सेशनांतच हें बिल सर्टीफिकेट देऊन पुढें आणणें याचा अर्थ " होय माझा अधिकार आहे, मी तो बजावणार; जगानें वाटेल तर मला हंसावें " असा उघड होतो. याला कौन्सिल ऑफ स्टेटनेंहि असलेंच उत्तर देऊन म्हणावयास पाहिजे होतें कीं, " होय, बिल नामंजूर करण्याचा अधिकार आम्हांस आहे, तो तूर्त बजावतों, मग तुम्ही वाटेल तर रागावा, व त्याउप्पर काय करावेंसें वाटेल तें करा; तुम्ही मुखत्यार आहां. " पण हें घडून येणार कसें ? व्हाइसरॉयसाहेब, जन्माचे कायदेपंडित, बडे न्यायाधीश व डोक्याचे थंड असा त्यांचा लौकिक असतां " विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते " या न्यायानें जरा डिवचतांच त्यांनीं आपली फडा काढली. कौन्सिल ऑफ स्टेटजवळ रागहि नाहीं व फडाहि नाहीं, हें या प्रसंगीं चांगलेंच दिसून आलें. पण विचार करणारानें यांत असा विचार केला पाहिजे कीं, सर्टीफिकेट देऊं नये तें देऊन बिल पुढें पाठविलें ही चूक मोठी कीं, असलें सर्टीफिकेट मिळून बिल नामंजूर करण्याची सत्ता हातीं असतां असलें घातक बिल मंजूर केलें ही चूक मोठी ! व दुसरी चूक अधिक मोठी असेल तर ती केली कोणी ? आमच्यांतीलच लोकांनीं कीं नाहीं?

आणि ती कां तर त्यांच्यापेक्षां अधिक नेटाचे व स्वाभिमानबुद्धीचे लोक त्यांच्या जागीं नाहींत म्हणून! व हे यावयाचे तर व्हाइसरॉयसाहेबांवर नुसते रागावून येतील ? किंवा प्रत्यक्ष त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून त्यांच्याहून अधिक लायक उमेद्वार उभे करून येतील ? आपलाच दाम खोटा असतां दुसऱ्याला बोल लावण्यांत फारसा अर्थ नाहीं. हल्लीं काय किंवा इतर केव्हांहि काय, कोणाहि व्हाइसरॉयाचा सरळपणा किंवा न्यायबुद्धि हीं आपल्या राजकीय प्रगतीचा आधार होऊं शकत नसून कौन्सिलांच्या विद्यमान शक्तीचा इतर राष्ट्रीय शक्तीसमवेत उपयोग करून घेणें हाच खरा आधार होऊं शकेल. आपण कितीहि प्रयत्न केला तरी हटकून आपल्या मनाप्रमाणें वागेल असा व्हाइसरॉय आपणांस विलायतेहून आणवितां येणार नाहीं. पण आपण कसून प्रयत्न केल्यास कौन्सिल ऑफ स्टेटसारखीं सभास्थानेंहि आपणास हस्तगत करून घेतां येतील; व तसें झाल्यास मग शेंडी तुटते कीं पारंबी तुटते हें सिद्ध करण्याचा खरा प्रसंग येणार आहे. आज इंग्रजींतील एका म्हणी-प्रमाणें हिंदभूमी ही स्वराज्याच्या दृष्टीनें "विवाहित कुमारिका किंवा अविवाहित विधवा" यापैकीं कोणत्या वर्णनांत पडते हें ठरविणेंच कठीण झालें आहे!

असो. शेवटीं ज्यांच्या जिवाखातर विलायतसरकारानें इतका आग्रह धरला व व्हाइसरॉयसाहेबांनीं एवढें साहस केलें त्यांच्यासंबंधानें दोन शब्द लिहून हा लेख पुरा करूं. नवीन बिलानें संस्थानिकांना मिळालें तर काय मिळणार हा पहिला प्रश्न उत्पन्न होतो. या बिलानें त्यांचें संरक्षण होणार तें कोणत्या बाबतींत होणार ? खुद्द संस्थानिकांच्या मुलखांत वाटेल ते कायदे करण्याला, वाटेल त्या कायद्याचा वाटेल तो अर्थ व अंमल करण्याला किंवा याहि पलीकडे जाऊन आपल्या स्वयंभू अधिकारानें वाटेल तें बेकायदेशीर कृत्य अशा नाहीं तशा रीतीनें घडवून आणण्याला संस्थानिक समर्थ आहेत. त्यांना येऊन जाऊन दोन गोष्टींची भीति. एक स्वतः संस्थानिक किंवा त्यांच्या प्रेमांतले लोक यांची अब्रूनुकसानी आणि दुसरी गोष्ट संस्थानी राज्या-

संबंधानें राजद्रोह. खुद्द संस्थानच्या हद्दींत यांपैकीं कोणतीहि गोष्ट कोणी केली तर त्या गुन्ह्याचा इनसाफ, शिक्षा वगैरे हरएक गोष्टी करण्याला संस्थानिक पूर्ण सत्ताधीश आहेतच. आपल्या मुलखांत आपली सत्ता चालत नाहीं असली नादान कागाळी करण्याला कांहीं हे संस्थानिक लोक सरकारकडे खाचित गेले नव्हते. त्यांचे हात जेथें पोंचत नाहींत असा एकच वर्ग म्हणजे तो खालसा इलाख्यांतील वर्तमानपत्रें व वक्ते. यांना पायबंद लावणें किंवा त्यांच्या तोंडाला मुस्की घालणें व शक्य तर या दोन्ही गोष्टींचे अधिकार आमच्या हातीं द्या अशी मागणी करणें हाच संस्थानिकांच्या खटपटीचा मुख्य हेतु ! या बाबतींत आम्हींहि पण सरळ मनानें विचार करण्यास तयार असून असें प्रांजळपणानें कबूल करितों कीं, केवळ कायद्यांत कलम नाहीं म्हणून आमच्या संस्थानिकांना किंवा त्यांच्या राज्याला खालसांतील वाटेल त्या नादान मनुष्यानें बेजबाबदारपणें वाटेल तसें तोंड टाकून बोलावें अगर लिहावें हें आम्हांसहि खपणार नाहीं. इंग्रज सरकारची अब्रू ही मात्र कलमी आंबे-फळाप्रमाणें किंवा द्राक्षाच्या घोसाप्रमाणें मौल्यवान म्हणून तिला काटेरी कुंपणें आणि कडीकुलुपाचें कवाड आणि आमच्या संस्थानिकांची अब्रू म्हणजे मात्र जंगली झाडाचा पाला. तो वाटेच्या वाटसरानेंच काय पण वात्रट वानरांनींहि वाटेल तसा खुडावा. इतकी ती अब्रू हलकी आहे असें पूर्वी आमच्या कधीं स्वप्नीं आलें नाहीं व पुढेंहि येणार नाहीं. आम्हीच काय, पण हिंदुस्थानांतील शंभर वर्तमानपत्रकर्ते घेतले तरी त्यांतील ९५ असेच सांपडतील कीं, इंग्रज सरकारांपेक्षां देशी संस्थानिकांविषयीं त्यांना ममत्व म्हणजे आपलेपणा अधिक वाटतो. शिवाय जे पांच लोक इतर प्रकारचे सांपडतील तेहि प्रायः असले कट्टे ध्येयवादीच असतील कीं, त्यांना पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे. स्वतत्वांचा निर्भेळ अंमलच पाहिजे मग त्याच्या आड इंग्रज सरकार आलें तरी सारखेंच व संस्थानिक आले तरी सारखे. अशी स्थिति असतां उलट संस्थानिक मात्र असा कांगावा करतात कीं, आमचेच प्रजाजन कृतघ्न बनून खालसांतील हद्दीचा व पुढाऱ्यांचा आश्रय करून

आमच्या जिवावर व आमच्या राज्याच्या जिवावर उठले आहेत आणि या काळजीमुळें आम्हाला झोंप येत नाहीं. ही तक्रार ऐकून आम्हांला तर हंसूंच लोटतें. ज्यांचा भेद झडावा म्हणून तर सारी खटपट त्यांनीं मेहनत तर करूंच नये, पण उलट बसल्या बैठकीस हवा तितका मोहनभोग खावयास मिळत नाहीं, किंवा गादीला कापूस कमी पडतो म्हणून तक्रार करावी अशांतलाच हा सारा प्रकार आहे. खालसांतील टीकाकार मुख्यतः संस्थानांतील एकतंत्री अरेरावीवर टीका करतात; असें असतां राजद्रोहाच्या सबबीवर ही टीका देखील बंद करावयाची म्हणजे तो जुलुमाचा कहरच झाला. संस्थानांवर टीका संस्थानच्या हद्दींत व्हावी आणि ब्रिटिश सरकारवर टीका खालसांत व्हावी हीच अंतिम इष्ट स्थिति होय. एकाच्या हद्दींत दुसऱ्यावर टीक करण्यांत फळ नाहीं व पुरुषार्थहि नाहीं. या दृष्टीनें पाहता खालसा हद्दींतील कोणीहि टीकाकार व्यक्तिशः कोणाहि संस्थानिकांची बेअब्रू करील तर त्याला योग्य ब्रिटिश न्यायकोर्टांत न्याय मिळण्याचा हक्क असावा आणि स्वतः हजर न राहून मुखत्यारामार्फत काम चालविण्याच्या बाबतींत संस्थानिकांच्या दर्जानुरूप त्यांस सवलती दिल्या जाव्या हें आम्हास पूर्णपणें मान्य आहे. याही पलीकडे जाऊन आम्ही असें म्हणतों कीं, संस्थानिकांच्याहि राज्यकारभारावर झाली तरी बेजबाबदार व खोटी टीका कोणी करील तर तिलाही आळा पडला पाहिजे. पण या बाबतींत ब्रिटिश सरकारची बरोबरी करूं पाहणाऱ्या संस्थानिकांनीं राजकीय सुधारणा करण्याबाबद आपण त्यांचेंच कां होईना पण अनुकरण करीत आहो कीं काय हें आपल्या मनाशीं विचारून पहावें, व असें नसेल तर तोबऱ्याला तेवढी मान पुढें व लगामाला मागें असें कां, असें आम्हीं संस्थानिकांनाही कां विचारूं नये? इंग्रज राज्यकर्त्यांच्या अब्रूचें संरक्षण कोणताहि कायदा जितकें करतो तितकें तुम्ही खुशाल करू द्या व या देणगीचा मोबदला म्हणून निदान खालसातीबरोबरीच्या राजकीय सुधारणा संस्थानी प्रजेला मिळतील तर संस्थानिकांच्या संरक्षणाचे आणखी दहा कायदे करावे लागले तरी त्यास आम्ही आनंदानें मान्यता देऊं. पण

हक्क तेवढे वसूल करून घ्यावयाचे आणि आपलें योग्य कर्तव्य मात्र करावयाचें नाहीं; असाच जर संस्थानिकांचा कावा असेल तर हंस-काकीय-कथानकांतील कित्येक शेलक्या दुरुत्तरांची आठवण संस्थानिक लोकांस आम्हांस करून द्यावी लागेल !

## प्रेसबिलानें दाखविलेले देखावे*

हिंदी राजेरजवाड्यांनीं इंग्रज सरकारकडे खरखरमुंडेपणानें दाद लावून घेऊन आपल्या संरक्षणाचा कायदा मागितला, व विलायतसरकारनें तो करून देण्याचें कबूल केलें. वास्तविक खुद्द हिंदुस्थानसरकारला असल्या कायद्याची जरूरी वाटत नव्हती. ती वाटत असती तर, प्रेस-कमिटीचा रिपोर्ट झाला आणि प्रेस ॲक्ट रद्द करण्याचें ठरलें, तेव्हां सर वुल्यम व्हिन्सेंट यांनीं या भावी कार्याचें बीजारोपण करून ठेवलें असतें. तें तर त्यांनीं केलें नाहींच, पण उलट ज्या जमिनींत बीं पेरावयाला टाकल्याचा संशय येत होता ती जागा देखील पुढें लवकरच लॉर्ड रेडिंग यांनीं एक प्रतिकूल भाषण करून नांगरून उधळून टाकून दिली. याचें कारण अगदीं उघड आहे. राजेरजवाडे हीं आपल्या शाळेंतील मुलें. त्यांतील किती खोडकर, नाठाळ, नादी, फंदी व दुष्ट स्वभावाचीं असतात आणि आपल्या प्रजेला किती छळतात हें सरकारला पुरें माहीत. अशांच्या हौसेखातर त्यांच्या हातांत विषारी वाघनखें घालून त्यांचीं वाघोबाचीं सोंगें सजविण्यास सरकार कसें तयार होईल ? परंतु विवेकी बाप बधेनासा झाला म्हणजे मूर्ख व अविचारी आईकडे जाऊन, तिच्या आग्रहानें आपला हट्ट पुरवून घेण्याचें कसब अशा मुलांना चांगलेंच साधलेलें असतें. तोच प्रकार राजेरजवाड्यांच्या संरक्षणाच्या कायद्यासंबंधानेंहि घडून आला आहे. बायकोच्या मुठींत असलेल्या नवऱ्याला परस्परविरुद्ध विसंगत वर्तन मुलांच्या डोळ्यांदेखत करावें लागतें, तीच गत हिंदुस्थानसरकारचीही झाली. लॉर्ड रेडिंग व वुल्यम व्हिन्सेंट हे दोघेहि या बिलाविरुद्ध, पण करतात काय?

*केसरी ता. १० आक्टोबर १९२२.

असेंब्लीनें बिल नामंजूर करतांच, आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून, शहाणपणाची अब्रू गमावण्यास लॉर्ड रेडिंग तयार झाले; व जरूर तें सर्टिफिकीट देऊन त्यांनीं बिल वर कौन्सिलकडे पाठविलें. होम–मेंबर व्हिन्सेंट साहेब हेहि बिलाविरुद्ध; पण त्यांनाहि हास्यास्पदता पतकरून, जन्मांत कधीं केलें नाहीं असें दुबळेपणाचें आचरण करून, पूर्वी नको म्हटलेल्या गोष्टीलाच कौन्सिलपुढें तोंड भरून मंजुरीची भिक्षा मागावी लागली!

आणि हा सर्व प्रकार इतका एकदम व अदमासाबाहेर घडून आला कीं, यांत सांपडलेल्या सर्वांनाच विजेचा मोठा धक्का बसल्यासारखा होऊन, प्रत्येकाची निरनिराळी मनःस्थिति अवाचित उघडकीस आली. फोटो काढतांना सावधगिरीच्या वारवार वेळ सूचना देऊन कांच उघडली तरी एखादा बावळट चुकतोच. पण तेंच एखाद्या समुदायाचा न कळत फोटो (स्नॅपशॉट) घेतला म्हणजे नर वीर वानर अशा नैसर्गिक वृत्तींचीं किती तरी वेगवेगळीं चित्रें कांचेवर उमटतात. कोणी संवईखातर उगाच मिशीवर ताव देत असतो, कोणा गबाळ्याचे अंगरख्याचे बंद सुटलेले असून त्याचें अंग धड झांकलेलें नसतें किंवा धड उघडेंहि नसतें, कोणी उगीचच डोळे मिचकावीत असतो, कोणाच्या हंसण्यानें शोभेपेक्षां तोंडाला विद्रूपताच अधिक आलेली असते, व क्वचित् एखादाच मनुष्य, फोटो काढणाऱ्याच्या नशिबीं कधींहि न लाभणाऱ्या, सहजसौंदर्याच्या स्थितींत ऐटीनें उभा असतो! पाम्पे शहर ज्वालामुखी पर्वताच्या स्फोटानें जें अवचित् गडप होऊन गेलें तें शेंकडों वर्षांनीं उकरून काढल्यावर त्यांतहि समाजस्थितीचे असेच अनेक प्रकार आढळून आले, व ते फार मनोरंजक होते असें म्हणतात. असेंब्लींत बिल आलें, नामंजूर झालें, सर्टिफिकीटाच्या पायावर तें धांवत कौन्सिलांत गेलें, व तेथें त्याला मंजुरीचीं महावस्त्रें देण्यांत आलीं. हा सर्व प्रकारहि असाच अनपेक्षित रीतीनें झाल्यानें या राजकारणांत गुरफटलेल्या लोकांचीं बेसावधपणांतील मनःस्थितीचीं अशींच चित्रें पहावहास सांपडलीं आहेत.

राजेरजवाडे विलायतसरकारकडे लाडिवाळपणानें हट्ट धरून बसले आहेत. । विलायतसरकार फणकाऱ्यानें इमानदारीची सबब सांगून, ‘बिल मंजूर झालेंच

पाहिजे, आणि सरकारी मायेची शाल राजेरजवाड्यांच्या उघड्या अंगावर पडलीच पाहिजे' अशा हट्टानें उंबऱ्यावर ठाणें देऊन उभें आहे. लॉर्ड रेडिंग साहेब एका डोळ्यानें रागावून विलायतसरकारकडे पहात आहेत, आणि दुसऱ्यानें बिल नामंजूर केल्याबद्दल असेंब्लीला दटावून तें पास करण्याला स्टेटकौन्सिलला खुणावीत आहेत; भाडोत्री मारेकऱ्याप्रमाणें आपण तलवार चालविली असतांहि असेंब्लींतून संस्थानी प्रजेचें स्वातंत्र्य जीव बचावून पळून गेलें असें पाहून, ज्या ऐटीनें पापभीरु सुमेरसिंग नारायणरावाच्या वधाच्या हुकमाचा कागद हातांत मिरवीत त्या वधाचें अपुरें काम पुरें पाडण्यास ओंठावरच्या ओंठावरच 'दीन दीन' हे शब्द खेळवीत तरवार सरसावून ऐटीनें गणेश महालांत गेला, त्याच उसन्या ऐटीनें सर बुल्यम हे कौन्सिलांत जात आहेत, अधिकाराच्या तोऱ्यांत प्रजास्वातंत्र्याची प्रथम किंचित् दया येऊन ज्यांनीं मारेकरी धुडकावून लाविले त्या खासदारांना लॉर्ड रेडिंगसाहेबांनीं सर्टिफिकीट दिल्याची बातमी लागतांच, आपण मोठी चूक केली असें वाटून वधाचा हुकूम देणें आवश्यक आहे असें थोडेंबहुत जगाच्या तोंडापुरतें तरी सांगाल तर आम्हीहि हें वधाचें काम करणार नाहींच असें नाहीं, असें ते गुळमुळत बोलत आहेत; उद्यां अकरा वाजेपर्यंत विचार करा, नाहीं तर माझें कौन्सिल बिल मंजूर करण्याला बसलेंच आहे, मग तुम्ही आपलें हंसें करून घ्याल, असा निर्वाणोक्तीचा खलिता लॉर्ड रेडिंग त्यांना देत आहेत, घरीं तांदूळ येतील ते आधणांत वैरावयाचे, त्यांत किडामुंगीचा जीव गेला तर त्याचें पाप बाजार करणाराला, असें मानणाऱ्या एखाद्या निढावलेल्या आचाऱ्याप्रमाणें कौन्सिलांतील नामदार, तुम्ही पानें घाला, भात तयार आहे, असें सरकारी वाकानिसाला सांगत आहेत; असेंब्ली व कौन्सिलबाहेरील लोकसमाज कोणी लॉर्ड रेडिंग यांना नांवें ठेवीत आहे, कोणी संस्थानिकांना रागानें शिव्या देत आहे, कोणी हल्लींच्या राज्यपद्धतींतील दोषांकडे बोट दाखवीत आहेत, कोणी तुम्ही कौन्सिलांत गेलां म्हणून असें झालें असें म्हणत आहे, तर कोणी तुम्ही कौन्सिलांत गेलां नाहीं म्हणूनच असें झालें असें बजावीत आहे; आणि शेवटीं खालसांतील वर्तमानपत्रें व वक्ते यांचाच जो

एक अखेरचा आश्रय होता तो जाऊन खरोखरच आपण अनाथ बनलों अशा निराशेनें कपाळाला हात लावून शून्यवदन होऊन संस्थानी प्रजा भीतिमिश्रित दुःखानें गांगरून गेलेली आहे—असे अनेक निरनिराळे चित्रपट या बिलाच्या प्रकरणांत दिसून येत आहेत !

लॉर्ड रेडिंग यांनीं बिलाला सर्टिफिकीट दिलें नसतें तर कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें बिल असेंब्लीप्रमाणें नामंजूर झालें असतें असें आम्ही म्हणत नाहीं. रीतीप्रमाणें पुढच्या बैठकींत बिल आलें असतें तर रीतीप्रमाणें सरकारपक्षाचेंच बहुमत झालें असतें ही गोष्ट अगदीं उघड आहे. एवढेंच नव्हे तर ॲसेंब्लींतील विरोधी अशा दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांनीं जो खुलासा हल्लीं केला आहे त्यावरून पाहतां, कदाचित् कौन्सिल ऑफ स्टेटकडे जाण्याचीहि जरूर पडली नसती. कांहीं तरी नवें कारण दाखवितां आल्यास तेवढेंच निमित्त घेऊन हे दोनहि पक्ष या बिलाचा असेंब्लींत फिरून विचार करण्यास तयार झाले असते असें दिसतें. असेंब्लींत बहुतेक सर्व भाषणें बिलाविरुद्ध झालीं असतांहि त्याला ४५ मतें अनुकूल पडलींच; फक्त चार मतांनीं बिल नामंजूर झालें. असेंब्ली देवी बेपर्वाईच्या शिखरावर असतांहि इतकें थोडें अंतर नकार व रुकार यांमध्यें पडलें; मग ज्यांनीं विरोध केला त्यांनींच बिलाला डोक्यावर घेण्याची इच्छा दर्शविल्यावर नकार पक्षातर्फे शेवटीं जागेवर चार मतें तरी उरलीं असतीं कीं नाहीं शंकाच आहे. हें स्थित्यंतर घडून येण्याला खरें कारण लार्ड रेडिंग यांचा जळफळाट; व नवीन पुरावा पुढें आल्यानें विचाराची नवी दिशा सुचल्याचें निमित्त मात्र करण्यांत आलें असतें. पण हें निमित्त सर्वस्वी पोकळच ठरलें असतें असें आम्हास तरी वाटतें. प्रेस ॲक्ट कमिटीपुढें चर्चा चालली असतां संस्थानिकांना विशेष प्रकारचें संरक्षण देण्याला अनुकूल अशीं जीं कारणें अस्तित्वांत नव्हतीं तीं नंतर कोठून कशीं आलीं ? स्वतः संस्थानिकांना ही अक्कल प्रेस ॲक्ट रद्द झाल्यावर सुचली असें नाहीं. त्यांचे उपद्व्यापी पुढारी ही कमिटी बसली होती तेव्हांच जारीनें खटपट करीत होते. कमिटीपुढें आलेल्या साक्षीदारांची या मुद्यावर तपासणी झाली. होम मेंबर व्हिन्सेंट हे स्वतः या कमिटीवर होते. पोलिटिकलखात्याचे

सेक्रेटरी वुडसाहेब यांची कचेरी आणि व्हिन्सेंटसाहेबांची कचेरी एकाच इमारतींत आहे, व कमिटीचें काम चालूं असतांच या पुढाऱ्यांनीं वुडसाहेबांच्या कचेरीचे उंबरे झिजविले होते. असें असतां संस्थानिकांच्या तर्फेचा पुरावा तेव्हां दडून कसा बसला व आतां उसळी मारून वर कसा आला?

बरें, पुरावा पुरावा म्हणजे तरी काय? संस्थानी चळवळीसंबंधीं कांहीं हकीगती, व वर्तमानपत्रासंबंधीं कांहीं लेख. या दोनहि गोष्टी जुन्याच आहेत. उलट संस्थानिकांनीं प्रजेची चळवळ हाणून पाडण्याकरितां केलेली दडपशाही हीच हकीकत काय ती नवी! उत्तरहिंदुस्थानच्या संस्थानांतून ही हकीकत किती तरी वेळां घडली व तिजवरून कोणता एक बोध घ्यावयाचा तर संस्थानिकांना संरक्षण न देतां ते त्यांच्या प्रजेलाच अधिक दिलें पाहिजे हा होय! पुराव्याची दुसरी बाब तहनाम्यांची. किंबहुना याच बाबीला सरकारनें विशेष महत्त्व दिलेलें असून आपल्या मायावी इमानदारीची मयसभा या तहनाम्याच्या पायावरच त्यांनीं बांधलेली आहे. पण हे तहनामे तरी नवीन कोठून आले? ते पन्नासपाऊणशें वर्षांचे तरी जुने आहेत. ते इतके जुने आहेत कीं, त्यांतील स्पष्ट किंवा गर्भित वचनें इंग्रज सरकारनें पाळलीं नाहींत, व देशी संस्थानें बुडविण्याचा क्रम सुरू केला, म्हणून तर कांहीं अंशीं १८५७ चें बंड झालें! प्रेस ॲक्ट–कमिटी उठून गेल्यानंतर व असेंब्लींत बिल येण्यापूर्वीं नवीन पुरावा घडला गेला असेल तर तो हाच कीं, खालसांतील वर्तमानपत्रांतून संस्थानिकांना बोधप्रद असे प्रेमानें किंवा रागानें लिहिलेले लेख अधिक आलेले असतील. असल्या लेखाचे चिकट बुकांतील उतारे काढून ते दिमाखानें मिरविले व त्यांची संख्या फुगवून सांगितली म्हणजे त्याला नवा पुरावा म्हणणें हास्यास्पद होय! पण या अवधींत झालें तरी, कोणाहि संस्थानिकाशीं सरकारचा एखादा नवीन तह झालेला आम्हीं ऐकिला नाहीं. बरें, जुन्या तहाची पूर्वीं आठवण झाली नव्हती ती आतां झाली असें म्हटलें तरी त्यांत काय आहे? तहाचें मुख्य कलम हेंच कीं, उभय सरकारांनीं स्नेहभावानें वागावें व परस्परांचे मित्र व शत्रु परस्परांनीं मित्र व शत्रु समजावे.

पण या कलमांत किती खोल अर्थ आहे याचा विचार झालेला दिसत नाहीं. तह हे नुसते उभयान्वयी नसून तंतोतंत दुतर्फी लागू होणारे आहेत हें काय म्हणून विसरावयाचें ? मित्र राष्ट्रांच्या स्नेहभावाचें लक्षण फार तर येथवर जाऊं शकेल कीं, एखाद्या संस्थानांतील प्रजाजन संस्थानाच्या हद्दींत गुन्हे करून खालसांत जातील, तर त्यांची पूर्व चौकशी करून, गुन्ह्याची शाबिती होईल असें दिसून आल्यास इंग्रज सरकारनें संस्थानी गुन्हेगार संस्थानला परत द्यावयाचा, पण याहि बाबतींत एक्स्ट्रॅडिशन ॲक्टानें सवलती देण्यापेक्षां निर्बंधच अधिक घातलेले दिसून येतील; शिवाय शरणागतास अभयदान देणें हें थोरांचें ब्रीद असून स्वतः इंग्लंड या बाबतींत उदारधी म्हणून प्रसिद्ध आहे. एकोणिसाव्या शतकांत सर्व युरोपभर सुराज्यघटनेची व प्रजास्वातंत्र्याची चळवळ झाली, तेव्हां इंग्लंडच्या प्रत्येक दोस्त राष्ट्रांतील राजद्रोही गणलेले राजकीय पुढारी इंग्लंडला पळून आले होते व इंग्लंडनेंहि त्यांना आपल्या पंखाखालीं सुरक्षित ठेवलें होतें. म्हणजे त्यांना परत तर दिलें नाहींच, पण स्वतःहि त्यांच्यामागें न्यायइनसाफाचा ससेमिरा लाविला नाहीं. तीच गोष्ट हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यांतहि कां घडूं नये ? इंग्रजांच्या युरोपांतील दोस्तांपेक्षां हिंदुस्थानांतील या दोस्तांना असें काय सोनें अधिक लागून गेलें आहे कीं, जें इंग्रजांनीं युरोपांत केलें नाहीं तें हिंदुस्थानांत करावें ? राजद्रोहाचे कायदे बनविणें व संस्थानी प्रजेवर त्यांचा अंमल करणें या गोष्टी संस्थानिकांना स्वतंत्रपणें करतां येतात. विशेष प्रकारचे गुन्हेगार परमुलखांत गेले असतां त्यांना ते परत मिळण्याची सोय आहे. बरें, इंग्रजीमुलखांत झालेल्या चळवळीचा उपसर्ग आपल्या खालस संस्थानी प्रजेला लागूं नये असें त्यांना वाटत असल्यास, संस्थानिकांनीं परहद्दींतील राजकीय चळवळीचा मालमसाला आपल्या हद्दींत येऊं देऊं नये म्हणून त्यावर कांहीं बंधनें घालावीत व कित्येक संस्थानिक तशीं तीं घालीतहि आहेत. पण खुद्द इंग्रजी मुलखांतील प्रजाजनांची मुसकटदाबी आमच्या जिवाखातर करा असें संस्थानिकांनीं म्हणणें हें खचित लाजिरवाणें होय ! अधिकाराच्या पंडुरोगाचें हें लक्षण ठरतें. स्वतःच्या संस्थानांतील सगळी

बेबंदशाही पचनीं पाडून, इंग्रजी मुलुखांतील आपल्याविषयींची मुस्कटदाबी वरती तोंडीं लावण्यास ज्यांना लागते त्यांची अधिकाराची किंवा स्वसंरक्षणाची भूक हें सुदृढ प्रकृतीचें लक्षण नसून रोगाचें लक्षण आहे, हें सरकारच्या लक्षांत यावयास पाहिजे होतें.

मित्रामित्रांनीं परस्परांचें संरक्षण करावें हें खरें. पण इंग्रजसरकार व संस्थानिक यांचें मित्रत्व आत पाहावें तों एखाद्या अडाणी शिंप्यानें शिवलेल्या आंगरख्यासारखें झालें आहे. एक अस्तनी इतकी लांब शिवलेली आहे कीं, ती अजागळस्तनाप्रमाणें लोंबूं नये म्हणून तिच्या चुन्या घालाव्या लागतात; व दुसरी बाही इतकी तोकडी शिवलेली आहे कीं, कोपरापर्यंत हात उघडा पडतो. छातीवर अंगरखा इतका तंग बसतो कीं, बंदाचे करकोचे पडतात व काळीज दाबल्यानें प्राण जाण्याची भीति वाटते; पण पाठीमागें तो बालसंतोषाच्या झग्याप्रमाणें मोकळा असून बेबंदशाहीचा वारा त्यांतून हवा तितका खेळत असतो. "ददाति प्रतिगृण्हाति गूढमाख्याति पृच्छति । भुंक्ते भोजयते चैवं षड्विधं मित्रलक्षणम् ॥" संस्थानिक व इंग्रज सरकार यांची मैत्री सर्वच बाजूनीं अशी दुतर्फी पाहिजे व तशी असेल तरच ती खरी मैत्री. इकडे स्वतःच्या मुलखांत प्रांतिक स्वराज्य देण्यापर्यंत या इंग्रज सरकारची पाळी आली. पण संस्थानिकांनीं आपल्या प्रजेला कोणते किती हक्क दिले याची ते कधीं विचारपुस करीत नाहींत. बरें, अंतर्व्यवस्थेंत ते कधीं हात घालीत नाहींत म्हणावें तर, एकाच व्याख्यानाच्या, संस्थानी अधिकाऱ्यांनीं पाठविलेल्या व त्यांच्या गुप्त हेरांनीं दिलेल्या, रिपोर्टांत जर कानामात्रेचा फरक झाला तर हे संस्थानच्या कारभाऱ्यांना तंबी देतात! बडोद्यास दादाभाई नौरोजी हे दिवाण असतां तेथील इंग्रज रेसिडेन्ट फिरकोळ गोष्टींतहि इतका हात घालूं लागला कीं, त्या त्रासानें दादाभाईनीं दिवाणगिरीचा अखेर राजीनामा दिला असें सांगतात. बडोद्यासारख्या पहिल्या दर्जाच्या, बरोबरीच्या नात्याच्या संस्थानाची ही स्थिति! मग सांगली, भोर, मिरज, फलटण, मुधोळ, अक्कलकोट असल्या संस्थानांच्या कामांत पोलीटिकल एजं-

टाच्या उपद्व्यापाची मुळी किती खोल शिरत असेल याची सहज कल्पना होते. पण फिरून, पो. एजंट लक्ष घालतोच असें म्हणावें तर जवळच कोल्हापूरच्या हद्दींत काय चाललें आहे याची त्याला जणूं कांहीं दादच नाहीं! संस्थानच्या कारभारांत इंग्रजांनीं हात घालण्याच्या बाबतींत जाईल तेथें हत्ती जाईल, नाहीं तेथें मुंगीचाहि प्रवेश होणार नाहीं! तहनाम्यावर रचलेल्या इमानदारीची सरकारची बतावणी पाहून ' दिवा काकरवाद्भीता । रात्रौ तरति नर्मदां ' या चरणाची समस्या मार्मिक वाचकांना या प्रकरणीं पूर्ण करण्यास मुळींच कठीण नाहीं. सर्व मयसभेचाच प्रकार! संस्थानी प्रजेनें इंग्रजांच्या जामिनकीचा आधार आहे अशा समजुतीनें चालूं लागावें तों ते निराश्रयाच्या पाण्यांत पडून गटांगळ्या खाऊं लागतात. न्यायाचा दरवाजा उघडलेला आहे असें पाहून ते आंत शिरूं लागतात तों अन्यायाच्या दगडी भिंतीवर त्याचें डोकें सडकतें. पायर्णीच्या रेघेइतक्या अंतरावर खालसा मुलूख व संस्थानी मुलूख एक-मेकांना चिकटून बसला असतां, राजकीय सुधारणांच्या इकडील वादळानें संस्थानांतलें पानहि हालत नाहीं याची शरम नुसत्या संस्थानिकांना नसून ती इंग्रज सरकारलाहि आहे. तहनाम्याचे एरवीं शंभर खून होतात त्यांतच प्रजास्वातंत्र्याच्या बाबतींत फारतर आणखी एक होईल. बरें, तहनामे नांवानें संस्थानिकांशीं केले असले तरी त्या वेळीं संस्थानी प्रजा विचारांतून अगदींच वगळली होती असेंही म्हणतां येत नाहीं. संस्थानांवर जहाल टीका करणारा एखादा इसम आपल्या राज्यांत असल्यानें जर इंग्रजांना इमानदारीला धोका वाटतो तर संस्थानांतली शेंकडों किंवा हजारों प्रजा तहनाम्यांनीं जामिनकी दिली असतांही बेबंदशाहींत खितपत पडते यानें त्यांची व इंग्रजांची इमानदारी कशी बिघडत नाहीं? आपल्या डाव्या हातच्या हाऱ्यांतील एखादें फळ उष्णतेनें कुजलें तर त्याचें या दुकानदाराला संकट वाटतें, पण उजव्या हाताच्या हाऱ्यांतील सगळींच फळें कुजत आहेत असें पाहून जो तिकडे लक्ष घालीत नाहीं त्याला काय म्हणावें? कारण दोघांची विक्री होईल तरच त्याचें कर्ज फिटेल! यांत निदान सूक्ष्म विचार म्हणून तरी सरकारनें

इतका ठेवला पाहिजे होता कीं, संस्थानांतून मुद्रणस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य असतें तर मग हा नवा कायदा इकडे करणें शोभलें तरी असतें. पण या बाबतींत संस्थानी प्रजेची काय स्थिति आहे हें सांगावयास नकोच. आई-जेवावयास वाढीत नाहीं व बाप भीक मागूं देत नाहीं अशा प्रकार झाला आहे. आतां आज आपलें साधलें म्हणून कित्येक संस्थानिक रळून गेले असतील पण इकडचा वचपा तिकडे काढून देण्याची सृष्टीची रीत असल्यामुळें संरक्षणाचा कायदा मिळाला पण अब्रू आणि सहानुभूति गेली हें मात्र संस्थानिकांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. संस्थानी प्रजेलाही आमचें हेंच सांगणें आहे कीं, 'मेलें कोंबडें सुरीला भीत नाहीं;' त्यांची अधोगति होण्याची बाकीच जर उरली नाहीं तर त्यांनीं तरी अशा कायद्यानें उदास कां व्हावें? रहाटगाडग्याचें जें मडकें तळाला जाऊन पाणी प्यालें तें पुढें कांहींही झालें तरी अधिक खोल न जातां वरच येणार! इंग्रज सरकार संस्थानिकांन जितकें इमानदार आहे तितकें खालसांतील संस्थानी प्रजेचे स्नेहीही आपली इमानदारी पाळूं शकतील. आपणा दोघां प्रजाजनांत लेखी करारमदार किंवा तहनामे झाले नसले, तरी तुमचा आमचा स्नेहभावाचा व सहानुभूतीचा तहनामा त्रिकालाबाधित आहे. ज्यांनीं सगळें १२४ अ कलम खाल्लें व पचविलें ते आणखी १२४ ब किंवा क झालें तरी पचवितील. त्याची तुम्हाला काळजी नको. मात्र तुम्हीहि आपल्या योग्य हक्कांकरितां झगडण्यास तयार व्हा; व या झगड्यांत पडेल तो स्वार्थत्याग करा, म्हणजे हिंदुस्थानच्या नकाशावर जे तांबडे पिवळे रंग वेगवेगळे दिसतात ते लोपून, अखंड हिंदी प्रजेच्या डोळ्यांना मानवेल असा व जगाच्या दृष्टीनेंही शोभेल असाच एखादा नवा स्वराज्यदर्शक रंग या नकाशावर सर्वत्र दिसूं लागेल.

# अ. भा. संस्थान प्रजापरिषद

## न. चिं. केळकर यांचें भाषण

दिल्ली येथें ता. १५ सप्टेंबर १९२३ रोजीं भरलेल्या अखिल भारतीय संस्थान प्रजापरिषदेंत अध्यक्ष या नात्यानें न. चिं. केळकर यांनीं केलेलें भाषण:

प्रथम संस्थानांचे प्रतिनिधी व हितचिंतक या लोकांनीं परिषदेच्या अध्यक्षस्थानाचा मान दिल्याबद्दल आभार प्रदर्शित करून अध्यक्ष म्हणाले, 'संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याकरितां सर्व हिंदुस्थानभर चळवळ करणारी एक संघटित संस्था याच परिषदेंत आपण स्थापन कराल अशी मला आशा आहे. मी स्वतः एका संस्थानचा प्रजाजन असल्यामुळें व माझें शिक्षणहि एका संस्थानांत झाल्यामुळें संस्थानिकांबद्दल माझ्या मनांत कोणत्याहि प्रकारचा अनादर असणें शक्य नाहीं. संस्थानी कारभारावर मी आजपर्यंत टीका करीत आलों व पुढेंहि संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन होईपर्यंत मी ती करीत राहीन. पण संस्थानिकांबद्दल सद्बुद्धीनें प्रेरित होऊन मी हें करीत आहें. संस्थानांचे ऋणानुबंधी नसलेले असे जे इतर संस्थानिकांचे टीकाकार आहेत त्यांच्या मनांतहि हीच सद्भावना आहे. राज्यसंस्थांना बुडविणाऱ्या लोकसत्तेचा पूर आला असतांहि व हे संस्थानांचे अनियंत्रित सत्तेचे डाग हिंदभूमीवर मध्येंच पसरलेले किती वाईट दिसले तरी, हिंदी लोकांच्या अंतःकरणांत संस्थानिकांबद्दल एक प्रकारची उपजत पूज्यबुद्धि आहे. कारण ते गतस्वराज्याचे स्मृत्यंश होत, आणि त्यांनीं जर जबाबदारीची राज्यपद्धति सुरू केली तर सर्व प्रकारें भिन्न संस्कृतीच्या अधिकाऱ्यांपेक्षां हिंदी लोकांस ते किती तरी जवळचे आहेत. जुलमीपणानें न वागतां जर लोककल्याणेच्छेनें प्रातिनिधिक राज्यपद्धतींतील प्रमुख म्हणून ते वागतील तर त्यांस सर्वजण आनंदानें शिरसावंद्य मानतील. ब्रिटिश सरकारलाहि सुराज्याचें उदाहरण घालन देण्याची त्यांना उत्तम संधि आहे.

परंतु दुर्दैवानें पूर्वीच्या वैभवाचे अवशेषरूप असलेल्या संस्थानिकात पुष्कळ चांगल्या अंशाबरोबर अनिष्ट बीजेंहि शिल्लक राहिलीं आहेत. या अनिष्ट बीजांचें पोषण होणें हें जगाच्या दृष्टीनें घातक आहे. संस्थानें खालसा करण्याचें सत्र अखेर सत्तावन सालच्या बंडांत संस्थानप्रेमी प्रजेनें आपल्या प्राणांचे बळी देऊन थांबविलें. याबद्दल कृतज्ञता बाळगून प्रजेचें कल्याण करण्याच्या ऐवजीं तिनें मिळवून दिलेल्या अधिकाराचे जोरावर संस्थानिक लोक जुलुमाचा फांस अधिक घट्ट आंवळीत आहेत. आणि संस्थानिक-संरक्षण कायद्यानें सरकारनें त्यांस तसें करण्यास मुक्तद्वारच दिलें आहे !

हिंदुस्थानांतील संस्थानिक हे एक प्रकारें इंग्लंडांतील उमरावांसारखे होत. वैयक्तिक शौर्याबद्दल त्यांचे पूर्वजांस या वंशपरंपरा देणग्या दिलेल्या आहेत. इंग्लंडांतील उमरावांप्रमाणें संस्थानिकांकडेहि राज्यें राहावींत, पण त्याबरोबरच हें साम्य आणखी एक पायरी पुढें नेऊन असें म्हणतां येईल कीं, इंग्लंडांतील उमरावांच्या जमिनी व संपत्ति हीं कायम असलीं तरी त्यांच्या हातांत पूर्वीची राजकीय सत्ता बिलकूल राहिली नाहीं; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील संस्थानिकहि जर आपली सत्ता लोकांच्या हातीं देण्यास तयार होतील तर त्यांच्या संपत्तीचा व वैभवाचा कोणासहि हेवा वाटणार नाहीं. परंतु असें करावयाचें सोडून ते या विसाव्या शतकांत "ना विष्णुः पृथिवीपतिः" या जुन्या युगांतील तत्त्वास चिकटून राहिले आहेत.

हिंदुस्थानांत श्रीमंत जमीनदार लोक पुष्कळ आहेत व कित्येकांचें उत्पन्न संस्थानिकांपेक्षांहि मोठें आहे मुंबई, कलकत्ता या ठिकाणीं कांहीं व्यापारी लोक इतके धनाढ्य आहेत कीं, ते एखादें लहानसें संस्थानहि सहज खरेदी करून खिशांत टाकूं शकतील. पण लहानशा संस्थानिकांचा लोक जितका द्वेष करतात तितका या श्रीमंत जमीनदारांचा किंवा व्यापाऱ्यांचा करीत नाहींत. चैन व द्रव्य आणि काळ यांचा अपव्यय याबद्दल फार तर लोक या श्रीमंतांस दोष देतील. पण त्यांच्या स्वतःच्या यःकश्चित् नोकरांवर देखील त्यांनीं गैरवाजवी अधिकार गाजवला तर तो त्यांस कोर्टांत खेचूं शकतो

त्याच्याविरुद्ध असलेला असंतोष फार तर संपत्तीच्या विषम वांटणीबद्दल असूं शकेल, पण ती राजकीय स्वरूपाची चळवळ होऊं शकत नाहीं. संस्थानिकांची गोष्ट मात्र तशी नाहीं. त्यांचें वैशिष्ट्य त्यांच्या संपत्तींत नाहीं; तें त्यांच्या अनियंत्रित अधिकारांतच आहे. वाटेल तितके कर लादणें, कराचा पैसा मन मानेल तसा खर्च करणें, हवे ते दिवाणी व फौजदारी कायदे करून अमलांत आणणें, व फांशीची अगर मालमत्तेच्या जप्तीची शिक्षा देणें हे सर्व अधिकार त्यांस आहेत. यामुळें प्रजा व संस्थानिक यां-मधील झगडा आर्थिक स्वरूपाचा नसून मनुष्याच्या नैसर्गिक हक्कासंबंधाचा आहे. यांत बोलशेविझम् नसून स्वराज्याची पवित्र चळवळ आहे. संस्था-निक आणि प्रजा यांमध्यें हक्कांची योग्य वांटणी होणें हा त्यांतील मुख्य हेतु आहे.

आपल्याला परिपूर्ण राजसत्ता आहे असा आव घालण्यांत संस्थानिक आपलीच फसवणूक करून घेत आहेत. कारण केवळ नांवानें ते हिंदुस्थान सरकारचे बरोबरीचे मित्र म्हटले जात असले तरी प्रत्यक्ष व्यवहारांत संस्थानी प्रजा जितकी असहाय व परतंत्र तितकेच संस्थानिकहि ब्रिटिश सरकारचे सत्तेखालीं असहाय व परतंत्र आहेत. या परतंत्रतेचा जाच संस्था-निकांस भोगावा लागतो. या स्वानुभवावरून तरी त्यांनीं प्रजेला आपल्या अनियंत्रित सत्तेमुळें होणाऱ्या जाचाची जाणीव ठेवावी, आणि ज्याप्रमाणें ते स्वतः नरेंद्र मंडळासारख्या संस्था स्थापून ब्रिटिश सरकारशीं बरोबरी करूं पाहतात त्याप्रमाणें आपल्या प्रजेलाही त्यांनीं प्रातिनिधिक संस्थांच्या द्वारें राज्यकारभारांत हक्क दिले पाहिजेत.

प्रजेच्या या मागणीला फेटाळून लावण्याकरितां असा एक आक्षेप घेण्यांत येतो कीं, लोकसत्ता ही येथील लोकांच्या संस्कृतीशीं विसदृश आहे, पण यांत फारसा अर्थ नाहीं. सर्व देशांत नवी राजकीय चळवळ चालू आहे आणि हीं संस्थानें या देशांशीं इतकीं संलग्न झालेलीं आहेत कीं तीं निराळीं काढणें शक्य नाहीं. म्हणून त्यांतहि ही लाट पसरणें अपरिहार्य आहे.

ब्रिटिश मुलखांत काय किंवा संस्थानांत काय, मनुष्यस्वभाव हा एकच आहे. शिवाय स्वत: संस्थानिक देखील परकीय संस्कृतीचे भोक्ते बनले नाहींत काय? विलायतेंत राहण्यांत बहुतेक संस्थानिक लाखों रुपये खर्च करतात व अप-टु-डेट पाश्चात्य राहाणी मोठ्या अभिमानानें स्वीकारतात! स्वतःचा अशा रीतीनें पाश्चात्य गोष्टींकडे कल असतां प्रजेनें लोकसत्तेच्या पाश्चत्य कल्पना बाळगल्यावर तिला त्यांनीं काय म्हणून दोष द्यावा?

त्याचप्रमाणें अल्प राज्यविस्ताराची सबब अयुक्त होय. राज्यविस्तार अल्प असला तरी त्यांत त्यांना अधिकार परिपूर्ण असतात. अल्प राज्यविस्तार हा जर स्वत: संस्थानिकांच्या सत्तेस बाधक होत नाहीं तर त्याच सत्तेवरील नियंत्रणाच्या स्वरूपाच्या प्रजेच्या हक्कास त्यानें बाध कसा येणार? ज्या लहानशा राज्यांत व्यक्तिशः संस्थानिकाला पूर्ण सत्ता गाजवितां येते त्यांत प्रजेलाहि कायदेकौन्सिलच्या द्वारें सत्ता चालविण्यास काय हरकत आहे? प्रातिनिधिक संस्थेला अमुक इतका राज्यविस्तार असलाच पाहिजे किंवा लोक अमुक इतके शिकलेले व सुबुद्ध असलेच पाहिजेत असा कांहीं नियम ठरलेला नाहीं. स्वत: अशिक्षित व अडाणी संस्थानिक देखील जर आपल्याला लहर येईल तसे कायदे करतो तर त्याच्याच भोंवतीं असलेल्या प्रातिनिधिक सभेंत व्हाइसरॉयच्या कौन्सिलच्या सभासदांइतके विद्वान् सभासद नाहींत याची त्यास लाज कां वाटावी? स्वत: तो जर सर्वाधिकारास पात्र तर लोकहि कायदेमंडळाचे द्वारें कायदे करण्यास पात्रच मानले पाहिजेत.

संस्थानिकांच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत याची जाणीव सर्वांनाच आहे. कित्येकांचें उत्पन्न इतकें अपुरें आहे कीं त्यांना अधिकाऱ्यांस योग्य पगारहि देतां येत नाहीं. मोठ्या ब्रिटिश सरकारशीं तुलना करतां त्यांचा अल्प राज्यविस्तार हास्यास्पद होतो खरा, पण याला त्यांच्या राज्याच्या अल्पपणापेक्षां त्यांचा पोकळ दिमाखच जास्त कारणीभूत होतो. त्यांनीं थोडेंसें तारतम्य व उदारपणा दाखविला तर ब्रिटिश हद्दींतील पुढाऱ्यांपेक्षांहि प्रागतिक कल्पनांना योग्य रूप देण्यास ते समर्थ होतील. ब्रिटिश हद्दींत नवीन सुधारणा

प्राप्त झाल्या तरी सिव्हिल सर्व्हिस अजून आपल्या हातचा अधिकार सोडीत नसल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांत फारच थोडी सत्ता शिल्लक राहते. पण संस्थानांत असला प्रकार नसल्यामुळें ते यापेक्षां चांगलें व खरें स्वराज्य आपल्या प्रजेस देऊं शकतील.

संस्थानांतील स्वराज्याची चळवळ ब्रिटिश राज्यांतील स्वराज्याच्या चळवळीच्या मानानें अगदीं अलीकडची आहे. अजूनहि काँग्रेसमधील कित्येक लोक ब्रिटिश सरकारला संस्थानांत हात घालण्यास अधिक वाव मिळेल म्हणून संस्थानांतिल स्वराज्याचा प्रश्न हातीं घेऊं नये असें म्हणतात. पण प्रजेला जबाबदारीचे हक्क दिल्यानें संस्थानिकांना परकीय सरकारच्या नियंत्रणाचा प्रतिकार करण्यास अधिक जोर येईल असें मला वाटतें.

काँग्रेसनें संस्थानांच्या अंतस्थ कारभारांत हात घालावयाचा नाहीं असें ठरविलें आहे. तरी संस्थानांतहि ब्रिटिश मुलखाप्रमाणें राजकीय आकांक्षा उत्पन्न व्हाव्या याकरितां त्यांचा काँग्रेसमध्यें समावेश केलेला आहे. बाहेरचे लोकमतानें संस्थानी प्रजेचा पाठपुरावा आजपर्यंत पुष्कळ केला आहे, व अजूनहि तो होईल. परंतु संस्थानांतील प्रजाजनांनीं जागे होऊन स्वतःच या कामीं चळवळ केली पाहिजे. बाहेरच्या प्रयत्नांपेक्षां त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नानेंच त्यांना प्रत्यक्ष फायदा अधिक पदरांत पडेल. हे त्यांचे प्रयत्न चालू असतां सर्व हिंदुस्थानची एक संस्थानहितवर्धक संस्था स्थापून तद्द्वारा चळवळ करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. गुजराथ, काठेवाड व दक्षिण महाराष्ट्र इत्यादि ठिकाणीं असल्या चळवळीस स्वयंस्फूर्तीनें प्रारंभ झाला आहे. १९२२ च्या आगस्टमध्यें अखिल भारतीय संस्थान प्रजापरिषद मुंबईस बोलवावी याकरितां त्याच वर्षी मार्च महिन्यांत मुंबई व पुणें येथील लोकांनीं एक संस्था स्थापन केली; पुढें दिल्ली हें ठिकाण विशेष सोयीचें म्हणून १९२३ च्या जानेवारींत किंवा फेब्रुआरींत तेथें ही परिषद भरण्याचें ठरलें असतांहि प्लेगमुळें ती पुढें ढकलली गेली.

काँग्रेसच्या अधिवेशनाबरोबर ही परिषद भरवावी असें वाटणें साहाजिक आहे. पण काँग्रेसच्या घाईंत व दगदगींत या परिषदेकडे योग्य लक्ष देतां येत

नाहीं, तेव्हां ती निराळ्या वेळीं व स्वतंत्र अशीच भरविण्यांत यावी. पुढच्या फेब्रुआरी किंवा मार्चमध्यें असेंब्ली किंवा कौन्सिल ऑफ स्टेट यांच्या बैठकी चालू असतां पुनः येथेंच ही परिषद् भरवावी अशी माझी सूचना आहे. ही नवी चळवळ आहे. हिंदी संस्थान झालें तरी त्यांत वाटेल तसे राजकीय अन्याय राहूं नयेत. कारण संस्थानांतली जनता झाली तरी तिचाहि इतर जनतेप्रमाणेंच उद्धार होणें अवश्य आहे, याबद्दल माझ्याप्रमाणें आपणहि निर्धार कराल अशी मला आशा आहे."

## अखिल भारतीय
## हिंदी–संस्थान प्रजापरिषद्

१९२४ सालीं बेळगांवच्या राष्ट्रीय सभेनंतर राष्ट्रीय सभेच्या तंबूंत अखिल भारतीय संस्थान–प्रजापरिषदेचें अधिवेशन भरविण्यांत आलें. सभेस बराच प्रेक्षकसमूह असून राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष महात्मा गांधीहि हजर होते. प्रारंभीं त्यांचें प्रास्ताविक भाषण झाल्यावर, अध्यक्ष श्री. केळकर यांनीं आपलें इंग्रजी भाषण वाचून दाखविलें. त्याचा सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें—

### अध्यक्षांचें भाषण

"या सभेचें अध्यक्षस्थान देऊन माझा बहुमान केला याबद्दल मी आभारी आहें. पण त्याबरोबर मजवर आपण दुसराहि एक उपकार केला आहे. तो हा कीं, बाजूला पडलेल्या या विषयावर बोलण्याची मला आपण संधि दिली. महाराष्ट्रांतील संस्थानांसंबंधानें मला थोडीबहुत माहिती आहे. पण या प्रसंगानें इतर भागांतील, विशेषतः कर्नाटकांतील, संस्थानांविषयीं मला कांहीं अधिक माहिती मिळेल हा एक मी फायदाच समजतों. राष्ट्रीय सभेच्या आठवड्यांत ज्या अनेक लहानसान परिषदा येथें मुक्रर करण्यांत आल्या त्यांतीलच ही एक आहे. त्यामुळें तिजकडे लोकांचें लक्ष कमी प्रमाणावर लागणार हें उघड

आहे. पण राष्ट्रीय सभेप्रमाणें निवळ राजकीय असें महत्त्व या परिषदेखेरीज इतर कोणत्याहि उपांगभूत परिषदेला येत नाहीं. कारण राष्ट्रीय सभा व खालसांतील प्रजा यांचा जो संबंध स्वराज्यसंपादनाच्या दृष्टीनें आहे तोच संबंध ही आपली परिषद् व देशी संस्थानांतील प्रजा यांचा आहे. संस्थानी प्रजेची ही काँग्रेसच होय. संस्थानचा प्रश्न तीन कारणांनीं आज डोळयाआड केला गेला आहे. इंग्रज सरकार असा बहाणा करतें कीं, संस्थानिक हे आमचे दोस्त, तहवाले बरोबरीचे मित्र, त्यांच्या अंतर्व्यवस्थेंत व स्वातंत्र्यांत आम्हीं हात कसा घालावा ? म्हणून तें हा प्रश्न दृष्टीआड करतें. खुद्द संस्थानी प्रजेंत कर्तृत्वसंपन्न व स्वार्थत्यागी पुढारी फारसे लाभत नाहींत व जे थोडे लाभतात त्यांच्या पाठीवर संस्थानिकांकडून ताबडतोब तडाखा बसतो म्हणून ते हा प्रश्न दृष्टीआड करतात, व दुर्दैवानें राष्ट्रीय सभेनेंहि, तिला तसें कांहीं कारण नसतां, हा प्रश्न केवळ अनास्थेनें डोळयाआड केला आहे.

इंग्रज सरकारचें या प्रश्नाकडे दुर्लक्ष कां हें उघडच दिसत आहे. देखावा स्नेहांकित संस्थानिकांचे स्वातंत्र्यांत हात घालणें अन्यायाचें होईल असा; पण असा कानाडोळा करण्यांतच त्यांचा स्वार्थ साधतो व चैन साधते. इंग्रजांना शिकार करण्याकरितांच संस्थानें हीं राखीव कुरणें किंवा रानें ठेवलेलीं आहेत. ही शिकार वाच्यार्थाप्रमाणें लाक्षणिक अर्थानेंहि होत असते. संस्थानी जंगलांत गेल्यास चारदोन वाघ मारतां येणें हें एकाद्या गोऱ्या शिकाऱ्याला जितकें सोपें तितकेंच एकाद्या बड्या अधिकाऱ्याला संस्थानिकाच्या दिवाणखान्यांत बसून एकादा मोत्यांचा कंठा किंवा सुंदर हस्तिदंति नक्षीकाम केलेलें लांकडी सामान देणगीदाखल मिळणें सोपें असतें. खालसा प्रजेच्या सर्वस्वांवर जितका अधिकार सरकारचा चालत नाहीं तितका तो संस्थानांच्या सर्वस्वावर चालूं शकतो. सुधारलेल्या इंग्रजी राज्यपद्धतीचा रंगीत भपका लोकांना दाखवावयाला त्यामागें संस्थानांतील आंधळ्या कोशिंबिरीचा काळा पडदा सरकारला चांगलाच उपयोगी पडतो. अशा स्थितींत निजलेल्या संस्थानीं प्रजेला त्यांच्या हक्कांची जाणीव उत्पन्न करून डिवचून जागें करण्याचें

सरकारला काय कारण? खालसांतील चाललेल्या स्वराज्याच्या चळवळीची काळजी त्यांना काय थोडी झाली!

## एक खोटा बहाणा

पण इंग्रज सरकार संस्थानिकांच्या कारभारांत हात घालीत नाहीं ही गोष्ट मुळांत खरी तरी आहे काय? नाहीं. या बाबतींत जाईल तेथें हत्ती जाईल; मग तेथें तहनामे, न्यायबुद्धि हीं सर्व बाजूला राहतात; आणि मनानें नाहीं म्हटलें म्हणजे मुंगीचाहि रिघाव होण्याइतकी सरकारला जागा सांपडत नाहीं! म्हणजे एका जुन्या गोष्टींतिल "दिवा काकरवाद्बीता रात्रौ तराति नर्मदाम्" या संस्कृत म्हणीसारखें सरकारचें वर्तन असतें. संस्थानी प्रजेनें तक्रार केली म्हणजे मात्र सरकारचा हात संस्थानिकांच्या स्वातंत्र्यांत शिरत नाहीं. पण त्यांचा स्वतःचा स्वार्थ साधावयाचा असला म्हणजे मग तो हात हवा तितका खोल जातो; मग तेथें न्यायान्यायाचा प्रश्न नाहीं. तहांतील शब्दांचा अर्थ सोयीप्रमाणें हवा तसा करतां येतो. संस्थानें खालसा करावयाचीं झाल्यास नवीन कायद्याचीं तत्त्वें सुचतात; दत्तक घेऊन संस्थानाची गादी चालविण्याचा संस्थानिकांचा हक्क संपुष्टांत आणतां येतो; संस्थानिक सज्ञान होऊन त्याला मुखत्यारी देण्याची वेळ आली म्हणजे त्या संधींत स्वतःला फायदेशीर अशा नव्याच अटी लादून आपलें कल्याण करून घेतां येतें; परकीय भांडवलवाल्या रेल्वे कंपन्यांच्या फायद्याकरितां नांवापुरती अल्प किंमत देऊन संस्थानांतील जमीन हवी तशी घेतां येते; संस्थानांतील नद्यांना बंधारे घालून गांवेंच्या गांवें पाण्याखालीं बुडवून त्या तळ्यांतील पाण्यानें काढलेल्या कालव्यांनीं खालसांतील प्रजा व इंग्रज सरकारची तिजोरी यांचें कल्याण करतां येतें; बहुमूल्य अशीं संस्थानांच्या हद्दींतील खनिज द्रव्यें उकरून काढून परदेशीं लुटून नेण्याला फार थोड्या नजराण्यानें परवाने मिळवितां येतात; सर्व देशांत एकच नाणें चालणें व्यापाऱ्यांच्या सोयीचें आहे या सबबीवर नाणें पाडण्यांत होणारा संस्थानिकांचा नफा बुडवितां येतो; व विशिष्ट हक्कांचे मक्ते स्वतः घेऊन संस्थानिकांना थोड्या मोबदल्यावर संतुष्ट राहण्यास भाग पाडतां येतें!

या सर्व गोष्टी होऊं शकतात. त्यांनीं मात्र संस्थानिकांच्या अंतर्व्यवस्थेंत हात घातला असें होत नाहीं; पण संस्थानी प्रजेनें राजाविरुद्ध तक्रार केली तर ती मात्र इंग्रज सरकार हातीं धरीत नाहीं! कां तर संस्थानिकांच्या अधिकारांत हात घातल्याचें पाप लागेल म्हणून!!

व्यक्तिशः संस्थानिकांना पोलिटिकल अधिकारी कसें वागवीत असतील याची कल्पना कोणासहि सहज करतां येईल. संस्थानिकांतील किती तरी लोक एजंट किंवा रेसिडेंट पुढें दिसला म्हणजे भित्रे बावळे ठरतात. एजंट व रेसिडेंट हे बहुधा नाजुक मुत्सद्देगिरींत प्रवीण असतात, व संस्थानिक भोळा भित्रा असेल तर त्याला वश करण्याला त्यांना मुळींच पंचाईत पडत नाहीं. तो ताठर असेल तरीहि त्याची सुटका नाहीं. कारण त्याला वठणीवर आणण्याचे मुत्सद्देगिरीचे चाप किंवा कांटेलगामहि पोलिटिकल कचेरींत हमेश तयारच असतात व जरूरीप्रमाणें गुर्मी, धाकदपटशा यांचा अवलम्ब करण्यास एजंट व रेसिडेन्ट हे माघार घेत नाहींत. या दृष्टीनें पाहतां श्रीमंत संस्थानिकांपेक्षां बिचारा खालसांतील गरीब प्रजाजन अधिक बरा. स्वाभिमान रक्षावा कीं राज्य रक्षावें असा दुहेरी फांस संस्थानिकांच्या गळ्यावर अनेक वेळां पडतो. पडद्याआड काय घडतें तें बाहेर सांगण्याचीहि चोरी. एजंट व रेसिडेन्ट यांचा जाच गुप्त व सूक्ष्म असतो, पण तो सोसवत नाहीं असा होऊं शकतो. या बाबतींत संस्थानिकांची कींव येते व त्यांचेविषयीं सहानुभूति वाटते. त्यांचें दुःख कोणाला कमी करतां येणार? पण यांतच एक नतद्रष्टपणाचा विचार सुचतो तोहि बोलून दाखविला पाहिजे. तो असा कीं, संस्थानिकांना या गुप्त जाचाचें दुःख होतें खरें. पण त्यामुळें आत्मौपम्याच्या तत्त्वानुसार आपल्या प्रजेला एकतंत्री बेजबाबदार अधिकाराचें दुःख कसें होत असेल याची जरा त्यांना कल्पना करतां आली तर तें वाईटांत चांगलेंच म्हणावयाचें.

## संस्थानिकांना रीत लावा

मॉंटेग्यु—चेल्मसफर्ड रिपोर्टांत राजकीय सुधारणा करण्याविषयीं संस्थानिकांना सर्वसाधारण उपदेश केला आहे हें खरें. या सुधारणा त्यांना फार दिवस

टाळतां येणार नाहींत असेंहि त्यांत सांगितलें आहे. गव्हर्नर-जनरल हे देखील जातां जातां, कोठें कोठें, संस्थानिकांच्या या कर्तव्याचा पुसट उल्लेख करतात. पण इतर रीतीनें संस्थानिकांवर स्तुतीचीं जीं फुलें उधळण्यांत येतात त्यांत हे पुसट इशारे सहजच लोपून जातात. त्यांना दिलेल्या शाबासकीच्या नगाऱ्यापुढें ताकिदीची टिमकी ऐकूं कशी जाणार? दुसरेंहि असें कीं, संस्थानिक व हे बडे अधिकारी यांच्या भेटी क्वचित् प्रसंगीं होणार व हे प्रसंग म्हणजे पाहुणचाराचे व सत्कारसमारंभाचे. लाखों रुपये खर्चून हे समारंभ करण्यांत येतात. अशा वेळीं नावडते किंवा भानगडीचे प्रश्न काढणें हें उभय पक्षींहि सहजच अडचणीचें होतें. किंबहुना असले प्रश्न काढणें हें शिष्टाचाराच्या विरुद्ध ठरेल. आणि कोणाच्याहि झालें तरी पाहुणचारांत शिष्टाचाराचा भंग झाला तर तें चालेल असें कसें म्हणावें? पण आमची तक्रार इतकीच कीं, हे खाजगी पाहुणचाराचे समारंभ सोडून संस्थानिकांना रीत लावण्याचे इतर प्रसंग व मार्ग जे खुले असतात त्यांचाहि उपयोग सरकारकडून व्हावा तसा होत नाहीं. वसंतऋतूंत अकालीं ढग येऊन वादळ व्हावें आणि त्याच्या आनंदाचा भंग व्हावा असें कोणी इच्छिणार नाहीं. पण वसंतऋतूप्रमाणें वर्षाकाल हाहि ईश्वरानेंच मनुष्याच्या हिताकरितां नेमून ठेवला आहे; व ग्रीष्मऋतूंत सांठलेल्या कडक उष्णतेप्रमाणें प्रजेचा असंतोष वाढल्यावरहि सरकारदरबारच्या राजकारणांत ढगांनीं गर्जूं नये व विजांनीं चमकूं नये असें कोणी म्हणूं लागल्यास सर्वच ग्रंथ आटोपला! मग पर्जन्य पडणार कसा व लोकांना अन्न मिळणार कसें? तात्पर्य, सत्काराच्या वेळीं शिष्टाचार व कामकाजांत करडी शिस्त असें यथोचित धोरण इंग्रज सरकार न स्वीकारील तर संस्थानांत राजकीय सुधारणा कशा होणार!

## नरेंद्रमंडळाचा फार्स

नरेंद्र–मंडळ स्थापिलें गेलें तेव्हां वाटलें होतें कीं, त्यांत संस्थानिकांचे योग्य हक्क व प्रजेविषयीं त्यांचें योग्य कर्तव्य यांची चर्चा होऊन कांहीं तरी शिस्त लागेल. पण तेथें संस्थानिकांना अजून आपल्या योग्य हक्कांच्या चर्चेला

प्रारंभहि करतां आलेला नाहीं. व तुम्ही राजकीय सुधारणा कोणत्या करणार असा साधा प्रश्नहि सरकारनें त्यांना अजून विचारला नाहीं. नरेंद्र-मंडळ म्हणजे राजकारणाच्या कोरड्या विड्या फुंकीत बसण्याकरितां रंगवून-सजवून तयार केलेला एक दिवाणखाना, याहून त्याला अजून अधिक महत्त्व नाहीं. आज दोन वर्षें त्याचीं दारें लागलेलींच होतीं. यंदा तीं उघडून जागेचा धुरळा निघाला असला तरी तेथें काम असें थोडेंच झालें, व खऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांना हातहि लागला नाहीं. नरेंद्रमंडळ हें नांव प्राचीन, संस्कृत, कर्णमनोहर असें आहे. पण आज त्याच्या उच्चारानें त्याच्या प्राचीनत्वापेक्षां म्हणजे निरुपयोगित्वापेक्षां दुसरा कांहीं अर्थ निघत नाहीं. त्याची रचना कळत नाहीं, त्याचे नियम बनलेले नाहींत, कित्येक बडे संस्थानिक नरेंद्र-मडळांत जाऊन बसणें हें अपमानास्पद मानतात, व जे जाऊन बसतात त्यांपैकीं कांहीं सरकारचे मानसपुत्र व कांहीं बिनखटपटीनें खुशाल निवडून येणारे असे आहेत. पण माझ्या मतें पूर्वींच्या कौन्सिलबहिष्काराप्रमाणेंच नरेंद्र-मंडळावर बहिष्कार घालणें ही बड्या संस्थानिकांची चूक होत आहे. असो. या मंडळांत बिकानेरचे व ग्वाल्हेरचे महाराज हेच काय ते बडे संस्थानिक आहेत, बाकीच्यांना अव्वल दर्जाच्या महत्त्वाच्या प्रश्नचर्चेत तोलण्यासारखे नाहींत, अशा स्थितींत घोड्यांची चांगली अवलाद कशी निर्माण करावी अशासारखे प्रश्न नरेंद्रमंडळांत चर्चेला निघाल्यास त्यांत आश्चर्य नाहीं ! स्वतः जाऊन नरेंद्रमंडळांत बसल्यानें लहानमोठ्याची खिचडी होते व आपण क्षुद्रांच्या पंक्तीला बसलों असें बड्या संस्थानिकांना वाटत असल्यास स्वतः कोणाच संस्थानिकानें न जातां आपआपले दिवाण चर्चेला पाठवावेत व नरेंद्रमंडळाऐवजीं वाटेल तर मंत्रिमंडळ बनवावें. पण हा खटाटोप करण्यांत काय अर्थ ? कौन्सिलें व असेंब्ली यांत एकत्र बसणारे सभासद काय सगळेच सारख्या दर्जाचे किंवा श्रीमंत आहेत ? मग संस्थानिकानांच तेवढें खिचडीचें कुपथ्य कां वाटावें ? पण मला संस्थानिकांच्या दृष्टीनें नरेंद्रमंडळाचा फारसा विचार कर्तव्य नाहीं. या मंडळांत संस्थानी प्रजेच्या हक्कांचा जर केव्हांच

कांहींच विचार व्हावयाचा नसेल तर तें मंडळ उद्यां मोडलें तरी मला त्याची पर्वा नाहीं.

## संस्थानांतलें होमरूल

असो. हें मंडळ एका बाजूस ठेवलें तरी प्रजेच्या बाबतींत संस्थानिकांचें जें अवश्य कर्तव्य म्हणून आहे तें कोठें जाईल ? पण ही गोष्ट संस्थानिक अजीबात विसरल्यासारखे करतात. बिकानेरचे महाराज हे नरेंद्रमंडळाचे आधारस्तंभ. ते संस्थानिकांच्या हक्काबद्दल सरकारला चुरुचुरू उपदेश करतात, पण प्रजेच्या हक्काचा प्रश्न निघाला कीं, 'आम्ही प्रजेचे मायबाप, ममतेनें सर्व कारभार चालला म्हणजे झालें, त्यांत प्रजेच्या हक्कांची गोष्ट कशाला' असा सूक्ष्म भेद ते काढतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें देशी संस्थानांतून खालसापेक्षां एका अर्थानें होमरूल अधिक आहे ही गोष्ट खरी, पण संस्थानांतले राजे, दिवाण, अधिकारी हे सर्व हिंदी असतात, परके असत नाहींत, इतक्यापुरताच तो सिद्धांत खरा आहे. पण प्रातिनिधिक संस्थांच्या द्वारें आपलीं गाऱ्हाणीं बोलण्याच्या व आपल्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडवून आणण्याच्या बाबतींत संस्थानांपेक्षां खालसांतच अधिक मजल गांठली गेली आहे. कारण, इकडे आतां 'माबाप सरकार' हा जुना शब्दप्रयोग कोठेंच ऐकूं येईनासा झाला आहे व जबाबदारीचा अधिकार डोळ्यासमोर दिसतो तो पकडून हस्तगत करण्याला हिंदी प्रजेचीं बोटें आतां सळसळूं लागलीं आहेत.

बिकानेरच्या महाराजांसारखे सुशिक्षित राजेच असे बेधडक बोलूं लागल्यावर इतरेजनांची गोष्ट सांगावयासच नको. त्यांतील कित्येक अजून जुन्या काळच्या बेबंदशाहींतून जागेहि झालेले नाहींत. कित्येकांना अजून असें वाटतें कीं, आपण प्रत्यक्ष ईश्वर. त्याच्या श्वासांतून जसे वेद निघाले तसे आपल्या श्वासांतून जे कायदे व हुकूम निघतील ते प्रजेनें वेदतुल्य मानलेच पाहिजेत. कित्येकांना असेंहि वाटतें कीं, ईश्वराचा स्वर्ग व आपल्या वाड्यांतला दिवाणखाना या दोहोंत अंतर असें कांहींच नाहीं. स्वर्गांतून

उतरावें दिवाणखान्यांत बसावें; दिवाणखान्यांतून उठावें ते स्वर्गांत जाऊन बसावें. इतका घरगुती संबंध यांचा व ईश्वराचा जणूं काय आहे! तरी बरें, इंग्रज सरकार यांना पदोपदीं अधिकाऱ्यांचे धक्के देऊन व न कळत कां होईना अपमान करून यांच्या डोळ्यांत अंजन घालतेंच आहे; त्या अंजनानें तरी आपण ईश्वरतुल्य अशी जी यांची धुंदी किंवा भूल ती उतरावी अशी कोणीहि अपेक्षा करील. आपण कोण व इंग्रज सरकार कोण हें पाहून तरी ह्यांना असें वाटावें कीं, संस्थानचें राज्य झालें तरी तेथेंहि हिशेब घ्यावा लागतो व घ्यावा लागतो. प्रजा झाली तरी तिलाहि कांहीं हक्क असतील व राजाचें झालें तरी तिजविषयीं कांहीं कर्तव्य असेल. पण हें लक्षांत येईल तेव्हां! कारण अजून पहावें तों ते जुन्या वंशपरंपरेच्या धुंदींतच आहेत. परवां काठेवाडांत तिकडचे सर्व राजेरजवाडे जमून त्यांनीं लॉर्ड रेडिंग यांना मेजवानी दिली, तेव्हां जामसाहेबांनीं केलेलें भाषण वाचून कोणालाही हंसूंच येईल. त्यांनीं बहुतेक सर्वांची पूर्वपीठिका सूर्यचंद्रासारख्या किंवा रामकृष्णासारख्या देवतांपर्यंत नेऊन भिडविली. आतां आपण सर्वच आपापल्या घराण्यांचे आपापल्या परीनें अभिमानी असतों हें ठीकच आहे, व त्या दृष्टीनें जामसाहेबांच्या बडेजावीवर मला टीका करावयाची नाहीं. पण मला इतकेंच जाणवावयाचें आहे कीं त्यांची प्रजा झाली ती देखील त्यांच्याप्रमाणें ईश्वरनिर्मितच आहे. त्यांनाहि आपला मूळ पुरुष परमेश्वर आहे असा दावा सांगतां येईल. ही गोष्ट चुकून देखील त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. ईश्वराला झालें तरी त्यानें मनुष्यरूप घेतलें तेव्हांच अवतारकृत्य करतां आलें.

## हे श्रीकृष्णाचे वंशज!

काठेवाडचे कित्येक राजेरजवाडे म्हणे थेट श्रीकृष्णाचे वंशज आहेत! जणूं काय श्रीकृष्णापासून त्यांची कितवी पिढी हें नक्की सांगतां येईल. पण हें ग्राह्य मानलें तरी दुसरी एक गोष्ट त्यांनीं लक्षांत बाळगली पाहिजे कीं, स्वतः श्रीकृष्ण झाला तरी त्याचे आईबाप माणसेंच होतीं. त्याचा जन्म तुरुंगांत झाला. बाळपणीं गवळी या खोट्या नांवाखालीं त्याला दिवस कंठावे

लागले, गवळ्यांच्या घाणेरड्या मुलांच्या संगतींत त्याचे दिवस आनंदांत गेले. त्यांच्या कांबळ्यावर तो बसे, त्यांच्याबरोबर गाणें गाई, त्यांच्याबरोबर खेळ खेळे, आपल्यांतील लोणी-भाकर त्यांना देई व त्यांच्या सुखदुःखाचा आपण वांटेकरी होई. तो राजा झाल्यावरहि आपल्या खेळगड्यांना विसरला नाहीं, त्याच्या राजधानींत सोन्याचीं घरें होतीं. पण सुदामासारखा बाळपणाचा दरिद्री मित्र फार दिवसांनीं घरीं आला तेव्हां आपल्या सगळ्या बायकांच्या हांड्याकडून श्रीकृष्णानें त्याचे पाय धुवविले. व त्यानें बरोबर आणिलेल्या मूठभर पोह्यांच्या प्रसादांतील वाटा आपणाला मिळावा म्हणून त्याचें चाललेलें भांडण श्रीकृष्णानें कौतुकानें पाहिलें. पांडवांच्या घरीं यज्ञसमारंभांत त्यानें उष्टीं काढिलीं, व ज्या मानवी शिष्याला त्यानें गीतेंत सांठविलेलें उत्कृष्ट सुंदर तत्त्वज्ञान उपदेशिलें त्याच्याच घोड्यांना रणभूमीवर श्रीकृष्णानें आपल्या हातानें खरारा केला. काठेवाडी संस्थानिकांचा आद्यपूर्वज श्रीकृष्ण हा सुष्टांचा कैवारी व दुष्टांना कर्दनकाळ होता. त्यालाही कपट माहीत होतें. पण कपटाशिवाय ज्यांचा इतर रीतीनें पराभव होण्यासारखा नव्हता त्याव-रच त्यानें कपटप्रयोग केला. म्हणून मला काठेवाडी संस्थानिकांना नम्रपणें असें सुचवावयाचें कीं, त्यांना आपल्या दैवी पूर्वजांचा खरा अभिमान असेल तर त्याच्या गुणांचें त्यांनीं अनुकरण करावें. विशेषतः मनुष्यजातीविषयीं श्रीकृष्णानें बाळगलेलें प्रेम त्यांनीं आपल्या आंगीं आणावें. तसें ते न करतील तर त्यांचे प्रजाजनहि त्यांच्यापुढें धीटपणानें उभे राहून त्यांना हटकून सांगतील कीं, ज्या दैवी खाणींत तुमचा जन्म त्यांतच आम्हीहि पण जन्मलेले आहोंत. व्यर्थ आपल्या घराण्याचा बडेजाव सांगून जुलमी अधि-कारांचें समर्थन कां करतां ? शिवाय घराण्याची गोष्ट सोडली तरी कर्णानें अश्वत्थाम्याला ज्या सणसणीत शब्दांनीं उत्तर दिलें त्याच म्हणजे "दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं च पौरुषम्" या शब्दांनीं काठेवाडांतील प्रजाजन या कृष्णवंशीय संस्थानिकांचा धिक्कार करतील व खरोखरच संस्थानिकलोक यापुढचें धोरण काळवेळ पाहून योग्य असें न ठेवतील तर त्यांच्या संस्थानाची धडगत राहणार नाहीं.

## स्वावलंबन हाच खरा मार्ग

वरील विवेचनावरून हें दिसून येईल कीं, असलें इंग्रज सरकार व असले संस्थानिक यांच्यावर विसंबून राहिल्यानें संस्थानी प्रजेला स्वराज्य मिळण्याची आशा नको. प्रारंभीं व शेवटीं त्यांना स्वतःच्या पायावरच खंबीर उभें राहिलें पाहिजे. काँग्रेसवाले व स्वराज्यवादी वगैरे लोकांवरहि त्यांनीं भार टाकून बसण्यांत अर्थ नाहीं. विलायतेंतील पार्लमेंटरी पक्षावर हिंदी लोकांनीं अवलंबून राहण्यासारखेंच तें भ्रामक होईल. कांहीं गोष्टी केवळ प्रतिनिधीद्वारा होत नसतात; स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं ही म्हण प्रसिद्ध आहे. बाहेरून लोक मदत देतील, नाहीं असें नाहीं. पण भोजनांत जसें तिखट तशीच ही बाहेरची मदत केवळ उत्तेजनार्थ होय. कुस्ती पाहण्यास जमलेले लोक शाबास म्हणून टाळ्या वाजवितील किंवा पंच जवळ उभे राहून कुस्ती बरोबर नियमांप्रमाणें चालली आहे व तींत कांहीं वेडावांकडा प्रकार होत नाहीं एवढेंच फार तर पाहतील; पण कुस्ती जिंकण्याला जें शरीरबल, जो जोर, व जी ईर्षा लागते ती स्वतः पहिलवानाचीच पाहिजे. संस्थानी प्रजेला बाहेरून सल्लामसलत व सहानुभूति मिळेल, पण संकटें आलीं तरी तीं सोसून त्यांनीं आपलें भांडण आपणच भांडलें पाहिजे. खालसांतील लोकांना संकटें सोसावींच लागलीं आहेत. स्वराज्य फुकट किंवा स्वस्तहि मिळत नसतें. सभा भरविण्याचाच प्रश्न घेऊं. आजवर संस्थानी प्रजाजनांनीं बाहेरून बाहेरून सभा भरविल्या, पण यापुढें त्यांनीं त्या स्वतःच्या संस्थानांतच भरवाव्या, व बंदीचे हुकूम अयोग्य असतील तर ते खुशाल मोडावेत; पण सुज्ञ संस्थानिक सहसा इतक्या थराला गोष्टी नेत नाहींत व असा एकादा संस्थानिक भेटल्यास प्रजेनेंहि त्याला संभाळून घेतलें पाहिजे. कारण त्यानें खुषीनें सभा भरवूं दिल्या तरी पोलिटिकल अधिकारी त्याबद्दल त्यांना जाच करतात. संस्थानिकांची स्थिति अडकित्त्यांतील सुपारीसारखी असते हें प्रजेनें ध्यानांत धरलें पाहिजे. म्हणून संमतीनें किंवा हट्टानें संस्थानाच्या हद्दींत सभा भरविली असतां तेथें इंग्रज सरकारावर टीका किंवा आपल्या अगर परकी संस्थानिकांची व्यक्तिशः निंदा करूं नये, किंवा बेजबाबदार आचरट वक्ते उभे

करूं नयेत. सर्वसामान्यरीत्या प्रजेचे हक्क काय आहेत याची चर्चा किंवा स्वतःच्या संस्थानांतील खातेवार कारभारावरील टीका एवढा विषय सभेला योग्य व पुरेसा असतो. एकादा संस्थानिक जर असें ह्मणेल कीं, सभा भरवा पण माझ्या स्वतःच्या संस्थानाशिवाय इतर गोष्टी येथें काढूं नका, तर त्यानें आणखी अधिक काय करावें ? उलट, एकादा नाठाळ संस्थानिक भेटला व अशाहि अटींवर सभा भरवूं देत नाहीं म्हणाला तर भाषणस्वातंत्र्य व संगतिस्वातंत्र्य यांचे हक्क बजावण्याकरितां, पण तेवढ्याचपुरता, सत्याग्रहाचा अवलंब केल्यास अशा संस्थानिकाला त्याप्रसंगीं तें तर योग्य उत्तर ठरेलच पण या प्रयोगानें त्याची जन्माची खोडहि निघून जाईल.

संस्थानी प्रजाजनांनीं असें केल्यास त्यांना बाहेरून मदत व सहानुभूति मिळेल. राष्ट्रीय सभा द्यावी तितकी मदत देत नाहीं, ही त्यांची तक्रार मला न्यायाची वाटत. देशी संस्थानांच्या खातेवार कारभारांत राष्ट्रीय सभेनें मन घालूं नये हें ठीक आहे. तसें न केल्यास अनवस्था होईल. पण हल्लीं संस्थानें जिल्हावार वांटून दिलीं आहेत व संस्थानी प्रजेला कॉंग्रेस कमिट्यांचे सभासद व राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि होतां येते व हा हक्कही बजावला जातो. असें असतां राष्ट्रीय सभेंत दरसाल संस्थानी प्रजेच्या स्वराज्याविषयीं निदान एखादा सर्वसाधारण ठराव राष्ट्रीय सभेनें कां करूं नये हें समजत नाहीं. तसें झाल्यास कॉंग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांचीं या विषयावर भाषणें होतील व संस्थानी प्रतिनिधी भाषणें करतांना उदाहरणादाखल त्या सालांतील आपले अनुभव सांगूं शकतील. पण आज दोनतीन वर्षें राष्ट्रीय सभेच्या वर्किंग कमिटीनें या विषयावर स्वतःचा म्हणून एकहि ठराव पुढें आणला नाहीं. महात्माजींच्या भाषणांत आलेला संस्थानविषयक उल्लेख अपुरा असल्याचें त्यांनींच आपणांस सांगितलें आहे. हल्लींच्या काळांत महात्माजींना अनाथांचे वाली असें नांव मिळालें आहे व तें योग्य आहे. म्हणून अनाथ संस्थानी प्रजेबद्दलहि त्यांनीं मधून मधून उद्गार काढावेत. खुद्द राष्ट्रीय सभेंतच असे कांहीं पुढारी आहेत कीं, संस्थानिक किंवा राजा म्हटला म्हणजे ते आदरबुद्धीनें मान खालीं घालून मूक बनतात. स्वतः राजापेक्षां त्यांच्या प्रतिष्ठेची काळजी

जणूं काय यानांच अधिक आहे; पण ही त्यांची अतिशयोक्ति आहे. संस्थानें शिल्लक, शाबूत व जिवंत रहावीं, संस्थानिकांना योग्य तो मान मिळावा, असेंच म्हणणारांपैकीं मी एक आहें. नकाशांत संस्थानाच्या मुलखावर सरसकट तांबडा रंग फासावा हें मत मला अत्यंत त्याज्य वाटतें, पण संस्थानें जिवंत राहावीं किंवा न राहावीं हें संस्थानिकांच्याच हातचें आहे ! त्यांना आपली दौलत व आपली इभ्रत सांभाळावयाची असेल तर त्यांनीं काळाकडे नजर देऊन योग्य त्या सुधारणा केल्या पाहिजेत.

## अलिजाबहादूर माधवराव शिंदे यांचा मृत्यु

हिंदुस्थानांतील देशी संस्थानांत ग्वाल्हेर संस्थानाचा नंबर बराच वरचा लागतो. त्या संस्थानाचें क्षेत्रफळ २६ हजार चौरस मैल असून लोकसंख्या सुमारें ३२ लक्ष आणि वसूल २ कोटी १० लक्ष आहे. ग्वाल्हेर संस्थानचे अधिपति ले. जनरल आलिजा बहादूर सर माधवराव शिंदे हे थोडेच दिवसांपूर्वी लॉर्ड रेडिंगसाहेबांबरोबर विलायतेस जाण्यास निघाले. पण वाटेंतच त्यांची प्रकृति बिघडून औषधोपचाराकरितां ते फ्रान्समध्यें राहिले. तेथें त्यांच्यावर दोन वेळां शस्त्रप्रयोग करण्यांत आला, परंतु त्यांचें काळपुळीचें दुखणें अधिकच विकोपास जाऊन शुक्रवार ता. ५ रोजीं फ्रान्समध्यें पारीस शहरीं त्यांचा अंत झाला. ही अत्यंत दुःखदायक वार्ता ऐकून ग्वाल्हेर संस्थानाच्या प्रजेप्रमाणेंच सर्व महाराष्ट्रीयांसहि हळहळ वाटल्यावांचून राहणार नाहीं.

ग्वाल्हेर संस्थान महाराष्ट्रापासून इतक्या दूर अंतरावर असलें तरी शिंदे घराण्याचा पेशवाईशीं अत्यंत निकट संबंध असल्यामुळें महाराष्ट्रीयांना त्या संस्थानाविषयीं आपलेपणा वाटत असतो, व त्यामुळेंच अलिजाबहादूर माधवराव शिंदे यांच्या प्रत्येक सत्कृत्याचें महाराष्ट्राकडून कौतुकच केलें जात असे. श्रीमंत माधवराव शिंदे यांचा जन्म ता. २० ऑक्टोबर १८७६ रोजीं

झाला. ता. २१ जून १८८६ रोजीं ते गादीचे मालक झाले आणि १८९४ सालीं त्यांस मुखत्यारी मिळाली. त्या वेळेपासून सुमारें ३२ वर्षें ते आपल्या संस्थानाचा कारभार कुशलतेनें चालवीत होते. कारभाराच्या सोईकरितां त्यांनीं ९ मंत्र्यांचें एक मंत्रिमंडळ नेमलें असून त्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानें ते राज्यकारभार पहात असत. या शिवाय मजालस-इ-आम आणि मजलिस-इ कानून अशीं दोन सल्लागार मंडळेंहि त्यांनीं बनविलीं आहेत. तथापि संस्थानांतील प्रत्येक बारीकसारीक कामाकडे स्वतः लक्ष देणारा व इतका निरलस संस्थानिक सबंध हिंदुस्थानांत क्वचितच आढळेल. अलीकडे संस्थानांतील जुलमांस एक प्रकारें ऊतच आला आहे; परंतु ग्वाल्हेर संस्थानांत राजा व प्रजा यांचे संबंध अत्यंत सलोख्याचे होते.

श्रीमंत अ. ब. माधवराव शिंदे यांना लष्करी विद्येची आवड लहानपणापासून असून तींत ते चांगले तरबेज होते. त्यांचा स्वभाव धाडसी असल्यामुळें चीनमधील बॉक्सर लोकांच्या बंडाच्यावेळीं ते स्वतः चीनमध्यें गेले व त्या कामगिरीबद्दल त्यांना केसर-ई-हिंदचें पदक मिळालें. एडवर्ड बादशहांच्या राज्यारोहणाकरितां ते विलायतेस गेले असतां त्यांना तेथील विश्वविद्यालयांनीं एल. एल. डी. ची पदवी दिली. ब्रिटिश सरकाराकडून त्यांस जी. सी. एस. आय., जी. बी. ई. वगैरे अनेक बडे किताब वेळोवेळीं मिळाले असून हिंदी लष्करांत ते ऑनररी लेफ्टेनंट जनरल होते.

महायुद्धाचे वेळीं माधवराव शिंदे यांनीं २० लक्ष रुपये खर्च करून 'लॉयल्टी' नांवाचें एक 'हॉस्पिटल शिप' तयार करून दिलें. शिंदे सरकाराच्या खड्या सैन्यांत २०५९ स्वार व ५३५६ पायदळ असून त्याबरोबरचा त्यांचा तोफखानाहि नांवाजण्याजोगा आहे. या सैन्यांतला बराचसा भाग महायुद्धांत फ्रान्स, इजिप्त, मेसोपोटेमिया, सालोनिका वगैरे भागांतील रणांगणावर गेला व तेथें त्यानें आपलें नांव गाजविलें. या शिवाय त्यांच्या संस्थानांतून ४००० रंगरूट सरकारास मिळाले. महायुद्धाप्रीत्यर्थ शिंदेसरकारास साडे तीन कोटींचा बुडीत खर्च आला असून साडेचार कोटींचें कर्ज त्यांनीं सरकारास दिलें आहे.

पुणें शहरीं श्रीशिवाजी महाराजांचें प्रचंड स्मारक करण्याची जी कल्पना निघाली होती तिला श्रीमंत माधवराव शिंदे यांची सहानुभूति व सहाय्य होतें. परंतु त्या स्मारकाविषयींचें त्यांचें उदार व सर्वसंग्राहक धोरण येथील संकुचित वृत्तीच्या सत्यशोधक पक्षाला न खपून त्यांनीं शिंदेसरकारावर शिव्यांची लाखोली वाहिली व स्मारकाच्या सत्कार्यांत विघ्न उपस्थित केलें.

हिंदुस्थानच्या व्यापक प्रश्नावर हिंदी संस्थानिकांचेंहि मत हिंदुस्थानसरकारनें घेतलें पाहिजे असा पूर्वीपासून श्रीमंत माधवराव शिंदे यांचा आग्रह असून सुधारणा अमलांत आल्यानंतर नरेंद्रमंडळाची स्थापना करण्याच्या व संस्थानिकांचीं गाऱ्हाणीं नरेंद्रमंडळापुढें आणण्याच्या कामीं त्यांस बरेंच यश आलें. नरेंद्रमंडळांत बसणें आपणास अपमानकारक आहे असें मानून त्यावर बहिष्कार घालण्यापेक्षां त्यांत शिरून त्याला इष्ट असें वळण द्यावें हाच मार्ग अलिजाबहाद्दरांनाहि मान्य झाल्यामुळें त्यांनीं नरेंद्रमंडळाच्या घटनेकडे विशेष लक्ष पोंचविलें होतें. व ते आणखी कांहीं वर्षें जगते तर त्यांनीं नरेंद्रमंडळास बरेंच व्यवस्थित व प्रातिनिधिक स्वरूप दिलें असतें. शिंदे—घराण्याचा होळकरांच्या घराण्याशीं पूर्वीपासूनच निकट स्नेहसंबंध असून कै. तुकोजीराव होळकर हे शिंदेसरकारास एका नाजुक प्रसंगीं उपयोगी पडले होते. व तो उपकार लक्षांत वागवून श्रीमंत माधवराव यांनीं नुकतीच त्याची सव्याज फेड केली असावी असा कित्येकांचा तर्क आहे.

देशांतील औद्योगिक चळवळीकडेहि श्री. माधवराव यांचें लक्ष असून त्यांनीं आपल्या संस्थानांत अनेक कारखानदारांना व तज्ज्ञांना आश्रय दिला होता व आपल्या संस्थानांतील देशी उद्योगधंदे वाढविण्याकरितां अनेक सवलती देण्याची त्यांनीं तरतूद केली होती. टाटांच्या पोलादाचे कारखान्यावर आपत्ति ओढवली असतां त्यांनीं त्या कंपनीला एक कोटि रुपयांचें कर्ज देऊन त्या कंपनीच्या जीवावरचें अरिष्ट टाळण्यास हातभार लावला; हा त्यांचा देशी उद्योगधंद्यांवर मोठाच अनुग्रह होय.

विलायतेस जाण्यापूर्वी संस्थानांतील कारभार पाहण्यासाठीं त्यांनीं आपल्या थोरल्या राणीसाहेबांस रीजंट नेमून त्यांच्या मदतीस मंत्रिमंडळ दिलें होतें.

ग्वाल्हेरचे युवराज श्रीमंत जयाजीराव महाराज हे अल्पवयी असल्याकारणानें ते वयांत येईपर्यंत कारभार चालविण्याची जबाबदारी ह्या राणीसाहेबांवरच पडणार आहे. महाराजांच्या मृत्यूनें त्यांच्यावर मोठाच दुर्धर प्रसंग ओढवला आहे. तथापि आपल्या प्रजेच्या सहानुभूतीनें आपलें रीजंटचें काम उत्तम रीतीनें संभाळून शिंदे घराण्याचा लौकिक त्यांच्या हातून अबाधित राखला जाईल अशी आशा आहे. नुकतेंच अधिकारारूढ झालेले श्रीमंत जयाजीराव महाराज हे सज्ञान होऊन मुखत्यारीनें आपल्या राज्याचा कारभार कधीं पाहूं लागतील याचीच ग्वाल्हेर संस्थानचे प्रजाजन व महाराष्ट्रीय औत्सुक्यानें वाट पहात राहतील.

फ्रान्समध्यें श्रीमंत माधवराव यांची प्रकृति विकोपास जातांच धाकट्या राणीसाहेब व त्यांच्या बरोबरची शितोळेप्रभृति सरदार मंडळी फ्रान्समध्यें जाऊन दाखल झाली व त्यांच्याच हस्तें कै. श्रीमंत माधवराव यांचा अंत्यविधि हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें उरकण्यांत आला. श्रीमंत सयाजीराव महाराज हेही त्या प्रसंगीं मुद्दाम हजर राहिले होते. श्रीमंत माधवराव यांचा शेवट त्यांच्या प्रजाजनापासून इतक्या दूरवर आकस्मिक रीतीनें व्हावा हा मोठाच अनिष्ट योगायोग होय. परंतु ईश्वरी इच्छेपुढें इलाज चालत नाहीं असें जाणून त्यांच्या कुटुंबियांनीं व प्रजाजनांनीं आपलें शांतवन करून घेतलें पाहिजे.

## इंदूरच्या राज्यावरचें संकट

इंदूर संस्थानचे अधिपति श्री. महाराज तुकोजीराव होळकर यांच्याविषयीं मुमताज बेगम प्रकरणांत जो संशय उपस्थित झाला त्याची चौकशी करण्याकरितां पांच न्यायाधीशांचें कमिशन नेमण्याचा सरकारी ठराव झाला असून चौकशीच्या कामाला लवकरच सुरुवात होईल. एका अर्थानें प्रत्यक्ष कमिशन नेमून उघड चौकशी होण्यापर्यंत मजल येऊन ठेपली हें बरेंच

झालें. विस्तव न पेटतां नुसता धुमसत राहिल्यानें आजूबाजूला सर्वत्र धूर पसरतो, आणि नाकाला व्यर्थ घाण घेत बसावें लागून डोळ्यांनाहि पीडा होते. याकरितां जोराचा फुंकर घालून कोणीहि ज्वाला पेटविली तर त्या प्रसंगीं ही आग भडकविणारादेखील आग मुळांत समूळ विझविणाऱ्याइतकाच उपकारकर्ता ठरतो. कारण विस्तव पुरा विझला तरी एक बरें, किंवा 'दाह्याभावात् न खेदात्' इत्यादि वचनाप्रमाणें ज्वाला पुरी पेटून आतां जळण्याला कांहीं उरलें नाहीं असें होऊन आगीचा उपशम झाला तरीहि ती गुदमरविणाऱ्या धुराच्या संकटांतून मुक्तताच होय! मुंबई हायकोर्टांतील खटला संपला, प्रिव्ही कौन्सिलचें अपील नामंजूर झालें, आणि बावलाच्या खुनाकरितां जे कोणी फांसावर चढावयाचे ते चढून ज्यांना तुरुंगवासाची शिक्षा सांगण्यांत आली त्यांची रवानगी तुरुंगाकडे झाली. या गोष्टींनीं या प्रकरणाचा पूर्वार्ध संपला खरा; परंतु, या प्रकरणीं न्यायसभेंत महाराजांच्या नांवाची जी कुणकुण मधून मधून निघत होती, व त्या कुणकुणीचा नगारा बाहेर लोकांत कित्येक वर्तमानपत्राच्या द्वारें जो पिटला जात होता, त्यामुळें सामान्य तिऱ्हाईत माणसाला देखील या प्रकरणाचा एकदाचा कायमचा शेवट लागत नाहीं ही गोष्ट मोठ्या अडचणीची, मानसिक अस्वस्थतेची, आणि वरील दृष्टांतांतील धुराप्रमाणें गुदमरविणारी अशी झाली होती. वास्तविक या प्रकरणांचा निकाल लागल्यानें तिऱ्हाइताला प्रत्यक्ष लाभ किंवा हानी कोणती? कोणतीच नाहीं. पण कोणत्याही महत्त्वाच्या सार्वजनिक प्रश्नावर आपणाला निश्चयात्मक होय किंवा निश्चयात्मक नाहीं असें उत्तर देतां न येणें यानें मनाला असमाधान वाटत असतें. तिऱ्हाइताची जर ही स्थिति तर स्वतः महाराजांच्या मनाची या अवधींत काय स्थिति झाली असेल तिची कोणासही सहज कल्पना करतां येईल.

असो. चौकशी करण्याकरितां कमिशन नेमण्याची योजना सरकारनें केली व चौकशीच्या आव्हानाचा स्वीकारही महाराजांनीं केला, यामुळें बावला-खुनाच्या खटल्याच्या उत्तरार्धाला आतां खरा प्रारंभ झाला आहे. मुंबई येथील न्यायकोर्टामध्यें खटला चालू असतां इंदूरच्या महाराजांचें नांव क्वचित्

कोठें कोठें पुढें आलें. परंतु खून करणाऱ्या अपराध्यांना महाराजांचा आश्रय होता किंवा त्यांनीं चिथावणी दिली असा प्रत्यक्ष पुरावा पुढें आला नाहीं. कित्येक वेळां असेंहि दिसलें कीं, हकीकतीच्या ओघानें महाराजांचें नांव पुढें येत असतां, त्यांच्याविरुद्ध पुरावा दाखल करण्याचें हें स्थान नव्हे अशा समजुतीनें किंवा संकेतानें, आगीवर माती टाकून आग दडपावी त्याप्रमाणें, वकील व न्यायाधीश यांनीं महाराजांशीं संबंध जोडूं पाहणारे पुराव्याचे धागे मध्येंच तोडले. आणि ज्याअर्थी महाराज हे आरोपी म्हणून कोर्टांत हजर नव्हते त्याअर्थी त्यांच्या गैरहजेरींत त्यांचेविरुद्ध पुरावा दाखल होऊं न दिला ही गोष्ट न्यायाचीच झाली. परंतु अशानें ह्या प्रकरणाचा महाराजांसंबंधीं निकाल कायमचा लागत नव्हता. लोकांच्या दृष्टीनें महाराज यांतून सर्वस्वी दोषमुक्त होऊन निघाले असें वाटणें शक्यच नव्हतें. आणि मुमताज बेगमनें तर मुंबई मॅजिस्ट्रेटपुढें, महाराजांचें प्रत्यक्ष नांव घालून दिलेला अर्ज निकालांत निघावयाचाच होता. अर्थात् हें प्रकरण कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें उमटल्याशिवाय राहणार नाहीं असें सर्वांसच वाटत होतें व त्याप्रमाणें घडूनहि आलें. पण हें प्रकरण सरकारनें इतके दिवस लोंबत ठेवणें योग्य नव्हतें. कारण, असल्या आरोपाच्या चौकशीची तलवार मानेवर रात्रंदिवस लोंबत राहिल्यानें कोणाच्याहि जिवाला काळजीचें दुःख होत राहणार! दरम्यानच्या अवधींत, गुप्त पोलिसांचा सुळसुळाट संस्थानांत झाल्यानें महाराजांखेरीज इतर लोकांनाहि तें संकटच वाटत असलें पाहिजे. असो, लॉर्ड रेडिंग हे आपला अधिकार सोडून परत जाण्याच्या तयारीला लागल्यानें तरी हें प्रकरण लवकर निकालाला निघणार हें पाहून समाधान होतें.

महाराजांवरील आरोपाचें निराकरण होण्याचे मार्ग दोन; एक चौकशी होऊन निरपराधी ठरून. आणि दुसरा, मुळींच चौकशी न होतां प्रकरण संपलें असें म्हणून सरकारनें त्यावर तसा शेरा मारून. परंतु दुसऱ्या रीतीचा निकाल हा खरा निकालच नव्हे. कारण लोकांचे मनांतील अंदेशा, खरा खोटा कां होईना, पण तसाच राहणार. शिवाय मुमताझ बेगम ही कोणी कशी कां असेना, तिनें आपणास न्याय मिळण्याकरितां कोर्टाकडे केलेला

अर्ज केवळ महाराज हे मोठे संस्थानिक किंवा राजे एवढ्या सबबीवर फेटाळून लावणें अन्यायाचें झालें असतें. मानलेला अपराधी हा कितीहि मोठा असला तरी त्याचाहि इन्साफ म्हणून होण्याचा कांहींना कांहीं तरी मार्ग सुप्रतिष्ठित न्यायपद्धतींत असलाच पाहिजे. महाराजांनीं आपल्या इच्छेनें राज्यपद सोडून दिलें तर कदाचित् ही चौकशी टळण्याचा संभव आहे किंवा होता असें कित्येकांना वाटतें. परंतु असल्या संन्यासानें पापाची निष्कृति होत नाहीं, फिर्यादीस न्याय मिळत नाहीं, आणि महाराजांविषयींचें लोकमत निवळूं शकत नाहीं– झाला तर उलट लोकांचा असाच ग्रह दृढ झाला असता कीं महाराजांनीं गुन्हा केल्याची जाणीव त्यांच्या मनाला डांचत आहे, स्वतःला निरपराधी ठरवण्यासारखा त्यांचेजवळ पुरावा नाहीं, आणि त्यागानें कोणाचें निरपराधित्व सिद्ध होत नसतें. अर्थात् खऱ्या धैर्याचा व स्वाभिमानाचा मार्ग म्हटला म्हणजे चौकशीला तोंड देणें हाच होय. आणि कायदेपंडितांचा सल्ला तसाच पडून महाराजांनीं चौकशी करून घेण्यास संमति दिली ह्या गोष्टीनें त्यांच्याविषयीं प्रारंभीं तरी कोणासहि सहानुभूतीच वाटेल.

पण चौकशी करावयाची ठरल्यावर ती कोणी, कशी करावी हा प्रश्न शिल्लक उरतो. इंदूर शहरीं किंवा खुद्द पुण्यासहि ह्या प्रकरणीं ज्या सभा झाल्या त्यांमध्यें, कमिशनची म्हणजे न्यायकोर्टाची घटना कशी असावी ह्या महत्त्वाच्या मुद्यावर चर्चात्मक किंवा विधायक असा ठराव न होतां, प्रत्यक्ष चौकशीचा नुसता निषेध करणारे किंवा मुख्य मुद्दा टाळून आड-मुद्यावर वाद नेणारे ठराव झाले. त्या योगानें महाराजांस मदत होईल असें आम्हांस वाटत नाहीं. इंदूर शहरांत इंदूरच्या लोकांनीं चौकशीचा निषेध करणारा नुसता ठराव करावा ह्यांत आमच्या दृष्टीनें कांहींच स्वारस्य नाहीं. आणि दिवाणांनीं हें थांबवण्याचा हुकूम दिला त्याला वरवर पाहतां दडप-शाहीचें स्वरूप असलें तरी, “मी चौकशीस तयार आहें” असें महाराज म्हणण्यास सिद्ध झाल्यावर त्यांची चौकशीच होऊं नये हें म्हणणें हास्यास्पद होय. असो, महाराज चौकशीला तयार झाल्यावर कमिशनची घटना कशा प्रकारची असावी एवढाच प्रश्न शिल्लक उरतो, व त्यासंबंधानें मात्र आमचें

म्हणणें असें आहे कीं, ह्या घटनेंत सरकारच्या पोलिटिकल खात्याचा ज्यांत यत्किंचितहि संबंध पोंचूं शकणार नाहीं किंवा पोंचल्याचा संशय येणार नाहीं अशीच ती घटना असावी. चौकशीला तयार झाले तरी महाराज ही कोणी सामान्य व्यक्ति नाहींत. कसेंहि झालें तरी ते सर्व सत्ताधीश असे राजे आहेत. पूर्वीचे तह व करारमदार ह्यांच्या योगानें बादशहांच्या प्रतिनिधींच्या बरोबरीचा त्यांचा दर्जा आहे. आणि ह्या दृष्टीनेंच आरोपित महाराजांचाहि दर्जा ठेविला गेला पाहिजे. मॉंटेग्यु-चेम्सफर्ड रिपोर्टामध्यें अशा कमिशनांची घटना दिग्दर्शित केली गेली असली तरी, ती सर्व राजेलोकांनीं मान्य केली आहे कीं नाहीं हें रीतसर प्रसिद्ध झालेलें नाहीं. अशा स्थितींत सरन्यायाधीश नेमणें तो हिंदुस्थानसरकाराशीं संबंध नसलेला सर्वस्वी स्वतंत्र असा एकादा युरोपियन ( पण इंग्रज नव्हे ) असा कायदेपंडित असावा; व शक्य तर 'लीग ऑफ नेशन'च्या कायदेमंडळापैकीं तो असल्यास फारच चांगलें. कारण या कामीं फिर्यादीला न्याय मिळण्याची जितकी आवश्यकता तितकीच महाराजांना न्याय मिळण्याचीहि आहे.

महाराजांवरील कमिशनमध्यें सरकारी नोकरींतील एक पोलिटिकल अधिकारी न्यायाधीश म्हणून बसणार या गोष्टीचा तर त्यांतल्या त्यांत विशेष जोरानें निषेध केला पाहिजे. न्यायाच्या कामांत पोलिटिकल अधिकारी कशाला? त्या ठिकाणीं बसल्यानें दुधांतील मिठाच्या खड्याप्रमाणें तो न्यायाचें दूध नासून टाकील, किंवा मैदानांतील सराटयाप्रमाणें न्यायाच्या पावलांना बोंचबोंचून रक्त काढील. दोन हायकोर्टाचे न्यायाधीश व दोन संस्थानिक यांचीं मतें वेगवेगळीं पडलीं असतां, या एकेरी विजातीय व राजकारणी दृष्टीच्या व्यक्तीकडे न्यायाचें पारडें फिरविण्याचें काम जाणार; व मग तो तें कोणत्या दृष्टीनें करील याविषयीं सांगावयासच नको. हायकोर्टाचे न्यायाधीश हे परके असले तरी त्यांना स्वतंत्र विचाराची थोडी तरी सवय नेहमींची असते, व ते चौफेर न्याहाळूं तरी शकतात. पण पोलिटिकल अधिकारी म्हणजे, डोळ्यांच्या बाजूला झापणें लावलेला आणि व्हाइसरॉय

साहेबांच्या हातीं लगाम दिलेला असा घोडाच होय! न्यायसभेंत पोलिटिकल अधिकाऱ्याचा प्रवेश होऊं देणें म्हणजे विश्वासानें निद्रा घेण्याच्या खोलींत सापाला येण्याकरितां बीळ मुद्दाम राखून ठेवण्यासारखें आहे. बरें, कमिशनचा निकाल झाल्यावर त्याची अखेर अंमलबजावणी करणें हें सरकारच्या हातीं राहणारच आहे. मग खुद्द न्यायसभेंतहि आपला प्रतिनिधि घुसविण्याचा आग्रह सरकारनें कां धरावा? रखवालदारांत मिसळून रखवालदार, व चोरांत मिसळून चोर असा दुतर्फी डाव साधण्याचा सरकारचा हा बेत असेल; पण तो कोणाच्याहि न्यायबुद्धीला पटण्यासारखा नाहीं.

कमिशनची बैठक इंदुरास न भरतां बाहेर कोठें तरी किंबहुना दिल्लीस भरेल असा अजमास आहे. कित्येकांच्या मतें यांत महाराजांना खर्च पुष्कळ पडून त्यांची एकप्रकारें अप्रतिष्ठा होणारी आहे; पण याविषयीं आमचें मत थोडें वेगळें आहे. तें असें कीं, खर्च लक्षांत घेण्याचें आतां कारण नाहीं जेथें एक कोटी तेथें दोन कोटी! जुने लहरी राजेलोक शेणामेणाच्या बाहुला–बाहुलीच्या लग्नालाही इतका खर्च करीत असें म्हणतात. आणि हें तर जीवंत 'बावला–बावलीचें' चुरशीचें लग्न! बरें, ज्या राजधानींत राजे म्हणून श्रीमंत तुकोजीराव हे वागले त्याच आपल्या राजधानींत त्यांच्या इन्साफाचें काम चालावें, आणि प्रजाजनांनीं तो प्रसंग रोज डोळ्यांनीं पहावा, व त्याच अप्रिय कथेची रोज चर्चा करावी यांत तरी महाराजांना भूषणास्पद असें काय आहे? आमचें तर असें स्पष्ट मत आहे कीं, ही चौकशी संस्थानाच्या बाहेर झालेलीच बरी. पूर्वीं लढाईवर जाण्याला बाहेर पडण्याचा होळकरांना जो प्रसंग तोच एका दृष्टीनें श्रीमंत तुकोजीरावमहाराज यांजवर आज आहे. त्यांना न्याय मिळविण्याकरितां प्रतिपक्षाशीं झुंजण्याला बाहेर पडावयाचें आहे. आणि या चौकशींत ते निर्दोषी ठरले किंवा लोकांच्या दृष्टीनें ते निर्दोषी ठरण्याइतकी बचावाची बाजू रंगली गेली तर त्यांना परत राजधानींत आनंदानें व अभिमानानें येतां येईल व लोकहि त्यांचें त्या समयाला उचित असें स्वागत केल्याशिवाय राहणार नाहींत. उलट दुर्दैवानें

त्यांना आपलें निरपराधित्व सिद्ध करतां आलें नाहीं तर मलिन मुखानें परत येऊन प्रजेला दर्शन देणें त्यांना अवघडच वाटेल, व मग कोणी परत चला म्हटलें तरी त्यांनीं राजधानीला येऊं नये हेंच उत्तम.

इंदूर संस्थानावर तेवीस वर्षांपूर्वी जो एक दुःखद प्रसंग आला होता त्याची आठवण आज झाल्याशिवाय रहाणार नाहीं. तो प्रसंग असा कीं, हल्लींच्या महाराजांचेच वडील कै. श्री. बाळासाहेब होळकर यांच्याविरुद्ध प्रजाजनांच्या कांहीं कागाळया झाल्या, व त्यांचें निमित्त करून, पण महाराजांच्या तडक-दार स्वाभिमानी व विक्षिप्त अशा वागणुकीचें शल्य मनांत ठेवून, लॉर्ड कर्झन यांनीं त्यांजकडून पडत्या फळाची आज्ञा स्वीकारून प्रकृतीच्या खोट्या सबबीवर सक्तीनें राजीनामा घेतला व वार्षिक नेमणूक देऊन नर्मदातीरीं बडवाईस हरि हरि म्हणत बसावयास लाविलें! श्री. बाळासाहेब यांच्या वर्तनासंबंधानें कांहीं तक्रारी खऱ्या असल्या तरी कांहीं खोट्या होत्या, आणि वास्तविक उघड चौकशीशिवाय त्यांना अधिकारावरून दूर करतांच येत नव्हतें. पण महाराजांनानीं वैतागानें व त्राग्यानें काढलेल्या उद्गारांना लेखी स्वरूप देऊन, त्या कपटी सनदेवर लॉर्ड कर्झन यांनीं आपला कार्यभाग युक्तीनें उरकून घेतला. "हिंदुस्थान सरकारच्या दृष्टीनें तरी महाराजांस त्यांच्या प्रजेवर जुलूम करण्याचा पूर्ण अधिकार ठेवणें इष्ट नव्हतें" अशी कबुली केसरीनेंहि संस्थानी दृष्टीनें तेव्हां दिली होती. पण उघड चौकशी न करतां, गुप्त धाकदपटशानें वैतागून सोडून हा राजीनामा घेतला याबद्दल तक्रार करण्यास लोकमतास जागा होती व लोकमतानें लॉर्ड कर्झन यांचा त्या वेळीं तीव्र निषेधहि केला होता. लॉर्ड रेडिंग हे लॉर्ड कर्झन यांच्याइतकेच आंतून अरेरावी मिजासीचे असले तरी, न्यायाधीशाचा डौल मिरविण्याची त्यांना धंदेवाईक संवय लागलेली आहे. शिवाय या वीस-बावीस वर्षांत महायुद्धा-सारखे प्रसंग घडून आल्यानें, व स्वराज्याची चळवळ तुफान झाल्यानें, इंग्रज सरकार व संस्थानिक हे एकमेकांना अधिकाधिक आश्रय देऊं घेऊं लागले आहेत. यामुळें मॉंटेग्यु-चेम्सफर्ड रिपोर्टाप्रमाणें कमिशन नेमणें अपरिहार्य

झालें, पण या कमिशनमध्येंहि सरकारनें आपला हातचा म्हणून, पोलिटिकल अधिकाऱ्याच्या न्यायाधिशत्वानें, ठेविलाच आहे. प्रस्तुत महाराजांकडूनहि मागील पिढीच्या दाखल्यान्वयें, सक्तीच्या खुषीचा राजीनामा घेऊन महाराजांना राजसंन्यास देण्याचा लॉर्ड रेडिंग यांचा विचार होता म्हणतात. पण ती गोष्ट घडून आली नाहीं हेंच सर्वांच्या दृष्टीनें बरें झालें. तथापि इंदूर संस्थानच्या अधिपतींच्या लागोपाठ दोन पिढ्यांवर अशा प्रकारची आपत्ति यावी हें पाहून मात्र अतिशय दुःख होतें !

कमिशनची नेमणूक झाली असली तरी चौकशीचीं प्रकरणें किंवा मुद्दे नक्की कोणते हें अद्यापि समजलें नाहीं. पण एका मुमताज बेगमच्या खटल्याशिवाय दुसरें कोणतेंहि प्रकरण या चौकशींत सरकारनें घुसडवितां कामा नये. असें स्पष्ट म्हणण्याचें कारण असें कीं, महाराजांना पेंचांत आणावयाचें व राज्यभ्रष्ट करावयाचें सरकारनें मनांतून ठरविलें असल्यास, या शिकारीकरितां आपल्या भात्यांत एकाहून अधिक बाण भरून नेण्याचा मोह सरकारास पडणें स्वाभाविक आहे. पण राज्यकारभाराची दुर्व्यवस्था हा प्रस्तुत चौकशींत निर्णयाचा मुद्दाच होऊं शकत नाहीं; व त्यासंबंधानें यत्किंचितहि पुरावा पुढें येऊं देणें अन्यायाचें होईल. राज्यकारभाराच्या दुर्व्यवस्थेविषयींहि सरकाराकडे महाराजांविरुद्ध पूर्वीं कागाळ्या गेल्या असतील, नाहीं असें नाहीं. पण तसें असलें तरी आजवर थांबून, आणि हें विशिष्ट गुन्ह्याचें प्रकरण निघाल्यानें ह्या दुसऱ्या बाबीचा इन्साफ करण्याचा आपला हक्क सरकारनें तूर्त गमावला आहे असेंच मानावें लागतें. बावला प्रकरणाच्या आगींतून महाराज वांचले तर इतर कागाळ्यांच्या फोपाट्यांत आम्हीं त्यांना भाजून काढूं अशी बुद्धि सरकारनें ठेवणें अत्यंत गर्हणीय होईल. संस्थानी प्रजेच्या दृष्टीनें, कोणाहि संस्थानाधिपतींच्या दुर्वर्तनाला आळा बसावा व त्यांनाहि दहशत रहावी असें आग्रहानें म्हणणाऱ्यांपैकींच आम्हीहि आहोंत. परंतु या बाबतींत सरकार उंदीर-मांजराचा खेळ खेळत असतें, व संस्थानी प्रजेच्या गाऱ्हाण्याचें निमित्त सांगून आपल्या राजकारणी रागालोभाचीं कार्यें उरकून घेत

असतें हेंहि आम्हांस पुरें माहीत आहे. म्हणूनच प्रस्तुत चौकशींत बहाणा एक प्रकारचा व हेतु दुसऱ्या प्रकारचा असें होण्याचा संभव. संक्रांतीप्रमाणें मार्ग एकीकडे व दृष्टि दुसरीकडे असा कुटिल राजनीतीचा प्रकार असतो. म्हणून महाराजांवर जो घोर आरोप हल्लीं करण्यांत आला आहे त्याची चौकशी सर्वस्वी एकेरी, म्हणजे केवळ न्यायाच्या धोरणानें या आरोपापुरतीच व्हावी. त्यांत इतर धोरणांची लुडबुड होऊं नये अशाविषयीं सरकारनें खबरदार राहिलें पाहिजे.

शेवटीं आम्हांस इतकेंच सांगावयाचें कीं, इंदूर संस्थानचे अधिपति व त्यांची प्रजा यांच्याइतकाच हल्लींचा हा प्रसंग आम्हांलाही दुःखद वाटतो. मोठ्या माणसांचें पतन हें सहजच इतकें खेदकारक असतें कीं, मृच्छकटिकांतील चारुदत्ताला वधस्थानीं नेऊन तेथें त्याचा वध करणें हें ज्याचें कर्तव्य त्या मांगालाही वाईट वाटून त्यानें वरील प्रकारचे उद्गार काढले. मग देशी संस्थानें व राजेरजवाडे म्हणजे हिंदुस्थानच्या जुन्या राजसंस्कृतीचे अवशिष्ट खंड म्हणून ज्यांच्याकडे आम्हीं बोट दाखवावयाचें त्यांच्यावरच असला प्रसंग येऊन त्यामुळें ब्रिटिश राजसत्ता या देशांत दृढ झाल्याचा आणखी एक नवा ठसा जनतेच्या मनावर पडावा हें देशाचें दुर्दैव होय. पण अशाहि या दुःखद स्थितींत मनाला एकाच गोष्टीनें समाधान वाटतें तें हें कीं, इंदूरच्या महाराजांनीं आपखुषीनें राजीनामा देऊन आपल्या हातानें पदरांत अपयश बांधून न घेतां, प्रतिपक्षाशीं न्यायभूमीवर झुंजण्याचें ठरवून, विशेष प्रकारचें मनोधैर्य दाखविलें आहे. आणि पुढें कांहींहि होवो, आज तरी, त्यांच्याविरुद्ध वेळींअवेळीं, स्थानींअस्थानीं, केवळ द्वेषबुद्धीनें किंवा सूड उगविण्याच्या इच्छेनें, लोभाच्या भुकेला खाद्य न मिळाल्यानें, किंवा अद्भुतरसाच्या नवलकथा लिहिण्याचा मोह न आवरून ज्या फुकट्या कादंबरीलेखकांनीं आपण जळतीं कोलितें नाचवून कोणाच्या घरादारावर कशी आग पाडवतों याचा विचार यत्किंचितहि न करतां भरमसाट बातम्या छापल्या, टीका केल्या व महाराजांना चौकशीपूर्वींच अपराधी ठरवून मरणाआधीं सरणांत घाल-

ण्याचा अप्रयोजकपणा दाखविला, त्या सर्वांचीं तोंडें सध्यांपुरतीं तरी बंद करून त्यांस खालीं पहावयास लाविलें. न्यायाचें काम न्यायाचे अधिकारी करीतच होते, मुमताज बेगमनें प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढें प्रथमच जी डांबर-बत्ती शिलगावून ठेविली ती आपलें कार्य केल्याशिवाय विझणें शक्य नव्हतें, आणि सरकारनें कांहीं वेळ आपले डोळे मिटले असल्यासारखा भास उत्पन्न केला तरी तें बकध्यान होतें—तात्पर्य, शिकारीला नादावलेल्या या पोटभरू पारध्यांची ही मातबर शिकार हातची अगदींच फुकट जाण्याचा संभव नव्हता, व ते न बोलते तरी हें कार्य व्हावयाचेंच होतें; पण हें कळण्या-इतकाहि त्यांनीं समंजसपणा दाखविला नाहीं त्यांची मात्र आम्हाला कींव येते. कोणीहि संकटांत सांपडला असतां त्याजविषयींची सहानुभूति वाटण्याची मनुष्याची सहज प्रवृत्ति असते. ती इतकी कीं, खुनाचा अपराधी फांसावर चढतांना कोणीं पाहिला तर त्यावेळीं त्यानें केलेल्या खुनाची क्षणभर विस्मृति होऊन त्याच्या गळ्याचा फांस निघेल तर बरें असेंहि वाटूं लागतें. मारक-पणांत जसें मुरलेलें विष तसें तारकपणांत ताजी दयाबुद्धि प्रभावी ठरते. मग महाराजांचा तर न्यायनिवाडा अद्यापि व्हावयाचा असून, नक्की कोणतें दुष्कृत्य त्यांच्या आंगाला प्रत्यक्ष जाऊन भिडतें याचा निर्णयहि व्हावयाचा आहे, अर्थात् लोकांचीं व सरकारचीं मनें दूषित होतील असे विषारी लेख आतां-पर्यंत लिहिण्याची परंपरा चालू ठेवण्याचें काय कारण?

मुमताज बेगमनें सांगितलेलें सगळें खोटें नसलें तरी सगळेंच खरें असेल असें मानण्याला कोणाला काय आधार होता? मयत मिस्तर बावला हे रंगभूमीवर बऱ्याच उशीरां अवतरले; आणि खुद्द त्यांचा व महाराजांचा व्यक्तिद्वेष कांहींएक नव्हता हें सिद्ध आहे. मुख्य भानगड व गुंतागुंत काय ती महाराज व मुमताज यांच्या परस्परागलोभाची काय असेल ती. पण मुमताजचा इंदूर येथील एकंदर इतिहास काय? त्या इतिहासांत महाराजांखेरीज इतर स्त्रीपुरुष व्यक्तींचेहि कांहीं हितसंबंध येत होते किंवा नाहीं? महाराजांची आसक्ति किंवा अहंकार या दोषांना जाब देणारा मुमताजच्या बाजूलाहि दोषांचा

कोणी जोडीदार होता किंवा नाहीं ? तसेंच या प्रकरणांत हेतु एक व कृत्य भलतें असें कांहीं घडलें कीं काय, किंवा एकानें 'ग' लिहिला व दुसऱ्यानें त्याचा 'मा' केला असें कांहीं घडलें कीं काय ? अशा किती तरी भानगडी असूं शकतील. गुप्त पोलिसांच्या पराक्रमाचीं कथानकें, पोलिस कोर्टांत मधून मधून रंगणारे अद्भुत खटले, व सामान्य मनुष्यस्वभाव यांची नुसती ओळख ज्याला असेल त्याला या प्रकरणांतील या अनेक कूट प्रश्नांचें एकच उत्तर मिळेल असें वाटणार नाहीं. महाराजांनीं मुमताजला पळवून नेण्याचा प्रयत्न केला व त्याकरितां मारेकरी घातले असें जें सरळ सूत दुरून कित्येकांना भासतें, त्याला कदाचित् भुतासारख्या वांकड्या तिकड्या गांठीहि अनेक असतील. आणि सर्व खरी हकीकत बाहेर आल्यास निंदाव्यंजक असे जसे महाराजांचे कांहीं दोष बाहेर पडतील त्याप्रमाणेंच त्या दोषांना चिकटून असणारे उदारपणाचे किंवा दिलदारीचे गुणहि कांहीं दिसून येण्याचा संभव आहे. किंवा असेंहि कदाचित् निष्पन्न होईल कीं, जे मारेकरी ठरले ते मूळ हेतूनें मारेकरी नव्हते, आणि मुमताजला पळवून नेण्याच्या किंवा विद्रूप करण्याच्या साहसांत ते जे पडले त्यांना महाराजांची प्रत्यक्ष चिथावणी नसून एकप्रकारच्या स्वयंभू, विकृत व लहरी राजभक्तीनें त्यांनीं तें स्वामिकार्य म्हणून खोट्या कर्तव्यबुद्धीनें आपल्या अंगावर ओढून घेतलें असेल. इंग्लंडच्या इतिहासांत असें एक उदाहरण घडलें होतेंच कीं नाहीं ? टॉमस अ-बेकेट हा पदरचा पोषित भिक्षुक असतां धर्मगुरूच्या अहंकारानें उपद्रव देऊं लागला हें पाहून राजा हेन्री सहज उद्गारला कीं "या त्रासापासून मला सोडवील असा कोणीच नाहीं काय! " आणि ती एकप्रकारची आज्ञाच समजून चौघे माथेफिरू शिलेदार तडक धर्ममंदिराकडे गेले व त्यांनीं टॉमस-अ-बेकेटचा एकदम खून केला ! संसर्गदोषामुळें हेन्रीनें बहिष्काराची शिक्षा भोगिली पण आपण खुनाला चिथावणी दिली असें त्याचें मन त्याला सांगत नव्हतें. त्याप्रमाणें दिलदार व फाजील उपकारी अशा दरबारी लोकांनीं लुबे-पणानें महाराजांवर हा उपकार करतां करतां अपकार केला नसेल कशावरून ?

तात्पर्य, या प्रकरणीं अनेक तर्क चालण्यास रखे आहेत. म्हणूनच चौकशीच्या आधीं एकच एक कुतर्क चालवून महाराजांविषयीं वाईट ग्रह दृढ करणें हें कोणासहि न्यायाचें नव्हतें.

कसेंहि असो, महाराज इन्साफाला उभे राहिले ही आमच्या मतें त्यांनीं फार उमदी गोष्ट केली; आणि त्यांच्या प्रजेला जर त्यांच्याबद्दल खरी सहानुभूति व प्रेम वाटत असेल तर तें रीतसर मार्गानें व्यक्त करण्याची त्यांना ही एक अपूर्व संधिच मिळाली आहे. महाराजांवर कमिशन बसलें म्हणून ते आज पायमाल झाले असें कोणी त्रयस्थहि म्हणणार नाहीं. इंग्रज सरकारच्या राज्यांत अधिकाराचा दुरुपयोग व कारभाराची दुर्व्यवस्था करणारे इंग्रज किंवा युरोपियन असत नाहींत असें नाहीं. पण जातीकडे जात वळते आणि धन्याचा धनी कोणी असत नाहीं यामुळें पुष्कळ दोष छपले जातात. श्रीमंत तुकोजीरावमहाराज यांचे अंगीं राज्यकर्ते या दृष्टीनें दोष नाहींत असें म्हणण्याइतकी त्यांची प्रजा याहि प्रसंगीं ढोंगी होणार नाहीं, पण राजावर जें संकट तेंच एकप्रकारें राज्यावर संकट आहे असें या क्षणापुरतें तरी मानण्यास ते खचित तयार होतील. इंदूरच्या राज्यांत प्रत्यक्ष एका वाईट कामांत महाराजांकरितां जीव देणारे लोक निघूं शकले हें जगानें पाहिलेंच आहे. अर्थात् हल्लींच्या न्यायमुनसफीच्या सत्कार्यांत आपलें तनमनधन देऊन महाराजांस मदत करणारे लोक मिळतील याविषयीं आम्हांस शंका नाहीं. स्वतः महाराजांना द्रव्य कमी नाहीं; तरीहि शेटसावकार त्यांच्याकरितां जरूर तर द्रव्याच्या राशी ओततील, आणि कायदेपंडित निरपेक्ष सल्ला देतील. महाराजांचें अन्न खाणाऱ्या त्यांच्या अधिकारी मंत्रिमंडळानें तर इमान दाखविण्याची हीच वेळ आहे ! त्यांनींहि महत्त्वाकांक्षेनें पोलिटिकल खात्याला वेळीं न पडतां आपल्या मिठाला जागावें. सामान्य जनतेलाहि एक गोष्ट करतां येईल. प्रकरण चौकशीला निघालें कीं, लांचलुचपत किंवा धाकदपटशहाच्या साह्यानें वेळीं खोटा पुरावा तयार होत असतो. म्हणून समाजांतील लोभी, चहाडखोर व आगलाव्या लोकांवर दृष्टि ठेवून त्यांना

मार्गावर राखण्याचें काम जनतेला करतां येईल. प्रस्तुत संकटांतून महाराज निभावले असतां त्यांना एकप्रकारची अद्दल घडेल, व या पुढील काळांत तरी प्रजावत्सलतेचें कार्य ते अधिक दक्षतेनें करतील, अशी आशा बाळगण्यासहि जागा आहे हें दुःखांत सुखच होय. महाराजांना या चौकशींत यश आलें तर नुसत्या इंदूरचेंच तोंड उजळ होईल असें नव्हे तर पर्यायानें आपणालाहि त्याचा फायदा आहे ही गोष्ट हिंदी राजेरजवाड्यांनीं देखील लक्षांत ठेविली पाहिजे. आणि या संकीर्ण सदीच्छेच्या बळावर महाराज दोषमुक्त व्हावे व यापुढील त्यांचें आयुष्य तरी निष्कंटक जावें अशी प्रार्थना करून हा लेख आम्ही पुरा करतों.

## इंदूरप्रकरण*

इंदूरच्या महाराजांना कमिशनविषयीं होय ना म्हणण्याला सरकारनें ता. २० ही अखेरची मुदत दिली होती असें प्रसिद्ध झालें होतें. त्यानंतर आणखीहि दोन दिवस गेले तरी निर्णयात्मक अशी बातमी कांहींच येत नाहीं. इंदूर-प्रकरणावर आम्हीं जो अग्रलेख दोन आठवड्यांपूर्वी लिहिला त्या वेळीं महाराजांच्या कायदेपंडितांनीं कमिशन स्वीकारण्याचा सल्ला दिला होता व त्याप्रमाणें महाराजांनीं कमिशन स्वीकारल्याचें सरकारास कळविलें होतें, अशी साधार बातमी आम्हांस समजली होती. दरम्यान उलट-सुलट अशा अनेक बातम्या प्रसिद्ध होत आहेत. तथापि त्या अग्रलेखांत व्यक्त केलेलें आमचें मत आजहि कायम आहे. तें असें कीं, कमिशन नेमल्यास त्यांत प्रस्तुत आरोपाखेरीज राज्यकारभाराविषयीं इतर मुद्दे घालणें ही जशी सरकारची चूक होईल, तशीच 'नक्की एका आरोपाच्या चौकशीकरितां चौकशी करवून द्या' असें आव्हान सरकारनें केलें असतां ती तितक्यापुरतीहि नाकारणें ही महाराजांची देखील चूक होईल. चौकशी करून घेण्याचें पत-

* केसरी, ता. २३ फेब्रुवारी १९२६.

करण्यास महाराज तींतून प्राय: निर्दोषी असेच बाहेर पडतील अशी आम्हांस आशा किंबहुना विश्वास आहे. आणि या चौकशीला तोंड देण्याचा व आपलें निरपराधित्व सिद्ध करण्याचा, न्यायाचा धोरोदत्त मार्ग महाराजांनीं स्वीकारल्यास जनतेच्या सर्व प्रयत्नांचें व सदिच्छांचें पाठबळ त्यांच्या बाजूस ठेवलेलें आहे असें आम्ही खात्रीनें सांगतों. कमिशन नेमावयाचें तर त्यांत बावलों प्रकरणाच्या फक्त एकाच मुद्याची चौकशी व्हावी याविषयीं तर कोणाचा मतभेद नाहींच. पण कमिशनची घटना काय असावी हाहि अत्यंत महत्त्वाचा, कायदेशीर, व आंतरराष्ट्रीय राजनीतीचा बिकट प्रश्न असून त्याहि बाबतींत लोकांची सर्व सहानुभूति महाराजांसच मिळेल.

देशी संस्थानांच्या व संस्थानिकांच्या इभ्रतीला व रतिसर हक्काला काडीइतकाहि कमीपणा आणण्याचा सरकार प्रयत्न करील तर लोकमत प्रक्षुब्ध होईल; व संस्थानी प्रजेच्या हक्कांची चळवळ करणाऱ्या लोकांनाहि ती दृष्टि क्षणभर बाजूला ठेवून संस्थानांची कड घेऊन सरकारशीं भांडावें लागेल. पण या सर्व गोष्टी महाराजांच्या निकालावर अवलंबून आहेत. त्यांनीं आपण होऊन गादीचा राजीनामा दिला तर त्यांचा अपराध त्यांनींच कबूल केला व आपला न्याय आपल्या हातानें केला असें सरकार म्हणूं लागेल. याकरितां महाराजांनीं आपखुषीनें राजीनामा न देतां चौकशीलाहि त्यांनीं पाठ फिरवूं नये. “मी निरपराधी आहें” असें जितक्या जोरानें त्यांचा आत्मविश्वास ओरडत उठेल व तत्त्वत: चौकशीचें आव्हान स्वीकारील, इतकेंच नव्हे तर चौकशीला आपण होऊन उलट आव्हान देईल, तितक्या जोरानें संस्थानिकांच्या राजकीय हक्काच्या प्रश्नाला उठावदार व तजेलदार स्वरूप येईल. संकटसमयीं व विशेषत: सल्लागारांचें पेंव फुटलें असतां योग्य काय व अयोग्य काय हें ठरविणें ही गोष्ट महाराजांना मोठी अवघड झाली असेल यांत शंका नाहीं. परंतु आपलें हें निरपराधित्व कोणत्याना कोणत्या तरी मार्गानें सिद्ध करण्यास ते तयार झाल्यास, त्यांना निरपराधित्वाच्या यशाबरोबर संस्थानिकांच्या हक्काचें भांडण नेटाला लावल्याचेंहि श्रेय मिळेल असें आमचें मन आम्हांस सांगतें.

# श्री. होळकर यांचा राजसंन्यास*

इंदूर संस्थानचे अधिपति श्री. तुकोजीरावमहाराज होळकर यांनीं राज्य-त्याग केल्यासंबंधानें पुढील आशयाचा पत्रव्यवहार हिंदुस्थानसरकारच्या पर-राष्ट्रीय व राजकीय खात्यामार्फत प्रसिद्ध झाला आहे.

**श्री. महाराजांचें पत्र**

कॅम्प बिजासनी ता. २६ फेब्रुवारी

**ना. मि. ग्लॅन्सी**

**एजन्ट टु धि गव्हर्नर जनरल**

मध्यहिंदुस्थान यांस—

सन्माननीय मित्रवर्य—

मलबारहिल वरील दुःखद गोष्टीसंबंधांत तुम्हीं ना. व्हाइसरॉय यांच्या वतीनें परराष्ट्रीय व राजकीय खात्याचा ता. २९ ऑक्टोबर स. १९२० हिंदुस्थान-सरकारचा ठराव नं. ४२६ आर. या अन्वयें मी, चौकशी कमिशन पतकरावें अगर दोन सभासदांची चौकशीकमिटी पतकरावी अशी विनंति केली. योग्य अगर अयोग्य असो, परंतु अंतरराष्ट्रीय कायद्यान्वयें आणि तहनाम्याप्रमाणेंहि माझ्या दर्जाच्या राजाची चौकशी होणें योग्य नव्हे अशाच मताचा मी आहें. मॉंटेग्यु-चेम्सफर्ड रिपोर्टाचा भाग १० वा याला उद्देशून ता. १६ डिसेंबर १९१९ रोजीं मध्यहिंदुस्थान एजन्सीच्या मुख्य अधिकाऱ्याला लिहि-लेल्या पत्रांतील परिच्छेद २९ ते ३१ यांचा हवाला मी देतों. या मुद्यांत जास्त शिरण्याची माझी इच्छा नाहीं. परंतु आठ वर्षांपूर्वीं माझ्या श्रेणींतील राजांचा दर्जा, हक्क व अधिकार या संबंधीं त्या वेळीं जीं मतें मीं माझ्या पत्रांत नमूद केलीं होतीं तींच आजहि कायम आहेत. माझ्या सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध वागून मला कमिशन अगर चौकशी-कमिटी मान्य करतां येत नाहीं. राज्य-कर्ता या नात्यानें ज्या तत्त्वाप्रमाणें मी ठामपणें वागत आलों आहें तीं मतें

---

* केसरी, ता. ९ मार्च १९२६.

सोडण्यापेक्षां राज्याचा त्याग करणें हेंच मला मोठेपणाचें वाटतें. मीं चौकशीला तोंड दिलें नाहीं म्हणून मी अपराधी आहें असेंच जग म्हणेल हें मला माहीत आहे. परंतु माझें मन मला खातें म्हणून नव्हे तर तत्त्वरक्षणासाठीं हा मार्ग मीं पत्करला आहे; तथापि याची जाणीव जगास होणार नाहीं, अशीहि माझी कल्पना आहे. तरी पण मलबारहिल प्रकरणाशीं माझा जो संबंध जोडण्यांत आला आहे त्याची चौकशी पुढें होणार नाहीं अशा समजुतीनें मी सर्व राज्यकारभार चिरंजीवाच्या स्वाधीन करून राज्यत्याग करीत आहें. माझें राज्य, कुटुंब व मी स्वतः यासंबंधीं माझी काय इच्छा आहे हें तुम्हांस कळविण्याचा अधिकार मीं मि. डी. एम्. नरसिंगराव यांस दिला आहे व ना. व्हाइसरॉय त्या गोष्टीचा सहानुभूतीनें विचार करतील अशी आशा आहे.

(सही) तुकोजीराव होळकर

## एजंट टु दि ग. ज. यांचें उत्तर

इंदूर २६ फेब्रुवारी १९२६

सन्माननीय मित्र–

आपलें ता. २६ फेब्रुवारी १९२६ चें पत्र पावलें व त्यांत बावला–खटल्यांतील चौकशी–कमिशनास आपण आपली हरकत लिहिली ती समजली. महाराजसाहेबांनीं कोणत्या कारणास्तव हा निर्णय केला त्याबद्दल या पत्रांत मला चर्चा करतां येत नाहीं. मात्र ज्या अर्थी बावला–प्रकरणांत महाराजांवर जो आरोप करण्यांत आला आहे त्याची पुढें चौकशी होणार नाहीं या समजुतीवर महाराजांनीं गादी सोडण्याचें ठरविलें आहे, त्या अर्थीं मीहि असें कळवितों कीं, गव्हर्नर–जनरलसाहेबाच्या वतीनें मी आपल्या गादीचा राजीनामा स्वीकारतों व बावला–प्रकरणासंबंधानें यापुढें चौकशी न होण्याची महाराजसाहेबांस जी हमी पाहिजे तीहि देतों, आणि आपण आपल्या चिरंजीवाकरितां राज्यत्याग केला व तेवढ्यापुरतें हें प्रकरण संपलें असें मी समजतों. याशिवाय इतर गोष्टी आपण ना. व्हाइसरॉयांच्या 'सहानुभूतीवर' सोंपविल्या आहेत. या संबंधांत आपण नियुक्त केलेले मि. नरसिंगराव काय म्हणतात तें ऐकून हिंदुस्थानसरकारचा निकाल मागाहून महाराजांस कळवीन.

आपला स्नेहांकित

(सही) आर. आय. आर. ग्लॅन्सी

# राजे लोकहि 'स्वराज्य' मागतात !*

तीन आठवड्यांपूर्वी दिल्ली येथें नरेंद्रमंडळाची सभा पांच दिवस काम चालून समाप्त झाली. सभा इतर बाबतींत पूर्वीप्रमाणेंच झाली. पण यंदा प्रथमच ती अवांतर लोकांना पाहण्या. ऐकण्याला मोकळी ठेवण्यांत आल्यामुळें तिच्या संबंधानें उघडपणें कांहीं लिहिणें बोलणें शक्य झालें आहे. नरेंद्र-मंडळासंबंधानें जनतेच्या दृष्टीनें हा फारच महत्त्वाचा फरक झाला. यापूर्वीही मंडळाच्या बैठकींत काय झालें हें बाहेर अगदींच कांहीं कोणाला कळत नव्हतें असें नाहीं, कळत होतें पण तें पानाड्याला पाणी कळावें, किंवा पायाळाला भूमिगत द्रव्य कळावें, किंवा गुप्त पोलिसाला कटाची बातमी कळावी, त्याप्रमाणें कळत होतें. आणि या गुप्त कामाची उघडपणें चर्चा करणें कठीण असे. कारण त्यामुळें बातमी फोडल्याचा आरोप आपणावर येईल कीं काय अशी भीति नरेंद्रमंडळाच्या प्रत्येक सभासदाला वाटत राही, आणि वर्तमानपत्रकारांनाहि कांहींहि लिहितांना आपण शिष्टाचार पाळींत नाहीं असा शरमिंदेपणा वाटत असे. आतां पडदानशीन स्त्री झाली तरी स्वतः ती पड्याच्या झरोक्यांतून परपुरुषाचें तोंड पहात नाहीं असें नाहीं, आणि वाऱ्यानें अथवा स्त्रीच्या हालचालीनें तिच्या चेहऱ्याचा कांहीं भाग लोकांना ओझरता तरी दृष्टीस पडतोच. पण तोंड उघडें ठेवल्यानें सभ्य स्त्रीच्या अब्रूला कमीपणा येत नाहीं किंवा प्रेक्षकांच्याहि मनांत कुविचारच येतात असें नाहीं, ही गोष्ट अनुभवानेंच कळून येते. ह्याप्रमाणें आपलें काम उघडपणानें केल्यास आपल्या अब्रूला किंवा बहुमानाला कमीपणा येत नाहीं ही गोष्ट, नरेंद्र-मंडळाला स्वतःच्या स्फूर्तीनें कळून आली व बुद्धीला पटली. म्हणून या मंडळापैकींच कित्येकांना सभेचा दरबार यापुढें खुला राहावा असें ठरविलें. आणि यंदा सभेच्या पहिल्या दिवशीं तसा ठराव होऊन दुसरे दिवसापासूनच तो अमलांत येऊं लागला. त्यामुळें सभेच्या कामाचा वृत्तांत वर्तमानपत्रांतून

---

* केसरी, ता. १६ एप्रिल १९२९

प्रसिद्ध होऊं लागला आणि त्यासंबंधानें आतां उघडपणें कोणालाही दोन शब्द लिहिणें बोलणें हें शिष्टाचार न सोडतां करितां येऊं लागलें आहे. आमच्या मतें ही सुधारणा नरेंद्रमंडळाच्या सभासदांना भूषणास्पद असून परिणामीं ती हितावह आहे असेंहि त्यांच्या अनुभवाला येईल.

ज्यांनीं नरेंद्रमंडळाची बैठक यंदा पाहिली त्यांना प्रथमच ही गोष्ट नजरेला आली कीं आमच्या राजे लोकांना पोषाकाचा साधेपणा आवडूं लागला आहे. तसेंच व्हाइसरॉय कोणी देव नव्हे किंवा वाघ नव्हे; अर्थात् त्यांच्याविषयीं फाजील पूज्यता किंवा भीति बाळगण्याचें कारण नाहीं, हें राजे व संस्थानिक यांनाहि कळूं लागलें आहे. पूर्वी व्हाइसरॉय साहेबांची गांठ घेणें व परतभेट स्वीकारणें एवढेच प्रसंग त्यांना लाभत असत. यामुळें आपल्या पोषाकाची सजावट कशी करावी, आदरातिथ्यांत कांहींहि उणें न पडण्याला कसें जपावें, आणि साहेबांची मर्जी कशी संभाळावी या विचारांत व चिंतेंतच संस्थानिक चूर असत. शिवाय अशा गांठी-भेटींत कुशलप्रश्न व सहसा व्हावयाचे; हवापाण्याच्या रिकामटेकड्या गोष्टी चालावयाच्या. पण परस्पर हितसंबंधाच्या प्रश्नाची चौकशी कधींहि व्हावयाची नाहीं. आधीं या भेटीपरतभेटींचा प्रसंग दहा पांच मिनिटेंच चालावयाचा. त्यांतच नजर-नजराणे अत्तरगुलाब यांचे उपचार व्हावयाचे. नटवून सजवून आणलेल्या राजकुमारकुमारींचें कौतुक करण्याचें व त्यांना व्हाइसरॉयसाहेबांच्या चरणावर घालण्याचें काम यांतच उरकावयाचें! शिवाय खासगी भेटींत सरकारदरबाराचें काम काढवें तर तो शिष्टाचार नाहीं. प्रश्न वादग्रस्त असले तर त्यासंबंधाचे कागदपत्र व्हाइसरॉय बरोबर कोठून बाळगणार! पोलिटिकल एजंट किंवा सेक्रेटरी दप्तर घेऊन जवळ असत नाहीं. आणि प्रश्न सामुदायिक स्वरूपाचे असले तर त्याचा विचार एखाद दुसऱ्या संस्थानिकापुरता करून इतरांच्या संमतीशिवाय दुसऱ्याला दाखला किंवा बंधन उत्पन्न करण्याचीहि अडचण. या सर्व कारणांमुळें अशा भेटी-परत-भेटींत कोणतेहि महत्वाचे राजकीय प्रश्न चर्चेला निघणें शक्य नव्हतें. तें मनांत असतांहि व

लाटसाहेबांची भेट होऊनहि मनांतल्या मनांत जिरावयाचें. पण आतां नरेंद्र-मंडळ अस्तित्वांत आल्यापासून संस्थानिकांची ही अडचण दूर झाली आहे. या नरेंद्र-मंडळांतहि केवळ खासगी स्वरूपाचे प्रश्न काढतां येत नाहींत. परंतु सार्वजनिक अशा संस्थानी प्रश्नांची चर्चा करण्याला तरी नरेंद्र-मंडळ ही एक सोयीची जागा झाली आहे व तिचा फायदा घेणें आतां संस्थानिकांच्या धैर्यावर, चिकाटीवर व कुशलतेवर अवलंबून राहील.

व्हाइसरॉय व संस्थानिक हे कामकाजाकरितां एकत्र येत असल्यामुळें, मागें सांगितल्याप्रमाणें पोषाकाचा बडेजाव नाहींसा झाला असून आतां एकहि संस्थानिक नरेंद्र-मंडळाच्या सभेला नटून-सजून येत नाहीं. सुंदर अलंकार, लखलखणारें जवाहीर, व भरजरी पोषाक हें नाहीं, झाल्यामुळें कोणाहि प्रेक्षकाला ही सभा देशी राजे-रजवाड्यांची आहे हें सांगितल्याशिवाय कळलेंहि नसतें. आणि यामुळें परदेशी प्रेक्षक व प्रवासी यांना देशी संस्थानिकांच्या पोषाख-पेहरावाला उद्देशून त्यांची टवाळी करण्याला जो एक विषय पूर्वी लाभत असे तो यापुढें फारसा लाभणार नाहीं. तसेंच नरेंद्रमंडळाच्या सभेंत ठराव, सूचना, प्रतिसूचना, भाषणें, मतमोजणी इत्यादि प्रकार सुरू झाल्यामुळें संस्थानिकांना आपलें मनोगत स्पष्ट बोलून दाखविणें, आणि व्हाइसरॉयसाहेबांचा ओढा एका बाजूस आहे हें माहीत असतां, त्याविरुद्ध अर्थात् मर्यादा संभाळून, आपले विचार प्रदर्शित करणें किंवा मत देणें या गोष्टी करण्याची संवय पडूं लागली आहे. सभेंत संस्थानिक जागच्या जागीं डांबून न बसतां एकमेकांकडे जातात, सल्लामसलत करतात व मोकळेपणानें वावरतात. यावरून त्यांचा स्वाभिमान जागृत होत असून कांहीं दिवसांनीं व्हाइसरॉय साहेबांचा रोष पत्करूनहि आपलें मत प्रतिपादण्याला किंवा हक्कसंरक्षणाला ते सिद्ध होतील अशी आशा वाटते. संघशक्ति ही केव्हांहि भित्र्याचा भित्रेपणा घालविण्याला उपयोगी पडते, आणि नरेंद्रमंडळ स्थापन करण्यांत सरकारचे हेतु कांहींहि असले तरी, या राज्यांत आपण एक नवीन लोकमताचें केंद्र निर्माण केलें आहे, असें सरकारला अनुभवाला आल्यावांचून राहणार नाहीं.

नरेंद्र-मंडळाची हल्लींची घटना एका माजी गव्हर्नर जनरलांनीं बनविलेली आहे. व आणखी बरेच दिवस तीच अमलांत राहील असें वाटतें. या घटने-प्रमाणें नरेंद्र-मंडळाचे सभासद एकंदर एकशेंवीस आहेत. त्यांतले एकशेंआठ स्वतःच्या हक्कानें सभासद म्हणून बसतात, व बाकीचे बारा विशिष्ट वर्गाचे किंवा संस्थानसंघांचे प्रतिनिधी म्हणून बसतात. या वर्गवारींत एकेका प्रांतां-तील संस्थानांचे सोयीप्रमाणें गट केलेले आहेत. उदाहरणार्थ, पंजाबांतील छोट्या संस्थानांचे तीन, मैदानी संस्थानांचा एक, अठरा पहाडी संस्थानांचा एक असे गट केले आहेत. बहार व ओरिसा प्रांतांतील संस्थानांपैकीं पांचांचा एक व विसांचा एक असे दोन गट केले आहेत. मुंबई इलाख्यांतील छोटया संस्थानांपैकीं तेरांचा एक, नवांचा एक, सहांचा एक व सातांचा एक मिळून चार गटांत संस्थानें वांटून दिलीं आहेत. यांपैकीं महाराष्ट्रांतील भोर, अक्क-लकोट, औंध, फलटण, जत व सुरगाणा असा एक गट असून त्यांच्यातर्फें श्री. पंतसचीव हे हल्लींचे प्रतिनिधी आहेत आणि मिरज, मिरजमळा, जमखिंडी, कुरुंदवाड, रामदुर्ग, सावनूर व सोंडूर असा एक गट असून त्यांच्यातर्फें श्री. जमखिंडीकर हे हल्लींचे प्रतिनिधी आहेत. अशा रीतीनें या नरेंद्र मंडळाचे बहुतेक सभासद ( १०८ ) स्वतःच्या हक्कानें व कांहीं थोडे ( १२ ) गटांचे प्रतिनिधी म्हणून बसतात. पैकीं 'प्रतिनिधि' संस्थानिक ठराविक मुदतीनें निवडले जातात यामुळें त्याच व्यक्ति नरेंद्र—मंडळांत नेहमीं बसतील असें नाहीं.

पहिल्या एकशेंआठांच्या जागा कायम आहेत. यामुळें एक राज्यारूढ संस्थानिक मृत झाल्यास त्याच्या जागीं डोईबदल होऊन दुसरा येईल त्याला स्वतःच्या हक्कानें नरेंद्र—मंडळांत बसतां येईल. मात्र तो वयांत येऊन मुख-त्यारी मिळालेला असला पाहिजे. आपल्या हयातींतच ज्यानें आपल्या राज्या-धिकाराचा राजीनामा दिला त्याला आपल्या संस्थानातर्फें सभासद म्हणून अर्थातच बसतां येणार नाहीं. पण त्याला एखाद्या गटानें निवडलेला प्रति-निधी म्हणून बसतां येईल. तसेंच स्वतः गादीवर नसतां कोणा संस्थानिकाकडे

दुसऱ्या एखाद्या संस्थानाच्या रीजंटाचें काम असेल तर त्याला त्या एका संस्थानाचा प्रतिनिधि म्हणून बसतां येईल. वयांत न आलेल्या राजकुमारांना मताचा अधिकार नसला तरी त्यांना नैमित्तिक प्रसंगीं नरेंद्र-मंडळाच्या बैठकीला हजर राहतां येईल, व त्यांच्यातर्फेचें मत त्या संस्थानचे रीजंट देऊं शकतील. हिंदुस्थानांत एकंदर संस्थानें सहा-सातशें असल्यामुळें नरेंद्र-मंडळांतील सभासदांची संख्या अशा रीतीनें मर्यादित करावी लागली आहे. पण नरेंद्र-मंडळाच्या पुढें कोणतीं कामें येऊं शकतील हें लक्षांत घेतलें म्हणजे आहे ही संख्या कमी आहे असें म्हणतां येत नाहीं. या एकशेंवीस सभासदांपैकीं निदान तीस सभासद हजर असतील तरच नरेंद्र-मंडळाचें काम चालेल असा नियम केलेला आहे. ही गणभरतीची किमान मर्यादा ठीक आहे व ही गणभरती नाहीं म्हणून काम चालूं शकत नाहीं असा प्रकार होण्याचा संभव फारसा नाहीं.

स्वतःच्या हक्कानें बसणारे सभासद व प्रतिनिधि म्हणून बसणारे सभासद हा जो भेद करण्यांत आला आहे तो सोयीच्या दृष्टीनें ठीक असला तरी, एकंदर सहा-सातशें संस्थानांतून कोणतीं पहिल्या वर्गांत व कोणतीं दुसऱ्या वर्गांत घातलीं याचें तत्त्व मात्र बरोबर लक्षांत येत नाहीं व लक्षांत आलें तरी तें सर्वस्वीं बरोबरच आहे असें म्हणवत नाहीं. संस्थानिकांचा मोठेपणा कशावरून ठरवावयाचा ? त्यांचें उत्पन्न कीं क्षेत्रफळ, कीं प्रजेची लोकसंख्या, कीं राज्याधिकाराची व्याप्ति, कीं सरकाराशीं मूळ संबंध कसा घडला याचा प्रकार ? पण यांपैकीं एकही तत्त्व नरेंद्र-मंडळाच्या सभासदांचा दर्जा ठरवितांना किंवा सभासदांची याद ठरवितांना निर्णयात्मक म्हणून लक्षांत घेतलें आहे असें दिसत नाहीं. सरकारनें जें तत्त्व स्वीकारलें आहे तें फक्त तोफांच्या सलामीच्या बहुमानाचें. या दृष्टीनें या एकशेंआठांची भरती खालीलप्रमाणें झाली आहे. एकवीस तोफांच्या सलामीचे ५, सतरांचे १३, पंधरांचे १७, तेरांचे १६, अकरांचे २० व नवाचे २३. आतां तोफांच्या सलामीचा मान प्राय: संस्थानाच्या महत्त्वावरूनच मूळ दिला गेला असेल असें घेऊन चालतां येतें. परंतु हें अनुमान सर्वत्र सारखें लागत नाहीं हेंहि तेव्हांच दाखवून देतां येण्यासारखें आहे. शिवाय तोफांची संख्या वाढविणें ही गोष्ट सरकारच्या केवळ खुषीची असल्यानें केवळ ही संख्या वाढविल्यानें त्याचे योगानें त्या संस्थानाला नरेंद्र-मंडळांत स्वतःचें असें स्थान मिळतें याचा अर्थ नरेंद्र-मंडळाचें सभासदत्व सरकार आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल त्याला देऊं शकतें असा

होतो. पण कांहीं संस्थानिकांसंबंधानें पाहिलें तर तोफांच्या संख्येचें तत्त्वहि निर्णायक नाहीं. कारण जमखिंडी व भोर या संस्थानिकांना सांगली, मुधोळ व सावंतवाडी या संस्थानच्या इतक्याच तोफांची सलामी असतां पहिल्या दोन संस्थानांना स्वतंत्र हक्कानें नरेंद्र-मंडळांत बसतां येत नाहीं. पण पुढच्या तिघांस तसें बसतां येतें. जमखिंडी व भोर या संस्थानांच्या अधिपतींना हल्लीं नरेंद्र-मंडळांत स्वतंत्र स्थान आहे. पण तें प्रतिनिधी म्हणून.

असो. नरेंद्र-मंडळांत कोणाला स्थान कोणत्या तत्त्वावर दिलें आहे हा मुद्दा गौण म्हणून सोडून देऊं. परंतु सामान्यरीत्या पाहिलें असतां नरेंद्र-मंडळाचें जें काम चाललें आहे तें एकंदरीनें ठीक आहे असें आम्हांस वाटतें. यंदांच्या बैठकींत जो एक ठराव नरेंद्र-मंडळानें केला तो विशेष अभिनंदनीय आहे. खालसा मुलखांतील प्रजा स्वतःकरितां जबाबदारीचें स्वराज्य मागत आहे, त्याविषयीं संस्थानिकांचें धोरण काय आहे, यासंबंधानें पुष्कळांना आजवर संशय होता. पण नरेंद्र-मंडळानें यंदा याविषयीं अनुकूलतेचें धोरण प्रगट केलें; त्याचा परिणाम फार चांगला होईल. संस्थानिक हे आमच्या स्वराज्याचा द्रोह करणारे आहेत व इंग्रज सरकार या द्रोहाचा फायदा घेत आहे अशी लोकांची जी आजवर समजूत होती ती यापुढें नाहींशी होईलच. पण त्यांत-ल्या त्यांत आणखी एक आनुषंगिक फायदा असा कीं, खालसांतील प्रजेला स्वराज्य द्यावें असें हे संस्थानिक म्हणतात तर त्यांना स्वतःच्या प्रजेला तें कोणत्या तोंडानें नाहीं म्हणतां येईल? हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यांतून निघून स्वतंत्र व्हावा या कल्पनेला संस्थानिकांनीं विरोध केला ही गोष्ट स्वाभाविकच आहे. व खुद्द खालसा मुलखांतही राष्ट्रीय सभेनें नेहरू रिपोर्टाला संमति दिली याचा अर्थ स्वातंत्र्याच्या धोरणासंबंधानें हिंदी लोकांतहि आज दुमत आहे हाच होय! तथापि "आमच्या स्वराज्याच्या मागणीला संस्थानिकांनीं सहा-नुभूति न दाखविल्यामुळें या देशांतून संस्थानें अजीबात नष्टच व्हावीं" असें म्हणणाऱ्यांच्या चळवळीला आतां सहज आळा पडेल. कारण जो आपलें हित चिंतितो त्याचें हित उलट आपणहि चिंतावें हा मनुष्यस्वभावच आहे.

पण राजे लोक याचा मोबदला कदाचित् असाहि मागणार कीं, "आम्ही ज्याप्रमाणें तुमच्या आकांक्षांना सहानुभूति दाखवितों त्याप्रमाणें तुम्हीहि आमच्या आकांक्षांना सहानुभूति दाखविली पाहिजे. राजे लोकांची आकांक्षा अशी आहे कीं, आज त्यांच्यावर हिंदुस्थान-सरकार जो ताबा व अंमल

गाजवितें तो कमी किंवा नाहींसा होऊन त्यांचा संबंध प्रत्यक्ष राजे बादशहा यांच्याशींच राहावा. यासंबंधानें हिंदी लोकांचें म्हणणें थोडें खुलासेवार सांगणें जरूर आहे. संस्थानिकांचें म्हणणें एका अर्थानें ठीक आहे. आणि राजे बादशहांशीं संबंध राहणें यांतच त्यांना मोठेपणा वाटत असेल, तर त्याला आम्ही हरकत घेत नाहीं. पण आज हिंदुस्थान–सरकारचें जें नियंत्रण त्यांच्यावर आहे तें निघून जावें याचा अर्थ जर तें सर्वस्वी अंतःकारभाराच्या बाबतींत स्वतंत्र व्हावें असा असेल तर, त्याला एक अट अशी आहे कीं, त्यांनीं आपल्या स्वातंत्र्यांत आपल्या प्रजेला भागीदार केलें पाहिजे. संस्थान (स्टेट) या शब्दाचा अर्थ आज ते स्वतः म्हणजे व्यक्तिशः संस्थानिक असा करतात, तो कोणीहि मान्य करणार नाहीं. 'स्टेट' या इंग्रजी शब्दाचा अर्थ नुसता राजा, सर्वाधिकारसंपन्न राजा, असा नाहीं. राजा व प्रजा मिळूनच स्टेट होत असतें. अर्थात् प्रजेला स्वराज्याचे अधिकार न देतां, केवळ आपल्यापुरतें स्वातंत्र्य हे संस्थानिक मागतील तर आम्ही व कोणीहि त्याला विरोधच करूं. सुदैवानें असा विरोध करण्याचें काम आतां लोकांवर फारसें पडण्याचा संभवच नाहीं. कारण सोनारानें कान टोंचावा त्याप्रमाणें बटलर कमिटीच्या रिपोर्टानें तें काम परस्परच केलें आहे. या दृष्टीनें कमिटी नेमून घेण्याचा संस्थानिकांचा उपद्व्याप त्यांच्याच अंगाशीं आला, व सरकारनें त्यांच्याकडून कमिटीची मागणी करवून शेवटीं आपलेंच काम साधलें!

ज्या कमिटीवर संस्थानिकांचा एकहि प्रतिनिधी नाहीं अशी कमिटी संस्थानिकांनीं मुळांत मान्यच करावयास नको होती. तिजवर त्यांनीं बहिष्कार घालावयास पाहिजे होता. पण संस्थानिकांच्या सल्लागारांच्या कळपांत उघड किंवा गुप्त रूपानें कोण कोण शिरले आहेत हें ज्याला माहीत आहे त्याला या कमिटीचा खटाटोप असा फसला याचें आश्चर्य वाटत नाहीं. मूळ कमिटीची कल्पना मनांत भरवून देणारा साहेब, सल्लागार साहेब, वकील साहेब, कमिटीचा सभासद साहेब–असा साहेबलोकांचा चौफेर घेरा असल्यामुळें हिंदुस्थान सरकाराविरुद्ध उभारलेलें संस्थानिकांचें या कमिटीचें बंड यशस्वी होईल अशी कल्पनाही खुळेपणाची होय. पण लक्षावधि रुपयांच्या खर्चानें आतां तें प्रत्ययाला येईल. असेंहि म्हणतात कीं, नरेंद्र–मंडळाच्या सभेंत किंवा इतर व्यवहारांत संस्थानिकांनीं गव्हर्नर–जनरल–इन–कौन्सिल असेच शब्द वापरले पाहिजेत, 'व्हाइसरॉय' म्हणजे 'राजप्रतिनिधी' असा शब्द वापरावयाचा

नाहीं अशी संस्थानिकांना ताकीद देण्यांत आलेली आहे! कारण राजप्रतिनिधीशीं संबंध आला कीं, तो राजाशींच आला व तेंच तर संस्थानिकांचें म्हणणें व मागणें. म्हणून तोंडच्या चुकीच्या शब्दप्रयोगानें आपलें कार्य संस्थानिक भोळेपणानें साधूं पहातील तर तें साधूं देऊं नये अशी दक्षता सरकार बाळगीत आहे.

संस्थानिकांचा दुःस्वास किंवा त्यांचा तेजोभंग करण्याचें आम्हांला कांहींच कारण नाहीं. त्यांनीं आपल्या प्रजेला स्वराज्याचे अधिकार दिले, व हिंदुस्थान-सरकारशीं अखिल भारतीय स्वरूपाच्या कार्यांत स्नेहपूर्वक व मनःपूर्वक सहकारिता केली म्हणजे मग त्यांचा संबंध राजे बादशहाशीं जडला तरी आमची तक्रार नाहीं. अडचणीचा प्रश्न इतकाच कीं, संस्थानिकांनीं आपल्या राज्यांत जुलूम केला, प्रजेचा छळ आरंभिला, एकतंत्रीपणा गाजविला तर त्याच्या परिहाराचें साधन कोणतें? तें एक स्वतः संस्थानी प्रजेच्या तरी हातांत पाहिजे किंवा वरिष्ठ इंग्रज सरकारच्या तरी हातीं पाहिजे. संस्थानी प्रजेवरच जर त्यांच्या संरक्षणाचें कार्य सोंपवावयाचें असेल तर त्यालाहि आमची हरकत नाहीं. प्रजा तें करण्याला समर्थ आहे. मात्र मग संस्थानिकांनीं इंग्रज सरकाराकडे पोलिस किंवा लष्कर यांची याचना करूं नये. पण इकडे संस्थानांत दंगाधोपा झाला तर तो मोडण्याकरितांहि सरकारकडे पोलिस व लष्कर मागावयाचें, आणि संस्थानी प्रजेवर जुलूम कां करतां असें मात्र हिंदुस्थान सरकारनें विचारावयाचें नाहीं व कारभारांत हात घालावयाचा नाहीं, असा दुहेरी आपमतलबी डाव संस्थानिक आमचे असले तरी, त्यांना कोण साधूं देईल? स्वातंत्र्यच हवें तर तें स्वाभिमानी ब्रीद पुरें तरी पाळा. "राजा लुटि जरी प्रजाजनाला, माता मारी निज बाळाला, बंधु विकी जरि निज भगिनीला शरण कुणा जावें?" हें रडगाणें गाण्याचे जुने दिवस आतां गेले. 'राजानें लुटलें आणि नवऱ्यानें कुटलें दोनहि सारखींच' ही म्हणहि नव्या मन्वंतरांत लागू पडणार नाहीं. स्त्रीला कुटणारा नवरा आणि प्रजेला लुटणारा राजा दोघांनींहि आतां संभाळून राहण्याचे व आपलें वर्तन सुधारूनच जगण्याचे दिवस आले आहेत. याकरतां खरें स्वातंत्र्य मागणाऱ्या संस्थानिकांनीं वेळ पडल्यास प्रजेशीं आपल्याच बळावर दोन हात करण्याची स्वाभिमानी बुद्धि तरी बाळगिली पाहिजे. पण खरा मार्ग तो नव्हेच. स्वतःचे स्वातंत्र्याची मर्यादा दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या मर्यादेनें मर्यादितच झालेली असते

हें संस्थानिकांनींहि लक्षांत ठेविलें पाहिजे. स्वातंत्र्य ही वस्तु सापेक्षच होय, निरपेक्ष नाहीं म्हणून त्यांनीं प्रजेला स्वराज्याचे अधिकार देऊन हिंदुस्थान-सरकाराशीं सख्य ठेवावें व सहकारिता करावी हेंच श्रेयस्कर होय. समुद्रांत राहून माशाशीं वैर करूं नये म्हणतात, पण मगर, सुसरी व वरुण देवता यांच्याशीं वैर करण्याची गोष्ट संस्थानिकांनीं कां बोलावी ?

## खुंटा हालवून बळकट केला*

बरेच दिवसांपासून हिंदी संस्थानिकांनीं ब्रिटिश सरकारच्या मागें भुणभुण लाविली होती कीं, "तुमच्या आमच्या राजकीय संबंधाची एकदां तपासणी व उजळणी होऊं द्या हो". सरकारहि कंटाळून जाऊन म्हणालें, "ठीक आहे. तपासणीउजळणी पाहिजे ना? मग होऊनच जाऊं द्या. आम्ही त्याला तयार आहों". ही कबुली ऐकून संस्थानिकांना वाटलें कीं आपण जिंकलें. पण ही तपासणी-उजळणी करण्याकरितां सरकारनें काय केलें? स्वतःच्या मानसपुत्रांचीच एक कमिटी नेमली. कमिटीचे अध्यक्ष कोण तर सर हारकोर्ट बटलर! म्हणजे इरसालांतले इरसाल धूर्त मुत्सद्दी. त्यांच्या जोडीला दोन कायदेपंडित म्हणून दिले. पण तेही इंग्रजच. जणूं काय हिंदुस्थानांत कायदे-पंडित नव्हते. पण स्वतः संस्थानिकहि असे भले कीं त्यांचा हिंदी कायदे-पंडितांपेक्षां विलायती कायदेपंडितांवरच अधिक विश्वास! पण या सर्व विश्वास-निधींनीं अखेर संस्थानिकांना गोता दिला व सूर्याचीं पिलें दाखविलीं. संस्थानिकांना आपल्या चुकीचा सुगावा लागला. पण दुर्दैवानें तो फार उशीरा लागला. ऊंस चरकांत निम्याहून अधिक पिळला गेल्यावर पश्चात्ताप होऊन काय उपयोग?

वास्तविक संस्थानिकांना आपण बादशाही सरकारच्या बरोबरीचे अशी जाणीव किंवा भावना होती तर असली कमिटी त्यांनीं मान्य कां केली?

---

* केसरी ता. २३ एप्रिल १९२९.

तिच्यापुढें पुरावा देण्याला हे कां तयार झाले ? बरोबरीच्या लोकांचा वाद तोडणें किंवा इनसाफ करणें हें काम बरोबरीच्या लोकांनींच केलें पाहिजे. म्हणजे कमिटीवर जसे सरकारचे प्रतिनिधी तसेंच संस्थानिकांचेही प्रतिनिधी नेमावयास पाहिजे होते. किंवा " आमचीं संस्थानें म्हणजे स्वतंत्र राष्ट्रें " अशीच भावना जर संस्थानिकांची होती, आणि तहनाम्यासारखे मातबर कागदपत्र अर्थ लावण्याकरितां पुढें यावयाचे होते तर " हा सर्व वाद राष्ट्र-संघाच्या एखाद्या कमिटीकडे सोंपवा " असा आग्रह संस्थानिकांनीं धरावयास पाहिजे होता. जगांतल्या कोणत्याहि फाटक्यातुटक्या राष्ट्रांचीं भांडणें जर राष्ट्रसंघापुढें येतात, तर ब्रिटिश सरकारचे बरोबरचे दोस्त म्हणविणाऱ्या या संस्थानिकांचें भांडणहि राष्ट्रसंघाकडे जाण्यास कोणती हरकत होती ? किंवा आणखी तिसराहि एक मार्ग होता. तो असा कीं, ब्रिटिश सरकार व संस्थानिक यांनीं लेखी राजीनामे देऊन, उभयतांच्या संमतीनें पंच नेमून, त्यांच्याकडून निकाल करून घ्यावयास पाहिजे होता. पण यांपैकीं कांहींच घडलें नाहीं.

आम्हां लहानसहान लोकांचें उदाहरण या मोठ्या मातबर संस्थानिकांनीं गिरवावें असें आम्ही म्हणणार कोण म्हणा ! पण बटलर कमिटीची ही दोषास्पद घटना पाहतांच त्यांनीं तिजवर बहिष्कार टाकावयास पाहिजे होता. कमिटीपुढें जाण्याचेंच नाकारावयास पाहिजे होतें. पण एवढा जोर कोठें आहे? बोलूनचालून संस्थानिक हे आजवर ताबेदारींत दिवस काढलेले. पोलिटिकल एजंट व रेसिडेंट यांना देवासारखें वागवून स्वतः त्यांच्या पायाशीं यांनीं लोटांगणें घेतलेलीं. पोलिटिकल खात्यांतील चित्रगुप्तानें यांच्या वहीखात्यांतील पापकर्मांचा उतारा काढून पुढें ठेवण्याची धमकी घालतांच क्षमस्व म्हणून हे मोकळेच झालेले तोफांची सलामी वाढविण्याकरितां हे हपापलेले. कोणत्या एखाद्या फाटक्या साहेबाचीहि सरबराई करून त्याची मिजास संभाळण्यांत खर्ची पडलेले. अशांच्या हातून कमिटीवर बहिष्कार कसा पडणार ? बहिष्काराला जें भांडखोरीचें स्वरूप येतें तें उघडपणें स्वीकारण्याइतका धीटपणा यांच्या अंगीं कोठून येणार ? तात्पर्य, "कमिटी नेमतां, पण ती अशी काय म्हणून ?" असा प्रश्न एकाहि संस्थानिकानें केला नाहीं. फिर्यादीला निघावें, आणि प्रतिवादी नेमील त्या व प्रतिवादीचा पगार खाणाऱ्या न्यायाधीशाचा अधिकार निर्णयार्थीं मान्य करावा हा कोण शहाणपणा ?

वास्तविक चौकशी कमिटी नेमण्याचाच अधिकार जर स्वतंत्रपणें ब्रिटिश सरकारचा म्हणून संस्थानिकांनीं मुळांत मान्य केला, तर त्या सरकारला संस्थानांच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालण्याचा अधिकार आहे कीं नाहीं हा मुद्दाच उपस्थित होऊं शकत नाहीं. कमिटीची घटना सरकारनें केली तीच जर मान्य करावयाची होती तर, "तुमच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालण्याचा अधिकार आम्हाला आहे," हा जो हक्क प्रथमपासून ब्रिटिश सरकार सांगत आलें आहे तोच संस्थानिकांनीं मान्य केला असता म्हणजे येवढी कमिटी व येवढी चौकशीच नको होती. पण असले कागदी घोडे व्यर्थ नाचविल्या-शिवाय सर लेस्ली स्कॉटसारख्या गोऱ्या बॅरिस्टरांच्या घरांत गरीब संस्थानी प्रजेचे लक्षावधि रुपये जाणार कसे? व उत्तर—हिंदुस्थानांतले उपद्व्यापी महत्त्वाकांक्षी लब्धप्रतिष्ठित शिष्ट संस्थानिक, कर्नल हस्करासारखे त्यांचे हस्तक व प्रो. रशब्रुक वुइल्यम्ससारखे उभयान्वयी स्वार्थसाधक यांचें स्तोम माजणार कसें? व चंदी चालणार कशी? कुत्रें पीठ खातें पण तें गरिबांच्या घरीं आंधळा दळीत असतां. तथापि श्रीमंतांच्या घरीं डोळस दळीत असतांहि कुत्र्यानें खुशाल पीठ खावें!

बरें, आम्हीं हें असें न म्हणावें तर काय करावें! मध्यवर्ती ब्रिटिश सरकारला संस्थानिकांच्या कारभारांत विशेष प्रसंगीं हात घालण्याचा अधिकार आहे व असला पाहिजे, यांत खरोखर शंका येण्याला कांहीं तरी जागा होती का? पण दिल्या कोणी तरी थापा! चढविलें कोणी तरी घोड्यावर! म्हणून सारासार न पाहतां "आम्ही स्वतंत्र व तहानें तुमच्या बरोबरीचे म्हणून अधिकारानेंहि बरोबरीचे" असें म्हणून संस्थानिक हुरळून जाऊन बरळूं लागले. तोंडांतला काटेलगाम चघळीत असतां, व तोंडाला आंतून रक्त येत असतां, घोड्यानें म्हणावें कीं, "लगाम इकडे एका टोकाला मीं तोंडांत धरला व तिकडे दुसऱ्या टोंकाला स्वारानें हातांत धरला. मिळून कांटेलगामाच्या संबंधानें आम्ही दोघे सारख्या अधिकाराचेच ठरतों." तशाच प्रकारें संस्थानिक हे इंग्रज सरकारची बरोबरी सांगूं लागले. एका तहावर दोघांच्या सह्या म्हणून दोघे बरोबरीचे! 'तुम्ही आम्ही दोस्त' असें तहांत म्हटलें म्हणुन बरोबरीचे! 'तुमचा आमचा स्नेह राहावा' असें तहांत म्हटलें म्हणून बरोबरीचे! पण हे तह कोणत्या प्रसंगीं कोणत्या परिस्थितींत झाले? त्या वेळीं वरिष्ठ व बलिष्ठ कोण होता? इत्यादि

गोष्टी ऐतिहासिक दृष्टया पाहूं जाणाराला संस्थानिकांच्या धाडसाचें आश्चर्यच वाटेल.

आज मोठ्यांतले मोठे संस्थानिक घेतले तरी त्यांचा पूर्वीचा इतिहास काय सांगतो? निजाम सर्वांत मोठे. पण यांच्या संरक्षणाकरितां इंग्रजांनीं सैन्य ठेवावें म्हणून यांनीं इंग्रजांना या सैन्याच्या खर्चाकरितां आपला मुलूख तोडून दिला. आणि हे म्हणे इंग्रजांच्या बरोबरीचे. कारण तह झाला! म्हैसूरचें संस्थान मोठें. पण हैदरानें वाडियार राजापासून जिंकून घेतलेलें राज्य, इंग्रजांनीं हैदराच्या मुलापासून परत जिंकून घेऊन, तें वाडियारांना बक्षिस दिलें. आणि म्हणे म्हैसूरचे राजे इंग्रजांच्या बरोबरीचे. कारण तह झाला! शिंदे व होळकर यांचा इंग्रजांनीं युद्धांत पराभव केला. यांचें इतकें तरी राज्य राहिलें ही कृपा. आणि म्हणे शिंदे होळकर इंग्रजांच्या बरोबरीचे. कारण तह झाला! बडोदेंकर कांहीं इंग्रजांशीं कधीं लढले नाहींत. पण एक वेळचे इंग्रजांच्या बरोबरीचे जे पेशवे त्यांच्या मांडलिकांचे मांडलिक हे गायकवाड. आणि म्हणे बडोदेकर इंग्रजांच्या बरोबरीचे. कारण तह झाला! उत्तर हिंदुस्थानच्या रजपूत राजांनीं मराठ्यांपासून बचाव व्हावा म्हणून इंग्रजांचा आश्रय केला व आपल्या रियासती संभाळल्या. आणि म्हणे रजपूत राजे इंग्रजांच्या बरोबरीचे. कारण तह झाला! मग बाजीराव पेशवे यांना पळतां भुई थोडी झाली असतां, स्वराज्याचें उदक मालकमसाहेबाच्या हातावर घालून ब्रह्मावर्तास जाऊन ते जहागीर घेऊन राहिले, त्यांनींहि म्हणावें कीं आम्ही इंग्रजांच्या बरोबरीचे. कारण तह झाला.

तात्पर्य, तहाचा आधार सांगून आपणाला इंग्रजांच्या बरोबरीचे म्हणवून घेण्यांत या प्रकरणांत संस्थानिकांनीं स्वतःला हास्यास्पद मात्र करून घेतलें. आणि "आम्ही आमच्या राज्यांत वाटेल तसा नंगा नाच घालूं, पण आमच्या कारभारांत इंग्रज सरकारनें हात घालतां कामा नये, कारण आम्ही बरोबरीचे दोस्त, कारण तह झाला!" असें म्हणून संस्थानिकांनीं जेव्हां अप्रयोजकपणाला फाजील अधिकारप्रियतेची भर घातली तेव्हां तर ती हास्यास्पदता सहजच वाढली. शिवाय हा बरोबरीचा हक्क सांगणारांत जेव्हां मोठ्याबरोबर छोटे संस्थानिकहि सामील झाले तेव्हां तर विचारूंच नका. लोकांना हसूं आवरेना. एका मोराबरोबर किती तरी लांडोर्‍या नाचल्या. खाकी युनि-

फार्म घातले कीं सगळे योद्धे वीरच. मग तो सवाल्टर्न असो, सार्जंट असो, कीं सेनापति असो. त्याचप्रमाणें संस्थानिक म्हटलें कीं सगळेच स्वतंत्र राजे, इंग्रजांच्या अगदीं बरोबरीचे. कारण तह या नांवाच्या कसल्या तरी कागदा-वर यांची सही आहे! मग तो दहावीस गांवांचा धनी असो किंवा दहावीस जिल्ह्यांवर राज्य करो. देव्हाऱ्यांत बसला तो देव. मग तो विष्णु असो नाहीं तर शंख असो! कांहीं तरी तारतम्य पाहावयाचें होतें. पण पुढारी संस्था-निकांनीं वर्गणीचे लाखों रुपये जमविण्याकरितां सर्वांना एका नांवाखालीं ओढलें व एका माळेंत गोवलें.

संस्थानिकांनीं प्रथम इंग्रजांशीं तह केले तेव्हां ते युद्धांत पराभव पावून किंवा इंग्रजांचा आश्रय मिळविण्याकरितां, किंवा इतरांच्या संकटांत आपला हात धुवून घेऊन आपला मुलूख वाढविण्याकरितां तह केले. बरोबरीच्या नात्यानें लढून, चार लढाया हरून पण चार जिंकून, दोघेहि दमले म्हणून समान–मानास्पद रीतीनें तह केला असा कोणता संस्थानिक तो कोणी दाख-वून द्यावा. शिवाय यानंतर इंग्रजांची सत्ता किती वाढत गेली, व त्या मानानें संस्थानिकांची किती संपुष्टांत येत चालली हेंहि दिसतच आहे. बरें, बरोबरीचें नातें यांच्या तरी मनांत खरोखर वागत होतें म्हणावें, तर इंग्रजांच्या पहि-ल्याच अतिक्रमणाबरोबर झणकारा येऊन व राज्याची आशा सोडून, कोणत्या संस्थानिकबहादूरानें इंग्रजसरकारचा हात धरून त्यांना हटकून जाब विचारला? तहाच्या आधारावर बरोबरी सांगतात, पण त्या तहाच्या कागदांतील शब्दांवर अतिक्रमणाच्या पिवडीचे थरावर थर बसले तेव्हां हे गप्प बसले. आणि खालसां-तील प्रजेनें व संस्थानी प्रजेनें स्वराज्याची चळवळ सुरू करून ती थोडी रंगाला आलेली दिसतांच संस्थानिकांना आपल्या स्वातंत्र्याची व बरोबरीच्या हक्काची जाणीव झाली! ही चळवळ किंवा या स्वराज्याच्या गोष्टी उत्पन्न झाल्या नसत्या तर, हे संस्थानिक इंग्रज सरकारची पायमल्ली अशीच सोशीत राहिले असते यांत बिलकुल शंका नाहीं.

बरें, या चळवळीचा फायदा घ्यावासा वाटला तर तो शहाणपणानें तरी घ्यावयाचा होता. म्हणजे उदाहरणार्थ, संस्थानिकांनीं इंग्रजांना असें म्हणावयाचें होतें कीं 'पहा हो बाबा, आतां हें स्वातंत्र्याचें नवें युग अवतरत आहे. सर्वांनांच स्वातंत्र्य हवेंसें वाटतें व देणें योग्यहि आहे. आमची काय

तुमची काय! प्रजा ही येथून तेथून सारखीच. तुम्ही सुधारणांना सुरवात केली तशी आम्हीहि पण आमच्या राज्यांत करूं लागलों आहों. कालांतरानें दोन्ही प्रजा स्वराज्यनिष्ठ सुराज्य भोगोत. तुम्ही काय आम्ही काय ट्रस्टी! मालकच सज्ञान व कर्ता झाला तर आमचें कामच झालें. मुलगे संसार सुरळीत करूं लागलेले पाहून कोणत्याहि बापाला बरेंच वाटावें. अशा रीतीनें ध्येयच पदरांत पडलें, म्हणजे आम्हीं होऊनच अधिकारसंन्यास केला, तर आमच्या हातून गैरव्यवस्था कसली होणार? आणि तुम्ही तरी आमच्या अंतर्व्यवस्थेंत हात कशाकरतां घालणार? अशा रीतीनें अधिकारसंन्यासानें तुमची आमची बरोबरी होईल." व तीच खरी बरोबरी!

पण असें न म्हणतां संस्थानिक इंग्रज सरकारला काय म्हणूं लागले माहित आहे? ते म्हणूं लागले "स्वराज्याची ही चळवळ तुमच्या व आमच्याहि मुळावर आली आहे. तुम्हाला आपल्या प्रजेला स्वराज्यदान करावयाचें असेल तर खुशाल करा. आर्धी करूं नका हेंच उत्तम. कारण आमच्या मनांत हें स्वराज्यदान करावयाचें येत नाहीं. आणि तुम्ही आम्ही दोस्त! तुमचा आमचा तह! तुमची आमची बरोबरी! तेव्हां तुम्ही आम्ही एकविचारानें वागावें हेंच योग्य. पण तुम्ही पडलां पाश्चात्य राष्ट्राचे लोक. तुमच्या देशांत लोकसत्ता वावरते म्हणून इकडेहि, होय नाहीं म्हणतां म्हणतां लोकांना राजसत्ता देण्याचा मोह तुम्हाला कदाचित् आवरणार नाहीं. कदाचित् खोटा बहाणा करतां करतांच घसरूनहि जाल, पण आमचें तसें नाहीं. इंग्लंड तें इंग्लंड, हिंदुस्थान तें हिंदुस्थान! आमची खानदानी आमची परंपरा जुलुमी एकतंत्री सत्तेची आहे. तुमच्यापासून इतर वाईट गोष्टी कितीहि शिकलों तरी स्वराज्यदानाची चांगली गोष्ट आम्ही शिकणार नाहीं. आमची प्रजा व आम्ही पाहून घेऊं. पण कृपा करा आणि आम्ही आमच्या राज्यांत काय करतों, कसे वागतों इकडे पाहूं नका. आणि आमच्या कारभारांत हात घालूं नका. आणि या आमच्या मागणीला आधारच दाखवावयाचा तर तह आहेतच."

पण सुदैवानें संस्थानिकांच्या या म्हणण्याला इंग्रज सरकारनें म्हणजे बटलर कमिटीनें थारा दिला नाहीं. आणि संस्थानी अंतर्व्यवस्थेंत हात घालण्याचा इंग्रज सरकारचा हक्क तर तिनें स्पष्टपणें प्रस्थापित केलाच, पण संस्थानिकांनीं आपल्या राज्यांत राजकीय सुधारणा करण्याच्या मार्गाला लागावें असा नाजुक उपदेशही केला आहे. आतां कमिटीनें आजच हिंदुस्थानांतील

कायदेमंडळांच्या स्वाधीन संस्थानिकांना कां केलें नाहीं, याचें कारण उघड आहे. या आमच्या कायदेमंडळांत खरें स्वराज्यच अजून उतरलें नाहीं. हा आंबा अजून आंबट आहे. व्हाइसरॉय हेच अजून शिरजोर, सर्वसत्ताधीश व बेजबाबदार आहेत. तेव्हां संस्थानांवरचा ताबाहि तूर्त त्यांच्याच हातीं राहणें योग्य आहे. व्हाइसरॉय यांचे हक्क कमी होतील, ते गव्हर्नर–जनरल–इन कौन्सिल यांच्या हातीं जातील, आणि हें कौन्सिल लोकांना सर्वस्वी जबाबदार होईल, तेव्हां पहातां येईल. आजच उगीच कशाला नसत्या गोष्टीची चिंता! मरणाच्या आधीं उगीच कोण कोणाला सरणांत घालतो? कसेंहि असो; संस्थानावर ब्रिटिश कायदेमंडळाचा ताबा चालावा कीं नाहीं हा पुढचा प्रश्न आहे; व हिंदी प्रजा तो प्रश्न यथाकाल सुचेल तसा सोडवीलच. पण आज संस्थानी प्रजेचा जीव थोडासा तरी भांड्यांत पडेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण त्यांना वाली कोणीच नव्हता. यामुळें इंग्रज सरकारला संस्थानांच्या अंतर्व्यवस्थेंत विशेष प्रसंगीं हात घालण्याचा अधिकार आहे असें बटलर कमिटीनें ठरविलें हा उपकारच झाला. संस्थानिकांनीं सर लेस्ली स्कॉट प्रभृतींना मलिद्दा चारण्यांत व बटलर कमिटीसंबंधाची कारवाई करण्यांत वस्तुतः संस्थानी प्रजेचाच पैसा खर्च झाला. पण त्याचा उपयोग प्रजेला अशा अप्रत्यक्ष रीतीनें झाला म्हणावयाचा!

यावर कोणी अशी शंका घेईल कीं "आपल्या देशी राजांच्या कारभारांत परक्या इंग्रज सरकारनें हात घालावा असें म्हणणें हें संस्थानी प्रजेच्या राजभक्तीला शोभत नाहीं." खरें आहे. पण संस्थानिक जेव्हां राजभक्ति निर्दोष टिकविण्यासारखे वागतील तेव्हां हा दोष पदरीं येईल! संस्थानिक हे इंग्रज सरकारशीं संस्थानी प्रजेच्या हिताकरितां जेव्हां झगडण्याला कंबर कसून सिद्ध होतील, तेव्हां संस्थानी प्रजाहि हांक न मारतांहि आपल्या राजाच्या पाठीशीं उभी आहे असें त्यांनीं खुशाल समजावें व वाटेल तर प्रसंगविशेषीं अनुभवहि घेऊन पाहावा. पण आधीं संस्थानी कारभारांत फारच मोठा अन्याय किंवा गोंधळ झाल्याशिवाय सरकार हात घालीत नाहीं हें एक. आणि संस्थानिक इंग्रज सरकारच्या हक्काला विरोध करतात तो, असला अन्याय किंवा गोंधळ झाला तरी तोहि करण्याचा हक्क स्वतःला असला पाहिजे या सबबीवर व तहाच्या जोरावर करितात. मिळून हेतु दुष्ट व तर्कपद्धतीहि दुष्ट. याच्या उलट, केवळ स्वदेशप्रेमानें स्वदेशभक्तीनें एखादा मातबर संस्थानिक इंग्रजांशीं

हक्कासाठीं झगडण्याला सिद्ध होऊं द्या, आणि त्या तल्यारयांत तें प्रेम व ती भक्ति प्रजेला स्वराज्याधिकार देण्याच्या मार्गानें व्यक्त करूं द्या, म्हणजे मग पहा सगळें टिकाकार जग त्याला वश होईल, आणि प्रजाहि आपलें तनमनधन त्याला अर्पण करील. इटालीच्या इतिहासांत पीडमाँटचा संस्थानिक स्वदेश-प्रेमानें आस्ट्रियन राजसत्तेशीं झगडण्याला उभा राहिला, तेव्हां प्रजेंत गॅरि-बाल्डीसारखे राजभक्त लोक कसे निर्माण झाले याचा इतिहास तरी आमच्या संस्थानिकांनीं एकवार नीट वाचून पहावा. तसलें कांहीं न करतां हे स्वतः-पुरतें स्वातंत्र्य मागणार ! आणि तेंहि आपल्या प्रजेवर अंमल गाजविण्याला ! घरीं नवरा आपल्या बायकोला मारूं लागला तरी शेजाऱ्याला मध्यें पडण्याचा अधिकार आहे. पिनलकोडानेंहि तो दिला आहे. असें असतां " आम्ही प्रजेवर काय वाटेल तसा जुलूम करूं, पण तुम्ही हात घालण्याचें कारण नाहीं " असें संस्थानिक लोक, त्यांचे अधिराजे जे इंग्रज सरकार त्याला, कोणत्या तोंडानें सांगणार ?

समाप्त.